# मराठी

# युवकभारती

## इयत्ता बारावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# मराठी

# युवकभारती

## इयत्ता बारावी





२०२०

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.**


Q8I8G7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. शिवाजी तांबे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्रीमती स्वाती ताडफळे (सदस्य)
श्री. ज्योतिराम कदम (सदस्य)
श्री. हरी नारलावार (सदस्य)
श्री. प्रकाश बोकील (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य–सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. प्रवीण खैरे
श्रीमती वैदेही तारे
श्रीमती प्रांजली जोशी
डॉ. नंदा भोर
श्री. विजय राठोड
डॉ. सुहास सदाव्रते
डॉ. विनोद राठोड
डॉ. माधुरी काळे
श्रीमती शीतल सामंत
श्रीमती सुचेता नलावडे
श्री. जगदीश भोईर
डॉ. पांडुरंग कंद
श्री. ललित पाटील
डॉ. सुजाता शेणई
श्रीमती रेणू तारे
डॉ. महादेव डिसले
श्रीमती आरती देशपांडे
डॉ. जगदीश पाटील

**संयोजन :**
**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**चित्रकार :**
राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ :**
विवेकानंद पाटील

**अक्षरजुळणी :**
भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :**
सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**मुद्रक :**
M/s. Vijayalaxmi Creations, Nagpur

**मुद्रणादेश :**
N/PB/2020-21/1.00

**कागद :**
७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह

**प्रकाशक**
**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्ही आता बारावीत आलात! तुमचे मन:पूर्वक स्वागत!! मराठी 'युवकभारती' हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती सोपवताना अतिशय आनंद होत आहे.

आपल्या जीवनात भाषेला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. मराठी आपली राजभाषा आहे. त्यामुळे वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात मराठीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी भाषेवर तुम्ही जितके चांगले प्रभुत्व मिळवाल तितके जीवनात यशस्वी होण्याच्या अधिकाधिक संधी तुम्हांला मिळत राहतील. त्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकेल अशा प्रकारे या पाठ्यपुस्तकाची रचना केलेली आहे.

या पाठ्यपुस्तकात सहा विभाग आहेत. पहिल्या दोन विभागातील गद्य-पद्य पाठांच्या माध्यमातून नामवंत साहित्यिकांच्या साहित्यिक कृतींचा परिचय करून घेता घेता त्या साहित्यांमधील संस्काराने तुमची भाषा ही उत्तरोत्तर समृद्ध होत जाईल. हे साहित्य तुमच्या वैचारिक आणि कल्पनाशक्तीच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल. या साहित्यामधील आशय तुम्हांला आजच्या जीवनातील समस्यांची जाणीव करून देईल तसेच साहित्यिक कृतींमधील सौंदर्याचा आनंद घेत आपले जीवन अनुभवसमृद्ध करण्याचा वस्तुपाठही तुम्हांला मिळेल. चित्रांमुळे पाठ्यपुस्तकाचे स्वरूप अधिक आकर्षक झाले आहे. त्यामुळे आशयाचे आकलन अर्थपूर्ण आणि सुलभ होण्यास मदत होईल.

बारावीमध्ये तुम्हांला 'कथा' हा साहित्यप्रकार अभ्यासण्याची संधी मिळत आहे. या साहित्यप्रकाराची ओळख करून घेताना तुम्हांला या साहित्यप्रकाराच्या वैशिष्ट्यांनी युक्त दोन नामवंत कथाकारांच्या कथांचाही आस्वाद घेता येईल.

मराठी भाषेच्या उपयोजनाचे क्षितिज दिवसेंदिवस विस्तारत आहे. त्यामधून अनेक व्यावसायिक संधी निर्माण होत आहेत. त्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतील अशा चार घटकांचा समावेश 'उपयोजित मराठी' या विभागात केला आहे. गद्य-पद्य पाठ आणि त्यांच्या स्वाध्यायकृतींमधून विकसित झालेल्या भाषिक कौशल्यांचे वेगळ्या प्रकारे उपयोजन करण्याची संधी या विभागात उपलब्ध करून दिली आहे.

'व्याकरण आणि लेखन' या भागांतील व्याकरणाच्या घटकांची मांडणी कार्यात्मक पद्धतीने केल्यामुळे ते अधिक आकलनसुलभ झाले असल्याचे तुमच्या लक्षात येईल. हे व्याकरण घटक तुम्हांला भाषा अभ्यासासाठी आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही मार्गदर्शक ठरतील. याच भागात तुम्हांला तुमचा परिचित निबंधही भेटेल. उत्तम निबंध कसा लिहावा याचे अगदी नेमके मार्गदर्शन येथे तुम्हांला मिळू शकेल.

'परिशिष्ट' आणि 'शब्दार्थ' तुम्हांला भाषिक समृद्धीची दिशा दाखवतील.

'पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाविषयी' या पृष्ठांमधील मार्गदर्शनामुळे तुमच्या अभ्यासास नेमकी दिशा मिळण्यास मदत होईल.

पाठ्यपुस्तकातील साहित्याचा आणि भाषेचा बारकाईने केलेला अभ्यास तुम्हांला स्वमत, अभिव्यक्ती आणि उपयोजन यांच्या विकासाच्या दृष्टीने अधिक समर्थ करू शकेल, असा विश्वास वाटतो.

**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

इयत्ता बारावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात अशी अपेक्षा आहे.

| क्षेत्र | क्षमता |
| --- | --- |
| श्रवण | • श्राव्य, दृक्-श्राव्य माध्यमांतील व्याख्याने, चर्चा, परिसंवाद, मुलाखती, कथाकथन, काव्यवाचन कार्यक्रम, अभिवाचन इत्यादींमधील भाषिक वैशिष्ट्ये आणि वैचारिक मांडणी चिकित्सकपणे समजून घेणे.<br>• सार्वजनिक ठिकाणच्या सूचना, आवाहने, निवेदने यांची यथार्थता विचारात घेऊन योग्य तो प्रतिसाद देणे.<br>• औपचारिक व अनौपचारिक ठिकाणी होणारी व्याख्याने, संवाद-संभाषणे, परिसंवाद, कार्यशाळा यांमधील संदर्भांचा चिकित्सकपणे अर्थ लावता येणे व स्वत:ची भाषा अधिकाधिक विकसित करण्याचा प्रयत्न करणे.<br>• भाषिक कौशल्यांच्या समृद्धीसाठी विविध श्राव्य, दृक्-श्राव्य माध्यमांचा माहितीचे स्रोत म्हणून जाणीवपूर्वक उपयोग करणे.<br>• आंतरजालावरून लिंक्स, क्यू. आर. कोड, व्हिडिओज, यू-ट्यूब व प्रसारमाध्यमे इत्यादी दृक्-श्राव्य माध्यमांतून अपेक्षित व अध्ययनपूरक संदर्भांचा शोध घेऊन ते वापरणे. |
| भाषण-संभाषण | • विविध साहित्यकृतींवर आधारित चर्चेत सहभागी होताना साधक-बाधक विचारांच्या मांडणीसाठी विषयानुरूप भाषा परिणामकारकतेने वापरणे.<br>• अभ्यासलेल्या साहित्यप्रकारांच्या सर्वसाधारण वैशिष्ट्यांबाबत चर्चा करणे.<br>• वाचलेल्या पुस्तकाची माहिती वा एखाद्या कथेचा, कवितेचा सारांश, कवितेतील ओळींचा अर्थ सांगणे; तसेच गीत, कविता, भाषण सादर करणे.<br>• 'उपयोजित मराठी' या भागात अंतर्भूत असलेल्या घटकांवर आधारित कृतींवर चर्चा करता येणे.<br>• दिलेल्या विषयाला अनुसरून स्वत:चे स्वतंत्र विचार संदर्भासह मुद्देसूदपणे मांडता येणे.<br>• भाषण-संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये आत्मसात करून त्याचा व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने आत्मविश्वासपूर्वक वापर करता येणे. |
| वाचन | • विविध साहित्यकृतींचे अभिवाचन करणे. तसेच साहित्याच्या आस्वादासाठी वाचन करणे.<br>• संकेतस्थळावरील ई-बुक्स, ई-न्यूज आणि ई-साहित्य शोधून वाचन करता येणे व त्याचा योग्य ठिकाणी वापर करता येणे.<br>• स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मराठी भाषाविषयाशी संबंधित उपयुक्त घटकांचे अभ्यासपूर्ण वाचन करणे. |

- स्वत:चे भाषाविषयक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संबंधित उपयुक्त घटकांचे अभ्यासपूर्ण वाचन करणे. उदा., विविध नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, कोशवाङ्मय इत्यादी.
- पाठांचे आणि पाठांशी संबंधित मूळ साहित्यकृतीचे व संदर्भ साहित्याचे समजपूर्वक वाचन करणे.

**लेखन**

- पाठाच्या आशयाचे व त्या पाठातील विचारांचे आकलन करून घेऊन त्याबाबत स्पष्टीकरणासह आपले मत स्वत:च्या भाषेत समर्पक शब्दांत लिहिणे.
- काव्यपंक्तीतील काव्यसौंदर्य स्पष्ट करणे व पाठांतील भाषिक सौंदर्यस्थळे शोधून लिहिणे.
- आपले अनुभव, निरीक्षण आणि त्या अनुषंगाने केलेला विचार लेखनातून अभिव्यक्त करणे.
- दिलेल्या विषयावर निबंध लिहिता येणे.
- ‘उपयोजित मराठी’ या भागातील संबंधित घटकांवर आधारित कृती सोडवणे.

**अध्ययन कौशल्य**

- संदर्भासाठी कोशवाङ्मय अभ्यासता येणे.
- अनुभवलेल्या विविध घटनांसंदर्भात व्यापक अर्थाने अभिव्यक्त होता येणे.
- आंतरजालाचा वापर करून व्यवहार करता येणे.
- संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा उत्तमरीत्या कृतियुक्त वापर करता येणे.
- प्रसारमाध्यमांतून समोर येणाऱ्या घटकांचे सांगोपांग आकलन करून चिकित्सक मांडणी करता येणे.
- विविध सामाजिक अडसरांचे आकलन करून घेऊन त्यांच्या निर्मूलनासाठी स्पष्टपणे विचारांची मांडणी करणे.
- बहुभाषा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे.
- वाङ्मयीन उपक्रमाद्वारे अभिरुची घडवणे व सहभागातून वृद्धिंगत करणे.
- तंत्रज्ञान आणि आंतरजाल यांच्या योग्य वापरातून ‘स्व’ला अभिव्यक्त करून विकसित करता येणे.

**भाषाभ्यास व लेखन**

- भाषाभ्यास– वाक्यप्रकार व वाक्यरूपांतर, समास, प्रयोग, अलंकार ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
- निबंधलेखन– सुचवलेल्या विषयावर निबंधलेखन करणे.

# पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाविषयी...

बारावीचे ‘मराठी युवकभारती’ हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपल्या हाती देताना आनंद होत आहे. इयत्ता बारावीमधील मराठी भाषा विषयाच्या अध्ययन-अध्यापनाची उद्‌दिष्टे विचारात घेऊन क्षमता विधाने निश्चित केली आहेत आणि ती पाठ्यपुस्तकाच्या आरंभी दिली आहेत. क्षमता विधाने श्रवण, भाषण-संभाषण, वाचन, लेखन, अध्ययन कौशल्य आणि भाषाभ्यास व लेखन या सहा क्षेत्रांमध्ये विभागलेली आहेत. क्षमता विधानांचा संबंध पाठ्यघटकांशी आणि कृतींशी आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करताना क्षमता विधाने पाठ्यघटकांशी आणि कृतींशी पडताळून पाहावीत. त्यामुळे कोणकोणत्या घटकांमधून कोणकोणत्या क्षमता कशाप्रकारे विकसित होतील हे समजण्यास मदत होईल. तसेच क्षमतांचा अर्थ आणि व्याप्ती स्पष्ट होऊन पाठ्यपुस्तकातील घटक अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत होईल. शिवाय पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन पाठ्यघटकातील आशय आणि भाषा जीवनव्यवहाराशी कुठे आणि कशी जोडता येईल हेही समजू शकेल.

पाठ्यपुस्तकाच्या अनुक्रमणिकेत एकूण सहा भागांचा समावेश आहे. पहिल्या आणि दुसऱ्या भागात गद्य, पद्य घटक दिले आहेत. पाठ्यक्रमानुसार अपेक्षित भाषिक कौशल्यांचा विकास, साहित्यप्रकार, वयोगटानुरूप द्यावयाचे अनुभव आणि मूल्यमापनविषयक अपेक्षा विचारात घेऊन मराठीमधील नामवंत साहित्यिकांच्या दर्जेदार रचनांचा समावेश या पाठ्यपुस्तकामध्ये केला आहे. त्यामधून अपेक्षित भाषिक कौशल्यांचा विकास साधताना विद्यार्थ्यांवर सर्जनाचे संस्कार व्हावेत, अशी अपेक्षा आहे. या पाठांमधून गाभाघटक, जीवनकौशल्ये आणि मूल्यांचा परिपोष होईल.

गद्य पाठांमध्ये वैचारिक, ललित आणि विनोदी लेखांबरोबरच चिंतनशील, अनुभवकथनपर आणि चरित्रात्मक पाठांचा समावेश केला आहे. वेगाच्या आहारी जाण्याच्या अतिरेकावर भाष्य करताना ‘वेगवशता’ हा पाठ आजच्या तरुणाईला संयमाने जगण्याचा उपयुक्त कानमंत्र देतो. सध्याच्या व्यस्त आणि तणावग्रस्त जीवनात साध्यासुध्या दैनंदिन प्रसंगांतून आनंद मिळवत आनंदी राहणे हा स्वभाव कसा बनवावा, हे ‘आयुष्य... आनंदाचा उत्सव’ या पाठामधून उमगते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सीमेवर कर्तव्य बजावणारे सैनिक आणि भारतीय नागरिक यांमधील घट्ट भावबंध ‘वीरांना सलामी’ या पाठात अधोरेखित झाले आहेत. हा पाठ वाचल्यानंतर सैनिकांच्या समर्पण वृत्तीविषयी आपल्या मनात अभिमानाची आणि आदराची भावना नक्की निर्माण होईल. पहाटेच्या प्रहरी समेवर आलेले मन आणि त्यावेळी उलगडणारे सभोवतालच्या चराचर सृष्टीशी असणारे मानवाचे आदिम नाते ललितरम्य शैलीत उलगडून दाखवणारा ‘रेशीमबंध’ हा पाठ मनावर प्रसन्नतेचा शिडकावा करतो. दैनंदिन प्रसंग आणि अनुरूप शैलीतून अप्रतिम विनोदनिर्मिती साधताना ‘दंतकथा’ या ललितरम्य विनोदी लेखातून समृद्‌ध भाषेचे दर्शन लेखकाने घडवले आहे. योग्य वेळी जाणकारांचे मार्गदर्शन घेऊन, अखंड चिंतनशील आणि अध्ययनशील राहून कलेच्या क्षेत्रात यशस्वी कसे होता येते याचा प्रत्यय ‘रंगरेषा व्यंगरेषा’ या पाठातून आपल्याला येतो. हे सर्वच पाठ आशयाच्या दृष्टीने समृद्‌ध असून ते भाषाशैलीचे आणि भाषासमृद्‌धीचे उत्तमोत्तम नमुने समोर ठेवणारे आहेत.

पद्य पाठांमध्ये ‘बहु असोत सुंदर...’ या लोकप्रिय महाराष्ट्र गीताचा समावेश काव्यानंदासाठी केलेला आहे. भारतीय कृषी समृद्‌धीमधील स्त्रियांचे योगदान ‘रोज मातीत’ या लयबद्‌ध रचनेतून स्पष्ट होते. ‘रे थांब जरा आषाढघना’ ही रचना म्हणजे पावसाळी निसर्गसौंदर्याचे अप्रतिम काव्यरूप. कवितेमधील काही संस्कृत आणि बोलीभाषेतील शब्दांचे अर्थ उलगडल्यावर काव्यसौंदर्याने मन भरून जाते. ‘रंग माझा वेगळा’ ही सुप्रसिद्‌ध गझल व्यावहारिक जगात वावरताना आणि दु:खे सोसतानाही हटके जगून माणसांवर प्रेम करणाऱ्या गझलकाराच्या कलंदर वृत्तीचे दर्शन घडवते. वारकरी भजनांपासून ते शाळा-महाविद्यालयामधील स्नेहसंमेलनांपर्यंत सर्वत्र अत्यंत नाट्यमय पद्‌धतीने सादर होणारे ‘विंचू चावला’ हे लोकप्रिय भारूड दुर्गुणांपासून दूर राहण्याची शिकवण देते. तसेच सज्जनांची संगत अंगीकारली तर विंचवाच्या विषासारखे दारूण दु:खही दूर ठेवता येते हे वास्तवही आपल्या मनावर ठसते. व्यस्त आणि बंदिस्त महानगरी जीवनात आक्रसून गेलेल्या त्रस्त बाल्याविषयीची पीडा ‘समुद्र कोंडून पडलाय’ या कवितेतून व्यक्त झाली आहे. ‘आरशातली स्त्री’ ही कविता स्त्रीजीवनातील स्थित्यंतराचा नेमका वेध घेताना तिला नव्या उमेदीने जगण्याचे नवे भान देते. भाग एक आणि भाग दोनच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या सरावासाठी नमुना गद्य आकलन उतारे दिलेले आहेत.

गद्य आणि पद्य पाठांतील आशय आणि भाषाशैली यांचे अध्ययन-अध्यापन करण्याच्या दिशा जशा क्षमता विधानांमधून स्पष्ट होतात तशाच त्या पाठपरिचयातूनही दृष्टिपथात येतात. वर्गातील चर्चांमधून अध्यापकांकडून पाठातील आशय आणि भाषा

यांचा संबंध वर्तमान जीवनाशी जोडणे अपेक्षित आहे. गद्य, पद्य पाठांमध्ये समाविष्ट चित्रांमुळे मजकूरपृष्ठांना आकर्षकता लाभली आहे. चित्रांमुळे आशयाचे अंतरंग उलगडण्यास अधिक मदत होणार आहे.

बारावीमध्ये 'कथा' हा साहित्यप्रकार स्वतंत्रपणे समाविष्ट केला आहे. भारतीय आणि जागतिक साहित्यात 'कथा' या साहित्यप्रकाराला मोठी परंपरा आहे. आजही 'कथा' तेवढीच आवडीने ऐकली जाते, वाचली जाते. त्यामुळे कथेचे स्वरूप, कथेची रचना, कथेची वैशिष्ट्ये यासंबंधीची माहिती एका स्वतंत्र प्रकरणात दिली आहे. तसेच त्याला जोडून प्रातिनिधिक स्वरूपात नामवंत कथाकारांच्या दोन कथा दिलेल्या आहेत. 'शोध' या कथेत कथारचनेच्या तंत्राची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. जिज्ञासा आणि उत्कंठा वाढवत नेत श्रोत्याला किंवा वाचकाला कथेशी खिळवून कसे ठेवता येते याचा उत्तम नमुना म्हणजे 'शोध' ही कथा होय. तर बोलीभाषेच्या माध्यमातून तयार झालेल्या वातावरणातून कथेमधील घटना, प्रसंग आणि पात्रे सजीवपणे वाचकांसमोर कशाप्रकारे उभी करता येतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'गढी' ही कथा होय. 'कथा साहित्यप्रकार परिचय' हे प्रकरण आणि त्यासोबतच्या 'शोध' आणि 'गढी' या कथा यांचा एकत्रित अभ्यास केल्यानंतर कथेचे स्वरूप आणि रचना स्पष्ट होण्यास मदत होईल.

'उपयोजित मराठी' या भागामध्ये 'मुलाखत', 'माहितीपत्रक', 'अहवाल' आणि 'वृत्तलेख' या घटकांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी गद्य, पद्य पाठ आणि त्याखालील कृती यांमधून काही भाषिक कौशल्ये आत्मसात केली आहेत. या भाषिक विकासाचे उपयोजन करण्याची संधी त्यांना 'उपयोजित मराठी' मधील उपरोक्त घटकांमधून मिळणार आहे. व्यवसाय वा नोकरीमधील भूमिकेच्या दृष्टीने हे चारही घटक उपयुक्त ठरणार आहेत. या घटकांचा विद्यार्थ्यांना चांगला परिचय व्हावा अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने मुलाखत, माहितीपत्रक, अहवाल आणि वृत्तलेख यांचे नमुने उदाहरणादाखल पाठ्यपुस्तकात दिले आहेत.

भाग पाचमध्ये 'व्याकरण व लेखन' हा भाग समाविष्ट केला आहे. त्यामध्ये स्पर्धापरीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या वाक्यप्रकार व वाक्यरूपांतर, समास, प्रयोग, अलंकार यांचा समावेश केला आहे. व्याकरणासंबंधीच्या कृती पाठांखाली दिलेल्या आहेत. त्या सोडवण्यापूर्वी टप्प्याटप्प्याने संबंधित व्याकरण घटकांचे अध्ययन-अध्यापन पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे. लेखन या भागामध्ये 'निबंधलेखन' या घटकाचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीमध्ये, महाविद्यालयीन शिक्षणामध्ये आणि स्पर्धापरीक्षांसाठी उपयुक्त ठरू शकेल अशा तपशीलाचा समावेश त्यामध्ये केला आहे. मात्र परीक्षेचे वातावरण आणि उपलब्ध वेळ यांचा विचार करता बारावीमधील विद्यार्थ्यांच्या निबंधलेखनाचे मूल्यमापन या तपशीलामधील निकषानुसार करणे अपेक्षित नाही. त्यासाठी कृतिपत्रिकेतील निकष विचारात घ्यावेत.

पाठ्यपुस्तकातील पाचही भागातील घटकांवर आधारित विविध स्वरूपाच्या कृती दिलेल्या आहेत. घटकांचे आकलन आणि सर्वांगीण अभ्यास यादृष्टीने या कृती उपयुक्त ठरतील. मात्र परीक्षेमधील मूल्यमापन हे मूल्यमापन आराखड्यानुसार राहील. त्यादृष्टीनेही उपयुक्त कृती पाठ्यपुस्तकात दिल्या आहेत. तसेच तोंडी परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतील अशा कृतींचाही समावेश पाठ्यपुस्तकात केला आहे.

परिशिष्टांमध्ये पारिभाषिक शब्द, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांची नावे व त्यांच्या साहित्यकृती, शब्दार्थ व वाक्प्रचार यांचा समावेश केला आहे. त्यांचा उपयोग सामान्यज्ञान, भाषाविकास आणि पाठांचे आकलन यांसाठी होईल.

नऊ भारतीय भाषांमधील बारावीच्या 'युवकभारती'च्या पाठ्यपुस्तकांसाठी एकच मुखपृष्ठ योजले आहे. त्यामध्ये मध्यभागी ज्ञानपीठ पुरस्कारासाठी दिल्या जाणाऱ्या 'वाग्देवतेची प्रतिमा' ठळकपणे नजरेत भरते. ज्ञानपीठ हा साहित्याच्या क्षेत्रातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार आहे. युवकभारतीच्या मुखपृष्ठावर त्या त्या भाषेतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेल्या साहित्यिकांची छायाचित्रे दिलेली आहेत. तसेच भाषेच्या उपयोजनाच्या आधुनिक संधींचेही प्रतीकात्मक दर्शन मुखपृष्ठावर होताना दिसते. प्राचीन काळापासून आजपर्यंत झालेल्या भाषिक विकासाच्या टप्प्यांचे ओझरते दर्शनही मलपृष्ठावर होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभाषेशिवाय अन्य भारतीय भाषांचा अभ्यास करावा. तसेच त्या भाषांमधील अनुवादित साहित्याचा आस्वाद घ्यावा अशी अपेक्षा आहे.

विद्यार्थ्यांनी उत्तमोत्तम साहित्यकृतींचा आस्वाद घेऊन अपेक्षित भाषाविकास साधावा आणि जीवनव्यवहारात त्याचे समर्थपणे उपयोजन करावे यासाठी, हे पाठ्यपुस्तक महत्त्वाचे साधन ठरेल असा विश्वास आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ, कविता | पृ. क्र. |
|---|---|---|
| | बहु असोत सुंदर... (काव्यानंद) – श्री. कृ. कोल्हटकर | १ |
| १. | वेगवशता – प्राचार्य शिवाजीराव भोसले | ३ |
| २. | रोज मातीत (कविता) – कल्पना दुधाळ | ७ |
| ३. | आयुष्य... आनंदाचा उत्सव – शिवराज गोर्ले | १० |
| ४. | रे थांब जरा आषाढघना (कविता) – बा. भ. बोरकर | १७ |
| ५. | वीरांना सलामी – अनुराधा प्रभुदेसाई | २० |
| ६. | रंग माझा वेगळा (कविता) – सुरेश भट | २८ |
| ✻ | आत्मविश्वासासारखी शक्ती नाही (नमुना गद्य आकलन) – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ३१ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ, कविता | पृ. क्र. |
|---|---|---|
| ७. | विंचू चावला... (भारूड) – संत एकनाथ | ३२ |
| ८. | रेशीमबंध – डॉ. यू. म. पठाण | ३५ |
| ९. | समुद्र कोंडून पडलाय (कविता) – वसंत आबाजी डहाके | ४० |
| १०. | दंतकथा – वसंत सबनीस | ४३ |
| ११. | आरशातली स्त्री (कविता) – हिरा बनसोडे | ५० |
| १२. | रंगरेषा व्यंगरेषा – मंगेश तेंडुलकर | ५४ |
| ✻ | जयपूर फूटचे जनक (नमुना गद्य आकलन) – डॉ. बाळ फोंडके | ६१ |


## भाग –३


| अ. क्र. | साहित्यप्रकार | पृ. क्र. |
|---|---|---|
| | कथा– साहित्यप्रकार–परिचय | ६२ |
| १. | शोध – व. पु. काळे | ७० |
| २. | गढी – डॉ. प्रतिमा इंगोले | ७९ |


## भाग –४


| अ. क्र. | उपयोजित मराठी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | मुलाखत | ८७ |
| २. | माहितीपत्रक | ९४ |
| ३. | अहवाल | १०० |
| ४. | वृत्तलेख (फिचर रायटिंग) | १०५ |


## भाग –५


| अ. क्र. | व्याकरण व लेखन | पृ. क्र. |
|---|---|---|
| • | व्याकरण– वाक्यप्रकार व वाक्यरूपांतर, समास, प्रयोग, अलंकार | ११२ |
| • | लेखन : निबंधलेखन | १३१ |


## भाग –६


| अ. क्र. | परिशिष्टे | पृ. क्र. |
|---|---|---|
| • | पारिभाषिक शब्द, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांची नावे व साहित्यकृती, शब्दार्थ व वाक्प्रचार | १३६ ते १४२ |

# बहु असोत सुंदर... (काव्यानंद)

■ **श्री. कृ. कोल्हटकर** (१८७१ ते १९३४) :

समीक्षक, विनोदी लेखक, कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार. महाविद्यालयात शिकत असतानाच ते समीक्षेकडे वळले. विविध वाङ्‌मयप्रकारांचे लेखन करत असताना त्यांचे समीक्षणात्मक लेखन सुरूच होते. कोल्हटकर यांची प्रतिभा बहुमुखी होती. त्यांनी मराठी नाटकाला नवे, स्वतंत्र रंगरूप दिले व त्याबरोबरच रूढींच्या नावाखाली चालणाऱ्या हास्यास्पद गोष्टींविषयी विनोदी लेखही लिहिले. विनोदाचा शस्त्राप्रमाणे वापर व कालातीत असा शुद्ध विनोद ही त्यांच्या विनोदाची वैशिष्ट्ये. 'दुटप्पी की दुहेरी', 'शामसुंदर' या कादंबऱ्या, 'गीतोपायन' हा काव्यसंग्रह, आत्मवृत्त, काही कथा इत्यादी वाङ्‌मय निर्मिती. 'बहु असोत सुंदर संपन्न कीं महा' ही त्यांची काव्यरचना 'महाराष्ट्र गीत' म्हणून अतिशय लोकप्रिय आहे. द्वितीय महाराष्ट्र कविसंमेलन, पुणे तसेच बारावे महाराष्ट्र साहित्य संमेलन, पुणे यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले.

कवीने या गीतात महाराष्ट्र भूमीच्या अनेकविध वैशिष्ट्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. उत्तुंग पर्वतरांगांमध्ये वसलेला, गगनाला गवसणी घालणाऱ्या आकांक्षा बाळगणारा महाराष्ट्र आम्हांला सर्वांत प्रिय आहे, असे गौरवपूर्ण उद्‌गार या गीतात काढले आहेत. अंत:करणाचे औदार्य, सद्‌गुणांची संपदा आणि नररत्नांची खाण असणारा महाराष्ट्र आम्हांला अभिमानास्पद आहे, हे कवीने अतिशय ओजस्वी वाणीत नमूद केले आहे. पराक्रम, भक्ती आणि वैराग्य या गोष्टी एकाच ठिकाणी आढळणारा प्रदेश ही महाराष्ट्राची वेगळी ओळख या गीतातून करून दिली आहे. अशा प्रिय महाराष्ट्रात मराठी भाषेला लोकव्यवहारात गौरवाचे स्थान प्राप्त व्हावे; तसेच महाराष्ट्राच्या थोरवीचे मर्म सर्वांच्या मनात ठसावे अशी अपेक्षा कवीने व्यक्त केली आहे.

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ।।धृ.।।

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणें
तेथ अडे काय जलाशयनदांविणें ?
पौरुषासि अटक गमे जेथ दु:सहा ।।१।।

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्‌भावांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळिं नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
शुद्‌ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा ।।२।।


नग्न खड्‌ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ।।३।।



विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म–राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ।।४।।

गीत मराठ्यांचे श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरी ठसो
वचनि लेखनीहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ।।५।।

**(आठवणीतल्या कविता, भाग–१)**




- **तोंडी परीक्षा.**

प्रस्तुत गीत तालासुरात सादर करा.

# १. वेगवशता

■ **प्राचार्य शिवाजीराव भोसले** (१९२७ ते २०१०) :

नामवंत वक्ते, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत आणि व्यासंगी लेखक. देशात आणि विदेशांत अनेक विषयांवर व्याख्यानमाला गाजवल्या. पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत सलग २८ वर्षे व्याख्याने दिली. 'कथा वक्तृत्वाची', 'जागर (खंड १ व २)', 'जीवनवेध', 'दीपस्तंभ', 'देशोदेशींचे दार्शनिक', 'मुक्तिगाथा महामानवाची', 'यक्षप्रश्न', 'हितगोष्टी' इत्यादी ग्रंथ प्रकाशित. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू. 'राजर्षी शाहूमहाराज पुरस्कार' (कोल्हापूर), 'श्रीमंत मालोजीराजे स्मृती पुरस्कार' (फलटण) अशा पुरस्कारांनी सन्मानित.

या वैचारिक पाठात लेखकाने अतिवेगाच्या आहारी गेलेल्या माणसांच्या विकृतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी वाहनाची गरज लेखकालाही पटते. मात्र गरज नसताना खोट्या प्रतिष्ठेपायी कर्ज काढून वाहन खरेदी करण्याच्या वर्तमानकालीन मानसिकतेवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. महानगरात, शहरात ठरावीक वेळेत अनेक ठिकाणी पोहोचून कामे करावी लागतात हे खरे असले, तरी नको तितक्या वेगाने वाहने चालवून लोक अपघातांना निमंत्रण देताना दिसतात, याचे लेखकाला वैषम्य वाटते. वेळ वाचवण्यासाठी माणसे वाहने वापरतात; परंतु माणसे वाचलेला वेळ पुन्हा वाहन चालवण्यात वाया घालवतात, तेव्हा 'वाहने माणसांवर स्वार होतात', अशी मार्मिक टिपणी लेखक करतात. अफाट वेगाने वाहने चालवण्याच्या प्रवृत्तीमुळे वाहनचालकाच्या शरीर-मनावर अनावश्यक ताण निर्माण होतो. त्यामुळे स्वत्व आणि स्वास्थ्य हिरावून घेणारा अनैसर्गिक वेग कमी करण्याबाबत लेखक शेवटी कशाप्रकारे स्पष्ट इशारा देतात, ते या पाठातून पाहूया.

वेग हे गतीचे एक रूप आहे. आपले जीवनही स्थिती आणि गती यांत विभागलेले आहे. थांबणे, चालणे, धावणे असे हे जीवनचक्र फिरतच असते. आपल्या विचारांनाही गती असते, जिला आपण प्रगती म्हणतो. ती विचारांची गती असते. गतीला जेव्हा दिशा असते तेव्हाच ती प्रगती या संज्ञेला पात्र ठरते. दिशाविहीन गती ही अधोगती ठरते. आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. रस्ते वाहनांनी व्यापलेले असतात. माणसे घरांत राहतात म्हणूनच अल्पकाळ तरी स्थिर राहतात. एरवी गतीपायी अगतिक होतात.

अहोरात्र भरारणारी आणि थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते. ही आली कोठून? आली कशी आणि कशासाठी? पूर्वी देशोदेशींचा इतिहास घडला. लोकांनी जगप्रवासही केला; पण आजच्या एवढी अवखळ वाहने कोठे दिसत नसत.

आता माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो. वेळ थोडा असतो. कामे बरीच असतात. पायी चालत ती उरकता येत नाहीत. जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे. मुलांची शाळा एका टोकाला, आपले कार्यालय दुसऱ्या टोकाला, मंडई एका बाजूला तर दवाखाना



दूर, कुठल्या तरी दिशेला. जीवनाची ही टोके सांधणार कशी? जोडणार कशी? शेवटी गती ही घ्यावीच लागते. यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे. आपली कामे यथासांग पार पाडावीत, एवढा वेग जीवनाला असावा. त्यापेक्षा अधिक वेग म्हणजे अक्षम्य आवेग म्हणावा लागेल. तो आत्मघातकी ठरतो. अमेरिकेसारख्या विकसित देशात माणसे वेगाने जीवन जगतात. घरोघर आणि दरडोई वाहन उपलब्ध असते. रस्ते रुंद, सरळ, निर्विघ्न आणि एकमार्गी असतात. घरे, कार्यालये, बाजारपेठा यांत निदान शंभर मैलांचे किमान अंतर असते. जवळच्या जवळ सगळे असे सहसा नसते. अंतरावरच्या गोष्टींशी जवळीक साधण्यासाठी दूरवर जावे लागते. यातून माणसामाणसांत दुरावा निर्माण होतो. तो जाचदायक आणि असह्य होऊ नये म्हणून वेगाचा आश्रय घेतला जातो. वेगामुळे माणसे बेभान होतात. भान हरपले म्हणजे अस्वस्थता विरून जाते. वेगात एक बेहोषी असते.

भारतीयांनी अमेरिकन जीवनशैली पत्करण्याचे कारण नाही. आपल्याकडे अंतरे कमी आहेत. माणसे खूप आहेत. कामे फारशी नाहीत. जीवनाची टोके सहज सांधता येतात. थोडी त्वरा करावी लागते; पण भरधाव वेगाने अंतर काटावे अशी स्थिती नसते. मुंबईसारखे विस्तीर्ण नगर गाड्यांनी सांधलेले असते. गाड्या रूळावरून चालतात. त्यात भरकटणे फारसे नसते. गाडीत चढले म्हणजे माणसांचे धावणे थांबते.

खरी अडचण असते ती रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या दोन आणि चारचाकी वाहनांची. त्यांचा वेग मर्यादित ठेवला तर ती साधने म्हणून उपयोगी पडतात. वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी त्यांचा उपयोग होतो; पण अनेकदा असे घडते, की वाचलेला वेळ घालवावा कसा हे कळेनासे होते आणि मग तो घालवण्यासाठी पुन्हा माणसे वाहनांच्या आहारी जातात. आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात. मग वाहने माणसांवर स्वार होतात.

कामापुरते आणि कामासाठी वाहन आणि आटोक्यात राहील एवढाच वेग, हे तंत्र अनुसरले तर जीवन अर्थपूर्ण होईल. आपले जीवन अधिक प्रमाणात आपल्या वाट्याला यावे, ते कृतार्थतेने जगता, अनुभवता यावे, त्यासाठी उसंत लाभावी म्हणून वाहनांचा वापर करायला हवा. प्रत्यक्षात घडते ते वेगळे. इतरांशी मानसिक स्पर्धा करण्यासाठी, आपल्या ऐश्वर्याचे प्रदर्शन घडवण्यासाठी, गरज नसताना कर्ज काढून वाहने खरेदी करणारी माणसे समाजात आढळतात. कोणतेही महत्त्वाचे काम नसताना पत्नीला मागच्या बाजूला बसवून आधुनिक दुचाकीने सहज फेरफटका मारून आले म्हणजे अनेकांना बरे वाटते; पण आहेच वाहन तर चार-सहा मैलांवरचे एखादे निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहाण्यासाठी ही माणसे का जात नाहीत? एखादा लक्ष्मी रोड, महात्मा गांधी मार्ग किंवा जंगली महाराज रस्ताच का पसंत केला जातो? देहू, आळंदी, सिंहगड, बनेश्वर, विठ्ठलवाडीकडचे रस्ते का दिसत नाहीत?

वाई, सातारा, फलटण, कराड अशा गावी वाहनांची एवढी निकड आहे का? शेतमळ्यात जायचे असेल, तर तातडीचा भाग म्हणून कधी तरी वाहन लागेल. आपले राहणे गावाबाहेर होत असेल, तर वाहनाचा उपयोग होईल; पण सहज आणि सुखाने येणे-जाणे सोडून वेगाने येरझारा कशासाठी घालावयाच्या? आहेच गाडी तर मारूया चक्कर, अशी भावना बाळगून रस्त्यावर अडचणी निर्माण करणारे रसिक संख्येने वाढत चालले आहेत.

वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते. त्याचा वेग बेताचा असणे अगत्याचे असते. माणसे चालू आणि पळूही शकतात; पण रस्त्याने कोणी चालण्याऐवजी पळू लागला तर त्याचे कौतुक करावे का? अपेक्षित स्थळी वेळेवर पोचता येईल, अशा बेताने वाहने चालवण्याऐवजी उगाचच भरधाव वेगाने चालवण्यात औचित्य ते कोणते?

वाहनाचा वेग वाढला म्हणजे त्याच्यावरचा ताबा कमी होतो. पुढचे वाहन मागे टाकून पुढे जाण्याच्या हव्यासामुळे अनेक अपघात होतात. रात्रीच्या वेळी विलक्षण वेगाने धावणारी गाडी ही रातराणी म्हटली जाते. रात्री भरधाव वेगाने प्रवास करून पार पाडावीत एवढी महत्त्वाची कामे दरवेळी असतात का?

वाहनाचा वेग अनिवार झाला, तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोळ्यांवर, मनावर, शरीरावर ताण पडतो. शरीरभर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. हादरे बसून मज्जातंतू आणि मणके कमकुवत होतात. कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहनधारकांची व्यथा असते. बसणे, उठणे,

चढणे, उतरणे, चालणे, वळणे, वर-खाली पाहाणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरून स्वत:ला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारून आपल्या शरीरव्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्गविरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहे. वाढता वेग म्हणजे ताण. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे? आपले स्वत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे, हे आपले कर्तव्य आहे. उगाच भावविवश होऊन वेगवश होऊ नये. अनाठायी वेगामुळे पोचण्यापूर्वीच अंत होण्याची शक्यता वाढते.

(जागर, खंड २)

टिपा-

(१) **लक्ष्मी रोड, महात्मा गांधी मार्ग, जंगली महाराज रस्ता-** पुण्यातील रस्ते.

(२) **देहू, आळंदी, सिंहगड, बनेश्वर, विठ्ठलवाडी-** पुण्यातील व पुण्याजवळील स्थळे.

## कृती

**(१) (अ) पाठाच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा.**

(१) जीवन विभागणारे घटक- [ ] [ ]

(२) विचारांची गती म्हणजे- [ ]

(३) अधोगती म्हणजे- [ ]

(४) अक्षम्य आवेग म्हणजे- [ ]

**(आ) कृती करा.**

(१) **गतीबाबतची लेखकाने वर्णिलेली विकृती म्हणजे** → → →

(२) **लेखकाच्या मते जीवन अर्थपूर्ण तेव्हा होते, जेव्हा** → →

(३) **लेखकाने सांगितलेली वाहन खरेदी करण्याची कारणे** → →

(४) **वाहनाचा वेग अनिवार झाला तर** → → → →

**(इ) कारणे शोधा व लिहा.**

(१) अमेरिकेतील माणसांचे जीवन वेगवान असते, कारण ............

(२) लेखकाच्या मते गरजेच्या वेळी वाहनांचा वापर करायला हवा, कारण ............

**(२) (अ) योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा.**

(१) **जीवन अर्थपूर्ण होईल, जर............**

(अ) वाहन कामापुरतेच वापरले तर.

(आ) वाहन आवश्यक कामासाठी वापरले तर.

(इ) वाहनाचा वेग आटोक्यात ठेवला तर.

(ई) वरील तिन्ही गोष्टींचा अवलंब केला तर.

(२) **निसर्गविरोधी वर्तन नसणे, म्हणजे............**

(अ) स्वत:ला वाहनाशी सतत जखडून ठेवणे.

(आ) वाहनाचा अतिवेग अंगीकारणे.
(इ) तातडीचा भाग म्हणून कधीतरी वाहन वापरणे.
(ई) गरज नसताना वाहन वापरणे.

**(आ) वाहन वापरातील फरक स्पष्ट करा.**

| अमेरिका | भारत |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

**(३) खालील वाक्यांचा अर्थ सोदाहरण स्पष्ट करा.**

(अ) यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे.
(आ) आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात. मग वाहने माणसांवर स्वार होतात.
(इ) उगाच भावविवश होऊन वेगवश होऊ नये.

**(४) व्याकरण.**

**(अ) समानार्थी शब्द लिहा.**

(१) निकड- (२) उचित- (३) उसंत- (४) व्यग्र-

**(आ) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

(१) ताणतणाव- (२) दरडोई- (३) यथाप्रमाण- (४) जीवनशैली-

**(इ) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.**

(१) आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. (उद्‌गारार्थी करा.)
(२) आपल्याकडे कामाच्या ठिकाणाची अंतरे कमी आहेत. (नकारार्थी करा.)
(३) निसर्गरम्य स्थान किंवा मंदिर पाहण्यासाठी ही माणसे का जात नाहीत? (विधानार्थी करा.)

**(५) स्वमत.**

(अ) 'वाहनांच्या अतिवापराने शरीर व्यापारात अडथळे निर्माण होतात', तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.
(आ) 'वाढता वेग म्हणजे ताण', याविषयी तुमचे मत सविस्तर लिहा.
(इ) 'वाहन हे वेळ वाचवण्यासाठी असते. ते वेळ घालवण्यासाठी नसते', हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
(ई) 'वाहनाची अतिगती ही विकृती आहे', स्पष्ट करा.

**(६) अभिव्यक्ती.**

(अ) रस्त्यावरील वाहतूक कोंडीत सापडल्यावर तुमची भूमिका काय असेल ते लिहा.
(आ) वाहन चालवत असताना कोणती काळजी घ्यावी, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**उपक्रम :**

'वाहतूक नियंत्रण पोलीस कर्मचारी' यांची अभिरूप मुलाखत तुमच्या वर्गमित्राच्या/मैत्रिणीच्या मदतीने वर्गात सादर करा.

- **तोंडी परीक्षा.**

'वाहतूक सुरक्षेची गरज' या विषयावर पाच मिनिटांचे भाषण द्या.

# २. रोज मातीत

■ कल्पना दुधाळ (१९७८) :

प्रसिद्ध कवयित्री. 'सिझर कर म्हणतेय माती', 'धग असतेच आसपास' हे कवितासंग्रह प्रकाशित. 'सिझर कर म्हणतेय माती' या पहिल्या कवितासंग्रहास महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'कवी कुसुमाग्रज' पुरस्कारासह एकूण अठ्ठावीस पुरस्कारांनी व 'धग असतेच आसपास' या कवितासंग्रहास 'महाराष्ट्र फाउंडेशन'च्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

रोज मातीत राब राब राबणाऱ्या शेतकरी महिलेचे मनोगत या कवितेतून व्यक्त झाले आहे. आपला स्वत:चा जीवच जणू मातीत रुजवावा इतक्या मन:पूर्वकतेने शेतकरी स्त्री जेव्हा शेतात लावणीसारखी कष्टाची कामे करते, तेव्हा कुठे शेतात गोंदणाच्या नक्षीसारखी हिरवाई फुलू लागते. आपल्या ओढगस्त संसाराला हातभार लावण्यासाठी उन्हातान्हाची पर्वा न करता शेतकरी महिला कांद्याच्या लावणीसारखी वा उसाच्या लागवडीसारखी अत्यंत कष्टाची कामे करत राहते. हिरवीगार दिसणारी शेती काही उगीच पिकत नाही, तर जेव्हा शेतकरी स्त्री रोज श्रम करून, मर मर मरून, सर्वस्व अर्पण करते, तेव्हा कुठे शेतात हिरवेगार पीक डोलू लागते. साध्या सरळ शब्दांतील ही गेय कविता ओळी-ओळींतून पुढे जाताना अंत:स्थ वेदनेमुळे काळजाला अधिकाधिक कशी भिडत जाते ते अनुभवूया.

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते





फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांड्या-कांड्यांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते





उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

**(सिझर कर म्हणतेय माती)**

## कृती

(१) (अ) कृती करा.

**कवितेतील स्त्री करत असलेली विविध कामे**

**(आ) संदर्भानुसार योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) नाही कांदं ग, जीव लावते. | (अ) गोंदणाच्या हिरव्या नक्षीप्रमाणे शेत पिकाने सजवते. |
| (२) काळ्या आईला, हिरवं गोंदते. | (आ) अतोनात कष्टानंतर हिरव्या समृद्धीच्या स्वरूपात शिल्लक राहते. |
| (३) हिरवी होऊन, मागं उरते | (इ) स्वत:चा जीवच जणू कांद्याच्या रोपाच्या रूपात लावते. |

**(२) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते

**(३) काव्यसौंदर्य.**

(अ) 'काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते' या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) 'नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांड्या-कांड्यांनी, संसार सांधते
बाई सांधते' या ओळींतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**(४) रसग्रहण.**

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) शेतकरी स्त्रियांच्या कष्टमय जीवनाचे वर्णन कवितेच्या आधारे लिहा.

(आ) तुमच्या परिसरातील कष्टकरी स्त्रियांचे कुटुंबाच्या उदरनिर्वाहातील योगदान स्पष्ट करा.

**उपक्रम :**

(अ) शेतकरी महिलेची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(आ) यू-ट्यूबवरील कवी विठ्ठल वाघ यांची 'तिफण' ही कविता ऐका.

- **तोंडी परीक्षा.**

(अ) प्रस्तुत कवितेचे तालासुरात सादरीकरण करा.

(आ) प्रस्तुत कवितेचा सारांश तुमच्या शब्दांत सांगा.

# ३. आयुष्य... आनंदाचा उत्सव

■ **शिवराज गोर्ले** (१९५१) :

सुप्रसिद्ध लेखक. नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, कथा, व्यक्तिरेखा, कादंबरी, ललितलेख, वृत्तपत्रीय स्तंभ इत्यादी माध्यमांतून विपुल लेखन प्रसिद्ध. 'कुर्यात् सदा टिंगलम्', 'गोलमाल' इत्यादी गाजलेल्या नाटकांसाठी तसेच 'थरथराट', 'चिमणी पाखरं' इत्यादी लोकप्रिय चित्रपटांसाठी पटकथा, संवाद लेखन त्यांनी केले आहे. त्यांनी मराठीत प्रेरक साहित्याचे दालन समृद्ध केले. 'मजेत जगावं कसं?' या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकाला 'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचा' पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय त्यांची 'माणसं जोडावी कशी?', 'मस्त राहावं कसं?', 'यशस्वी व्हावं कसं?', 'तुम्ही बदलू शकता' अशी अनेक प्रेरक पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'सर्वस्व', 'शोधार्थ', 'एका कल्पनेची आत्मकथा' या कादंबऱ्या प्रसिद्ध. त्यांच्या 'नग आणि नमुने' या विनोदी पुस्तकाला महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

प्रत्येकाला आनंद हवा असतो; परंतु बऱ्याचदा आनंद म्हणजे काय आणि तो कसा मिळवावा हे उमगत नाही. खरेतर आनंद बाहेर नसून अंतरंगात असतो; पण त्यासाठी आनंदाचे भान जागे असावे लागते, हे या पाठात लेखकाने हलक्याफुलक्या शैलीत उलगडले आहे. आनंद नेमका कशात असतो, तो कसा अनुभवायचा असतो, छोट्या छोट्या गोष्टीतही आनंद कसा भरून राहिलेला असतो, आनंदी राहण्याची सवय कशी लावून घ्यावी यासंबंधी विविध उदाहरणांमधून केलेले विवेचन आनंदी राहण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन करणारे आहे. निसर्गाची सोबत, संगीताची साथ आणि पुस्तकांचा सहवास आनंदी राहण्यासाठी कसे उपयुक्त ठरतात, यासंबंधीच्या पाठातील विवेचनामुळे आपणास जीवनात आनंदी राहण्याचा राजमार्ग गवसतो.

आनंद सगळ्यांनाच हवा असतो... पण आपला आनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठे असतो हा आनंद? कुठे नसतो हा आनंद? आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे! ही फक्त कविकल्पनाच नव्हे, तेच सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे!

आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो.

आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो.

हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच.

आनंदाचं भान जागृत ठेवणं हेच आनंदाचं रहस्य आहे. असंख्य, अगणित पातळ्यांवर आनंद अनुभवता येतो. आपल्या आयुष्यासोबत ज्याचं अस्तित्व असतं, तो म्हणजे अस्तित्वाचा आनंद. आपलं अस्तित्व आपण नेहमीच गृहीत धरून चालतो आणि अस्तित्वाच्या आनंदाला मुकतो. आपल्या अस्तित्वाची साक्ष देत असतो, तो आपला श्वास.

आपल्या श्वासाचंही आपल्याला भान नसतं. खरंतर श्वास हा शरीर आणि मन यांना जोडणारा सेतू असतो. हा सेतू आपण जाणीवपूर्वक वापरत नाही. पोटातून खोलवर श्वास घेणं केवळ आरोग्यासाठी चांगलं असतं, असं नव्हे, तर त्यामुळे मनही शांत होतं. मुख्य म्हणजे श्वासाचं बोट धरून मनापर्यंत पोहोचता येतं, मनाशी नातं जोडता येतं.

पण आपण श्वासाकडे लक्षच देत नाही. आयुष्यातला एकेक क्षण येतो आणि जातो. आपण क्षणांकडे लक्ष देत नाही. एकेक दिवस उजाडतो, मावळतो. आपण दिवसाकडे लक्ष देत नाही. सूर्योदय, सूर्यास्त होतो, तोही आपण नीट पाहात नाही. तो दिसतो, तेव्हा आपल्याला दृष्टी आहे, हेही आपण गृहीत धरतो. जे जे आनंद देणारं आहे, ते गृहीतच धरून चालल्यामुळे आपल्याला ना सृष्टीचं कौतुक वाटतं, ना दृष्टीचं. आपल्या श्वासाचं, आपल्या अस्तित्वाचं, आपल्या अस्तित्वाच्या आनंदाचं भान हवं.

आपलं अस्तित्व हीच एक कमाल आहे. एक अद्‌भुत सत्य आहे. भले सापेक्ष असेल, पण सत्य आहेच. जीवनाच्या, युगायुगांच्या खडतर तपश्चर्येनंतर हा मानवी

जन्म लाभला आहे. तो लाभला आहे, हेच आनंदासाठी एक सबळ कारण आहे. आनंदासाठी आपलं 'असणं'ही पुरेसं आहे; किंबहुना आपलं 'असणं' हीच आनंदाची खूण आहे, अभिव्यक्ती आहे.

एखादी आनंददायक घटना घडते. तरीही आपल्याला म्हणावा तितका आनंद होत नाही, त्याची काही स्पष्ट कारणं असतात. एखाद्या नाट्यस्पर्धेत तुम्हांला सर्वोत्कृष्ट अभिनयाचं बक्षीस मिळतं; पण तुमच्या मते ते खरं तर दुसऱ्या एखाद्या कलाकाराला मिळायला हवं असेल, तर आनंद होऊनही रुखरुख लागून राहते. आनंद हा निखळ असेल, तरच तो आनंद असतो. 'खरा' असेल, तरच तो अनुभवता येतो.

लोकांना पेढे 'वाटणं' वेगळं आणि स्वत:ला आनंद वाटणं वेगळं. खरा आनंद ओळखण्याची एक सोपी खूण आहे. तुम्हांला हलकंहलकं, पिसासारखं वाटायला हवं. मनावरचे सर्व ताण, सर्व दडपणं नाहीशी व्हायला हवीत. मुख्य म्हणजे ईर्ष्या, असूया नाहीशा व्हायला हव्यात. राग, द्वेष विरघळायला हवेत.

काहींना एखादं बक्षीस मिळालं, तरी त्या 'अमक्या'ला चार बक्षिसं मिळाली याचं वैषम्य वाटतं किंवा मग 'त्या लेकाला एकही बक्षीस मिळालं नाही', याचाच अधिक आनंद होतो. स्वत:ला काही मिळणं, स्वत: आनंद मिळवणं यापेक्षा दुसऱ्याला आनंद न मिळणं हे ज्यांना महत्त्वाचं वाटतं, ते आयुष्यात कधीच आनंदी होऊ शकत नाहीत. तुलना आली, की आनंद संपलाच. खरा आनंद दुसऱ्याच्या दु:खावर कधीच पोसला जात नसतो. खरा आनंद हा मनाला केवळ हलकंच नव्हे, तर चित्ताला शुद्ध करत असतो. माणूस खऱ्या आनंदात असतो, तेव्हा त्याला सगळं जग छान, सुंदर वाटत असतं. आपल्यासारखंच सगळ्यांनी मजेत, आनंदात असावं, असंच त्याच्या मनात येत असतं. स्वत:च्या मनात तो मावेनासा झाल्यानं सर्वांना वाटावा, असं वाटत असतं. ती गरज आनंद वाटण्याची असते, दाखवण्याची किंवा प्रदर्शन करण्याची नसते.

अनेकदा आयुष्यात असं काही घडतं, की आपण आनंदासाठी मनाची कवाडं कायमची बंद करून टाकतो. आपण म्हणतो, माणसं दु:खातून बाहेर येत नाहीत. त्याचं कारण ते दु:खाला बाहेर जाऊ देत नाहीत. हृदयाची दारं मिटलेली असतील, तर आतलं दु:ख बाहेर जाणार कसं? बाहेर दाराशी घुटमळणारा आनंद आत येणार कसा? आनंदाला जागा मोकळी लागते. तुमच्या मनात दु:ख, चिंता, टेन्शन अशा मंडळींची गर्दी झाली असेल, तर तशा दाटीवाटीत आनंद कधीच घुसत नाही. आनंदाचं खुल्यादिलानं स्वागत करावं लागतं. शेतकरी मंडळी 'कधी पडायचा पाऊस' म्हणून आभाळाकडे डोळे लावून बसतात. त्यांचा नाइलाज असतो, कारण पाऊस पाडणं त्यांच्या हातात नसतं. आनंदाचा पाऊस मात्र आपण पाडू शकतो. कृत्रिम नव्हे... नैसर्गिक. कुठून तरी आनंद येईल आणि आपल्या मनाचं अंगण भिजवेल, म्हणून वाट पाहात बसलं, तर आनंद येईलच याची खात्री नसते. आनंद हा आपण घ्यायचा असतो. कुणी तो देईल याची वाट पाहायची नसते. एकदा आनंद कसा घ्यायचा याचं तंत्र जमलं, की मग मात्र 'नाही आनंदा तोटा' अशी अवस्था होते.

आनंद हा तुमचा स्वभाव व्हायला हवा. आनंदात राहण्याची सवयच जडायला हवी. सगळी धडपड आनंदासाठी चाललेली असते; पण आनंद घ्यायला वेळ नसतो, हेच अनेकांचं दु:ख असतं. दु:खासाठी आपण भरपूर सबबी, भरपूर कारणं शोधलेली असतात. आनंदासाठीची मात्र मोजकीच कारणं आपल्याला माहिती असतात. खरं म्हणजे हे उलट व्हायला हवं.

आनंद होणं, छान वाटणं, मस्त वाटणं हे एकदम सोपं आणि सवयीचं करून घ्यावं. 'वाईट वाटणं' दुर्मीळ, अपवादाचं करून ठेवावं.

सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत असतं, तसा आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो. लहान मुलं निरागस, आनंदी वृत्तीची असतात, म्हणूनच ती आनंद घेण्यात तरबेज असतात. आनंद हा त्यांचा आग्रह असतो, अधिकार असतो. त्यांनी 'हात' केल्यावर चिमणी भुर्रकन उडाली तरी त्यांना केवढा आनंद होतो. किती आतून हसतात ती!

आपण मोठे होतो आणि या छोट्या छोट्या आनंदाला पारखे होतो. आनंदाची हीच तर गंमत आहे. आनंद छोट्या छोट्या गोष्टींतच असतो. आपण मात्र तो मोठ्या गोष्टींत शोधत असतो. आयुष्यात अशा मोठ्या गोष्टी, आनंदाचे मोठे प्रसंग कितीसे येतात? तेव्हाच आनंद घ्यायचा आणि बाकी आयुष्य काय नुसतं रेटत राहायचं? आनंद कणाकणानं टिपायचा असतो. क्षणाक्षणानं घ्यायचा असतो. आपल्याला मात्र तो टनाटनानं हवा असतो. 'खाईन तर तुपाशी, नाहीतर

उपाशी.' तिथंच सगळं चुकतं.

निसर्गात तर काय आनंद भरून राहिलेला आहे. 'देता किती घेशील दो कराने', अशीच अवघी परिस्थिती आहे. हिवाळ्यातल्या कोवळ्या उन्हाचा आनंद, श्रावणातली रिमझिम अंगावर झेलण्यातला आनंद, चांदण्या रात्री भटकण्यातला आनंद.. झाडांचे नुसते आकार पाहात हिंडलं, तरी थक्क व्हायला होतं. हिरव्या रंगाच्या नुसत्या छटा पाहात राहिलं तरी भान हरपतं. बदलत्या प्रकाशात त्या बदलताना न्याहाळत बसलं, तर वेडं व्हायला होतं. साक्षात निसर्ग ज्यांना आनंद देऊ शकत नाही, त्यांनी आयुष्यातील आनंदाला विसर्ग द्यावा, हेच बरं.

संगीताच्या सात सुरांमध्ये तर सात जन्म पुरेल एवढा आनंद भरून राहिलेला आहे. आपलं शास्त्रीय संगीत ही तर आनंदाची इस्टेटच आहे. कुमारगंधर्व, पं. भीमसेनजी, पं. जसराज, किशोरी आमोणकर यांचं गाणं आपण ऐकू शकतो, हे केवळ भाग्यच म्हणायला हवं. आत्मिक आनंद म्हणतात, तो यापेक्षा फारसा वेगळा नसावाच. आत्म्याच्या या भाषेत गाता आलं नाही, तरी ऐकता येतंच ना? कलाकार मंडळी खरी जगतात ती कलेच्या मस्तीतच. एखाद्या कलेशी आपणही दोस्ती करू शकलो, तर एका वेगळ्याच विश्वात वावरता येतं, निर्मितीच्या आनंदाशी नातं जोडता येतं. या आनंदाची जात काही वेगळीच असते; पण कलावंत होता आलं नाही, तरी रसिक होण्याचा आपला अधिकार कुणीच नाकारू शकत नाही. कलेच्या आस्वादातला अनोखा आनंद हा आपणच आपल्याला बहाल करू शकतो. निर्मिती म्हणजे काही प्रत्येकानं ताजमहाल बांधायला हवा असं थोडंच आहे? पोरांच्या बरोबरीनं दिवाळीतला किल्ला करण्यातही मौज असतेच.

शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो. शिकलेलं शिकवण्यातही आनंद असतोच. हा आनंद आपण किती घेतो? नाईलाजानं नव्हे, परीक्षा देण्यासाठी नव्हे की कुणावर उपकार म्हणून नव्हे, केवळ स्वत:ची हौस म्हणून काही शिकून पाहा. एखादी कला, एखादी भाषा, एखादा खेळ. माणसं स्वत:ची हौस, स्वत:चा छंद विसरू कसा शकतात, हे मला न उलगडलेलं कोडं आहे. खेळाचा आणि छंदाचा उद्देशच केवळ आनंद हा असतो. पोटापाण्यासाठी उद्योग आणि आनंदासाठी छंद इतकं हे साधं गणित आहे आणि छंद म्हणाल तर तो अगदी कुठलाही असू शकतो. वेगवेगळे दगड गोळा करण्याचं किंवा पक्षी निरीक्षणाचं.. कसलं कसलं वेड घेतात लोक डोक्यात; पण तेच त्यांच्या आनंदाचं आणि उत्साहाचं रहस्य असतं. आनंद हवा असेल, तर थोडं वेडं व्हावंच लागतं. नेहमी 'शहाणंसुरतं' राहून जमत नाही.

शहाणंसुरतं राहायचं असेल, तर वाचनाचा छंद लागतोच. पुस्तकांची सोबत म्हणजे तर अक्षरआनंदाची सोबत. ही सोबत तुम्हांला कधीच दगा देत नाही. या आनंदासाठी टिच्चून पैसे मोजावे लागत नाहीत. तुमचा हा आनंद कुणीच हिरावून घेऊ शकत नाही. सपाटून वाचावं आणि झपाटून जावं. माणसं अस्वस्थ होतात, उदास होतात, तेव्हा परमेश्वराचा धावा करतात. काहीजण अशा वेळी आवडीचं पुस्तक वाचतात, त्यादृष्टीनं पुस्तकाला परमेश्वरच म्हणायला हवं. अशा वेळी मित्रही हवे असतात; पण ते काही नेहमी उपलब्ध नसतात. पुस्तकं म्हणजे कायम उपलब्ध असलेले मित्र असतात.

निसर्गाची सोबत, संगीताची साथ, पुस्तकांची संगत असेल, तर माणूस जगाच्या पाठीवर कुठंही एकटा राहू शकतो. एकटं असण्यातही एक वेगळाच आनंद असतो. तुम्ही स्वत:च्या अंतरंगात हलकेच डोकावू शकता, स्वत:ला ओळखू शकता, स्वत:शी संवाद साधू शकता. एकटे असताना तुम्ही विचार करू शकता, एकटं असतानाच तुम्हांला नव्या कल्पना सुचू शकतात. निर्मिती, शोध, साक्षात्कार हे एकटेपणाचेच आविष्कार असतात. जो एकटेपणातला आनंद घेऊ शकतो, थेट जीवनाच्या सोबतीनंच जगू शकतो, दु:ख त्याच्या वाटेला कधीच जात नाही!

आनंदासाठी मन मोकळं असावं लागतं. भूतकाळाची स्मृती आणि भविष्याची भीती या दोन्हींपासून मन मुक्त होतं, तेव्हाच ते आनंद अनुभवू शकतं. भूतकाळ संपलेला असतो, भविष्यकाळ अनिश्चित असतो. खरा असतो तो फक्त वर्तमानकाळ. तोच भरभरून जगायचा असतो.

वर्तमानात जगायचं असेल तर जगण्याविषयी प्रेम हवं. जगण्याची हौस हवी. ही हौस नसेल, तर 'आजचं काम उद्या करू' असं होतं. काम उद्यावर ढकललं जातं किंवा कसंतरी उरकलं जातं. आपण सगळंच उरकून टाकत असतो. अंघोळ उरकतो, जेवण उरकतो, काम उरकतो. एका अर्थी आपण जगणंही उरकतोच. मग आनंद कसा घेणार?

एखाद्या गाण्याच्या कार्यक्रमाला आपण जातो. त्यात पूर्ण रंगून जातो का? कार्यक्रम संपल्यावर रिक्षा मिळेल की नाही, याची चिंता करत बसलो, तर गाण्याचा आनंद कसा घेणार? यासाठी आताच्या क्षणात जगा, याचा सोपा अर्थ म्हणजे या क्षणी उत्कटतेनं जे करावंसं वाटतंय आणि जे शक्य आहे, ते करा. पावसात भिजावंसं वाटतंय ना, मग भिजा. लोक काय म्हणतील, याचा विचार करू नका. असा विचार करत बसलात, की तो क्षणही गेला आणि आनंदही गेला.

खरा आनंद, टिकाऊ आनंद हा अंतरंगातून येतो. बाह्य यश, वैभव मिळवण्यातही आनंद असतो; पण जर तुम्ही यात दु:खी असाल, उदास असाल, तर बाह्य यश तुम्हांला आनंद देऊ शकत नाही. जेव्हा भरपूर सुख, वैभव मिळवूनही माणसाला आनंद मिळत नाही. स्वत:बद्दल 'छान' वाटत नाही, समाधान होत नाही, तेव्हा माणूस एक चुकीचा निष्कर्ष काढतो. त्याला वाटतं, मला अजून काहीतरी मिळवायला हवंय. ते मिळालं, तरच मला आनंद वाटेल. हीच गल्लत होते. अशा वेळी त्यानं बाहेर नव्हे, आत डोकवायला हवं. एवढं मिळवूनही मी आनंदात का नाहीये? मला अशांत, अस्वस्थ का वाटतं आहे? मला नेमकं काय हवं आहे? अशा वेळी उत्तर मिळू शकतं, 'मला विरंगुळा हवा आहे, मला बायको-मुलांत रमायला हवंय, मला मित्रांशी जिवाभावाचं बोलायला हवंय, मला लिहायला हवंय, मला लॅन्डस्केप्स् करायला हवीत.' तुम्ही आनंदी नसता, त्यावेळी आणखी काही मिळवणं, अधिक पैसा कमावणं, अधिक नाव कमावणं हे त्यावरचं उत्तर नसतं. आपल्याला काय हवंय, ते शोधणं हेच उत्तर असतं आणि जे खरोखर हवं असतं, ते आपल्याजवळ असतंच. आनंद, प्रेम, शांती, समाधान हे सगळं अंतरंगातच असतं. त्या अंतरीच्या आनंदाशी नातं जोडणं हीच आपली खरी गरज असते. हे नातं जोडणं अगदी सोपं असतं. आनंद जर 'मानता' येत असेल, तर तो 'मिळवायचा' कशाला? असं काहींना वाटतं. एक साधं उदाहरण घेऊ. जे रोज ताटात येतं, ते आपण आवडीनं खायला हवंच. अगदी झुणका-भाकर आली तरीही. अन्न हे पूर्णब्रह्म म्हणतात, ते खरंच आहे; पण याचा अर्थ आयुष्यभर झुणका-भाकर खाऊन दिवस काढावेत, असा थोडाच होतो?

अधिक सुखाचे-मी सुखाचे म्हणतोय-दिवस यावेत, गोडधोड खावं, असं वाटणं गैर आहे का? 'गोडधोड' हे सुद्धा पूर्णब्रह्मच असतं की! कष्टाची भाकर गोड लागते यात शंकाच नाही; पण कष्टाचं गोडसुद्धा गोडच लागतं की! ते अधिक गोड लागतं, जर त्यात स्वकर्तृत्वाची गोडी मिसळली असेल तर!

अधिक मिळवायला हवं; पण हवं असणं म्हणजे हाव असणं नव्हे. पैसा का हवा असतो? पैसा मिळाल्यानं आनंद होतो. तो आनंद पैशाचा नसतो, तो आपण कमावला, याचा आनंद असतो.

पैशाशिवाय जो आनंदी राहू शकतो, तोच पैशानं अधिक आनंद घेऊ शकतो. नाही तर कितीही पैसे मिळाले, तरी त्याचं समाधान होत नाही. तो पैशाच्या, अधिक पैशाच्या पाठी धावत राहातो आणि आनंदाला अधिक पारखा होत जातो.

यश मिळतं, वैभव मिळतं, कीर्ती मिळते, तेव्हा नक्की काय होतं? अंतरीचा आनंद द्विगुणित होतो. २ × २ = ४ असा आनंदाचा गुणाकार होतो; पण मुळातच आनंद शून्य असेल तर? शून्याला कितीही मोठ्या यशानं, पैशानं गुणलं, तरी गुणाकार शून्यच येणार.

यश, वैभव ही आनंदाची कारणं नव्हेत. आनंद अनुभवण्याची ती निमित्तं आहेत. पैशानं आनंद विकत घेता येत नाही. खरा आनंद विकाऊ नसतोच. टिकाऊ असला तरच तो खरा आनंद.

एखाद्या ध्येयानं, स्वप्नानं झपाटून जाणं आणि त्याच्या पूर्ततेसाठी झटून प्रयत्न करणं हेच माणसाचं जगणं आहे; पण या प्रयत्नांतही आनंद असतोच. तो घेता आला, की आनंदासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही.

आनंदी आयुष्यासाठीचं एक सोपं तत्त्व आहे- ज्यात तुम्हांला खरा आनंद होतो, तेच क्षेत्र निवडा. स्वत:च्या आवडीचं काम निवडा. केवळ आई-वडिलांची इच्छा म्हणून मुलानं डॉक्टर होऊन काय साधतं? त्याला वाटतं आपण आई-वडिलांच्या आनंदासाठी हे केलं; पण जेव्हा आई-वडिलांना जाणवतं, की मुलगा खरा आनंदी नाही, तेव्हा शेवटी तेही खंतावतातच.

ज्यात तुम्हांला खरा आनंद वाटतो, तेच काम करा. अर्थात काही वेळा हे शक्य नसतं. हवं तेच काम मिळतं,

असं नाही; पण अशा वेळी जे काम करायचंच आहे, त्यात आनंद घ्यायला शिकणं हेही शक्य असतंच. कुठल्याही कामात आनंद घ्यायच्या पुष्कळ युक्त्या असतात. तुमच्यासारखंच काम करणारे इतर कित्येक जण हसत, मजेत काम कसं करू शकतात, ते जाणलंत, तर तुम्हीही हसत, आनंदात काम करू शकाल, यश मिळवू शकाल.

शांत चित्तानं, आनंदी वृत्तीनं काम केलं, तर यश मिळत जातं. मिळणाऱ्या यशामुळे आत्मविश्वास, उत्साह वाढतो, अधिक आनंद होतो, त्यामुळे पुन्हा अधिक यश, अधिक आनंद- अशा आनंदाच्या चक्रवाढीवर आयुष्याचं चक्र फिरत राहातं. आयुष्य हा संघर्ष राहात नाही... ती एक सततची संधी वाटते, आनंदाचा उत्सव वाटतो.

(मजेत जगावं कसं?)

## कृती

**(१) (अ) कृती करा.**

(१) **लेखकाने सांगितलेल्या आनंदाच्या गमती**
→
→
→
→

(२) **लेखकाने वर्णिलेली खऱ्या आनंदाची लक्षणे**
→
→
→
→

(३) **माणसाच्या एकटेपणातून निर्माण होणारे आविष्कार**
→
→
→

**(आ) खालील विधाने योग्य की अयोग्य ते लिहा.**

(१) यश, वैभव ही आनंद अनुभवण्याची निमित्तं आहेत.
(२) पैशाने आनंद विकत घेता येऊ शकतो.
(३) शिकण्यातला आनंद तात्पुरता असतो.
(४) यशामुळे आत्मविश्वास वाढतो.
(५) ज्यात तुम्हांला खरा आनंद वाटतो, तेच काम करा.

**(इ) हे केव्हा घडेल ते लिहा.**

(१) माणसाला आनंद दुसऱ्याला वाटावासा वाटतो, जेव्हा...
(२) माणूस दु:खातून बाहेर पडत नाही, जेव्हा...
(३) आनंद हा तुमचा स्वभाव होईल, जेव्हा...
(४) एका वेगळ्या विश्वात वावरता येतं, जेव्हा...

**(२) (अ) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) मनाची कवाडं-
(२) आनंदाचा पाऊस-

### (आ) खालील चौकटी पूर्ण करा.

(१) आनंदाला आकर्षित करणारा–

(२) शरीर आणि मन यांना जोडणारा सेतू–

(३) बाहेर दाराशी घुटमळणारा–

(४) आनंदाला प्रसवणारा–

(५) आनंद अनुभवण्याची निमित्तं–

## (३) व्याकरण.

### (अ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून लिहा.

(१) एवढं मिळवूनही मी आनंदात का नाहीये? ........................

(२) 'गोडधोड' हे सुद्धा पूर्णब्रह्मच असतं की! ........................

(३) आनंदासाठी मन मोकळं असावं लागतं. ........................

### (आ) योग्य पर्याय निवडा व लिहा.

(१) माणसं स्वत:चा छंद कसा विसरू शकतात? या वाक्याचे विधानार्थी वाक्य–

(अ) माणसं स्वत:चा छंद नेहमी विसरतात.

(आ) माणसं स्वत:चा छंद लक्षात ठेवतात.

(इ) माणसं स्वत:चा छंद विसरू शकत नाहीत.

(ई) माणसं स्वत:चा छंद किती लक्षात ठेवतात.

(२) हा आनंद सर्वत्र असतो. या वाक्याचे प्रश्नार्थी वाक्य–

(अ) हा आनंद कुठे नसतो?

(आ) हा आनंद कुठे असतो?

(इ) हा आनंद सर्वत्र नसतो का?

(ई) हा आनंद सर्वत्र असतो का?

(३) किती आतून हसतात ती! या वाक्याचे विधानार्थी वाक्य–

(अ) ती आतून हसतात.

(आ) ती फार हसतात आतून.

(इ) ती आतून हसत राहतात.

(ई) ती खूप आतून हसतात.

### (इ) खालील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | झुणकाभाकर | | |
| (२) | | सूर्याचा अस्त | |
| (३) | | अक्षर असा आनंद | |
| (४) | प्रतिक्षण | | |

(ई) **खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा व लिहा.**

(१) स्वत:च्या आवडीचे काम निवडा. ......................

(२) लोकांना पेढे वाटणं वेगळं. ......................

(३) कष्टाची भाकर गोड लागते. ......................

(उ) **'आनंद' या शब्दासाठी पाठात आलेली विशेषणे शोधा व लिहा.**

............... ............... ............... ............... ...............

**(४) स्वमत.**

(अ) 'जे काम करायचचं आहे, त्यात आनंद घ्यायला शिकणं हेही शक्य असतं', या विधानाबाबत तुमचे मत सविस्तर लिहा.

(आ) 'सौंदर्य जसं पाहणाऱ्याच्या दृष्टीत असतं, तसा आनंद घेणाऱ्याच्या वृत्तीत असतो', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(इ) 'आनंदाचं खुल्या दिलानं स्वागत करावं लागतं', या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

(ई) 'प्रत्येक माणसाला आपल्या अस्तित्वाचे भान असणे अत्यंत गरजेचे आहे', तुमचे मत लिहा.

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) खरा, टिकाऊ आनंद मिळवण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) तुमचे जीवन आनंदी होण्यासाठी तुम्ही काय काय कराल, ते लिहा.

**उपक्रम :**

प्रस्तुत पाठात आलेल्या इंग्रजी शब्दांची यादी करा. त्यांसाठी वापरले जाणारे मराठी शब्द लिहा.

- **तोंडी परीक्षा.**

(अ) **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(१) आभाळाकडे डोळे लावणे.

(२) विसर्ग देणे.

(आ) **'माझ्या जीवनातील आनंदाचे क्षण' या विषयावर पाच मिनिटांचे भाषण सादर करा.**

# ४. रे थांब जरा आषाढघना

**■ बा. भ. बोरकर** (१९१० ते १९८४) :

श्रेष्ठ कवी, कादंबरीकार, ललित लेखक, कथाकार. 'पद्मश्री' या सन्मानाने भारत सरकारकडून गौरवान्वित. कवितेचे संस्कार लहानपणापासूनच. निसर्ग आणि प्रेम हे त्यांच्या कवितेचे मध्यवर्ती विषय आहेत. बोरकरांच्या कविता निसर्गप्रतिमांनी संपन्न आहेत. तीव्र संवेदनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व नादमयता हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. १९६० साली त्यांच्या तोपर्यंतच्या सर्व कवितांचा संग्रह 'बोरकरांची कविता' या नावाने प्रकाशित झाला. त्यांचे 'गितार', 'चैत्रपुनव', 'चांदणवेल', 'कांचनसंध्या', 'अनुरागिणी', 'चिन्मयी' हे काव्यसंग्रह, 'कागदी होड्या', 'घुमटावरले पारवे', 'चांदण्याचे कवडसे', 'पावलापुरता प्रकाश' हे लेखसंग्रह, तसेच 'मावळता चंद्र', 'अंधारातली वाट', 'भावीण', 'प्रियदर्शिनी', 'समुद्रकाठची रात्र' इत्यादी ललित साहित्याची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'सासाय' या कोंकणी कवितासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

निसर्गसौंदर्याने ओथंबलेल्या 'रे थांब जरा आषाढघना' या कवितेत काव्यही तितकेच ओतप्रोत भरलेले आहे. आषाढमासातील पावसाने निसर्गाला चहूबाजूने हिरवाईच्या नाना छटांनी नटवलेले आहे. हे निसर्गसौंदर्य अनुभवायचे असेल तर आषाढमेघाने क्षणभर थांबावे आणि निसर्गात त्यानेच घडवलेली रंगीबेरंगी जादुई किमया पाहण्याची संधी आपणाला द्यावी असे कवीला वाटते. आषाढमेघ थांबला तर लालसर मातीतील हिरवीगार शेते, शेतात चाललेली औते, वेळूंची बेटे, फुललेला केवडा, सोनचाफा, लाजरी जाई हे निसर्गसौंदर्य मनसोक्त पाहता येईल. रत्नजडीत पंखांच्या फुलपाखरांचे थवे, पाण्यात सळसळणाऱ्या मासोळ्या आणि रात्रीच्या मिट्ट काळोखात चमकणारी काजव्यांची प्रकाशफुले यांच्याशी सुखसंवाद साधता येईल असे कवीला वाटते.

निसर्गाच्या विविध घटकांमधून डोकावणाऱ्या मानवी भावभावनांमुळे कवितेतील वातावरण अधिक सजीव आणि चैतन्यमय झाले आहे. अभिव्यक्तीच्या आवश्यकतेनुसार कधी संस्कृत तर कधी ग्रामीण बोलीतील शब्दांची गोड रूपे वापरून कवीने या रचनेत निर्माण केलेल्या माधुर्याचा आस्वाद घेताना आपण चकित होऊन जातो.

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा

कोमल पाचूंचीं हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा

रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा

उघड गगन, कर घडिभर आसर
आणि खुलें कर वासरमणि-घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा



कणस भरू दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णां

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना

काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करुं दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

(चैत्रपुनव)

## कृती

**(१) (अ) कारणे शोधा.**

(१) कवी आषाढघनाला थांबायला सांगतात, कारण............

(२) कवीने आषाढघनाला घडीभर उघडण्यास सांगितले, कारण............

**(आ) खालील वर्णनासाठी कवितेत आलेले शब्द लिहा.**

(१) शेतातील हिरवीगार पिके– ☐

(२) पोवळ्यांसारखी लाल कणीदार माती– ☐

(३) वेळूंच्या बेटांचे वर्णन करणारा शब्द– ☐

(४) फुलपाखरांच्या पंखांवरील रत्नासारखे तेज दर्शवणारा शब्द– ☐

**(इ) एका शब्दात उत्तर लिहा.**

(१) रोमांचित होणारी–

(२) नव्याने फुलणारी–

(३) लाजणाऱ्या–

**(ई) कृती करा.**

(१) **कवीने आषाढघनाला करायला सांगितलेली कामे** → → → →

(२) **आषाढघन घडीभर थांबल्यावर घडणाऱ्या गोष्टी** → → → →

(२) जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) काळोखाची पीत आंसवे | (अ) पाऊस उघडला तर पाण्यातील चंद्रबिंब पाहात |
| (२) पालवींत उमलतां काजवे | (आ) ओलसर वातावरणातील मिट्ट काळोखाचे दु:ख अनुभवत |
| (३) करूं दे मज हितगूज त्यांसवें | (इ) वृक्षपालवीत उघडमीट करत चमकणाऱ्या काजव्यासोबत |
| (४) निरखीत जळांतिल विधुवदना | (ई) मला गुजगोष्टी करू दे |

(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.

कणस भरूं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णां

(४) काव्यसौंदर्य.

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना, या ओळींतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा.

(५) रसग्रहण.

खालील ओळींचे रसग्रहण करा.

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा
कोमल पाचूंचीं हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा
रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा

(६) अभिव्यक्ती.

(अ) आषाढातील पावसाचा तुम्ही घेतलेला एखादा अनुभव शब्दबद्ध करा.
(आ) 'आषाढघनाचे आगमन झाले नाही तर...' या विषयावर निबंध लिहा.

उपक्रम :

(अ) पाच निसर्गकवितांचे संकलन करा आणि त्याचे वर्गात प्रकट वाचन करा.
(आ) पावसाशी संबंधित पाठ्यपुस्तकाबाहेरील पाच कवितांचे सादरीकरण करा.

• तोंडी परीक्षा.

'रे थांब जरा आषाढघना' या कवितेचे प्रकट वाचन लयीत करा.

# ५. वीरांना सलामी

■ अनुराधा प्रभुदेसाई (१९५६) :

प्रसिद्ध लेखिका. लक्ष्य फाउंडेशनच्या संस्थापिका. या फाउंडेशनच्या माध्यमातून २००४ पासून श्रीनगर, लडाख, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि आसाममधील आघाड्यांवरील ठाण्यांवर जाऊन जवानांशी संवाद साधून 'आम्ही तुमच्या सोबत आहोत', असा विश्वास देण्यासाठी पुढाकार. कारगिल युद्धातील बारा वीरांच्या शौर्यगाथांच्या पुस्तिकांचे शाळांमध्ये वितरण. 'ऋणानुबंध सैनिकांशी–कारगिल शौर्यगाथा' हे दृक्श्राव्य सादरीकरण. सैनिकांबद्दल आदरभाव व्यक्त करणाऱ्या 'सैनिकांसाठी रक्षाबंधन', 'सैनिकांबरोबर दिवाळी', 'सैनिक माझा व्हॅलेंटाईन', 'प्रत्येक सैनिक एक पणती', 'सैनिकांसोबत युवा प्रेरणा' अशा कार्यक्रमांचे आयोजन.

सन २००४ मध्ये केवळ एक पर्यटक म्हणून लडाखला गेलेल्या लेखिकेला १९९९ चे कारगिल युद्ध आपल्यापर्यंत पोहोचले कसे नाही याची खंत वाटत राहते. त्यानंतर विजयस्तंभाच्या साक्षीने 'पुढील पाच वर्षे या भूमीवर येऊन सर्व वीरांना सलामी देईन' अशी ती शपथ घेते. त्या शपथपूर्तीच्या वाटेवरचा प्रवास म्हणजे हा पाठ! कुटुंबापासून खूप दूर सीमेवर 'सेवा परमो धर्म:' चे पालन करत सैनिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशरक्षणाचे काम करतात. कुटुंबियांच्या प्रेमासाठी आसुसलेल्या या सैनिकांसोबत जेव्हा रक्षाबंधन साजरे केले जाते तेव्हा ते खऱ्या अर्थाने 'रक्षाबंधन' कसे ठरते, याचा प्रत्ययकारी अनुभव या पाठातून मिळतो. जवानांच्या ठाण्यांपर्यंत पोहोचण्यासाठी लेखिकेने केलेल्या प्रवासातून सीमेवरील खडतर परिस्थितीची खरी कल्पना येते. अशा परिस्थितीत जिवाची बाजी लावून काम करणाऱ्या जवानांबद्दलच्या अभिमानाने आपला ऊर भरून येतो. आपणसुद्धा जवानांसाठी ठोस काहीतरी करायला हवे असे वाटते.

एका पर्यटकाच्या नजरेतून सुरू केलेला सात दिवसांचा प्रवास–लेह, नुब्राव्हॅली, पँगाँग लेक आणि सरतेशेवटी द्रास, कारगिल! आता शेवटचा टप्पा शिल्लक होता. कारगिल आणि द्रास! सोबत असलेला लडाखी ड्रायव्हर स्टानझिन पाच वर्षांपूर्वी घडलेल्या कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा देत होता. गाडी पुढे जात होती. आम्ही द्रासला पोहोचलो. शासकीय विश्रामगृहात दोन खोल्या मिळाल्या.



सकाळी उठून लांबूनच दिसणाऱ्या टायगर हिलच्या सुळक्यांचं दर्शन घेतलं. थोड्याफार मिळालेल्या माहितीमुळे १९९९ साली इथे काय उत्पात घडला असेल, ह्या कल्पनेनंही अंगावर काटा आला. नि:शब्द अवस्थेतच तोलोलिंगच्या पायथ्याशी बांधलेल्या 'ऑपरेशन विजय'च्या स्मारकापर्यंत पोहोचलो. समोर दिसणारा तोलोलिंग, डावीकडे नजर गेली, की दिसणारा रौकीनॉब, हंप, इंडिया गेट, थ्री पिपल, टायगर हिलचा सुळका, त्याच्या बाजूचा पॉईंट ४८७५–भारतीय जवानांनी काबीज केलेल्या शिखरांची रांग. होय, याच मातीतून धूळ अंगावर घेत उंच १६००० फुटांवर बर्फाच्छादित शिखरांवर, शत्रूच्या तोफा पहाडावरून आग ओकत असताना ह्या भयाण पर्वतांवर आमचे धैर्यधर अथक चढत राहिले होते.

मृत्यू समोर दिसत असतानाही त्याच्या जबड्यात हात घालून मृत्यूलाच आव्हान देणारी बावीसतेवीस वर्षांची तेजोमय स्फुल्लिंगं होती ती! ज्यांना आशीर्वाद द्यायचे, त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन सलामी देणं किती कष्टप्रद आहे, ह्याची जाणीव झाली. थरथरत्या हातांनी, डबडबलेल्या डोळ्यांनी त्या स्मारकाला सलाम केला.

तेवढ्यात एक तरुण लष्करी अधिकारी तिथे आले. त्यांनी आम्हांला कारगिल–युद्धाची फिल्म बघायला तेथील दृक्–श्राव्य दालनात नेलं. तो सगळा थरार म्हणजे दुर्दम्य आशावाद, असामान्य कर्तृत्व, प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि अदम्य साहस ह्या शब्दांना मूर्तपणे

सार्थ करणारं कर्तृत्व होतं. सरतेशेवटी एका शहीद झालेल्या वीराच्या आईनं जे म्हटलं, ते ऐकून एक जबरदस्त चपराक बसल्यासारखं झालं. त्या म्हणाल्या, ''जिस देश पर मैंने अपना बच्चा कुर्बान किया है, उस देश से थोडासा प्यार तो करो!'' चाबकानं शंभर फटके मारले असते, तर ज्या वेदना झाल्या असत्या; त्यापेक्षाही कितीतरी पटीनं अधिक वेदना मनाला झाल्या. आणि त्या विव्हळ अवस्थेत विजयस्तंभासमोर शपथ घेतली–

''शिस्त, निष्ठा, समर्पण आणि त्याग ह्या माझ्या मध्यमवर्गीय शब्दकोशात सपकपणे वापरल्या जाणाऱ्या शब्दांना यथोचित न्याय देईन. केवळ शब्द नाहीत, तर तशी वृत्ती बनलेल्या सैन्यदलातील त्या वीरांचे भाट होऊन त्यांची कवनं गाईन आणि निदान पुढील पाच वर्षं नागरिकांना सोबत घेऊन ह्या भूमीवर येऊन सर्व वीरांना सलामी देईन. पन्नादाईप्रमाणे सर्वसमावेशक मातृत्व अंगीकारेन आणि त्यांच्या त्यागाला पात्र बनण्याचा प्रयत्न करेन.''

भावनिक कल्लोळ शमला आणि भानावर आल्यावर एक अस्वस्थतेची लहर स्पर्शून गेली. भावनावेगात शपथ तर घेतली; पण जमेल का हे सारं आपल्याला? विचाराअंती मन खंबीर केलं. काही क्षणातच मनाचा निश्चय झाला आणि मग प्रतिज्ञापूर्ततेच्या दृष्टीने आमची वाटचाल सुरू झाली.

ऑगस्ट महिन्यात श्रावण असतो आणि श्रावण म्हणजे 'राखी पौर्णिमा!' सगळ्यांचा आवडता सण. त्या राखीच्या एका धाग्यानं बहीण–भावाचं नातं कायमचं घट्ट राहातं. बहिणीच्या भावावरील निरपेक्ष प्रेमाची आणि भावावरील तिच्या रक्षणाच्या जबाबदारीची ही भावनिक वीण. मग आपल्या रक्षणकर्त्याला प्रत्यक्ष भेटून राखी बांधली, आशीर्वाद दिले; तर आपली कृतज्ञता व्यक्त होईल आणि राखीचा सन्मान होईल. आमचं एकमत झालं आणि रक्षाबंधनाचा मुहूर्त साधून लोकांना घेऊन कारगिलला जायचं हे निश्चित ठरवलं. चोवीसजण आमच्याबरोबर यायला तयार झाले आणि सुरू झालं 'मिशन लडाख'.

सैनिकांच्या रेजिमेंटमध्ये जायचं, सैनिकांना भेटायचं; म्हणजे जणू सिंहाच्या गुहेत प्रवेश मिळवायचा होता. बऱ्याच खटपटी करून आम्हांला निघण्यापूर्वी १४ कोअरच्या लेहमधील हेडक्वार्टरमधून प्रतिसाद आला. आम्हांला १४ कोअरच्या कर्नल झा यांनी बोलावलं होतं. आमचं मन धास्तावलं, सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांच्या केबिनमध्ये जाऊन बोलायचं होतं; पण मनातील कित्येक प्रश्नांची भेंडोळी कर्नल झा यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वापुढे बाद झाली.

''तुम्ही लष्कराचं मनोबळ खूप वाढवत आहात.'' अशी पाठीवर थाप मिळाली आणि निघताना दारापर्यंत सोडायला आल्यावर कर्नल झा हात हातात घेऊन म्हणाले, ''विसरू नका–वन्स कनेक्टेड, ऑलवेज कनेक्टेड.'' त्यांचा शब्द त्यांनी पुढील वर्षी आणि थेट दहा वर्षांनीही पाळला अरुणाचलमध्ये भारत–चीन सीमेवर भेटून!

पँगाँग लेकच्या अलीकडे एका रेजिमेन्टला आम्ही भेट देणार होतो. मी रेजिमेन्ट बाहेरच्या आर्मीच्या फोनवरून मला सांगितलेल्या व्यक्तीशी बोलले. आमचा कॉनव्हॉय मोठ्या गेटमधून आत गेला. चकाचक स्वच्छ रस्ते, क्रूकट केलेले सैनिक, वातावरणातसुद्धा अदब आणि एका मस्त मोकळ्या जागेत ओळीनं मांडलेल्या खुर्च्या, आवर्जून हस्तांदोलन करणारी मुलं आणि कमालीचं आतिथ्य! सारंच स्वप्नवत.

इतक्यात एक मुलगा जवळ आला, ''अनुराधा प्रभुदेसाई तुम्हीच का?'' मी 'हो' म्हटल्यावर तो म्हणाला, ''मीच तुमचा फोन घेतला होता. मी तुम्हांला एक सांगू का–तुमचा आवाज माझ्या मंगलमावशीसारखा आहे.'' ''खरं की काय? बरं, ती मंगलमावशी, तर मी अनुमावशी!'' मी म्हणाले. पापण्या भिजू नयेत, ह्याची दखल घेत तो म्हणाला, ''मासी, क्या मैं आपके गले लग सकता हूँ? बहुत अच्छा लगा आपसे मिलकर।'' मी म्हणाले, ''अरे विचारतोस काय, बच्चा? मीच काय ह्या सगळ्या काका आणि मावशींनापण भेट.''

माझ्या गळ्यात पडून नंतर तो सर्वांना भेटला. सगळ्यांच्या गळ्यात पडत होता. नंतर कळलं, की त्याच्या मावसबहिणीचं लग्न ठरलं होतं आणि ते त्याच दिवशी होतं; पण त्याला मिळालेली रजा काही कारणांमुळे रद्द झाली होती. माझ्या आवाजात त्याची मावशी आणि सोबत आलेल्यांमध्ये त्याचे नातेवाईक शोधत असणार तो.

ह्या सोहळ्याची साक्षी असलेली इतर मुलं माझ्याकडे आली आणि म्हणाली, ''मासी, आप बड़ी पार्शल हो।'' ''क्यों? क्या हुआ, बेटा?'' ''वो आपके गले मिल सकता है, हमने क्या पाप किया?'' जवळजवळ अर्धा तास ती

कॉंबॅट वर्दी विसरून सगळेजण आम्हांला भेटत होते. अजब सोहळा... आम्ही नुसत्या भेटीतून मायेची पाखर घालत होतो; पण तो एवढासा भावनिक ओलावाही त्यांना उबदार वाटत होता. त्या सगळ्या खऱ्या त्रात्यांना राखी बांधून बाहेर पडलो. त्यांच्या हातात बांधलेल्या राखीच्या धाग्याच्या बंधनात आम्ही कायमचे गुरफटलो. बीज अंकुरत होतं. धुमारे फुटायला थोडा अवधी लागणार होता.



प्रवासातील शेवटच्या टप्प्यात कारगिल आणि मग द्रासला जायला निघालो. तेव्हा कारगिलमध्ये शिरताना लागणाऱ्या एका पुलावर एक सैनिक तैनात होता. आमच्या चार गाड्यांची तपासणी चालू असतानाच मी त्याच्याशी गप्पा मारत होते. ''कल आपको इसी रास्ते से वापस जाना है ।'' असं तो म्हणाला. ''बढ़िया, कल फिर मिलेंगे ।'' ''नहीं, कल मैं नहीं रहूँगा । मेरा बड़ी होगा, मतलब मेरा साथी । लेकिन आपको कारगिल में किसी भी चीज की जरूरत पडे, तो यहाँ जरूर आना ।''

आम्ही योजल्याप्रमाणे कार्यक्रम आटोपून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्या पुलावर आलो, तर तोच बच्चा उभा होता. ''अरे तू परत आलास?'' ह्या माझ्या प्रश्नावर तो हसून म्हणाला, ''मैं गया ही कहाँ था? मेरा बड़ी बीमार है, इसलिए मैं कल से यहीं हूँ ।'' जवळजवळ छत्तीस तास तो मुलगा तिथे उभा होता.

''अरे, तुझा बड़ी आजपण नाही आला तर?'' माझ्या '१० ते ५' ह्या ड्युटीच्या चौकटीत हे छत्तीस तास उभं राहणं बसतच नव्हतं. तो हसून म्हणाला, ''मॅडम, कोई बात नहीं । वो ठीक होने तक मैं यहाँ खडा रहूँगा- चाहे और दो दिन भी क्यूँ ना लगे!'' 'हे इतक्या सहजतेनं तू कसं बोलतोस?' या माझ्या प्रश्नावर तो डोक्याला हात लावून म्हणाला, ''सब कुछ आसान है, मॅडमजी । सिर्फ दिमाग में डाल देना है ।'' प्रश्न पडायच्या आतच उत्तर तयार असलेला हा वीस-एकवीस वर्षांचा मुलगा!

२००६ चा लडाख हा एक नवंच रूप लेऊन समोर आला होता. आभाळच फाटलं होतं. कधीही पाऊस न पडणारा प्रदेश ओलाचिंब झाला होता. बऱ्याच ठिकाणी नद्यासदृश पाणी वाहत होते. तिथल्या लडाखी मुलांना हे सगळं अप्रूपच होतं. लेहला सुखरूप पोहोचलो; पण पुढील सगळे मार्ग बंदच होते. एकच मार्ग उघडा होता-कर्नल झा! त्यांना भेटल्याशिवाय जायचं नाही. 'दिमाग में डाल दिया था ना!' बरोबर पाच वाजता दिमाखदार वळण घेत कर्नल झा यांची गाडी प्रवेश करती झाली. आम्ही आलो आहोत, हा निरोप पाठवल्यानंतर त्यांनी अतिशय प्रेमानं आमचं स्वागत केलं. आमची अडचण समजून त्यांनी कुठले मार्ग खुले आहेत वगैरे चौकशी केली. ''निसर्गापुढे आपलं काहीच चालत नाही. उदास होऊ नका. आपके हौसले बुलंद हैं! कार्यक्रमात बदल करून आता आधी कारगिलला जा. दोन दिवसांनी तुम्ही येईपर्यंत सगळे रस्ते मोकळे होतील.'' असे ते म्हणाले. हॉटेलवर पोहोचल्यावर आमचे उजळलेले चेहरे पाहून सगळ्यांच्या मनातील मळभ दूर झालं. कर्नल झा यांच्या सूचनेप्रमाणे आम्ही आधी कारगिल-द्रास या ठिकाणांकडे निघालो.

कारगिल- द्रास येथील विजयस्तंभ, तोलोलिंग, थ्री पिंपल, बात्रा टॉप, टायगर हिल आता अगदी परिचयाचे वाटू लागले. तेथील सैनिकांना भेटून झाल्यानंतर जड अंत:करणानं 'पुनरागमनायच' म्हणत परतीच्या प्रवासाला निघालो. रात्रीचे दहा वाजले होते. आता तासाभरात लेहला पोहोचू. उद्या कुठे जायचं याची आखणी सुरू झाली. अचानक गाडीला आणि आमच्या विचारांना करकचून ब्रेक लागला.

थंडीमुळे चेहरे झाकलेले तीन जण टॉर्चच्या प्रकाशात, भयाण वातावरणाला अधिक गडद करत आम्हांला परत जायला सांगत होते. कारण पुढे खल्सेचा पूल कोसळला होता. बाहेर मिट्ट काळोख, अनोळखी रस्ता, सोबत दहा

तरुण मुली! रस्ता बंद! माघारी जाणं अशक्य, पुढं जाणं दुरापास्त! एकच आधार–आर्मी पोस्ट!

पुढे केवळ पाचशे मीटरवर आर्मीचं ट्रॅफिक चेक पोस्ट (T. C. P.) आहे, असं त्या तीन जणांनी सांगितलं, ''भाईसाब, हमारे चौंतीस लोगों का परिवार आपके हवाले करते हैं! सिर्फ टीसीपी तक जानेकी इजाजत दीजिए। अगर कुछ बात न बनी, तो हम वापस जाएँगे।'' आम्ही त्या तिघांसमोर सपशेल शरणागती पत्करली. गाडीतील प्रत्येकाच्या चेहऱ्यावरची भीती लपत नव्हती. आम्हीही धैर्याचा मुखवटाच चढवला होता. 'तुम्ही गाडीतच बसा, आम्ही आत्ता येतो.' असे सांगून आम्ही गाडीतून खाली उतरलो.

टीसीपीवर पोहोचलो. भीती आणि थंडीमुळे थरथरणाऱ्या आम्हांला गरम पाणी देऊन सैनिकांनी उबदार स्वागत केलं. रात्रीचे साडेदहा वाजले होते. खूप खटपटीनंतर कर्नलना फोन लागला आणि समोरून आवाज आला, ''अरे, कैसे हो आप? मी तुमच्याच फोनची वाट पाहात होतो. चिंता करू नका. माझा एक बंदा येईल. तुमची त्या युनिटमध्ये राहायची सोय होईल. उद्या मी संपर्क करतो.'' रात्री साडेदहापर्यंत आमची वाट पाहणारे, पुढची सोय करून ठेवणारे कर्नल! 'सेवा परमो धर्म:', लष्कराबद्दलच्या आत्मीयतेच्या, अभिमानाच्या पोतडीत आमच्यावरील ऋणाचं एक एक गाठोडं जमा होत होतं. गालावरती वाहणाऱ्या अश्रूंच्या माळा एका क्षणात हिरेजडित झाल्या; जेव्हा समोर उंच, दणकट मेजर आकाश हसतमुखानं सामोरा आला आणि म्हणाला, ''या माझ्या मागोमाग.'' का, कसे, कुठे प्रश्नच नव्हता. फक्त त्यांच्या गाडीच्या मागून अंधारात मागोमाग जायचं होतं.

एखादी मर्दुमकी गाजवून आलेल्या योद्ध्यांप्रमाणे युनिटमधील आठ–दहा जणांनी आमचं जोरकस स्वागत केलं. आधी आम्हा छत्तीसजणांना वाफाळलेला चहा आणि गरमागरम भजी खाऊ घातली, वयाप्रमाणे चार ठिकाणी राहण्याची सोय केली, टेलिफोन लावून दिले. थोड्याच वेळात पूर्ण जेवण तयार केलं. रात्रीचे बारा वाजले होते. ''आप हमें मिलने के लिए इतनी दूर से, मुंबई से आते हो, हमें भी आपके लिए कुछ करने का मौका दीजिए।'' सगळेजण कामकरी मुंगीसारखे झपाझप काम करत होते. प्रसन्न, उमद्या चेहऱ्यानं आत्यंतिक कार्यव्यग्रतेत केलेलं आमचं हे आतिथ्य ठायीठायी माझ्या शहरातील आत्मकेंद्री आणि संकुचित आयुष्याला धक्का पोहोचवत होतं! 'स्वयम्' मधून 'कोऽहम्' असा निनाद उमटत होता!

लेह आणि १४ कोअर हे आमच्यासाठी एक समीकरणच बनलं होतं. तिथूनच वेगवेगळ्या रेजिमेंटला जाण्याची परवानगी मिळत होती. २००७ साली नवीन कर्नल असतील, ह्याचा अंदाज कर्नल झा यांनी दिला होताच. नवीन कर्नल आपल्याला समजून घेतील का? सहकार्य करतील का?

आम्ही कर्नलसाहेबांच्या केबीनपर्यंत पोहोचलो. तीच केबीन, तीच खुर्ची, तशीच वर्दी, माणूस बदलला; पण तीच वृत्ती! कर्नल राणा! कर्नल झा यांनी आमच्याविषयी त्यांना आधीच सांगितलं होतं. त्यामुळे ते आमच्याशी अत्यंत आत्मीयतेनं बोलत होते. समाजात होत जाणाऱ्या बदलांबद्दल थोडे व्यथित होते. ते म्हणाले, ''आमच्याकडे नवीन रूजू झालेला मुलगा ज्या समाजातून येतो, तिथलं भावविश्व आणि इथलं वास्तव यात जमीन–अस्मानचा फरक आहे. टीव्हीमुळे समाजातला उथळपणा आणि मोबाईलमुळे घरची प्रत्येक गोष्ट त्याला कळते. या मुलांची मानसिकता सांभाळत त्यांना खऱ्या अर्थी 'सैनिक' बनवणं हे फार जिकिरीचं होत चाललं आहे. मला फार आनंद होत आहे, की तुम्ही सैनिकाला समजून घ्यायला इथं येत असता. तुम्ही नेहमी येत जा.'' आम्हांला 'सैनिक' नावाचा माणूस कळू लागला होता. बघता बघता २००८ साल उजाडले. माझे वचन पूर्ण झाले होते.

''अनुमावशी, ह्या आसमंतात एक सुगंध पसरला आहे. तुला जाणवतो आहे का?'' द्रास, कारगिल येथील युद्धात शहीद झालेल्या वीरांचं स्मारक–विजयस्तंभ, तोलोलिंगचा पहाड ह्या सर्व हृदयस्पर्शी वातावरणातून बाहेर पडल्यावर भारावलेल्या नि:शब्दतेचा भंग करत आमच्याबरोबर आलेली भाग्यश्री भावूक होऊन उद्गारली. कदाचित तिचं हे स्वगत असावं; पण तरीही मी विचारलं, ''कसला गं?''

भाग्यश्री जणू आमच्यात नव्हतीच, तिचं स्वत:शी बोलणं चालूच होतं, ''अगं ह्या वातावरणात भारतीयत्वाचा सुगंध आहे. इथला प्रत्येक डोंगरमाथा वीरश्रीचा साक्षीदार आहे. इथल्या मातीच्या कणाकणांत कारगिल युद्धाचा रोमांचकारी इतिहास आहे. तो रोमारोमांत जाणवतो आहे.

आतापर्यंत कधीच अशी जाणीव झाली नाही. देशप्रेम, देशाभिमान फक्त सैनिकांपुरताच किंवा सीमेवरच असतो का गं? आपलं आणि त्यांचं काही देणं घेणं लागत नाही का?''

लेह, नुब्राव्हॅली, पँगाँग लेक आणि शेवटी द्रास, कारगिल अशा अव्याहत प्रवासात सतत भेटणारे, भरभरून बोलणारे जवान. त्यांची लष्करी अदब, प्रांत, धर्म, जात, भाषा अशा कुठल्याही प्रतिबंधाचा स्पर्शही नसलेले, केवळ भारतीयत्वाचा सुगंध ल्यालेले, सरहद्दीवर ठाम उभे राहिलेले आपले जवान! त्यांच्या शौर्याची, धाडसाची, खडतर साहसाची सतत आठवण राहावी, म्हणून सुरू केलेल्या मिशन लडाखचं हे शेवटचं पाचवं वर्ष! भाग्यश्रीच्या आणि बरोबर आलेल्या प्रत्येकाच्या मनात ही संवेदना निर्माण झाली, हे त्याचंच फलित. 'याचसाठी केला होता अट्टाहास!'

गेल्या पाच वर्षात एक मात्र निश्चित जाणवलं, की तिथे गेल्यावर आपला अहंकार, बडेजाव आणि प्रतिष्ठितपणाची चढलेली पुटं निखळून पडताहेत. लडाखच्या भिन्न भिन्न दऱ्याखोऱ्यात भन्नाट एकाकी, रौद्र आणि हिरवळीचा दुरान्वयानेही संबंध नसलेल्या कठीण भूप्रदेशात राहूनही ममत्व, बंधुभाव जपणाऱ्या, नाती जोडणाऱ्या आणि ती टिकवणाऱ्या सैनिकांना भेटलं, की 'आपली माणसं' भेटल्याचा गहिवर दाटून येत आहे. आपले सैनिक हे हिरे आहेत. त्यांना आपण जपलं पाहिजे. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे.

आम्ही पाच वर्षं रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत, याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडियर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात, याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता?

आमच्याशी संवाद साधत असताना ब्रिगेडियर ठाकूर आम्हांला म्हणाले, ''तुम्ही पाच वर्षांचा वादा केलात आणि तो निभावलात, ह्याबद्दल अभिनंदन; पण माझा प्रेमाचा, वयाचा अधिकार आणि हक्क वापरून सांगतो, तुम्ही हे मिशन बंद करू नका. इथे नेहमी या. आमच्या तरुण जवानांना भेटा त्यांचा हौसला बुलंद करा. तुमच्या शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना सांगा, आम्हांला त्यांची गरज आहे. निदान पाच वर्ष तरी कमिशंड ऑफिसर म्हणून डिफेन्स सर्व्हिसेस जॉईन करा. मग पुढच्या आयुष्यात तुमचं करिअर करायला तुम्ही मोकळे आहात! तरुण मुलींना सांगा, की आमच्या जवानांशी विवाह करायला डगमगू नका आणि मला वचन द्या, की हा जो लष्कर आणि नागरिकांमध्ये तुम्ही एक भावनिक सेतू बांधत आहात, ते काम थांबवणार नाही.''

वातावरणात नीरव शांतता! त्याचा भंग करत मी आवेगाने म्हणाले, 'नक्की सर, हे काम मी कधीच थांबवणार नाही'. तोलोलिंग पहाडीवरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकेने जणू कानात हळूच म्हटले 'तथास्तु'. भासच तो; पण अंगावर रोमांच उठले, नकळत तोलोलिंगला सॅल्यूट ठोकला. माघारी वळले ते, 'ह्या वीरांच्या त्यागाला, समर्पणाला अधिक लायक, अधिक जबाबदार, विवेकी आणि देशाबद्दल कर्तव्याची जाण असलेली भारतीय नागरिक बनून युवकांनाही तसे बनवण्याचा आटोकाट प्रयत्न करेन' असे सैनिकांना आश्वासन देऊनच! कारण ते म्हणतात,

**'माघारी जेव्हा जाल परतून, ओळख द्या आमची त्यांना**
**आणि सांगा तुमच्या 'उद्या'साठी ज्यांनी आपला 'आज' दिला.'**

**(तुमच्या 'उद्या'साठी आपला 'आज' देणारा सैनिक)**

(१) (अ) कृती करा.

(१) दृक्–श्राव्य दालनातील कारगिल युद्‌धाच्या फिल्ममधील थरार म्हणजे
→
→
→
→

(२) कारगिल क्षेत्रातील विजयस्तंभासमोर लेखिकेने घेतलेल्या शपथेनुसार करावयाची कार्ये
→
→
→
→

(३) लेखिकेने सांगितलेली शहरी जीवनाची वैशिष्ट्ये
→
→

(४) लेखिकेने वर्णन केलेली भारतीय जवानांची वैशिष्ट्ये
→
→
→
→

(आ) चौकटीत उत्तरे लिहा.

| | |
|---|---|
| (१) तोलोलिंगच्या पायथ्याशी असलेले स्मारक | |
| (२) भयाण पर्वतांवर चढणारे | |
| (३) मृत्यूलाच आव्हान देणारी | |
| (४) कारगिल युद्‌धाच्या आठवणींना उजाळा देणारी | |
| (५) चोवीस जणांची लडाख भेट | |

(इ) कारणे लिहा.

(१) थरथरत्या हातांनी आणि डबडबलेल्या डोळ्यांनी 'ऑपरेशन विजय'च्या स्मारकाला सलाम केला, कारण............
(२) 'मिशन लडाख' साठी 'राखी पौर्णिमे'चा मुहूर्त निवडला, कारण............
(३) लष्कराबद्‌दलच्या आत्मीयतेच्या, अभिमानाच्या पोतडीत आमच्यावरील ऋणाचं एक एक गाठोडं जमा होत होतं, कारण............
(४) समाजात होत जाणाऱ्या बदलांबद्‌दल कर्नल राणा थोडे व्यथित होते, कारण............

(ई) पाठाच्या आधारे खालील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करा.

(१) एवढासा भावनिक ओलावाही त्यांना उबदार वाटत होता.
(२) 'सेवा परमो धर्म:'
(३) गालावरती वाहणाऱ्या अश्रूंच्या माळा एका क्षणात हिरेजडित झाल्या.
(४) लष्कर आणि नागरिकांमध्ये तुम्ही एक भावनिक सेतू बांधत आहात.

(२) व्याकरण.

(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा.

(१) जमीन अस्मानाचा फरक असणे.
(२) आग ओकणे.
(३) अंगावर काटा येणे.
(४) मनातील मळभ दूर होणे.

**(आ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | वाक्य | वाक्यप्रकार | बदलासाठी सूचना |
|---|---|---|---|
| (१) | जमेल का हे सारं आपल्याला? | ...................... | विधानार्थी करा. |
| (२) | तुम्ही लष्कराचं मनोबळ खूप वाढवत आहात. | ...................... | उद्‌गारार्थी करा |
| (३) | यापेक्षा मोठा सन्मान कोणताही नव्हता. | ...................... | प्रश्नार्थक करा. |
| (४) | पुढील सगळे मार्ग बंदच होते. | ...................... | नकारार्थी करा. |

**(इ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | बावीसतेवीस | | |
| (२) | ठायीठायी | | |
| (३) | शब्दकोश | | |
| (४) | यथोचित | | |

**(ई) योग्य पर्याय निवडा व लिहा.**

**(१) तुम्ही गाडीतच बसा. या वाक्यातील प्रयोग–**

(अ) भावे प्रयोग
(आ) कर्तरी प्रयोग
(इ) कर्मणी प्रयोग

**(२) त्यांना आपण जपलं पाहिजे. या वाक्यातील प्रयोग–**

(अ) कर्तरी प्रयोग
(आ) भावे प्रयोग
(इ) कर्मणी प्रयोग

**(३) पुढीलपैकी कर्मणी प्रयोगाचे वाक्य–**

(अ) त्यांनी आम्हांला दृक्‌-श्राव्य दालनात नेले.
(आ) भाग्यश्री जणू आमच्यात नव्हतीच.
(इ) आम्ही धैर्याचा मुखवटाच चढवला होता.

**(३) स्वमत.**

(अ) 'जिस देश पर मैंने अपना बच्चा कुर्बान किया है, उस देश से थोडासा प्यार तो करो ।' असे शहीद झालेल्या वीराच्या आईने का म्हटले आहे, ते स्पष्ट करा.

(आ) ब्रिगेडियर ठाकूर यांनी शहरातील कुशाग्र बुद्‌धीच्या मुलांना मार्गदर्शन करण्याची विनंती लेखिकेला का केली असावी, ते स्पष्ट करा.

(इ) 'आम्हांला सैनिक नावाचा माणूस कळू लागला', या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

### (४) अभिव्यक्ती.

(अ) सैनिकी जीवन आणि सामान्य नागरिकांचे जीवन यांची तुलना तुमच्या शब्दांत करा.

(आ) कारगिलमधील पुलावर पहारा करणाऱ्या सैनिकाच्या, 'सिर्फ दिमाग में डाल देना है।' या उद्‌गारातील आशय तुमच्या जीवनात तुम्ही कसा अंमलात आणाल ते लिहा.

### उपक्रम :

(अ) रजा घेऊन गावाकडे आलेल्या एखाद्या सैनिकाची किंवा माजी सैनिकाची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(आ) पाठात आलेले 'आर्मी'शी संबंधित शब्द शोधा व त्यांचे अर्थ जाणून घेऊन ते गटासमोर सांगा.

### • तोंडी परीक्षा.

(अ) 'विजयस्तंभासमोर लेखिकेने घेतलेली शपथ' हा प्रसंग तुमच्या शब्दांत थोडक्यात सांगा.

(आ) 'मी सैनिक होणार' या विषयावर पाच मिनिटांचे भाषण द्या.

# ६. रंग माझा वेगळा

■ **सुरेश भट** (१९३२ ते २००३) :

सुप्रसिद्ध कवी, पत्रकार, संपादक. काही काळ वृत्तपत्रात वार्ताहर व साप्ताहिक 'बहुमत'चे संपादक. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात' या संग्रहांनी त्यांच्या कवितांचे वेगळेपण आणि गझलकार म्हणून स्थान निश्चित केले. त्यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या राजकीय-सामाजिक आशयाच्या कवितांतून जाणवते. माणसांचा दुटप्पी व्यवहार, स्वार्थ, ढोंगीपणा, लाचारी, समाजातील मूल्यहीनता, 'मी' ची समाजाने केलेली मानहानी यांविषयीचा प्रखर संताप ते व्यक्त करतात. प्रेमकवितेतील त्यांची मृदू व हळूवार शब्दकळाही कधीकधी तीक्ष्ण, धारदार व उपरोधिक बनते. 'गझल' या रचनाबंधाचा निष्ठापूर्वक स्वीकार व दृढनिश्चयी प्रसार हे सुरेश भट यांचे काव्यपरंपरेतील खरे योगदान. 'गझल' हा रचनाबंध लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

'रंग माझा वेगळा' या अत्यंत गाजलेल्या गझलेत आपणाला गझलकाराच्या अगदी वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते. सगळ्या गुंत्यात गुंतूनही आपला पाय मोकळा ठेवणाऱ्या कलंदर व्यक्तिमत्त्वाला येणारे अनुभवही जगावेगळेच असतात. एरव्ही सर्वांना उन्हाच्या झळा लागतात; परंतु अशा जगावेगळ्या माणसाला सावलीच्याही झळा लागतात. दु:खाचा अनुभव तर नेहमीचाच असतो; परंतु कधी काळी मिळणारे सुखही अशाप्रकारे मिळते, की त्याने आनंद वाटण्याऐवजी दु:खच वाटते. त्यामुळे गझलकाराला वाटत राहते, की जगण्यास सुरुवात करतानाच आयुष्याने आपला विश्वासघात केला आहे; परंतु अशाही परिस्थितीत दु:खांचा हसतमुखाने स्वीकार करत गेल्यामुळे दु:खांनाही माझा लळा लागला असा गझलकाराचा अनुभव आहे. त्याने स्वत:ला 'माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य' म्हटले आहे. ज्यांचे आयुष्य नैराश्य, अंधकाराने व्यापलेले आहे, त्यांच्यासाठी पेटून उठणारा मी सूर्य आहे असे तो जेव्हा नमूद करतो तेव्हा त्याची प्रखर सामाजिक बांधिलकी दिसून येते. 'सावल्यांच्या झळा', 'दु:खाचा लळा', 'मध्यरात्री हिंडणारा सूर्य' यांसारख्या परस्परविरोधी भावच्छटांमुळे अर्थाच्या दृष्टीने गझल वेगळ्या उंचीवर पोहोचते. अगदी योग्य ठिकाणी येणारे यमक, अनुप्रास यामुळे गझलेला अप्रतिम गेयता लाभली आहे.

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दु:ख ज्याला लागला माझा लळा!

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

सांगती 'तात्पर्य' माझें सारख्या खोट्या दिशा :
''चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!''

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

(रंग माझा वेगळा)

## कृती

**(१) (अ) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधा.**

| अर्थ | ओळ |
| --- | --- |
| (१) सर्वांमध्ये मिसळूनही मी माझे वेगळेपण जपतो. | ................................ |
| (२) मदत करायला येणारे अशाप्रकारे मदत करतात, की त्याचाही मला त्रास होतो. | ................................ |
| (३) हे कोणते अनामिक दु:ख आहे, की ज्याला सदैव माझ्याविषयी प्रेम वाटावे ? | ................................ |
| (४) आयुष्याने माझीच का बरे फसगत केली ? | ................................ |

**(आ) कृती करा.**

**कवितेतील विरोधी भाव दर्शवणाऱ्या गोष्टी**
- →
- →
- →
- →

**(इ) योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) माणसांची मध्यरात्र | (अ) नैराश्यातील आशेचा किरण |
| (२) मध्यरात्री हिंडणारा सूर्य | (आ) इतरांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची वृत्ती |
| (३) माझा पेटण्याचा सोहळा | (इ) माणसांच्या आयुष्यातील नैराश्य |

**(ई) एका शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) कवीची सदैव सोबत करणारी ..........................

(२) कवीचा विश्वासघात करणारे ..........................

(३) खोट्या दिशा सांगतात ते ..........................

(४) माणसांच्या अंधकारमय जीवनात साथ देणारा ..........................

**(२) खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

(१) तात्पर्य–
(२) लळा–
(३) गुंता–
(४) सोहळा–

**(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

(अ) रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

(आ) कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

### (४) काव्यसौंदर्य.

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

या ओळींमधील भावसौंदर्य स्पष्ट करा.

### (५) रसग्रहण.

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दु:ख ज्याला लागला माझा लळा!

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

### (६) अभिव्यक्ती.

(अ) 'समाजात स्वत:चे वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न करावेच लागतात', सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) कवीच्या आयुष्याने केलेली त्याची फसवणूक तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) 'मी मध्यरात्री हिंडणारा सूर्य आहे', असे कवी स्वत:बाबत का म्हणतो ते लिहा.

### उपक्रम :

(अ) मराठी गझलकारांच्या गझला मिळवून वाचा.

(आ) यू-ट्यूबरील विविध मराठी गझल ऐकून आनंद मिळवा.

- **तोंडी परीक्षा.**

'रंग माझा वेगळा' ही गझल सादर करा.

# आत्मविश्वासासारखी शक्ती नाही

**(नमुना गद्य आकलन)**

आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही. आम्ही आमच्यातील आत्मविश्वास गमावता कामा नये. उदा., कुस्ती खेळण्यासाठी आखाड्यात उतरलेल्या पहिलवानाने दुसऱ्याच्या ठणठणीत दंड थोपटण्याने घाबरून गर्भगळित झाल्यास त्याच्या हातून काहीतरी होणे शक्य आहे काय? मी तर नेहमी असे म्हणत असतो, की मी जे करीन ते होईल. अर्थात, मी हे सर्व आत्मविश्वासावर अवलंबून म्हणत असतो. माझ्या या म्हणण्यामुळे काही लोक मला घमेंडखोर, प्रौढीबाज वगैरे दूषणे देतील; परंतु ही प्रौढी अगर घमेंड नसून आत्मविश्वासामुळेच मी हे म्हणू शकतो. मी मनात आणीन तर सव्वा लाखाची गोष्ट सहज करीन. गरिबीच्या दृष्टीने विचार करता आजच्या गरिबांतील गरीब विद्यार्थ्यापेक्षा माझी त्यावेळी मोठी चांगली सोय अगर मला इतर अनुकूलता होती असे नाही. मुंबईच्या डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या चाळीत दहा फूट लांब व दहा फूट रुंद अशा खोलीत आईबाप, भावंडे यांच्यासह राहून एका पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला आहे. इतकेच नव्हे तर अनेक अडचणींना व संकटांना त्याकाळी तोंड देऊन मी जर एवढे करू शकलो तर तुम्हांस आजच्या साधन-सामुग्रीने सज्ज असलेल्या काळात अशक्य का होईल? कोणताही मनुष्य सतत दीर्घोद्योगानेच पराक्रमी व बुद्धिमान होऊ शकतो. कोणीही मनुष्य उपजत बुद्धिमान अगर पराक्रमी निपजू शकत नाही. मी विद्यार्थिदशेत इंग्लंडमध्ये असताना ज्या अभ्यासक्रमास ८ वर्षे लागतात तो अभ्यास मी २ वर्षे ३ महिन्यात यशस्वी तऱ्हेने पुरा केला. हे करण्यासाठी २४ तासांपैकी २१ तास अभ्यास करावा लागला आहे. जरी माझी आज चाळीशी उलटून गेली असली तरी मी २४ तासांपैकी सारखा १८ तास अजूनही खुर्चीवर बसून काम करत असतो. दीर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यशप्राप्ती होते.

**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## • नमुना कृती

**(१) कृती करा.**

(अ) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे या उताऱ्यातून जाणवणारे गुण** → ______ → ______

(आ) **व्यक्तीच्या दीर्घोद्योगाचा परिणाम** → ______ → ______

**(२) अभिव्यक्ती.**

व्यक्तीच्या जीवनातील 'आत्मविश्वासाचे' स्थान स्पष्ट करा.

❁❁❁

# ७. विंचू चावला...

■ **संत एकनाथ** (१५३२ ते १५९९) :

श्रेष्ठ संतकवी. संत एकनाथ महाराज यांनी 'चतु:श्लोकी भागवत' हा पहिला ग्रंथ रचला. 'रुक्मिणी स्वयंवर' हे आख्यानकाव्य लिहिले. 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची पाठशुद्ध प्रत तयार केली. वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आणि आचारधर्म यांचा मानवतावादी भूमिकेतून सातत्याने प्रसार केला. जोहार, गौळणी, आरत्या, अभंग, भारूडे यांसारख्या काव्यरचनेतून लोकशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे केले. जातीपातीचा भेद न मानता सर्वसामान्यांना आपल्या कार्यात सामावून घेतले.

'भारूड' हा काव्यप्रकार संत ज्ञानेश्वर महाराज यांनी प्रथम आणला; संत एकनाथ महाराज यांनी तो विशेष लोकप्रिय केला. त्यांनी अतिशय सुगम व चटकन आकर्षित करून घेतील अशी भारूडे रचली. त्यामुळे 'भारूड' म्हटले की 'एकनाथ महाराज' असा ठसा जनमानसात उमटला. 'भारूड' हे 'आध्यात्मिक रूपक' असते. सर्वसामान्य जनतेला पारमार्थिक नीतीची शिकवण द्यावी, हा त्यामागील उद्देश असतो. संत एकनाथ महाराज यांनी त्यांच्या भारूडांतून सांसारिकांना परिचित अशा रूपकांचा वापर करून शिकवण दिली. एकनाथी भारूडांची रचना विलक्षण नाट्यपूर्ण आणि चटकन पकड घेणारी आहे. संत एकनाथ महाराज यांनी जवळपास तीनशे भारूडे रचली. त्यांची काही भारूडे हिंदीतही आहेत.

'विंचू चावला' हे संत एकनाथ महाराज यांचे सुप्रसिद्ध आणि नाट्यमय भारूड आहे. या भारूडातील 'विंचू' हे 'काम' आणि 'क्रोध' या विकारांचे प्रतीक आहे. काम म्हणजे इच्छा आणि क्रोध म्हणजे राग, संताप. अनिर्बंध इच्छा आणि क्रोध यामुळे माणसाचे जीवन दूषित होते. कामक्रोधाची बाधा झाली, की माणूस विंचू चावल्याप्रमाणे बेताल वागू लागतो. विंचवाच्या चावण्यामुळे माणसाच्या शरीरात विष भिनून त्याला असह्य वेदना होतात, तसे काम आणि क्रोधाच्या बाधेमुळेसुद्धा मानवी जीवन अविचारी होते. त्यावर उपाय म्हणजे कामक्रोधांनी बाधित झाल्यावर सत्त्वगुणांचा आश्रय घ्यावा. संत एकनाथ महाराज यांनी आपल्या भारूडांमधून अंधश्रद्धेवर कोरडे ओढले आहेत. इथे सुद्धा अंगारेधुपारे या अंधश्रद्धेवर प्रहार केलेला आहे. अंगाराच लावायचा असेल, तर तो सत्त्वगुणांचा लावा, म्हणजे सद्गुणांचा अंगीकार करा. मग दुर्गुण जाऊन सद्गुणांचा विकास होईल आणि समाधान लाभेल, असा मोलाचा उपदेश संत एकनाथ महाराज यांनी या भारूडातून केला आहे.

**विंचू चावला वृश्चिक चावला ।**
**कामक्रोध विंचू चावला ।**
**तम घाम अंगासी आला ।।धृ.।।**

**पंचप्राण व्याकुळ झाला ।**
**त्याने माझा प्राण चालिला ।**
**सर्वांगाचा दाह झाला ।।१।।**

**मनुष्य इंगळी अति दारुण ।**
**मज नांगा मारिला तिनें ।**
**सर्वांगी वेदना जाण ।**
**त्या इंगळीची ।।२।।**



ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३।।

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

(श्रीसकलसंतगाथा खंड दुसरा, संपादक-प्रा. डॉ. र. रा. गोसावी)

## कृती

(१) (अ) योग्य पर्याय निवडा व विधान पूर्ण करा.

**(१) तम घाम अंगासी आला, म्हणजे...**
(अ) संपूर्ण शरीराला घाम आला.
(आ) घामाने असह्यता आली.
(इ) घामामुळे मन अस्थिर झाले.
(ई) शीघ्रकोपी वृत्ती वाढीस लागली.

**(२) मनुष्य इंगळी अति दारुण, म्हणजे-**
(अ) माणसातील विकाररूपी इंगळी अतिशय भयंकर असते.
(आ) मनुष्याला इंगळी चावणे वाईट.
(इ) इंगळी मनुष्याचा दारुण पराभव करते.
(ई) मनुष्याला इंगळी नांगा मारते.

**(३) सत्त्व उतारा देऊन, म्हणजे-**
(अ) जीवनसत्त्व देऊन.
(आ) सत्त्वगुणांचा आश्रय घेऊन.
(इ) सात्त्विक आहार देऊन.
(ई) सत्त्वाचे महत्त्व सांगून.

**(४) 'विंचू चावला वृश्चिक चावला', शब्दांच्या या द्‌विरुक्तीमुळे-**
(अ) भारूड उत्तम गाता येते.
(आ) वेदनांचा असह्यपणा तीव्रतेने जाणवतो.
(इ) भारूडाला अर्थ प्राप्त होतो.
(ई) भारूड अधिक रंजक बनते.

(आ) कृती करा.

**कामक्रोधरूपी विंचू-इंगळी उतरवण्याचे उपाय**

**(इ) खालील शब्दांचे अर्थ लिहा.**

(१) वृश्चिक ............

(२) दाह ............

(३) क्रोध ............

(४) दारुण ............

**(२) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

ह्या विंचवाला उतारा । तमोगुण मागें सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा । विंचू इंगळी उतरे झरझरां ।।

**(३) काव्यसौंदर्य.**

सत्त्व उतारा देऊन ।
अवघा सारिला तमोगुण ।
किंचित् राहिली फुणफुण ।
शांत केली जनार्दनें ।।४।।

वरील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**(४) रसग्रहण.**

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ.।।

पंचप्राण व्याकुळ झाला ।
त्याने माझा प्राण चालिला ।
सर्वांगाचा दाह झाला ।।१।।

मनुष्य इंगळी अति दारुण ।
मज नांगा मारिला तिनें ।
सर्वांगी वेदना जाण ।
त्या इंगळीची ।।२।।

**(५) अभिव्यक्ती.**

(अ) तुमच्यातील दुर्गुणांचा शोध घ्या. हे दुर्गुण कमी करून सद्गुण अंगी बाणवण्यासाठी तुम्ही काय कराल ते लिहा.

(आ) 'दुर्जनांची संगत इंगळीच्या दंशाइतकी दाहक आहे, त्यावर सत्संग हा सर्व दाह शांत करणारा उपाय आहे', स्पष्ट करा.

**उपक्रम :**

संत एकनाथ महाराज यांची इतर भारूडे मिळवून वाचा.

- **तोंडी परीक्षा.**

**'विंचू चावला' हे भारूड सादर करा.**

# ८. रेशीमबंध

■ **डॉ. यू. म. पठाण** (१९३०) :

सुप्रसिद्ध साहित्यिक, संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक, कथालेखक, संशोधक, संपादक व नामवंत वक्ते. 'पद्मश्री' या सन्मानाने भारत सरकारकडून गौरवान्वित; तसेच 'ज्ञानोबा तुकाराम' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने महाराष्ट्र शासनाकडून सन्मानित. शाळेत असल्यापासून लेखनाला सुरुवात. विविध नियतकालिकांमधून विपुल कथालेखन. 'मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप' या विषयावर संशोधन. प्राचीन मराठी व हिंदी साहित्याचे संशोधन हा त्यांचा विशेष आवडीचा प्रांत. 'भाऊसाहेबांची बखर', 'मराठवाड्यातील लोककथा', 'महानुभाव साहित्य संशोधन : खंड १' इत्यादी संशोधनपर संपादित ग्रंथ प्रकाशित. 'संतसाहित्यचिंतन', 'शोधणी', 'आठव ज्ञानदेवांचा... ज्ञानदेवीचा', 'अजून आठवतं' इत्यादी लेखसंग्रहही प्रकाशित. मराठवाड्यात विखुरलेल्या शिलालेखांचा, ताम्रपटांचा शोध हे त्यांचे अत्यंत मौलिक संशोधन कार्य आहे. १९९० साली पुणे येथे संपन्न झालेल्या त्रेसष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

या ललित गद्य पाठामधील उत्तररात्र, पहाट आणि सकाळ या प्रहरांचे ललितरम्य शैलीतील वर्णन वाचकाला चैतन्याचा परीसस्पर्श घडवते. उत्तररात्रीपासून पहाटेपर्यंतची नीरव शांतता आणि निद्रिस्त भवताल, पहाटेनंतर सकाळपर्यंत वृक्ष-वेली-पाखरांना हलकेच येणारी जाग यांची संवेदनशील मनाने टिपलेली जिवंत शब्दचित्रे मनाला अतिशय उल्हसित करतात. वृक्ष, वेली, फुले, पाखरे यांच्याबद्दल वाटणाऱ्या आत्मिक ओढीमुळे त्यांचे आणि आपले युगानुयुगांचे नाते आहे असे लेखकाला वाटत राहाते. या नात्यालाच लेखकाने 'रेशीमबंध' असे सुंदर नाव दिले आहे. पाखरे आणि पहाट परस्परांना भेटायला किती आणि कशी उत्सुक आहेत; यासंबंधीचा अनुभव लेखकाने अत्यंत तरलतेने शब्दांकित केला आहे. पाखरांचा चिवचिवाट, गुलमोहराचा स्वागत-सडा, निशिगंधाच्या सुगंधाची उधळण अशा पार्श्वभूमीवर होणारी प्रसन्न सकाळ लेखकाने तितक्याच प्रसन्न शैलीत कशी चित्रित केली आहे, हे अभ्यासण्याजोगे आहे.

मध्यरात्र केव्हाच उलटून गेलेली असते. उत्तररात्रीनं हलकेच आकाशात पाऊल ठेवलेलं असतं. इतकं हळूवारपणे, इतकं अलगद, इतकं मुलायम, की कुणाला चाहूलदेखील लागू नये; पण ही चाहूल मला मात्र सहज लागते. तिच्या पावलांची मंद मंद नाजूक स्पंदनं माझ्या मनात मात्र कुठं तरी उमटत राहतात. जणू त्यामुळंच मग माझा डोळा लागत नाही. पुरेशी झोप झाली आहे, असं वाटत राहातं.

मी हलकेच उठतो. चूळ भरतो. डायनिंग टेबलजवळ येतो. त्याच्याजवळची खिडकी हलकेच उघडतो. रात्रीच्या नीरव शांततेची निद्रा भंग होऊ नये म्हणून. बाहेर पाहातो तो आसमंतात काळाकुळकुळीत अंधार दाटलेला. बागेतल्या साऱ्या झाडांचा, साऱ्या वेलींचादेखील डोळा लागलेला. त्यांच्यावरची पाखरंदेखील गाढ झोपलेली. त्यांचा चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण आता फक्त पहाटेचे तीन-साडेतीन तर वाजलेले असतात. का कुणास



ठाऊक, ही वेळ मला फार आवडते. सारं जग साखरझोपेत असतं. साऱ्या चिंता-काळज्या मिटल्या-विरलेल्या असतात. मन कसं समेवर आलेलं असतं. मला वाटतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं, जे सुखदु:खांच्या पलीकडे कुठंतरी दूर दूर गेलेलं असतं. आपलंच नव्हे तर या दुधाळ सायलीचंदेखील. तांबडसर बोगनवेलीचंदेखील. केशरी गुलमोहोराचंदेखील. जांभुळसर जॅक्रांडाचंदेखील. किरमिजी-निळसर-पिवळसर इवलाल्या इंद्रधनुष्यी फुलांच्या घाणेरीचंदेखील. पांढऱ्याशुभ्र नि रक्तचंदनी चाफ्याचंदेखील.

या साऱ्यांमध्ये नि माझ्यामध्ये असं कोणतं बरं नातं आहे? कोणते रेशीमबंध आहेत? कोणती जवळीक आहे? केव्हा पहाट होते नि केव्हा मी या साऱ्यांना भेटतो, अशी असोशी मनाला का बरं लागून राहते? हे रेशीमबंध कुठं तरी आदिमत्वाकडे तर मनाला ओढून नेत नाहीत? मानवाला निसर्गाची जी ओढ युगानुयुगांपासून लागून राहिली आहे, ती या आदिम, ऋजु, स्नेहबंधांमुळे तर नाही?...

मी डायनिंग टेबलजवळ येतो, तेव्हा भान येतं, की आपण उघडलेल्या खिडकीतल्या काळोखात सायलीचा, मोगऱ्याचा नि चाफ्याचा सुगंध शोधत होतो. जॅक्रांडाची निळाई-जांभळाई शोधत होतो. बोगनवेलीची लाली शोधत होतो नि केशरी गुलमोहोराई शोधत होतो! काळ्या अंधारात हे सारेच विसावले होते, सुखावले होते. आणि माझं वेडं मन मात्र त्यांना केव्हा जाग येते, याची आस लावून बसलं होतं.

असं मला या वृक्षवेलींच्या बाबतीतच वाटत नाही तर माझ्या लहानग्या नातीबद्दलही वाटतं. तिचं नाव 'अल्विशा!' माझ्या मुलीची-अल्मासची-ती लहान मुलगी. तिचं नाव जसं जगावेगळं आहे तशीच तीही मुलखावेगळी आहे. अजून वर्षभराचीदेखील झाली असेल-नसेल. अल्मास आमच्याकडे राहायला आली, की अल्विशाही तिच्याबरोबर येते; पण दिवसभर असते ती माझ्याच अंगाखांद्यावर. मला बिलगून बिलगून. ती रात्री आईजवळ गाढ झोपते, तेव्हा शैशवातील नितळता किती मोहक असते ते जाणवतं. मी असा उत्तररात्री डायनिंग टेबलवर लिहायला बसलो तरी तिची आठवण होते. अल्विशा उठली की नाही, ते हळूच डोकावून पाहातो. ती केव्हा उठेल नि खुदकन् हसत आपल्याकडे पाहून आपल्या अंगावर झेपावेल, असं वाटत राहातं; पण ही झाडं नि या वेली जशा या वेळी निवांत झोपलेल्या असतात, तशीच अल्विशादेखील गाढ झोपलेली असते. ही उत्तररात्रीची नीरवता नि अल्विशाच्या गाढ झोपेतील निरागस शांतता यात किती कमालीचं, आश्चर्यकारक साम्य आहे, नाही? हे नातंदेखील आदिम नातंच नाही का? -निसर्गातलं नि मानवातलं? शेवटी ते दोघेही एकाच विश्वाचे दोन घटक आहेत, हा विचार हे नाजूक नातं पाकळीपाकळीनं उलगडू लागतो.


सर्वांत आधी जाग येते ती आमच्या बागेतल्या पाखरांना. मी पहिला चहा करून घेऊन त्याचे घोट घेत घेत 'काय लिहावं?' याचा विचार करत काहीसा संभ्रमात असतो, त्या वेळी ही इवली इवली पाखरं गुलमोहोराच्या घरट्यांतून, जॅक्रांडाच्या फांद्यांवरून हळूहळू डोळे किलकिले करून पाहातात. पहाटेच्या प्रकाशकिरणांना खुणावतात. आपापसात हलकेच कुजबुजू लागतात. 'पहाट झालीय काय?' असं विचारू लागतात. खरं तर पहाटच त्यांना विचारत असते, की 'मी येऊ का तुम्हांला भेटायला?' पहाटेचं नि या इवल्या इवल्या पाखरांचंदेखील असंच काहीसं जवळकीचं नातं आहे. त्यांनी पंख फडफडल्याशिवाय पहाटदेखील आकाशात येत नाही. त्यांच्या पंखांची फडफड ऐकली, की पहाटेलादेखील राहावत नाही. मग ती आकाशात हलकेच पाऊल टाकते. इतकं हळुवार, की तुम्हांला त्याची गंधवार्तादेखील लागू नये! पहाट कशी होते, हे देखील पाहण्याजोगं आहे. पाहण्याजोगंच नाही तर अनुभवण्याजोगं आहे. मला तर तो नेहमीच एक अनोखा, लोभसवाणा, नाजुक, तरल अनुभव वाटला आहे. तुम्ही केव्हा तरी असेच उठून बघा म्हणजे तुम्हांलाही त्यातला आल्हाद जाणवेल. त्यातली तरलता जाणवेल. त्यातली नजाकत जाणवेल.

हा आल्हाद व्यक्त करण्यासाठीच जणू आमच्या बागेतील जॅक्रांडावरची नि गुलमोहोरावरची पाखरं आपापसात कुजबुजू लागतात. त्यांचा चिवचिवाट पहिल्यांदा किती मंद मंद असतो; पण जसजशी पहाट उजाडते, तसतसा तो वाढत वाढत जातो. एखाद्या उत्सवासारखा. जणू त्या आल्हादाला, हर्षोल्हासाला एक अनावर भरती येते आणि हा चिवचिवाट ऐकूनच सायली जागी होते. बोगनवेल सळसळू लागते. दोन्ही चाफे एकमेकांशी हितगुज करू लागतात. रंगीबेरंगी क्रोटन्सना

फुलं कुठं येतात? पण त्यांच्या पानांचीच मग फुलं होतात! नि ती हलू-डोलू लागतात. गुलमोहोराची सळसळ ऐकल्यावर जॅक्रांडाही पहाटवाऱ्यासंगे हसू-बोलू लागतो. पहाट झाल्याचा आनंद जणू या साऱ्यांच्याच मनांतून भरभरून ओसंडू लागतो.

दार उघडून मी हलकेच बागेत येतो. पहाटेच्या किरणांनी मोगरा न्हाऊन निघालेला असतो. सायलीच्या इवल्या इवल्या पानांतून एक वेगळीच हिरवाई वाहू लागते. गुलमोहोराजवळ जावं तर त्यानं स्वागतासाठी, केशरी सडाच शिंपून ठेवलेला असतो. जॅक्रांडाची निळीजांभळी फुलं रक्तचंदनी चाफ्याशी बिलगून गप्पागोष्टी करत असतात.

गुलमोहोराच्या, जॅक्रांडाच्या, सायलीच्या नि बोगनवेलीच्या गोल गोल आळ्यांना पाणी देऊ लागतो. पाण्याच्या थेंबांचा स्पर्श झाल्यावर पानं कशी तरारतात, हे अनोखं दृश्य खरोखरीच अनुभवण्याजोगं असतं. आदल्या दिवशी मोगऱ्याला पाणी घालायचं चुकून राहून गेलं तर तो कसा रुसून बसतो, कोमेजू लागतो नि पाण्याचा शिडकावा झाला, की दुसऱ्या दिवशी पहाटेच गोंडस कळ्यांच्या रूपानं आपल्याकडे पाहून खुदूखुदू हसू लागतो! अबोला सोडून तो सुगंधाची पखरण करू लागतो नि मग जाणवू लागतं, की इवली इवली झाडं नि वेलीदेखील किती भावुक असतात! कधीमधी थोडीफार रुसलीफुगली तरी आपण त्यांची थोडीशी वास्तपुस्त केली, मायेनं त्यांच्यावरून हात



चाफ्यांजवळ जावं तर त्यांच्या फुलांचा एक वेगळाच मंद मंद गंध येत असतो; पण तो निशिगंधासारखा मात्र नसतो. निशिगंध म्हणजे निशिगंधच! त्याची सर इतर कुणाला येणार? पण निशिगंधाच्या पलीकडे मोगऱ्याची बहरलेली फुलं पाहिली, की त्यांच्या सुगंधाचा मोहदेखील आवरत नाही. या वेगवेगळ्या सुगंधांचं नि माझं काही आदिम नातं तर नाही? त्यांची इतकी अनिवार ओढ माझ्या मनाला का बरं लागून राहाते?

प्रकाश पसरू लागतो, तशी सकाळ होऊ लागते आणि मग दिसतं, की वाफे तर कोरडेच आहेत. बागेतल्या नळाला रबरी पाईप लावून मी वाफ्यांमध्ये पाणी घालू लागतो. कुंड्यांमध्ये पाईप लावू लागतो. चाफ्यांच्या,

फिरवला, त्यांचा तहानलेला जीव शांत केला, की ती देखील ही गोंडस फुलं देऊन आपल्याला केवढा विरंगुळा, केवढा तजेला देऊन जातात!

–आणि मग तुकोबांच्या त्या अभंगाचा खराखुरा अर्थ उकलू लागतो. त्यांनी वृक्ष आणि वल्ली यांना आपली सोयरीधायरी का बरं म्हटलं असावं, यातलं इंगित उमलू लागतं. त्यांच्यातलं नि आपल्यातलं हे नातं, हे रेशीमबंध आजकालचे नसावेत तर ते आदिम असावेत, युगायुगांचे असावेत, याची जाणीव उत्कटतेनं होऊ लागते.

...असं नसतं तर आपल्याला त्यांची नि त्यांना आपली एवढी अनिवार ओढ का बरं लागली असती?

(रेशीमबंध)

## कृती

**(१) कृती करा.**

(अ) उत्तररात्रीच्या आगमनाची वैशिष्ट्ये

(आ) घाणेरीच्या फुलांची वैशिष्ट्ये

(इ) चाफ्याच्या फुलांची वैशिष्ट्ये

(ई) उत्तररात्रीच्या वेळी खिडकीतून बाहेर पाहताना फुलांविषयी लेखकाच्या मनात निर्माण होणारे प्रश्न

**(२) कारणे शोधा व लिहा.**

(अ) पाखरांचा चिवचिवाट सुरू झालेला नसतो, कारण............

(आ) मानवाला निसर्गाची ओढ लागते, कारण............

**(३) (अ) पहाटेच्या वेळी बागेत प्रवेश केल्यानंतर लेखकाला खालील फुलांसंदर्भात आलेले अनुभव लिहा.**

(१) सायली -

(२) गुलमोहोर -

(३) जॅक्रांडा -

(४) चाफा -

**(आ) वर्णन करा.**

(१) उत्तररात्रीचे आगमन

(२) पहाट व पाखरे यांच्यातील नाते

**(इ) खालील घटकांच्या संदर्भात पाठात आलेल्या मानवी क्रिया लिहा.**

(१) वृक्ष-

(२) वेली-

(३) फुले-

(४) पाखरे-

**(४) व्याकरण.**

**(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(१) मन समेवर येणे-

(२) साखरझोपेत असणे-

**(आ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.**

(१) खरं तर पहाटच त्यांना विचारत असते की मी येऊ का तुम्हांला भेटायला

(२) निशिगंध म्हणजे निशिगंधच

(इ) **खालील वाक्यांचा प्रकार ओळखून सूचनेप्रमाणे तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्यप्रकार | बदलासाठी सूचना |
|---|---|---|
| (१) वृक्षवेली आपल्याला केवढा तजेला, केवढा विरंगुळा देऊन जातात! | | विधानार्थी करा. |
| (२) आल्हादाला आणि हर्षोल्हासाला अनावर भरती येते. | | उद्गारार्थी करा. |
| (३) वाफे तर कोरडेच आहेत. | | नकारार्थी करा. |

(ई) **खालील तक्ता पूर्ण करा.**

| सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| (१) पांढराशुभ्र | | |
| (२) वृक्षवेली | | |
| (३) गप्पागोष्टी | | |
| (४) सुखदु:ख | | |

(उ) **खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा व लिहा.**

(१) खिडकी हलकेच उघडतो.

(२) मानवाला निसर्गाची ओढ लागून राहिली.

(३) तुम्हांलाही त्यातला आल्हाद जाणवेल.

**(५) स्वमत.**

(अ) 'मानवाला निसर्गाची जी ओढ युगानुयुगांपासून लागून राहिली आहे, ती या आदिम, ऋजु, स्नेहबंधांमुळे तर नाही?...' या विधानासंबंधी तुमचे मत लिहा.

(आ) 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत लिहा.

**(६) अभिव्यक्ती.**

(अ) निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) डॉ. यू. म. पठाण यांच्या लेखनाची भाषिक वैशिष्ट्ये पाठाधारे स्पष्ट करा.

(इ) संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्लींना 'सोयरी' असे म्हटले आहे, यामागील तुम्हांला समजलेली कारणे लिहा.

**उपक्रम :**

(अ) तुमच्या परिसरातील देशी व विदेशी फुलांची माहिती इंटरनेटच्या माध्यमांतून मिळवून ती तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील काचफलकात प्रदर्शित करा.

(आ) हिवाळ्यातील उत्तररात्री किंवा अगदी पहाटेच्या वेळी तुमच्या परिसराचे निरीक्षण करा. पाहिलेल्या निसर्गसौंदर्याचे वर्णन शब्दबद्ध करा. ते वर्गात वाचून दाखवा.

- **तोंडी परीक्षा.**

**शिक्षकांनी वाचून दाखवलेला उतारा ऐका. सारांश लिहा.**

# ९. समुद्र कोंडून पडलाय

■ **वसंत आबाजी डहाके** (१९४२) :

सुप्रसिद्ध कवी, कादंबरीकार, समीक्षक, संपादक व चित्रकार. वाङ्मयीन कारकीर्द काव्यलेखनापासून सुरू. 'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शुन:शेप', 'चित्रलिपी' हे कवितासंग्रह, 'अधोलोक', 'प्रतिबद्ध आणि मर्त्य' या कादंबऱ्या, 'यात्रा-अंतर्यात्रा' हे चिंतनात्मक ललितलेखन असे साहित्य प्रकाशित. भोवतीच्या समाजव्यवस्थेने मानवी जगण्याला ज्या पातळीवर आणून सोडले आहे, त्याबद्दल कवी अस्वस्थ आहे. या युगातील मानवी दु:ख, एकाकीपणा, जीवनातील अस्थिरता, दहशत, सर्वव्यापी भय आणि पराधीनता या साऱ्यांचे चित्रण समृद्ध आणि समर्पक प्रतिमांचा वापर असलेल्या भाषेत केलेले आहे. त्यांची भाषा आशयाचे अंत:स्तर उलगडून दाखवणारी आहे, निसर्गातील प्रतिमांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करणारी आहे. 'शालेय मराठी शब्दकोश', 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश' आणि 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पनाकोश' यांचे संपादनही केले आहे. त्यांचा 'चित्रलिपी' हा काव्यसंग्रह 'साहित्य अकादमी पुरस्कारा'ने सन्मानित झाला आहे. तसेच 'जनस्थान पुरस्कार' आणि उत्कृष्ट साहित्यनिर्मितीचा 'महाराष्ट्र राज्य पुरस्कार' आदि पुरस्कारांनीही त्यांना सन्मानित केले आहे.

समुद्र म्हणजे अथांग पाणी आणि पाणी म्हणजे जीवन. यादृष्टीने या कवितेतील समुद्र हा जीवनाचे प्रतीक आहे. समुद्रासारखे अथांग जीवन जेव्हा शहरांच्या, महानगरांच्या मर्यादांमध्ये कोंडून पडते तेव्हा येणारी अस्वस्थता कवीने या कवितेतून व्यक्त केली आहे. बागडायला अंगण नसणाऱ्या उत्तुंग इमारतींमध्ये बालपण आक्रसून गेले आहे, तसेच वाहनांसोबत रस्त्यांवर अथवा रेल्वेस्टेशनवरच्या एवढ्याशा बाकावर झोपेसाठी बालकांना आश्रय घ्यावा लागत आहे हे पाहून समुद्र अस्वस्थ होतो. मोठ्यांच्या कार्यव्यस्त जगात बकाल होत जाणारे बाल्य कवीला अधिकच व्यथित करते.



समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं.

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत,
हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची
वयस्कांच्या शहरांतील.

(शुभवर्तमान)

## कृती

**(१) (अ) खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.**

(१) उंचच उंच पण अरुंद बालपण–

(२) डोळ्यांत उतरलेलं थकव्याचं आभाळ–

(३) स्टेशनवरल्या बाकाएवढं मुलाचं बालपण–

**(आ) कारणे लिहा.**

(१) कवीला समुद्र संत्रस्त वाटतो, कारण············


(२) समुद्र अस्वस्थ होतो, कारण············

(३) समुद्र शिणून जातो, कारण············

**(२) (अ) तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेची मध्यवर्ती कल्पना | मनाला भिडणारे शब्दसमूह |
|---|---|---|
| | | |

**(आ) चौकटी पूर्ण करा.**




**(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत,
हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) ‘त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी’

या ओळींमधील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) ‘समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची
वयस्कांच्या शहरांतील.’
या ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**(५) रसग्रहण.**

**प्रस्तुत कवितेतील खालील पद्यपंक्तींचे रसग्रहण करा.**

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं.

**(६) अभिव्यक्ती.**

(अ) ‘समुद्र तुमच्याशी संवाद साधत आहे’, अशी कल्पना करून ते कल्पनाचित्र शब्दबद्ध करा.
(आ) शहरातील बाल्याची अवस्था कवितेत कशाप्रकारे प्रकट झाली आहे, ते स्पष्ट करा.
(इ) ‘समुद्र कोंडून पडलाय’, या शीर्षकाचा अर्थ तुमच्या शब्दांत उलगडून दाखवा.

**उपक्रम :**

‘महानगरातील समस्या’ या विषयावर चर्चा करा.

- **तोंडी परीक्षा.**

**(अ) शब्द ऐका. त्यांचा वाक्यात उपयोग करा.**

(१) गगनचुंबी (२) संत्रस्त (३) वयस्क (४) खिन्न (५) हताश

**(आ) ‘वाढत्या शहरीकरणाचा जीवनावर होणारा परिणाम’, या विषयावर भाषण द्या.**

# १०. दंतकथा

■ **वसंत सबनीस** (१९२३ ते २००२) :

सुप्रसिद्ध लेखक, विनोदकार, नाटककार. सबनीस यांनी लेखनास प्रारंभ केला तो कवितेने. नंतर ते विनोदी लेखनाकडे वळले. 'पानदान', 'चिल्लरखुर्दा', 'भारूड', 'मिरवणूक', 'पंगत', 'आमची मेली पुरुषाची जात' असे विनोदी लेखसंग्रह, 'खांदेपालट', 'पखाल', 'आत्याबाईला आल्या मिशा', 'थापाड्या', 'विनोदी द्वादशी', 'बोका झाला संन्यासी' हे कथासंग्रह, 'सोबती' हा व्यक्तिचित्रसंग्रह, 'माहेश्वरी' हा आत्मपर लेखांचा संग्रह प्रसिद्ध.

विनोदी लेखनाबरोबरच त्यांनी अनेक नाटके, एकांकिका व लोकनाट्ये लिहिली. त्यांची बरीच नाटके रंगभूमीवर गाजली. राजकीय भाष्य व चतुर संवाद यामुळे त्यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे लोकनाट्य विलक्षण लोकप्रिय झाले. 'प्रेक्षकांनी क्षमा करावी', 'चिलखतराज जगन्नाथ' हे त्यांचे एकांकिका संग्रह आणि 'गुदगुल्या' हा बालकथा संग्रह प्रसिद्ध आहे.

'दंतकथा' हा एक विनोदी ललित लेख आहे. दाताचे दुखणे खूपच त्रासदायक असते. त्यामुळे कोणत्याही माणसाची अवस्था अगदी केविलवाणी होते, मात्र अशा गंभीर विषयातील प्रसंग लेखकाने नर्मविनोदी शैलीत मार्मिकपणे टिपले आहेत. दाताच्या दुखण्याची असह्यता, त्याप्रसंगी माणसाची होणारी दयनीय अवस्था आणि त्यामधून घडणारा प्रसंगनिष्ठ विनोद वाचकाला खळखळून हसवतो. वास्तवाला जोडून येणारी अतिशयोक्ती, कधी आढळणारी विसंगती तर कधी मराठीतील म्हणी, वाक्प्रचार आणि शाब्दिक कोट्या यांचा लेखकाने विनोदनिर्मितीसाठी कल्पकतेने केलेला वापर या पाठातून अभ्यासता येईल.

मानवी देह पंचमहाभूतांचा बनलेला आहे असे म्हणतात. ज्या ज्ञानी मंडळींना मानवी देहात पंचमहाभूते दिसली, त्यांना सहावे महाभूत कसे दिसले नाही याचे मला राहून-राहून नवल वाटते. या सहाव्या महाभूताला सामान्यांच्या भाषेत 'दात' असे म्हणतात.

माझ्या मते, दात ही परमेश्वराने मारून ठेवलेली मेख आहे. मानवी देहाची सर्व रचना परिपूर्ण केल्यानंतर जवळजवळ सहा-सात महिन्यांनी ही दाताची कल्पना परमेश्वराला सुचली असावी. नाही तर इतर सर्व अवयव एकदम फुटत असताना दातच तेवढे एखाद्या सभेच्या मुख्य पाहुण्यासारखे मागाहून का यावेत ?

तुटलेले बोट पुन्हा उगवल्याचे माझ्या तरी पाहण्यात नाही किंवा पहिले नकटे नाक गळून पडून त्या जागी नवे नाक आल्याचेही ऐकिवात नाही; पण दात हा एकच अवयव असा आहे, की जो दोनदोनदा उगवतो. तेव्हा माणसाला शरण आणताना तृण धरायला एखादी चांगली जागा असावी म्हणून ही दातांची योजना झाली आहे याबद्दल माझी तरी खात्री आहे. तसे दातांनी माणसाला काय दिले आहे ? दुसरा कुठलाही अवयव उगवताना माणसाला त्रास होत नाही. पण दात हे त्रास दिल्याशिवाय उगवत नाहीत. ते येताना ताप आणि गेल्यावर पश्चाताप!

मला स्वत:ला तर दातांबद्दल मुळीच प्रेम वाटत नाही. कारण लहानपणी मला दात येत असताना त्यांनी घरातल्या माणसांना रडवले होते म्हणे! अर्थात हे सर्वस्वी खरे असेलच असे नाही. त्यांच्याबरोबर मीही रडलो असलो पाहिजे. दात आल्यानंतरही मी दिसेल त्याला चावत असे अशीही एक दंतकथा ऐकून अजूनही कित्येक नातेवाईक माझ्यापासून दूर पळतात. आता मी दिसेल त्याला मुळीच चावत नाही. कारण चावण्याची हौस अनेकदा स्वत:चीच मनगटे चावून चावून भागली आहे! पण माझ्या दातांनी मला एवढा उपद्रव दिला आहे, की त्या मानाने दुसऱ्यांना झालेला उपद्रव काहीच नाही आणि म्हणूनच दातांबद्दल मला दातांत धरता येईल एवढासुद्धा आदर राहिलेला नाही. माझ्याप्रमाणे मराठी भाषेलाही दातांबद्दल आदर नाही असेही मला नंतर आढळून आले. कारण मराठी भाषेत अशी म्हण किंवा शब्दप्रयोग नाही ज्यात दातांबद्दल मंगल भावना व्यक्त झाली आहे. ज्या म्हणी व शब्दप्रयोग दातांशी निगडित आहेत, त्या दारिद्र्य, भिकारपणा, असभ्यपणा यांचे प्रत्यंतर घडवणाऱ्या आहेत. नाही म्हणायला प्रेमविव्हल कवींनी प्रेयसीच्या दातांना कुंदकळ्यांपर्यंत नेऊन पोचवले असेल तेवढाच अपवाद! तरी पण केवळ प्रेयसीच्या दातांत जीव अडकून तिच्या प्राप्तीसाठी झगडणाऱ्या प्रियकराचे उदाहरण माझ्या तरी ऐकिवात नाही. डोळे, रंग, ओठ, एखादा तीळ, एखादी खळी माणसाला गुंतवतात; पण दात पाहून वेडा झालेला प्रियकर मला अजून भेटावयाचा आहे. लहानपणी जे न घासल्याबद्दल मार

खावा लागतो, तरुणपणी जे फार घाशीत बसल्याबद्दल वडील माणसांची बोलणी खावी लागतात, व्यवहारात जे कोण केव्हा पाडील याचा भरवसा नसतो आणि जे दंतवैद्याकडे जायला भाग पाडतात ते दात, अशी माझी दातांबद्दलची कल्पना आहे.

मनुष्यस्वभावाप्रमाणे मीही प्रथम दातांची पर्वा केली नाही. दात दुखणाऱ्या माणसांची अवहेलना केली. एवढ्याशा दातदुखीचे एवढे मोठे कौतुक लोक का करतात हे मला कळत नसे. आमच्या परशा पहेलवानासारखा मस्त गडीसुद्धा दातांपुढे चारीमुंड्या चीत झालेला मी पाहिला, तेव्हा मला दातदुखीचा जरा संशय आला.

परशा हा जन्मापासून पहेलवान. रानात अनेकदा लांडग्याशी एकटा झुंजलेला. अनेक लांडग्यांचे सुळे नुसत्या काठीच्या तडाख्याने पाडणारा हा गडी नेहमी अशा ऐटीत चालायचा, की जसा काय वनराजच! छाती इतकी पुढे काढायचा, की अनेकदा आधी त्याची छातीच दिसायची आणि अर्ध्या मिनिटाने त्याचा चेहरा दिसायचा. रस्त्यात भेटला, की ''काय रं, कुटं निगालास?'' असा त्याच्या दृष्टीने अत्यंत प्रेमळ; पण माझ्या दृष्टीने अतिशय उर्मट असा सवाल करायचा. मला त्याचा राग येत असे.

''चाललोय कुस्ती मारायला... येतोस?''

''कुस्ती?'' असे म्हणत तो अत्यंत विकट हास्य करायचा आणि ''अरं, अगुदर माशी तर मार नाकावरली... मग कुस्तीचं बगू'' असे म्हणून माझ्या खांद्यावर मोठ्या प्रेमाने दणका द्यायचा; पण गंमत अशी, की दणका मला दिला तरी लागायचे त्याला.

''लइ हाडं हैत तुझ्या अंगात! दगडावाणी लागत्यात हाताला.'' असे त्याने म्हटले, की हाडाच्या बाबतीत का होईना; पण आपण त्याच्या वरचढ आहोत याचाच आनंद अधिक वाटायचा.

आपल्या ताकदीची-मस्तीची परशाला फार घमेंड होती. स्वत:चा उल्लेख करताना तो 'शिंव्ह' म्हणायचा. स्वत:ला 'शिंव्ह' म्हणून घेण्यात त्याला अभिमान वाटायचा.

''काय परशा, यंदा कशी काय तयारी आहे?'' असे कुणी विचारले, की त्याचे उत्तर ठरलेले असे-

''शिंव्हाला काय भ्या हाय व्हय कुनाचं?''

'शिंव्ह मातीत उतरला, की लांडगी, कोल्ही पाक पशार व्हत्यात... 'शिंव्हाला अल्याड लई झोप लागतीया', अशा भाषेत तो नेहमी स्वत:बद्दल बोलायचा. त्याला दात घासायचा विलक्षण कंटाळा असे. चार-आठ दिवसांतून एकदा केव्हातरी दात घासण्याचे सोंग करायचा. त्याबद्दल मी एकदा सहज त्याला विचारले, ''परशा, तू दात घाशीत नाहीस वाटतं रोज?''

''शिंव्ह काय दात घासतो व्हय कदी?'' असे त्याने ताडकन उत्तर दिले.

असा हा सिंहासारखा उग्र व बलदंड परशा एके दिवशी सपाटून मार खाल्लेल्या कुत्र्यासारखा समोरून येत होता. त्याची ऐट, त्याचा दिमाख, त्याची घमेंड यांपैकी कशाचाही मागमूस त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. कुस्तीत हरला तरी तो कधी असा दिसला नव्हता. जवळ जाऊन मी विचारले, ''काय पहेलवान, काय झालं आज?''

केविलवाणा चेहरा करून म्हणाला, ''दात रं! काल रातच्या धरनं असा ठणकतुया! काईएक सुचेनासं झालंया.''

''अरे, सिंहाचे दात कधी दुखतात होय?'' मी जरा थट्टेने म्हणालो.

''कसला शिंव्ह घिऊन बसलास मर्दा? ह्या दातानं शिंव्हाचा पार बकरा करून टाकलाया!'' असे म्हणून त्याने त्याच्या दातदुखीची दर्दभरी कहाणी मला सांगितली आणि अखेरीस म्हणाला, ''अरं, शिंव्हच न्हवं, नरशिंव्ह आला तरी दाताम्होरं त्येचं काई एक चालायचं न्हाई!''

मला त्यावेळी परशाचे हसू आले; पण काही काळानंतर माझाही जेव्हा परशा झाला तेव्हा माझा नक्षा पार उतरला. माणसाला मरण आणि दातदुखी चुकवताच येत नसावी. किंबहुना दात ह्या इंद्रियाचे एक कार्य दुखणे हेच असावे. जन्मात एकदाही दात न दुखलेला मनुष्य मला तरी अजून आढळलेला नाही. असा कुणी असलाच, तर तो कमनशिबीच असला पाहिजे. ब्रह्मांड पाहण्याचा योग त्याच्या नशिबी नाही.

अनेक वर्षे समोर येईल ते मिटल्या डोळ्यांनी चावणारा माझा दात एके दिवशी काही कारण नसताना ठणकू लागला. असा ठणकू लागला, की त्याने माझी अवस्था हीनदीन झाली. दात ठणकू लागल्याबरोबर मी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ही, की ज्यांच्या ज्यांच्या दाढदुखीची अवहेलना केली होती, त्या सर्व माणसांची त्यांच्या दात व दाढांसकट मनातल्या मनात क्षमा मागितली.

दात दुखायला लागला, की तो मुळापासून दुखू

लागतो. किंबहुना दाताला मूळ असते हे फक्त तो दुखायला लागला म्हणजेच कळते. माझा दात जेव्हा दुखायला लागला तेव्हा तर माझी खात्रीच झाली, की आपण आरोग्यशास्त्राच्या पुस्तकात पाहिलेले दाताचे चित्र आणि प्रत्यक्ष आपले दात यांत फार फरक असला पाहिजे. आपल्या दाताला मूळ नसून झाडासारख्या मुळ्या असल्या पाहिजेत आणि त्या हिरड्यांत सर्वत्र पसरल्या असल्या पाहिजेत. नाहीतर सगळेच दात दुखत असल्याचा भास मला का व्हावा? प्रत्येक दाताला हात लावून पाहिल्यानंतर ज्या दाताने शंख करायला लावला, तो दुखरा दात याची खात्री झाली. दुखऱ्या दाताला लहानसा स्पर्शसुद्‌धा खपत नाही! बरे, हे दुखणे तरी साधे, सरळ असावे? तेही नाही. एखाद्या कवीच्या मनातील जिप्सीसारखा एखादा लाकूडतोड्या माझ्या दाताच्या मुळाशी खोल बसलेला असतो आणि तो एकामागून एक घाव घालीत असतो.

असे म्हणतात, की दिवसा सभ्य दिसणारी माणसे रात्री आपल्या खऱ्या रूपात फिरतात. दात हा अवयवही अशाच माणसांसारखा असावा. नाहीतरी दिवसा अधूनमधून पण सभ्यपणे दुखणारा दात रात्री राक्षसासारखा अक्राळविक्राळ का होतो? दातांत आणि चोरांत साम्य असते ते याच बाबतीत. दोघेही रात्री गडबड करतात.

दात दुखण्याने मी आध्यात्मिक तत्त्वचिंतनही करतो. दात दुखतो तेव्हा मला साक्षात्कार होतो, की दात हेच सत्य आहे. जग मिथ्या आहे. त्या क्षणी संसार असार वाटतो. नेहमी हवेहवेसे वाटणारे शेंगदाणे दगडासारखे बेचव लागतात. बायको व मुले हा केवळ भास आहे असे वाटते. समोरून येणारी एखादी सुंदरी डोळ्यांना जाणवतच नाही आणि दाताचा ठणका मला ब्रह्मांड दाखवू लागतो. रात्रभर माझ्या ब्रह्मांडाच्या दहा-वीस फेऱ्या तरी सहज होतात आणि पहाटे ब्रह्मांड मिथ्या असून दातच सत्य आहे याची पुन्हा एकदा जाणीव होते.

माझ्याबद्‌दल लोकापवाद फार. दातदुखीही त्यातून सुटलेली नाही. माझ्या दातदुखीच्या काळात सबंध आळीला रात्रभर झोप मिळत नाही असे म्हणतात; पण माझा यावर विश्वास नाही. अर्थात आळीतील सर्व लोक आळीपाळीने माझ्या घरात डोकावून 'फक्त दातदुखीच ना?' असा सवाल करून जातात हे खरे आहे; पण यावरून त्यांना झोप येत नाही असा निष्कर्ष काढणे बरोबर नाही. मागच्याच दातदुखीच्या वेळी मी पलंगाच्या कोपऱ्यात दोन्ही हातात तोंड धरून बसलो होतो. (दातदुखीच्या काळात सामान्यत: मी असाच बसतो.) चेहऱ्यावर बहुधा कुणीतरी नुकतीच थोबाडीत मारल्याचा भाव असावा. कारण मी आरशात पाहत नाही. तोंडातल्या तोंडात दाताला आरसा कशाला? मी घशातल्या घशात आवाज बंद करण्याचा प्रयत्न करूनसुद्‌धा तो बंद होत नव्हता. घसा आणि जीभ फितुर झाली होती. मी फारच मोठ्याने ओरडत होतो, असे बायकोचे मत होते आणि माझ्या बाबतीतील बायकोचे मत हे बहुधा सबंध आळीचे मत असते.

''अहो, केवढ्यांदा ओरडताय? लोकांना काय वाटेल?'' अशी दमदाटी बायकोशिवाय कोण करणार?

''माझा दात दुखतोय त्याला मी काय करू?''

''पण शेजारीपाजारी माणसं राहतात! ती काय म्हणतील? अगदी लहान मुलासारखे काय थैमान घालताय?''

''दात-दात-दात!'' मी चिडून म्हणालो.

''ते कळलं.''

''तुला कळलं. सगळ्यांना कुठं कळलंय?''

''सगळ्या जगाला का कळायला पाहिजे? थोडा तरी सोशिकपणा दाखवा ना म्हणते मी.''

''तू लाख म्हणतेस-दात तुझा नाही. तो माझा आहे. माझ्या दातदुखीबद्‌दल मी किती ओरडावं हे ठरवणारी तू कोण?''

''मग खुश्शाल ओरडाऽऽ!''

''ओरडीन-ओरडीन! सोडतो की काय? आई गऽऽऽ! मेलोऽऽऽ!''

''आता गप्प बसा जरा. मी कापूर देते दाताखाली धरायला. त्यानं ठणका कमी होईल.''

''नकोऽऽऽ! सरळ बत्ता आण आणि दातावर हाण.''

''वेड लागलंय की काय तुम्हांला?''

''तू खल करू नकोस, बत्ता आण.''

''इश्श्य! मेला एवढा दात दुखतोय तरी शब्दावर कोटी करायची सोडू नका!''

तेवढ्यात बाहेर कुणीतरी आले. बायको जाऊन पाहून आली आणि खालच्या आवाजात मला म्हणाली,

''दाते आले आहेत.''

''ह्या दात्यांचा आणि दातांचा काही संबंध आहे की

काय? माझ्या प्रत्येक दातदुखीच्या वेळी नेमके दाते कसे प्रथम येतात?''

दातदुखीच्या काळात माझी सहनशक्ती पार खलास झालेली असते. दाते किंवा दातार ह्या दातांशी जवळीक दाखवणाऱ्या माणसांनाही भेटू नये असे वाटते!

माझ्या दातदुखीचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की माझ्या विव्हळण्याने शेजारीपाजारी गोळा होतात आणि माझ्या दाताच्या अध्यक्षतेखाली दातदुखी, ती का होते, टाळावी कशी आणि झाल्यावर कोणते उपचार करावेत यावर एकदा तरी परिसंवाद होतोच. उपस्थित वक्ते मोठ्या हिरिरीने त्यात भाग घेतात. हीच मंडळी एवढ्या मोठ्याने



बोलतात, की माझे विव्हळणे त्यात बुडून जाते. माझा अनुभव असा, की दातदुखीवरील चर्चेने दातदुखी मुळीच कमी होत नाही! दातदुखीवरील खूप उपचार मला पाठ झाले आहेत. माझा दात दुखू लागला, की मी बायकोला त्यातले काही उपचार करायला सांगतो आणि तीही आपले काही उपचार करते. अशी मिळून २०-२५ प्रकारची औषधे, बोळे माझ्या दातामागे लागतात. चार दिवसांनी दात दुखायचा थांबतो. कशामुळे थांबला याचा शोध करायच्या मी भानगडीत पडत नाही. दात दुखणे थांबल्याचे कळल्याबरोबर परिसंवादातील सगळे वक्ते आपलाच उपचार लागू पडला की नाही याची खात्री करून घेण्यासाठी येतात. मी कुणाचेही मन दुखवत नाही. प्रत्येकाला त्याने सुचवलेल्या उपायानेच गुण आल्याची कबुली देऊन मोकळा होतो. सगळे खूष होतात. दंतआघाडीवर सर्वत्र सामसूम होते. एखाददुसरा महिना जातो आणि पुन्हा तोच दात, तोच ठणका आणि तेच उपचार यांचा पुन्हा प्रयोग होतो.

या सगळ्याला कंटाळून शेवटी मी दाताचा प्रश्न कायमचा सोडवण्याच्या दृष्टीने तो दातच काढून टाकण्याचा निर्धार जाहीर केला. अनेकांचा सल्ला घेऊन आणि अनेक दंतवैद्यांचे चेहरे पाहून त्यातल्या त्यात बऱ्यापैकी दंतवैद्य गाठला. का कुणास ठाऊक; पण माझी अशी समजूत झाली, की ज्याचे दात चांगले असतील असाच दंतवैद्य शोधणे बरे. यापूर्वी आयुष्यात दंतवैद्याशी कसलाही संबंध आला नव्हता. आणि तेच ठीक होते असे संबंध आल्यावर वाटले. मी त्याला भेटून सारी दंतकथा सांगितली. दात काढून टाकण्याचा माझा विचार दंतवैद्याइतका दुसऱ्या कुणालाच पसंत पडला नाही. दात काढण्याबाबत आमचे मतैक्य झाल्यावर पुढचा मार्ग सरळ होता. फक्त दात काढायलाही पैसे द्यावे लागतात याचे वाईट वाटले; पण मग माझी मीच समजूत घातली, की आपण डोक्याचे केस मुळासकट काढत नाही तरी पैसे देतो, मग दात मुळासकट काढण्यासाठी पैसे दिले तर काय बिघडले?

आणि मी प्रामाणिकपणे सांगतो, की दहा-बारा वर्षांपूर्वी दंतवैद्याबद्दलच्या खऱ्याखुऱ्या दंतकथा ऐकल्या होत्या, त्यावरून दंतवैद्याची खुर्ची, दात उपटण्याची क्रिया इत्यादी सर्व गोष्टींबद्दल माझ्या मनात विक्राळ भीती

होती; पण प्रत्यक्षात तसे काही वाटले नाही. दंतवैद्य अलीकडे फारच माणसाळलेले आहेत असे माझे प्रामाणिक मत झाले. त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन देऊन इतका लीलया दात उपटला, की मी आश्चर्यचकित होऊन पाहतच राहिलो! दात उपटण्याची क्रिया इतकी सोपी असेल असे वाटले नव्हते. मी आजवर शत्रूंना आणि शेजाऱ्यांना भांडणाच्या वेळी 'दात उपटून हातात ठेवीन', 'दात घशात घालीन' अशा माझ्या शक्तीचे प्रदर्शन करणाऱ्या धमक्या दिल्या होत्या. त्यांना काहीच अर्थ नव्हता, याची हळहळ दंतवैद्याच्या खुर्चीत असतानाच वाटली.

दंतवैद्याने दात दाखवला. हाच तो खलदंत! ज्याने माझे बायकोपुढे हसे केले तोच हा नीच दात. नतद्रष्ट! 'तुला हेच शासन योग्य आहे' असे मी उरलेले दातओठ खाऊन मनाशी म्हणालो. आता पुन्हा तो ठणका लागणार नाही, पुन्हा ते बोळे धरावे लागणार नाहीत. पुन्हा बायकोचा उपदेश ऐकावा लागणार नाही. ह्या विचारांनी मी आनंदाने बेहोश झालो. उरलेल्या दातांना धाक बसावा म्हणून तो काढलेला दात घरी नेण्याचा विचार मनात येऊन गेला; पण त्या दाताची संगतसुद्धा नको असे वाटून मी तो दंतवैद्यालाच अर्पण केला. आनंदाने घरी आलो. दारातूनच ओरडून चार-पाच शेजाऱ्यांना सांगितले, की "तो तुम्हांला जागवणारा दात गेला. यापुढे दंतसप्ताह नाही."

**(सबनिशी)**

---

### टिपा–

**(१) पंचमहाभूते–** पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही पाच मूळ तत्त्वे.

**(२) दंतकथा–** कल्पित कथा, दाताशी संबंधित कथा.

---

## कृती

**(१) (अ) कारणे शोधा व लिहा.**

(१) लेखकाला दातांबद्दल अजिबात प्रेम नाही, कारण............

(२) दातदुखीच्या काळात दाते किंवा दातार यांना भेटू नये असे लेखकाला वाटते, कारण............

**(आ) कृती करा.**

(१) **दातांशी निगडित म्हणी व शब्दप्रयोग यांची लेखकाच्या मते वैशिष्ट्ये** → ...... → ......

(२) **दातासंबंधीच्या लेखकाच्या कल्पना** → ...... → ...... → ...... → ......

(३) **दात दुखताना लेखकाला होणारे साक्षात्कार** → ...... → ...... → ...... → ......

(इ) स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

(१) परशाची स्वभाववैशिष्ट्ये →

(२) लेखकाची स्वभाववैशिष्ट्ये →

## (२) चौकटी पूर्ण करा.

(अ) लेखकाच्या मते सहावे महाभूत.

(आ) लेखकाने दुखऱ्या दाताला दिलेली उपमा.

(इ) ऐटीत चालणारा परशा म्हणजे जणू.

(ई) लेखकाच्या मते जन्मात एकही दात न दुखणारा माणूस असा असतो.

(उ) लेखकाच्या मते कवीने दाताला दिलेली उपमा.

## (३) व्याकरण.

(अ) खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा व लिहा.

(१) चार दिवसांनी दात दुखायचा थांबतो–

(२) सगळे खूष होतात–

(३) त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन दिले–

(४) डॉक्टरांनी लीलया दात उपटला–

(आ) खालील तक्ता पूर्ण करा.

| सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| (१) पंचमहाभूते | ........................... | ........................... |
| (२) परमेश्वर | ........................... | ........................... |
| (३) शब्दप्रयोग | ........................... | ........................... |
| (४) शेजारीपाजारी | ........................... | ........................... |
| (५) विजयोन्माद | ........................... | ........................... |

(इ) खालील वाक्यात दडलेला वाक्प्रचार शोधा व लिहा.

माणसाला शरण आणताना तृण धरायला एखादी चांगली जागा असावी, म्हणून दातांची योजना झालेली आहे.

(ई) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेनुसार वाक्यपरिवर्तन करा.

(१) परशाने प्रश्न नम्रपणे विचारला नव्हता. (होकारार्थी करा.)

(२) शिंव्हाला काय भ्या हाय व्हय कुणाचं? (विधानार्थी करा.)

(३) तुझ्या अंगात लई हाडं हैत. (उद्गारार्थी करा.)

### (४) स्वमत.

(अ) पाठातील विनोद निर्माण करणारी पाच वाक्ये शोधा. ती तुम्हांला का आवडली ते सकारण लिहा.

(आ) लेखकाने दुखऱ्या दाताची तुलना अक्राळविक्राळ राक्षसाशी केलेली आहे, याबाबत तुमचे मत लिहा.

(इ) लेखकाच्या दातदुखीबाबत शेजाऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियांच्या संदर्भात एक छोटे टिपण तयार करा.

### (५) अभिव्यक्ती.

प्रस्तुत पाठ तुम्हांला आवडण्याची वा न आवडण्याची कारणे लिहा.

### उपक्रम :

डोळे व नाक या अवयवांशी संबंधित वाक्प्रचारांची यादी करा.

- **तोंडी परीक्षा.**

**खालील वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(१) नक्षा उतरणे-
(२) शंख करणे-
(३) दात घशात घालणे-
(४) खल करणे-
(५) चारीमुंड्या चीत होणे-
(६) सिंहाचा बकरा होणे-
(७) मेख मारणे-

### वाचा.

*** दातांशी संबंधित खालील वाक्प्रचारांच्या अर्थासंबंधी मित्रांशी चर्चा करा.**

(१) दातओठ खाऊन बोलणे-
(२) दातास दात लावून बसणे-
(३) दातखिळी बसणे-
(४) दात धरणे-
(५) दात दाखवणे-

# ११. आरशातली स्त्री

■ हिरा बनसोडे (१९३९) :

सुप्रसिद्ध कवयित्री. फुले-आंबेडकरी साहित्यचळवळीतील पहिल्या पिढीच्या महत्वाच्या कवयित्री. 'अस्मितादर्श', 'निकाय', 'सुगावा', 'युगवाणी', 'समुचित' इत्यादी नियतकालिकांतून सातत्याने काव्यलेखन. आपल्या काव्यलेखनातून आणि काव्यवाचनातून 'आंबेडकरांची विचारधारा' महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवाही करण्यात हिरा बनसोडे यांची कविता अग्रणी ठरली. त्यांचे 'पौर्णिमा', 'फिनिक्स' व 'फिर्याद' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करणारी, व्यवस्थेला जाब विचारून न्याय्यहक्कांची, अधिकारांची भाषा उच्चारणारी कविता त्यांनी मुख्यत: लिहिली. समताधिष्ठित समाजरचनेला जन्म देणारी 'दलित स्त्री' ही त्यांची नायिका आहे, तिचे भावविश्व त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी असल्याने त्यांची कविता सामाजिक वास्तव तसेच सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनेही आपल्या कवेत घेते. 'डॉटर्स ऑफ महाराष्ट्र' या ग्रंथात हिरा बनसोडे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांच्या कवितांचे गुजराती, इंग्रजी, फ्रेंच भाषांत अनुवाद झालेले आहेत.

स्त्रीच्या आयुष्यातील स्थित्यंतराचा वेध घेताना कवयित्रीने या कवितेत स्त्रीच्या व्यथा शब्दबद्ध केल्या आहेत. सहज आरशात पाहताना जेव्हा गतकाळाच्या स्मृती जाग्या होतात तेव्हा तिच्या लक्षात येते, की 'मी ती हीच का?' आणि मग तिला वाटत राहते किती अंतर्बाह्य बदलले मी! चैतन्यमय बाल्य, तेजस्वी तारुण्य-त्यांमधील स्वप्ने, ध्येय कुठल्याकुठे जाऊन आता कशाचेही काहीच न वाटणारी स्थितप्रज्ञता माझ्यात आली कोठून? पूर्वी हवेहवेसे वाटणारे चांदणे, वाट पाहणारी जाई अशा छोट्याछोट्या गोष्टींतील आनंदाचेही आता संसारात गुरफटून गेल्यानंतर भान नसते. संसारात गांजलेल्या या स्त्रीला शेवटी आठवणीतील 'बालसखी' नव्या उमेदीने जगण्यासाठी कसे प्रेरित करते, हे या कवितेतून समजून घ्यायचे आहे.



सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य...!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं...! तू कशी होतीस ते!

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसे सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञ राणी!

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीजच हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा'
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली–

'रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले'

(फिनिक्स)



## कृती

(१) (अ) कृती करा.

(१) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीच्या पूर्वीच्या स्थितीचे केलेले वर्णन →
→
→

(२) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरच्या स्त्रीला अधिकारवाणीने केलेला उपदेश →
→

**(आ) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(१) घनगर्द संसार- ........................................

(२) प्रेयस चांदणे- ........................................

(३) प्राण हरवलेली पुतळी- ........................................

(४) फाटलेले हृदय- ........................................

**(२) (अ) वर्णन करा.**

(१) आरशातील स्त्रीला आरशाबाहेरील स्त्रीमधील जाणवलेले बदल-

(२) आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीची काढलेली समजूत-

**(आ) खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(१) बालपणातील तुझा उत्साह आणि तुझ्यातील चैतन्य अवर्णनीय होते. तारुण्यात नवउमेदीने भरलेली, सर्वत्र सहज संचारणारी अशी तू होतीस.

(२) आता मात्र तू स्वत:च स्वत:ला संसारात इतकं गुंतवून घेतलं आहेस, की पारंपरिकपणे जगण्याच्या अट्टाहासात तू दिवसरात्र कष्ट सोसत आहेस.

**(इ) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) अंतरीचे सुंदर पूर्वरंग | (अ) मनात असलेले प्रचंड दु:ख लपवून ठेवतेस |
| (२) आभाळ झुल्यावर झुलणारी | (आ) परंपरेने चालत आलेल्या रीतींना वरदान समजून वागणारी. |
| (३) देह तोडलेले फूल | (इ) उच्च ध्येय बाळगण्याचे स्वप्न रंगवणारी |
| (४) पारंपरिकतेचे वरदान | (ई) कोमेजलेले किंवा ताजेपणा गेलेले फूल |
| (५) पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा | (उ) मनातले सुंदर भाव |

**(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

(अ) माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य!

(आ) स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू... तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

**(४) काव्यसौंदर्य.**

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी,

या ओळींतून सूचित होणारा अर्थ उलगडून दाखवा.

**(५) रसग्रहण.**

**प्रस्तुत कवितेतील खालील पद्यपंक्तींचे रसग्रहण करा.**

तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वत:च हिंदकळतेय
आणि अशातच, ती मला गोंजारीत, जवळ घेत

अधिकारवाणीने म्हणाली–
‘रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले’

**(६) अभिव्यक्ती.**

‘आरशातील स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीशी केलेला संवाद हा स्वत:शीच केलेला सार्थ संवाद आहे’, हे विधान स्पष्ट करा.

**उपक्रम :**

‘स्त्री’विषयक पाच कवितांचे संकलन करा. त्यांचे वर्गात लयीत वाचन करा.

- **तोंडी परीक्षा.**

  **‘आरशातली स्त्री’ या कवितेचे प्रकट वाचन करा.**

# १२. रंगरेषा व्यंगरेषा

■ **मंगेश तेंडुलकर** (१९३४ ते २०१७) :

सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार, नाट्यसमीक्षक, अभिनेता, लेखक, दिग्दर्शक आणि समाजव्रती कार्यकर्ता. 'संडेमूड', 'तेंडुलकरी स्ट्रोक्स', 'भुईचक्र', 'रंगरेषा व्यंगरेषा' ही त्यांची पुस्तके. व्यंगचित्रांना शब्दविरहित भाषा म्हणून 'साहित्यिक' वळण देणारा मनस्वी कलाकार. राजकीय आणि विनोदी व्यंगचित्रांबरोबरच समाजकारण आणि तत्त्वांवर भाष्य करणारी व्यंगचित्रे साकारून या कलेत वेगळा पायंडा पाडला. बोलक्या आणि मोजक्या रेषांमधून अधिक आशय व्यक्त करणे हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य. त्यांनी कुठल्याही महाविद्यालयात कलेचे शिक्षण घेतले नव्हते. त्यांना व्यंगचित्रे रेखाटण्याची नैसर्गिक देणगी होती. ती त्यांनी जनसमूहासमोर ताकदीने मांडली. भारतीय व्यंगचित्रकलेच्या क्षेत्रात एक नवे दालन उघडले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिं. वि. जोशी पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. आयुष्याने दिलेल्या नकारांचे होकार करणाऱ्या तेंडुलकर यांच्या भावजीवनाची आणि कलाजीवनाची 'रंगरेषा व्यंगरेषा' ही जीवनकहाणी आहे.

या आत्मचरित्रात्मक पाठात लेखकाने व्यंगचित्रकार म्हणून स्वत:च्या जडणघडणीच्या काळातील काही प्रसंग रेखाटले आहेत. व्यंगचित्रांमध्ये चांगल्या सुधारणा होऊन त्यांना प्रसिद्धी मिळावी यासाठी श्रेष्ठ चित्रकार दीनानाथ दलाल यांनी लेखकाला केलेल्या मार्गदर्शनाचा प्रसंग येथे आला आहे. कोणत्याही क्षेत्रातील नवोदितांनी वेळीच जाणकार तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन कशी प्रगती साधावी हे या प्रसंगातून सूचित होते. डोळस निरीक्षणातून व्यंगचित्रांविषयीच्या कल्पना कशा सुचतात हे लेखकाने स्त्रीभ्रूण हत्येच्या पोस्टरच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे. व्यंगचित्र ही नि:शब्द भाषा असून शब्दांपेक्षाही ती अत्यंत मार्मिक असते आणि ती परिणामकारकरीत्या काव्यात्म अभिव्यक्ती कशी साधू शकते हे आईच्या चित्राच्या उदाहरणातून त्यांनी दाखवून दिले आहे. ज्याला कलाकार म्हणून मोठे व्हायचे आहे त्याने सतत शिकत राहिले पाहिजे, हे लेखकाने व्यंगचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी आलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे.

मला व्यंगचित्रांसाठी अखंडपणे विषय मिळत राहणं हा मूळ प्रेरणेचा भाग सुदैवानं माझ्यासाठी कधी अडचणीचा ठरला नाही. विचारांचा पाठलाग करत क्षितिजापर्यंत जाण्याची माझी सवय हा माझा यातला एक महत्त्वाचा स्रोत आहे. ज्या विचाराचा पाठलाग करतो तो विषय हाती लागत नाहीच; पण त्या वाटेवर काय काय नवीन नवीन सापडत जातं, त्याचीच व्यंगचित्रं होतात.

मी बऱ्याच कार्यक्रमांना जात असतो. तिथेही या चित्रांचे स्रोत मला सापडतात. असले कार्यक्रम हे कच्चा माल पुरवणारे मार्ग आहेत माझे. प्रयत्न केला तर किती चांगले धागे हातात येतात याचं प्रत्यंतर देणारा एक प्रसंग एका अतिशय साध्याशा कार्यक्रमात घडला. प्रथेप्रमाणे त्या लोकांनी मला पुष्पगुच्छ आणि नारळ दिला. तो घेऊन मी टेबलावर ठेवला आणि शांतपणे खुर्चीत बसलो होतो. बोलणारा माझी कुठून कुठून जमवलेली माहिती उपस्थितांना सांगत होता. मला त्यात स्वारस्य नव्हतं. मी टेबलावरच्या नारळाकडे बघत होतो. बघता बघता मला ती नारळाची शेंडी, नारळाचा तो लहानसा आकार पाचसात वर्षांच्या मुलीच्या डोक्यासारखा वाटायला लागला. नारळाची शेंडी तिच्या पोनीटेलसारखी बांधलेली! हे स्मरणात घिरट्या घालायला लागलं. कार्यक्रम संपला. घरी आलो. बाकी सगळी कामं नेहमीसारखी सुरू होती. रात्री दहानंतर मी समोर ड्रॉईंगपेपर घेऊन बसलो होतो. त्यावर चित्र चितारत गेलो ते अशा क्रमानं. देवळासमोर दगडावर आपटून नारळ फोडतात. नारळ फोडणारा तो पुरुषी हात मी चितारला. तो नारळ नसून ते चिमुरड्या मुलीचं डोकं आहे हे सूचित व्हावं म्हणून त्या नारळाला बारीकसा कानातला डूल दाखवला.



त्यानं तो नारळ दगडावर आपटण्यासाठी वर उगारलाय आणि त्याचबरोबर मी दुसरा एक हात दाखवलाय ज्या हातानं तो नारळ उगारलेला पुरुषी हात धरून ठेवलाय. स्त्रीभ्रूण हत्येबद्दलचं एक पोस्टर त्यातून तयार झालं. ज्यांना लिहिता-वाचता येत नाही त्यांच्यापर्यंतही हा संदेश मला पोचवता आला. त्या समारंभाला मी गेलो नसतो तर मला हे सुचलं नसतं.

व्यंगचित्राची कल्पना सुचणं ही प्रक्रिया खरंतर मजेदार आहे. आपण मासे पकडणारे लोक पाहतो. काही जाळी टाकून पकडतात, काही गळ टाकून! त्यात एक समूह असाही आहे, की त्यामधील लोक वाहत्या उथळ पाण्यामध्ये जाऊन उभे राहतात. न हलता शांतपणे; पण सावध असे ते उभे असतात. एखादा मासा गाफिलपणे त्यांच्या पायाजवळून जातो. तो मासा हातानं झडप घालून ते पकडतात आणि जमिनीवर ठेवतात. ही माणसं मी पाहिलेली आहेत. वाहत्या आयुष्यामध्ये जर सावधगिरीनं उभं राहिलं, तर व्यंगचित्राची कल्पना अगदी जवळून जाते. ती तिथून उचलायची आणि कागदावर उतरायची एवढाच भाग असतो. व्यंगचित्राची नेमकी कल्पना मनात ठेवून चित्रं रेखाटताना कधीतरी अचानकपणे आपली एखादी सुप्त इच्छा त्या चित्रात स्वतंत्र रूप घेऊन उतरून येते.

अशी अनेक चित्रं काढता काढता एका क्षणी माझ्या लक्षात आलं, की व्यंगचित्रं ही नि:शब्द भाषा आहे. त्या रेषांना शब्द नाहीत; पण तरीही ती एक प्रभावी भाषा आहे. मला वाटतं तशी ती खरंच भाषेइतकी संवादी आहे का हे अजमावण्यासाठी म्हटलं, घेऊ अनुभव! माझे हे खेळ सुरू झाले. एखादी सुंदर काव्यात्म कल्पना व्यंगचित्रातून व्यक्त करता येते का? तर उत्तर आलं 'येते'. हे मी स्वत: अनुभवलं. व्यंगचित्रातून एखाद्या माणसाबद्दलची भावना व्यक्त करता येते का? तर तीही येते. शब्दांतूनसुद्धा ती व्यक्त होणार नाही इतकी छान करता येते. व्यंगचित्राच्या भाषेला जी मार्मिकता आहे ती शब्दाहून प्रभावी आहे. अशी जी काव्यात्म चित्रं मी रेखाटली त्यातलं एक 'आई'विषयी सारं काही सांगण्यासाठीच होतं. आईचं नातं हे सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे. बाकीची नाती ही जोडलेली असतात. माणसांमध्ये मला जर कुठे ईश्वराचा अंश दिसत असेल तर तो आईमध्ये दिसतो. हे नातं मला कसं दिसतं हे व्यक्त करण्यासाठी मी जे चित्र काढलेलं होतं, त्यात उन्हाळ्यातला वैशाख वणवा आहे. त्यात एक सुकलेलं झाडपण आहे. एकही पान नसलेल्या त्या झाडाच्या फांदीवर एका पक्ष्यानं घरटं केलेलं आहे. त्या घरट्यात चोच उघडून आकाशाकडे बघणारी तीनचार पिल्लं आहेत आणि त्या पिल्लाची कणसदृश्य आई पार आकाशात गेलीय. दूरवर सापडलेला एक पावसाचा ढग ती चोचीनं घरट्याच्या दिशेनं ओढून आणतेय. आता आई हे नातं मी कितीही शब्द वापरले तरी या चित्रासारखं मला व्यक्त करता येणार नाही. हे व्यक्त झालं असेल तर हा मोठेपणा माझा नाही. ही या माध्यमाची ताकद आहे. मी या चित्राखाली काही लिहीत नाही. हे चित्र आवडल्याचं सांगत अनेक लोक माझ्याकडे येतात. ते का आवडलं हे त्यांना सांगता येत नाही; पण त्यातला आशय त्यांच्यापर्यंत पोहोचतो म्हणूनच ते त्यांना आवडलेलं असतं.

व्यक्त होण्याची गोष्ट खूप पुढे नेत नेत मी माझ्या वडिलांना माझ्या व्यंगचित्रांमधून खूप मनापासून श्रद्धांजली वाहिली. या चित्रांमधल्या पहिल्या चित्रात मी भर पावसात उभा आहे आणि माझ्या डोक्यावर दोन अक्षरं आहेत 'बाबा'. पाऊस 'बाबा' या शब्दाच्या दोन्ही बाजूंनी पडतो आहे. खाली इवलासा मी सुरक्षित आहे. मी त्यात माझं लहानपण दाखवलंय. दुसऱ्या चित्रात आता ते शब्द नाहीयेत; पण तरीदेखील तो पाऊस माझ्या दोन्ही बाजूंनी जातो आहे. मी तिथे उभा आहे तो आत्ताच्या वयाचा- पंचाहत्तरी पूर्ण केलेला आहे. बाबांनी जे काही माझ्यासाठी निर्माण करून ठेवलं आहे ते त्यांच्यामागे आत्तापर्यंत मला खूप मोठा आधार, खूप मोठा आश्रय देत आलं आहे. माझ्या व्यंगचित्रातून मी हेही व्यक्त करू शकलो.

माझ्या व्यंगचित्रांची प्रदर्शनं भरवण्याचे माझे जे जगावेगळे हेतू आहेत, त्यात व्यंगचित्राचा परिचय 'एक छान भाषा' म्हणून करून देणं हाही आहे. पुणे, मुंबई, गोवा, दिल्लीपासून महाराष्ट्रातल्या अनेक छोट्या शहरांपर्यंत कितीतरी ठिकाणी माझी प्रदर्शनं झाली. या प्रदर्शनांमधला माझा सगळ्यात चांगला अनुभव आहे तो वाईसारख्या छोट्या शहरामध्ये लोकमान्य वाचनालयामध्ये प्रदर्शन भरवलं होतं तेव्हाचा. जुनी कौलारू वास्तू होती ती. उद्घाटन झालं. दुसऱ्या दिवशी मी आणि लता दोघंही खुर्च्या टाकून शांतपणे बसलो होतो. तिथे खाली रस्त्यावर उतरणारा जिना होता. रस्त्यावर एक वीसबावीस जणांची

शेतकरी कुटुंबाची ट्रॅक्टरट्रॉली थांबली. तिथे काही दुकानं होती. मला वाटलं ती मंडळी त्या दुकानांमध्ये आली असतील. मी कुतूहलानं पाहात होतो. मंडळी ट्रॉलीमधून उतरली आणि जिना चढून वर प्रदर्शनाकडे आली. मला बरं वाटलं. त्यांच्यासोबत सत्तरीच्या आसपासचा कुटुंबप्रमुख होता. पांढऱ्या मिशा, रंग काळाकभिन्न, डोक्याला केवढंतरी मोठं मुंडासं बांधलेलं. नखशिखान्त शेतकरीपण वागवणारा तो आणि त्याच्या घरातली मुलं-नातवंडं प्रदर्शन पाहायला लागली. हा कुटुंबप्रमुख माझ्या प्रत्येक चित्रासमोर उभा राहत होता आणि त्याच्यामागे उभे राहिलेल्या त्याच्या माणसांना अर्थ समजावून सांगत होता. तो काय सांगत होता ते मी शांतपणे ऐकत होतो. तो कुठल्या चित्रासमोर उभा आहे तेही मला दिसत होतं आणि मनाची स्वच्छ पाटी घेऊन आलेल्या या शेतकऱ्यापर्यंत हे चित्र कसं पोचतंय हे मी थेट अनुभवत होतो. चित्रं चितारताना माझ्या मनात होतं ते आणि आत्ता त्याच्यापर्यंत पोहोचत होतं ते याच्यात जी तफावत मला जाणवत होती ती तशी का जाणवत होती हे मी मनोमन समजून घेत होतो. हे माझं केवढं तरी मोलाचं शिक्षण होतं, जे मला एखाद्या विद्यापीठातही मिळालं नसतं ते त्या अनोळखी शेतकऱ्यानं त्या दिवशी मला दिलं.

व्यंगचित्रांच्या प्रसिद्धीसाठी प्रारंभीच्या काळात मी केलेली धडपड आठवली, की गंमत वाटते. तेव्हाचा तो काळ मोठा अवघड होता. मासिकं, नियतकालिकं यांना मी सतत चित्रं पाठवायचो आणि ती सतत परत यायची. त्या चित्रांसाठी मी अपार मेहनत केलेली असे, ती स्वीकारली जात नव्हती, त्यांची स्वतंत्र ओळख तयार होत नव्हती या सगळ्यांचा मी बऱ्यापैकी मनस्ताप करून घ्यायचो. नाव नाही म्हणून प्रसिद्धी नाही आणि प्रसिद्धी नाही म्हणून नाव नाही या चक्राच्या तळाशी गोल गोल फिरत होतो. एखादं दुसरं चित्र प्रसिद्ध व्हायचं तर पन्नासएक परत यायची. या काळात तीन संपादकांनी मात्र मला हात दिला. दीनानाथ दलाल हे त्यापैकी एक होते. या श्रेष्ठ चित्रकाराचं ऑफिस मुंबईत केनेडी ब्रीजला होते. तो पत्ता मी त्यांच्याच मासिकावरून उतरून घेतला. त्यांना पोस्टकार्ड टाकलं, 'मला तुम्हांला भेटायला यायचंय' असं लिहिलं. मला असं वाटत होतं, की 'दीपावली' मध्ये माझी चित्रं प्रकाशित झाली तर बाकीच्या मासिकांतून ती विनातक्रार स्वीकारली जातील. मग मी 'दीपावली' साठी खास चित्रं तयार केली. दरम्यान दलालांनी मला भेटीचा दिवस व वेळ कळवली. ठरल्या दिवशी सकाळी जनता एक्स्प्रेसनं मी मुंबईला गेलो.

चर्नी रोडला उतरलो आणि केनेडी ब्रीजला गेलो. दलाल किती वाजता ऑफिसमध्ये येणार आहेत, आलेत का? हे विचारण्यासाठी मी ऑफिसमध्ये फोन केला. फोन खुद्द दलालांनी घेतला. 'नमस्कार, मला दीनानाथ दलालांशी बोलायचंय' मी म्हणालो. 'स्पीकींग!' त्यांचा आवाज इतका स्त्रीच्या आवाजासारखा होता, की दलाल स्वत: बोलत असतील असं मला वाटलंच नाही. मी त्यांना पुन्हा सांगितलं, 'मला श्रीयुत दीनानाथ दलाल यांच्याशी बोलायचं आहे. मी मंगेश तेंडुलकर.' 'स्पीकींग स्पीकींग...' त्यांनी मंजुळ आवाजात आणखी दोनदा सांगितलं. 'अहो, मला तुमच्याशी नाही बोलायचं. मला संपादक दीनानाथ दलालांशी बोलायचं आहे. तुम्ही मला बोलू देणार आहात की नाही?' माझा आवाज थोडा वाढला. ते मला म्हणाले, 'अहो तेंडुलकर, मी दीनानाथ दलाल!' मी किंचितसा अवघडलोच. म्हटलं, 'तुम्ही ऑफिसमध्ये आहात ना हे विचारायला मी फोन केला.' 'हो, आहे मी. या तुम्ही', ते म्हणाले आणि मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. पहिल्या मजल्यावर त्यांचं ऑफिस होतं. 'ये. बस.' अगदी तोच आवाज. टेबलवर इझेल ठेवून ते काम करत होते. माझ्या मोठ्या बंधूंचा-विजयचा आणि त्यांचा परिचय होता. तोपर्यंत विजय लेखक म्हणून प्रसिद्ध झालेला होता. मी प्रथमच त्यांच्यासमोर गेलो होतो. 'तू विजयचा कोण?' दलालांनी विचारलं. 'कुणीही नाही.' मी क्षणार्धात सांगून टाकलं. काही क्षण भुवया उंचावून गंभीरपणे त्यांनी माझ्याकडे बघितलं. माझ्याकडे बघत म्हणाले, 'ठीक आहे! दाखव काय चित्रं काढली आहेस?' माझी व्यंगचित्रं त्यांना दाखवली. ती पाहून त्यांनी मला त्यांच्या खुर्चीच्या मागे येऊन उभं राहायला सांगितलं. राहिलो. दलालांनी कोऱ्या कागदाचे तुकडे ड्रॉईंगबोर्डवर ठेवले. माझं चित्र शेजारी धरून ब्रशच्या फटकाऱ्यांनी त्यांनी ते पुन्हा त्या कागदाच्या तुकड्यांवर चितारलं. म्हणाले, 'व्यंगचित्रातला नवा ट्रेंड हा असा आहे. कमीत कमी रेषा, कमीत कमी तपशील आणि त्यातून जास्तीत जास्त आशय. तोही शब्दांशिवाय! तुझी चित्रं चांगली आहेत; पण तुझी पद्धत जुनी झाली आहे आता. चित्राला एक परस्पेक्टिव्ह असतं.

सगळी चित्रं सपाट नाही काढायची. त्याला खोली असायला हवी.' खोली कशी घ्यायची हेही त्यांनी मला दाखवलं. म्हणाले, 'मी सांगितलेलं लक्षात ठेव आणि ही चित्रं पुन्हा काढून पाठव.' औपचारिक शिक्षण म्हणतात ते माझं असं दीनानाथ दलालांकडून झालं. पंधरा-एक मिनिटांत त्यांनी ती सातआठ चित्रं पुन्हा चितारून दाखवली. दलालांनी आपलं महत्त्वाचं मार्गदर्शन संपवून चहा मागवला. गप्पा सुरू झाल्या. बोलता बोलता एके ठिकाणी चुकून मी विजयचा एकेरी उल्लेख केला आणि मीच दचकलो.

माझ्याकडे शांतपणे पाहून ते म्हणाले, 'तू खोटं बोलतोयस हे तेव्हाच माझ्या लक्षात आलं होतं. कबूल कधी करतोयस त्याची वाट बघत होतो; पण तू असं का म्हणालास? तुझं त्याच्याशी भांडण वगैरे आहे का?' मी म्हटलं, 'अजिबात नाही. तो माझा सख्खा भाऊ आहे आणि त्याच्याबद्दल मला खूप आपुलकी आहे; पण त्याच्या खांद्यावर उभं राहून मला मोठं नाही व्हायचं. त्याचा भाऊ म्हणून माझी चित्रं तुम्ही घ्यावीत असं मला वाटलं नाही, म्हणून मी तसं म्हणालो.' दलाल म्हणाले, 'मला आवडलं. अशी माणसं क्वचितच सापडतात. तू चित्र तयार करून पाठव. मी घेतो.'

मी पुण्याला परत आलो. दोन दिवसात त्यांना हवी तशी चित्रं तयार केली. पाठवली. पाठवलेली एकूण एक चित्रं 'दीपावली' मध्ये प्रसिद्ध झालेली पाहून मला अतोनात आनंद वाटला.

(रंगरेषा व्यंगरेषा)

## कृती

**(१) (अ) लेखकाने खालील गोष्टी कळण्यासाठी व्यंगचित्रात वापरलेली प्रतीके लिहा.**

| पाठातील गोष्टी | प्रतीके |
|---|---|
| (१) चिमुरड्या मुलीचं डोकं - | |
| (२) आई हे नातं- | |
| (३) भरपावसातली छत्री | |

**(आ) वैशिष्ट्ये लिहा.**

(१) **लेखकाच्या मते व्यंगचित्रांची वैशिष्ट्ये**

(२) **व्यंगचित्राच्या नव्या ट्रेंडची वैशिष्ट्ये**

**(इ) योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट<br>लेखकाची व्यंगचित्रे | 'ब' गट<br>व्यंगचित्रांची कार्ये |
|---|---|
| (१) लेखकाचे स्त्रीभ्रूणहत्येचे पोस्टर | (अ) भाषेइतकी संवादी बनून प्रेक्षकांशी संवाद साधतात. |
| (२) लेखकाच्या मते व्यंगचित्रे ही | (आ) स्वकल्पनाशक्तीने चित्र समजून घेऊन इतरांचे उद्बोधन केले. |
| (३) शेतकऱ्याने व्यंगचित्राचा अर्थ इतरांना सांगताना | (इ) लिहिता वाचता न येणाऱ्यांना संदेश देते. |

**(ई) लेखकाला लागू पडणाऱ्या व्यक्तिवैशिष्ट्यांसमोर ✓ अशी खूण करा.**

(१) लेखकामध्ये जबरदस्त निरीक्षणशक्ती होती. ( )
(२) लेखकाच्या व्यंगचित्रांना सहजासहजी प्रसिद्धी मिळाली. ( )
(३) लेखकामध्ये प्रयोगशीलता पुरेपूर भरलेली होती. ( )
(४) अपेक्षित उत्तर मिळेपर्यंत ते विचारांचा पाठलाग करत. ( )
(५) व्यंगचित्रातला नवा ट्रेंड स्वीकारण्याची वृत्ती नव्हती. ( )
(६) प्राप्त प्रसंगांतून आणि भेटलेल्या व्यक्तींकडून शिकत राहण्याची वृत्ती होती. ( )
(७) नवनिर्मितीक्षमता हा त्यांचा गुण होता. ( )
(८) इतरांच्या आधाराने पुढे जाण्याची त्यांची वृत्ती नव्हती. ( )

**(२) वर्णन करा.**

(अ) वाई येथील प्रदर्शनाला भेट देणारा शेतकरी कुटुंबप्रमुख.
(आ) स्त्रीभ्रूणहत्येबद्दलचे लेखकाने तयार केलेले पोस्टर.
(इ) लेखकाने आईविषयी रेखाटलेले काव्यात्म चित्र.

**(३) व्याकरण.**

**(अ) खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा.**

(१) या चित्रांचे स्रोत मला सापडतात.
(२) हा संदेश मला पोहोचवता आला.
(३) त्यांनी ती सातआठ चित्रं पुन्हा चितारून दाखवली.
(४) मार्गदर्शन संपवून चहा मागवला.

**(आ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून सूचनेप्रमाणे तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्यप्रकार | बदलासाठी सूचना |
|---|---|---|
| (१) अशी माणसं क्वचितच सापडतात. | | नकारार्थी करा. |
| (२) ती जुनी कौलारू वास्तू होती. | | उद्गारार्थी करा. |
| (३) तुम्ही मला बोलू देणार आहात की नाही ? | | आज्ञार्थी करा. |

**(इ) समासाचे नाव व सामासिक शब्द यांच्या जोड्या जुळवून लिहा.**

| समासाचे नाव | सामासिक शब्द |
|---|---|
| (१) तत्पुरुष समास | (अ) स्त्रीपुरुष, गुणदोष |
| (२) अव्ययीभाव समास | (आ) महात्मा, पंचधातू |
| (३) बहुव्रीही समास | (इ) प्रतिवर्षी, आजन्म |
| (४) द्वंद्व समास | (ई) लक्ष्मीकांत, निर्धन |

(ई) **कंसात समासांची नावे दिलेली आहेत. खाली दिलेल्या सामासिक शब्दांसमोर त्यापैकी योग्य समासाचे नाव लिहा.**

(विभक्ती तत्पुरुष समास, कर्मधारय समास, द्‌विगू समास, इतरेतर द्‌वंद्‌व समास, वैकल्पिक द्‌वंद्‌व समास, समाहार द्‌वंद्‌व समास)

(१) चहापाणी – ................

(२) सद्‌गुरु – ................

(३) सुईदोरा – ................

(४) चौघडी – ................

(५) कमीअधिक – ................

(६) जलदुर्ग – ................

## (४) स्वमत.

(अ) 'एखादे व्यंगचित्र हे प्रत्यक्ष भाषेपेक्षा संवादाचे प्रभावी माध्यम असू शकते', या विधानाशी तुम्ही सहमत वा असहमत आहात ते सकारण स्पष्ट करा.

(आ) 'वाहत्या आयुष्यामध्ये सावधगिरीनं उभं राहिलं तर व्यंगचित्राची कल्पना अगदी जवळून जाते', या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(इ) लेखकाने व्यंगचित्रांतून वडिलांना वाहिलेली श्रद्‌धांजली तुमच्या शब्दांत लिहा.

## (५) अभिव्यक्ती.

(अ) 'स्त्रीभ्रूणहत्या एक अपराध' याविषयी तुमचे विचार स्पष्ट करा.

(आ) 'आईचं नातं सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे', या वाक्यातील आशयसौंदर्य उलगडून दाखवा.

## उपक्रम :

(अ) तुमच्या शाळेतील/महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात 'व्यंगचित्रांतून सामाजिक प्रबोधन' या विषयावर चित्रप्रदर्शनाचे आयोजन करा.

(आ) 'बेटी बचाओ, बेटी पढाओ ।' या विषयाशी संबंधित पाच घोषवाक्ये तयार करा.

- खाली दिलेल्या मंगेश तेंडुलकर यांच्या व्यंगचित्राचे निरीक्षण करा. या चित्रातून व्यंगचित्रकाराला काय सुचवायचे असेल असे तुम्हांला वाटते. ते तुमच्या शब्दांत लिहा.



.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

***

# जयपूर फूटचे जनक

## (नमुना गद्य आकलन)

'नाचे मयूरी' हा चित्रपट अनेकांनी पाहिला असेल. सुप्रसिद्ध नर्तिका सुधा चंद्रन हिच्या आयुष्यावर तो आधारित होता. एका अपघातामध्ये सुधाला एक पाय गमवावा लागला होता. साहजिकच तिचं नृत्य कायमचंच बंद पडण्याच्या मार्गावर होतं; पण सुधा जयपूरला गेली आणि तिथं तयार करण्यात आलेला कृत्रिम पाय आपल्या गमावलेल्या पायाच्या जागी बसवला. नृत्याची कारकीर्द तिनं नव्यानं सुरू केली आणि त्या कृत्रिम पायाच्या आधारानं तिनं भरघोस यश मिळवलं. सुधानं बसवून घेतलेल्या त्या कृत्रिम पायाचंच नाव आहे 'जयपूर फूट'. जयपूरमधल्या एका रुग्णालयात तो प्रथम विकसित केला गेला म्हणून त्याला ते नाव मिळालं.

जयपूरच्या रुग्णालयात डॉ. प्रमोद किरण सेठी अनेक विकलांगांवर उपचार करत होते. पोलिओची बाधा झाल्यामुळे दिव्यांगत्व आलेल्या मुलांना पाहून त्यांना एक कल्पना सुचली. पंडित राम चरण शर्मा या कलाकाराला विविध प्रकारची विलक्षण साधनं तयार करताना त्यांनी पाहिलं होतं. त्यांनी पंडितजींना रुग्णालयात येण्याचं आमंत्रण दिलं.

पंडितजींनी रुग्णालयात, ज्यांचे पाय काही कारणांनी गमावले आहेत अशांना परदेशातून आयात केलेले, महागडे कृत्रिम पाय बसवताना पाहिलेलं होतं. ते परवडणारे नव्हते आणि ज्यांना ते परवडणारे होते त्यांचीही चाल काही सुलभ होत असताना त्यांना दिसली नव्हती. ते पाहून त्यांच्या कल्पकतेला आव्हान मिळालं. त्यांनी व्हल्कनाईज्ड रबर आणि लाकूड या सहजगत्या उपलब्ध असलेल्या कच्च्या मालापासून हालचाल करण्यास सुलभ असा पाय तयार केला. डॉ. सेठी यांनी तो आपल्या एका रुग्णाला बसवून पाहिला. त्यासाठी शस्त्रक्रियेची नवी पद्धत विकसित केली. त्या रुग्णाला त्याचा फायदा झाल्याचं पाहून त्यांनी पंडितजींना आणखी तसेच पाय तयार करायला सांगितलं. आता परदेशातून कृत्रिम पाय आयात न करता हे लाकडी पाय बसवण्याचाच सिलसिला सुरू झाला. सुरुवातीला तर पंडितजींनी बांबूचाच वापर केला होता; पण हळूहळू इतरही पदार्थांचा वापर करायला त्यांनी सुरुवात केली.

आता जगभर त्याचं रोपण केलं जातं. अद्ययावत प्लास्टिक व ॲल्युमिनियम यांचा वापरही आता करण्यात येतो. पण मूळ कल्पना मात्र पंडितजींचीच राहिली आहे.

**– डॉ. बाळ फोंडके**

### • नमुना कृती

**(१) परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (अ) अपघातामध्ये सुधाला एक पाय गमवावा लागला. | ............................................... |
| (आ) पंडितजींनी कृत्रिम पाय बनवला. | ............................................... |

**(२) अभिव्यक्ती.**

'कृत्रिम पायाच्या मदतीने दिव्यांगत्वावर मात करता येते', हे सोदाहरण स्पष्ट करा.

# कथा–साहित्यप्रकार–परिचय

भाग – ३

'कथा' या वाङ्मय प्रकाराला दीर्घ परंपरा लाभली आहे. श्रवणीयता, मनोरंजन व प्रबोधन ही 'कथा' या वाङ्मयप्रकाराची उल्लेखनीय वैशिष्ट्ये आहेत. हा वाङ्मयप्रकार समजून घेण्यासाठी कथेची पूर्वपीठिका, घटक, वैशिष्ट्ये, सादरीकरण यांची माहिती दिली आहे.

कथेच्या अभ्यासातून भाषिक कौशल्ये विकसित होतात तसेच व्यावसायिक संधीही उपलब्ध होतात. 'कथा' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, या हेतूने प्रस्तुत विवेचन केले आहे.

## प्रस्तावना

मनुष्य आपले अनुभव व कल्पना जेव्हा दुसऱ्याला सांगू लागला तेव्हाच त्यांची गोष्ट झाली आणि त्यातून कथेचा जन्म झाला. 'कथा' या शब्दाचा शब्दश: अर्थ गोष्ट, कहाणी, हकीकत, वर्णन असा आहे. लक्षवेधी, सोप्या, सुटसुटीत आणि रसाळ शब्दांत पूर्वी गोष्ट सांगितली जात असे. या श्रवण–गोष्टीतून मनोरंजन व अप्रत्यक्षपणे बोध देण्याचा प्रयत्न होत असे.

मौखिक परंपरेतून सुरू झालेल्या व लिखित स्वरूपात स्थिरावलेल्या 'कथा' या वाङ्मयप्रकाराला उत्तरोत्तर लोकप्रियता लाभत गेली. 'कथ्' म्हणजे सांगणे, निवेदन करणे. 'कथ्' या मूळ धातूपासून 'कथा' हा शब्द रूढ झाला आहे. भारतात कथा या साहित्यप्रकाराला फार मोठी परंपरा आहे.

## कथा म्हणजे...

प्रारंभी एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी कथालेखन केले गेले. नंतर–नंतर मनोरंजन करण्यासाठी किंवा एखादा विचार, भावना, चित्ताकर्षक घटना वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथा लिहिल्या जाऊ लागल्या.

कथेत घटना असतात, कथानक असते, तिच्यात पात्रे असतात. स्थळ, काळ, वेळ यांचाही उल्लेख कथेत असतो. कथेच्या विषयानुसार तिच्यात विशिष्ट वातावरणही असते आणि समर्पक अशी निवेदनशैलीही असते. कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष, गुंतागुंतही कथेत असते आणि या सर्वांचा एक उत्कर्षबिंदूही (क्लायमॅक्स) असतो कथेत! अर्थात या सर्व घटकांनी युक्त अशा कथेला समर्पक शेवटही असतो तसेच एक सुयोग्य आणि उत्तम शीर्षकही असते.

थोडक्यात सांगायचे तर... कथा म्हणजे...

'एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे एखाद्या विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा.'

अर्थात प्रत्येक कथेत हे सर्वच घटक असतीलच आणि त्यांचे प्रमाणही सारखे असेल असे म्हणता येणार नाही. एखाद्या कथेत पात्रांना प्राधान्य असेल तर एखाद्या कथेत प्रसंगांना. कधी लेखकाचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा असू शकतो तर एखादी कथा वातावरणनिर्मितीचा हेतू लक्षात घेऊन लिहिली जाऊ शकते. तीच गोष्ट विचारांची आणि भावनांचीही असू शकते. थोडक्यात, कथा म्हणजे केवळ प्रसंगांचे वर्णन नव्हे, केवळ व्यक्तींचे चित्रण नव्हे, निव्वळ दृष्टिकोन किंवा एकाच विचाराचा परिपोष नव्हे, तर कथा म्हणजे पात्रे, प्रसंग, संघर्ष, गुंतागुंत, वातावरण, विचार, भावना, निवेदनशैली अशा सर्वांचे एक सुसंघटित प्रकटीकरण होय.

## कथेची पूर्वपीठिका

१८९० मध्ये श्रेष्ठ कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी 'करमणूक' या साप्ताहिकाची सुरुवात केली. या साप्ताहिकातून त्यांनी दैनंदिन जीवनाशी संबंधित साध्या व हृदयस्पर्शी कथा प्रकाशित केल्या.

पुढे कथेच्या स्वरूपात कालानुरूप बदल होत गेले. आशय आणि अभिव्यक्तीत परिवर्तन होऊन कथा सामर्थ्यवान झाली. अधिकाधिक विषयांना स्पर्श करत ती बहुआयामी होत गेली. लेखनतंत्रातही प्रयोग झाले.

त्यानंतर ग्रामीण कथा, दलित कथा यांनी कथावाङ्मयाला समृद्ध केले.

स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचा प्रभाव साहित्यावरही झाला. स्त्रियांचे अनुभव कथेच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागले. त्यामुळे एकूणच कथेचा प्रवाह आणि आशय दोन्हीही वृद्धिंगत होत गेले.

अशी ही जीवनाचे विविधांगी दर्शन घडवणारी कथा आजही वाचकांना आकृष्ट करत आहे.

## कथेचे घटक

(१) **कथाबीज :** कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच 'कथाबीज' असे म्हणतात.

(२) **कथानक :** कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

(३) **पात्रचित्रण :** पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व' निर्मिती असते.

(४) **वातावरण निर्मिती :** कथेला स्थळ-काळाबरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते.

(५) **नाट्यमयता/संघर्ष :** कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्ष किंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्षबिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

(६) **संवाद :** कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकाच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितीजन्य घटकांनुसार संवाद लिहिले जातात. या संवादात लय व आंतरिक संगती महत्त्वाची असते. संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो. अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

(७) **भाषाशैली :** कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणत: प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे बोलीभाषेतही लिहिली जाते.

वरील घटकांशिवाय प्रारंभ, मध्य आणि शेवट असे कथेचे सर्वसाधारणपणे तीन टप्पे मानले जातात. कथेची सुरुवात कधी विरोधाभासातून, कधी पात्रांच्या परस्परविरोधी भूमिकांतून तर कधी परिस्थितीजन्य प्रसंगातून होत असते. ही सुरुवात जितकी नाट्यपूर्ण, जितकी उत्कट तितकी वाचकांची उत्कंठा अधिक तीव्र होते. ही उत्कंठा कथेच्या शेवटपर्यंत कायम राखली जाते. कथेच्या रचनाबंधाला यामुळे सौंदर्य प्राप्त होते.

कथालेखनात कथेच्या वरील घटकांबरोबरच शीर्षकाचे महत्त्वसुद्धा अनन्यसाधारण आहे. सूचक व अर्थपूर्ण शीर्षक कथेचा आशय उलगडण्यास मदत करते.

## कथेची वैशिष्ट्ये

मराठी भाषेचे कथादालन खूप समृद्ध आहे. ते विविधतेने आणि गुणवत्तेने नटलेले आहे. त्यामुळेच मराठी कथा अनेकविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण झाली आहे.

### (१) कथा मनोरंजन करते.

मराठी कथा विलक्षण मनोरंजक आहे. तिची खुमारीच मोठी न्यारी आहे. मराठीत सर्वांत जास्त वाचला जाणारा साहित्यप्रकार म्हणजे 'कथा' होय. दिवाळी अंकांमध्ये कथेला मानाचे पान दिले जाते, ते तिच्या मनोरंजकता या वैशिष्ट्यामुळे. आबालवृद्ध कथा सांगण्याचा आणि ऐकण्याचा आनंद मनमुराद लुटतात तो तिच्या या मनोरंजकतेमुळेच. मनोरंजनाची कितीतरी अत्याधुनिक साधने-उदा., टी. व्ही. वगैरे खूप नंतर उदयास आली; पण पहिला मान कथेचाच. कथा सर्वांनाच हवीहवीशी वाटते याचे कारण तिच्या मनोरंजकतेत दडले आहे. मुले तर गोष्ट सांगण्यासाठी भंडावून सोडतात. मोठी माणसेही याला अपवाद नसतात. माणूस गोष्टीवेल्हाळ झाला तो तिच्या 'मनोरंजकता' या वैशिष्ट्यामुळेच.

### (२) कथेमुळे सुसंस्कार होतात.

मनोरंजकतेप्रमाणेच मनावर संस्कार करण्याचीही जबरदस्त ताकद कथेत असते. कथेच्या माध्यमातून 'मूल्यविचार' रुजवता येतात. कथा प्रेरणा, स्फूर्ती, बोध, ज्ञान देते. मानवता, सत्य, समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव, औदार्य, धैर्य, श्रमनिष्ठा, संवेदनशीलता, दया, सहकार्य अशा कितीतरी मूल्यांचा संस्कार कथा करते. मानवी मूल्यांची कदर करणारी आदर्श व्यक्तिमत्त्वे कथावाङ्मयात जागोजागी आढळतात. सामान्य माणूस प्रसंगी आभाळाएवढा मोठा कसा होऊ शकतो हे एखाद्या बोधकथेच्या माध्यमातून वाचकांच्या मनावर ठसवता येते. या संस्कारक्षमतेच्या वैशिष्ट्यामुळेच तर कथेतून सद्गुणांचे पाथेय देता येते.

### (३) कथा वाचकांची उत्कंठा वाढवते.

कथा वाचताना अनेकदा 'आता पुढे काय होणार' अशी उत्सुकता वाचकाच्या मनात निर्माण होते. त्याच्या मनात जिज्ञासा जागी होते. कारण कथानक वाचकाला खिळवून ठेवणारे असते. कथेतील पात्रे आणि प्रसंग यांची गुंफण अशा कौशल्याने केलेली असते, की वाचक त्यात तल्लीन होऊन जातो. वाचकाला वर्तमानातून भूतकाळात घेऊन जाणे आणि पुन्हा वर्तमानात आणणे अशा फ्लॅशबॅक लेखनशैलीमुळे कथा उत्कंठावर्धक होते. यादृष्टीने पाठ्यपुस्तकातील 'शोध' ही कथा एकदा वाचा. त्या कथेतील आकस्मिक वळणे, नाट्यमय प्रसंग, कथेचा अनपेक्षित शेवट या सर्वांमुळे उत्कंठा शेवटपर्यंत कशी टिकून राहाते, हे तुमच्या लक्षात येईल.

### (४) कथा एककेंद्री असते.

अनुभवाचे, रचनेचे एककेंद्रित्व हे कथेचे वैशिष्ट्य आहे. कादंबरी वा नाटकाप्रमाणे ती बहुकेंद्री नसते. कथेतील प्रसंग, पात्रे, वातावरण मर्यादित असते म्हणूनच ती लहान असते, लघू असते. ती पसरट नसते. तिचे स्वरूप स्फुट (छोटे) असते.

### (५) कथा भूतकाळात लिहिली जाते.

सर्वसाधारणपणे कथा भूतकाळात लिहिली जाते. कथेत होऊन गेलेल्या घटनांविषयीचे निवेदन असते. उदा., एक होते गाव. तिथे एक दानशूर माणूस राहायचा; ही अशी वाक्यरचना सर्वसाधारणपणे कथेत आढळते. कथेत एखादी हकीकत असते, घडून गेलेले प्रसंग असतात, त्यांचे वर्णन असते. त्यामुळे आपोआपच कथालेखनासाठी भूतकालीन निवेदनशैली वापरली जाते.

### (६) कथेच्या माध्यमातून जीवनाचा वेध घेतला जातो.

कथा मानवी जीवनाचा थेटपणे वेध घेते. ती जीवनस्पर्शी असते. राजाराणी असो वा एखादा टॅक्सीड्रायव्हर, नर्स असो वा गावातला लोकसेवक; त्या प्रत्येकाच्या जीवनातील घटनांचा, भावभावनांचा, वैचारिक उलथापालथींचा धांडोळा घेण्याची ताकद कथेत असते. कथेला एकही जीवनविषय वर्ज्य नाही. बालपणी काऊचिऊच्या रूपाने मानवी जीवनात प्रवेश करणारी कथा आयुष्यात ठाण मांडून बसलेली असते. जीवनाचा वेध घेण्याचे हे वैशिष्ट्य कथेची खासियत आहे.

### (७) श्रवणीयतेमुळे कथेचे सादरीकरण करता येते.

सादरीकरण म्हणजे सादर केले जाणे, सांगणे, कथन करणे. कथा सादर केली जाते. कथामाला, बालकमेळावे, बालसाहित्य संमेलने इथे आवर्जून कथा सांगितल्या जातात. नाटके, कादंबऱ्या, निबंध वा लेखसंग्रह यांचे कथन फारसे होत नाही; पण कथाकथन मात्र घरोघरी, शाळाशाळांमध्ये, साहित्यविषयक कार्यक्रमांमध्ये नित्यनेमाने घडत असते. कथा सांगणाऱ्याने ती मनोभावे सांगणे आणि ऐकणाऱ्याने ती एकचित्ताने ऐकणे ही सांस्कृतिक देवघेव पूर्वी होत होती, आज होत आहे, उद्याही होत राहील.

## कथेचे सादरीकरण

कथेचे 'सादरीकरण' ही एक कला आहे आणि योग्य प्रयत्नाने ही कला साध्य होऊ शकते. विविध प्रकारच्या कथांचे मूकवाचन, प्रकट वाचन करण्याचा सराव, विविध कथा लेखकांची/लेखिकांची लेखनशैली समजून घ्यायचा केलेला प्रयत्न, भाषेची जाण, शब्दोच्चार आणि सादरीकरण कौशल्ये यांमुळे कथाकथनाचे तंत्र अवगत होऊ शकते.

अलीकडच्या काळात 'कथाकथन' क्षेत्रात अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध होत आहेत. कथा-अभिवाचनाचे कार्यक्रम विविध निमित्ताने रंगमंचावरून सादर केले जात आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन या लोकप्रिय माध्यमांतून सादर केले जाणारे 'कथाकथन' अधिकाधिक लोकांना आकर्षित करत आहे. या पार्श्वभूमीवर कथा-सादरीकरण हा पैलू लक्षणीय ठरतो.

### अभिवाचन

अभिवाचनामुळे कथा श्रोत्यांपर्यंत योग्यप्रकारे पोहोचण्यास मदत होते. कथेचे अभिवाचन एकाच वेळी जर अनेकांकडून केले गेले तर आवाजाचा एकसुरीपणा टळतो. संवादातील चढउतार, चटपटीतपणा, शब्दफेक यांतील विविधतेचा आनंद श्रोत्यांना मिळतो. कथेतील घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा यांचे आकलन होण्यास मदत होते. कथावाचनाला जर पार्श्वसंगीताची, प्रकाशयोजनेची, नेपथ्याची जोड दिली तर ते अभिवाचन श्रोत्यांवर चांगला परिणाम करते व दीर्घकाळ स्मरणात राहते.

### कथाकथन

कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला भाषेच्या ज्ञानाबरोबरच वाचिक अभिनयाचीही थोडी जोड द्यावी लागते, त्यामुळे कथाकथन उठावदार होते. कथाकथन करणाऱ्याला शब्दांच्या माध्यमांतून पात्रांना जिवंत करायचे असते. कथाकथन करणाऱ्या व्यक्तीला कथा सादर करायची असल्याने कोणताही लिखित मजकूर हातात नसतो. श्रोत्यांशी संवाद साधत, त्यांचा प्रतिसाद घेत, लेखकाच्या मूळ संहितेला धक्का न लावता; पण परिणामकारकरीत्या ती श्रोत्यांपर्यंत पोहोचवायची असते.

कथेची निवड करणे फार महत्त्वाचे व तितकेच जबाबदारीचे काम असते. कथा सादरीकरणाचा कालावधी व श्रोत्यांचा अवधान काळ यांचे भान कथा सादरीकरणात ठेवावे लागते. कथा ही संवादातून खुलत असल्याने शब्दफेक, प्रभावी उच्चारण, स्पष्टता आणि शब्दांचा गर्भितार्थ श्रोत्यांपर्यंत थेट पोहोचवणे हे एकाचवेळी कौशल्यपूर्ण पण आव्हानात्मक काम असते.

कथेच्या सादरीकरणाला तंत्रज्ञानाची जोड देऊन सामाजिक संपर्काच्या माध्यमांतून आज कथा वाचकांसमोर येते.

## समारोप

मौखिक परंपरेपासून सुरू झालेला कथेचा प्रवाह आजही सक्षमपणे खळाळता राहिला आहे. आजही मनोरंजन आणि नित्यनूतन अनुभव देण्याची कथेची क्षमता टिकून आहे. कालानुरूप कथेचे विषय, आशय आणि अभिव्यक्ती बदलत गेली; परंतु ती समाजाशी व संस्कृतीशी बांधील राहिल्याने लोकप्रिय राहिली. वाचकांना कथावाचनाचा आनंद साप्ताहिके, मासिके व दिवाळी अंकांपासून ते सामाजिक संपर्कमाध्यमे या सर्व माध्यमांतून मिळतो.

भाषासौंदर्य, आशयसौंदर्य, अभिव्यक्ती विशेष, सादरीकरण, मनोरंजन आणि बोध या विशेषांमुळे कथा आजही लोकप्रिय आहे.

• वाचा.

## ✻ काही प्रमुख कथाकार व त्यांचे कथासंग्रह ✻

(१) ना. सी. फडके– ऊन आणि सावल्या

(२) वि. स. खांडेकर– फुले आणि दगड

(३) य. गो. जोशी– शेवग्याच्या शेंगा

(४) कुसुमावती देशपांडे– दीपकळी

(५) विभावरी शिरूरकर– कळ्यांचे नि:श्वास

(६) पु. भा. भावे– सतरावे वर्ष

(७) मालतीबाई दांडेकर– विसाव्याचे क्षण

(८) वामन चोरघडे– प्रस्थान

(९) श्री. ज. जोशी– मामांचा वाडा

(१०) अरविंद गोखले– मंजुळा

(११) अण्णा भाऊ साठे– कृष्णाकाठच्या कथा

(१२) शंकरराव खरात– टिटवीचा फेरा

(१३) जी. ए. कुलकर्णी– काजळमाया

(१४) गंगाधर गाडगीळ– तलावातले चांदणे

(१५) शंकर पाटील– वळीव

(१६) द. मा. मिरासदार– मिरासदारी

(१७) व्यंकटेश माडगूळकर– हस्ताचा पाऊस

(१८) विद्याधर पुंडलिक– पोपटी चौकट

(१९) व. पु. काळे– गुलमोहर

(२०) मधु मंगेश कर्णिक– झुंबर

(२१) विजया राजाध्यक्ष– अधांतर

(२२) ज्योत्स्ना देवधर– पैलतीर

(२३) शैलजा राजे– वेगळ्या वाटा

(२४) वामन होवाळ– वाटा आडवाटा

(२५) जयंत नारळीकर– यक्षाची देणगी

(२६) आशा बगे– मारवा

(२७) रा. रं. बोराडे– नातीगोती

(२८) गौरी देशपांडे– आहे हे असं आहे

(२९) योगीराज वाघमारे– बेगड

(३०) भास्कर चंदनशिव– अंगारमाती

(३१) उर्मिला पवार– चौथी भिंत

(३२) भारत सासणे– बंद दरवाजा

(३३) सानिया– भूमिका

(३४) प्रतिमा इंगोले– सुगरनचा खोपा

(३५) अप्पासाहेब खोत– माती आणि कागुद


(३६) आसाराम लोमटे– आलोक

## कृती

**(१) कृती करा.**


(अ)

**कथेचे घटक**



(आ)

**कथेची वैशिष्ट्ये**



**(२) उत्तरे लिहा.**


(अ) कथा म्हणजे काय ते थोडक्यात स्पष्ट करा.

(आ) कथेचे कोणतेही दोन घटक सोदाहरण स्पष्ट करा.

(इ) कथेची कोणतीही दोन वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(ई) ‘कथाकथनासाठी कथेची निवड करणे फार महत्त्वाचे आणि तितकेच जबाबदारीचे काम असते’, हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(उ) कथेच्या लोकप्रियतेची कारणे लिहा.



(ऊ) कथेच्या सादरीकरणासाठी आवश्यक भाषिक कौशल्ये लिहा.



**(३) कथेच्या शीर्षकाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**(४) ‘कथा आजही लोकप्रिय आहे’, या विधानाबाबतचे तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.**

(५) प्रभावी कथाकथनासाठी कथाकथन करणाऱ्याने कोणकोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे ?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

(६) तुम्ही वाचलेली कथा थोडक्यात सादर करा.

# १. शोध

■ **व. पु. काळे** (१९३२ ते २००१) :

मराठीतील सुप्रसिद्ध कथालेखक, निबंधकार, नाटककार, कादंबरीकार. कथाकथनाचे अनेक कार्यक्रम लोकप्रिय. कथा आकर्षकपणे सांगण्याची विलक्षण हातोटी. 'लोंबकळणारी माणसं', 'पण माझ्या हातांनी', 'पेन सलामत तो', 'ब्रह्मदेवाचा बाप', 'गुलमोहर', 'कर्मचारी', 'का रे भुललासी', 'ऐक सखे', 'वन फॉर द रोड', 'मायाबाजार', 'स्वर', 'संवादिनी', 'वलय', 'मी माणूस शोधतोय' असे अनेक कथासंग्रह प्रकाशित. आकर्षक कथानके, ओघवती निवेदन शैली आणि चटपटीत संवाद यांमुळे वपुंची कथा वाचकप्रिय. 'ही वाट एकटीची', 'पार्टनर' या कादंबऱ्या, 'रात्र नको चांदणी' हे नाटक आणि 'प्रपंच', 'पुन्हा प्रपंच' या आकाशवाणीवरील लोकप्रिय नभोनाट्यांचे संग्रहही प्रकाशित. महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, 'पु. भा. भावे' पुरस्कार, फाय फाउंडेशनचा पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित.

विपुल कथालेखन केलेल्या व. पु. काळे यांची 'शोध' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे. कथारचनेच्या तंत्रांची अनेक वैशिष्ट्ये या कथेत स्पष्ट दिसून येतात. कथेचा आरंभ मनाची पकड कशी घेतो? 'अनु' या प्रमुख व्यक्तिरेखेचा विकास हा कथानकातील प्रसंग, अन्य पात्रांशी येणारा संबंध आणि निवेदन यांमधून कसा घडत जातो? कथाकाराने कथानकातील प्रसंग, उपकथानक यांची एकसंघ गुंफण कशाप्रकारे केली आहे? विविध प्रसंगी कथानकाला आकस्मिकरीत्या मिळणाऱ्या कलाटण्यांमधून नाट्य कसे निर्माण होते? 'अनु' आणि 'तिचा एक रुपयाच्या नोटेचा शोध' याभोवती सगळे कथानक कसे फिरत राहते? आणि कथेच्या शेवटी रहस्याचा उलगडा कसा होतो? इत्यादी प्रश्नांच्या अनुषंगाने कथेचा अभ्यास करावा. कथेचा विषय, पात्रे आणि प्रसंग यांच्या दृष्टीने अनुकूल भाषा, चटपटीत आणि प्रत्यक्ष जीवनव्यवहारासारखे वाटणारे सजीव संवाद हे अभ्यासण्यायोग्य आहेत. या कथेचा विकसनाच्या अंगाने घेतलेला आस्वाद कथा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

---

अनु, आम्ही दोघं तुझी माफी मागतो हवं तर; पण तू काहीतरी बोल, अशी गप्प बसू नकोस. मी एवढं म्हणालो, तरी ती गप्प राहयली. मी मुक्ताकडं पाहयलं. तिनंही माझ्याकडं त्याच नजरेनं पाहयलं. नंतर काय करावं हे आम्हा दोघांनाही सुचेना. दिवस असता तर पंधरा-वीस मिनिटात बांधाबांध करून अक्षरश: अनुच्या खोलीवरून आम्ही पळ काढला असता. रात्री बारा-साडेबाराच्या सुमारास कुठं जाणार?

अनुचं जेवण आटोपलं होतं.

हात धुवायला न जाता ती तशीच पानावर बसून होती. 'अनु...' मुक्तानं बोलण्याचा प्रयत्न केला. मुक्ताकडं नजर रोखीत अनु म्हणाली, 'तुम्ही रुपयाची ती नोट घ्यायला नको होती.'

तिच्या स्वरातली नाराजी, कडवटपणा आम्हा दोघांना जिव्हारी लागला. अनु समोरून उठून गेली. हातून घडलेली चूक कशी सुधारावी ह्यावर विचार करण्यात अर्थ नसल्यामुळं मी त्यावर मुळीच विचार करत नव्हतो, कारण घडलेली घटना दुरूस्त करता येईल ह्या स्वरूपाची नव्हती. सकाळपर्यंतचे काही तास अनुच्या खोलीवर कसे काढायचे एवढाच प्रश्न होता. एकमेकांशी ह्या विषयावर न बोलता-तोच प्रश्न दोघांना सतावतो आहे हे दोघांनी ओळखलं होतं. सकाळी तरी जाताना आम्ही काय करणार होतो?

शंभर वेळा 'बाई गं, आमचं चुकलं', असंच म्हणत अपराध्याप्रमाणे जिना उतरणार होतो ना?

छे! It was just a problem! प्रॉब्लेम आणि ब्लेम-सुद्धा!

सकाळीच पुणं सोडताना आज रात्री अनुच्या खोलीवर असा काही प्रकार घडणार आहे असं कुणी सांगितलं असतं तर आम्ही त्यावर विश्वास ठेवला असता काय? बाब निव्वळ एका रुपयाची आणि तेवढ्यासाठी अनु असं करील? इतक्या वर्षांचा स्नेह विसरून अपमान करील? शक्य आहे. ती अनु इनामदार आहे हे आम्ही विसरलो. तिच्या विक्षिप्त स्वभावाचा आम्हाला विसर पडावा ह्यात तिची काहीच चूक नाही. तिचा हा असला विक्षिप्त स्वभाव, मला खरं तर आवडलेला. अगदी पहिल्यापासून. म्हणजे बी. ए. नंतर तिनं आबासाहेबांचा निरोप घेतला तेव्हापासून. तिनं घराला रामराम ठोकला हेही मला आबासाहेबांकडून समजलं.

आबासाहेबांकडे सहज चक्कर टाकली, एक रूटीन म्हणून. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या आणि सहज विचारलं, 'आबासाहेब, अनु दिसत नाही कुठं?'

'अनुनं घर सोडलं.'

'आं...'

'पाच वर्षांपुरतं.'

'मी नाही समजलो.'

त्याचं असं आहे, 'प्राप्तेषु षोडशे वर्षे...' हा नियम आपण फक्त मुलांच्या बाबतीत सांभाळतो. मुलींनाही तोच न्याय लावायला हवा आणि अनुसारख्या मुलीच्या बाबतीत तर ही सवलत प्रथम हवी.

ते सगळं मान्य आहे; पण घर सोडायचं कारण...

फक्त पाच वर्षांसाठी.

पण का?

तिनं माझ्यासाठी केवळ पाच वर्षांची सवलत दिली.

म्हणजे काय; पण?

पाच वर्षं तर घर सोडून गेली आहे ते तिच्यासाठी नाही तर माझ्यासाठी, असं अनु म्हणते. मला वाईट वाटू नये म्हणून.

'आलं लक्षात'-एकूण अंदाज येऊन मी म्हणालो. तोच आबासाहेब म्हणाले,

'तिचं मला थोडंसं पटलं. थोडंसं म्हणण्यापेक्षा पुष्कळसं.'

काय पटलं?

अनु म्हणाली, 'मी मुलीच्या जन्माला आले आहे, तेव्हा माझं लग्न केल्याशिवाय तुम्ही मला सोडणार नाही आणि मी लग्नच करणार नाही, ह्यासारखे पणही मला करायचे नाहीत. फक्त लग्नापूर्वी पाच वर्षं मला स्वत:ची म्हणून जगायची आहेत.'

म्हणजे कशी?

हा प्रश्न मीही तिला विचारला तेव्हा ती म्हणाली, 'पाच वर्षं माझी स्वत:ची म्हणजे purely माझी स्वत:ची असावीत. त्या वर्षांशी कुणाचाही संबंध असता कामा नये. मला त्याचा कुणी अकाऊंट विचारता कामा नये. तुम्हीसुद्धा. पाच वर्षं मी एकटी जगणार.'

'म्हणजे निश्चित काय करणार?'

आबासाहेब म्हणाले, अगदी, तिच्याच शब्दांत सांगतो. ती म्हणाली, 'कुणाच्या ना कुणाच्या कलानं चालण्याची सवय प्रत्येक व्यक्ती परंपरेनं लावून घेते. माणूस स्वत:चं व्यक्तिमत्त्व स्वत: घडवत नाही. कुणाचा ना कुणाचा तरी त्याच्यावर पगडा असतो. विचारांवर छाया पडलेली असते. आई-बाप एखाद्या व्यक्तीवर प्रेम करतात म्हणून मूल त्या व्यक्तीवर प्रेम करू लागतं. जे आई-वडिलांचे शत्रू तेच त्या मुलाचे शत्रू. ह्याचाच अर्थ असा की स्वत:चा स्वतंत्र मेंदू घेऊन जन्माला आलेला जीव दुसऱ्याचं ऐकतो; त्याच क्षणी तो स्वत:चं अस्तित्व, निसर्गानं जगाकडं पाहण्याची दिलेली स्वतंत्र नजर हरवून बसतो. मला पाच वर्षं एवढ्याचसाठी एकटं राहायचं आहे. माझे स्वत:चे विचार आणि तुमच्या विचारांचा पडलेला पगडा ह्यात किती अंतर आहे ते मला पाहायचंय.' जगाकडं पाहताना मला माझा चष्मा हवा. प्रत्येक वस्तूचं, घटनेचं, व्यक्तीचं मूल्यमापन करायला मला माझी नजर स्वतंत्र तयार करायची आहे आणि तेही संसारात पडण्यापूर्वी.'

स्वत:चे अनुभव स्वत:च जमा करायचे आहेत. समाजात मिसळल्याशिवाय समाज समजत नाही आणि व्यक्तीही कळत नाहीत असं ती म्हणते. समाज ही विशाल अर्थानं व्यक्तीच असते आणि व्यक्ती घटकरूपानं समाजच आहे, असं एका महाराजांचं विधान ती नेहमी ऐकवते; पण त्यावरही ती असं म्हणते, की 'हे त्यांचं मत झालं. मला त्यातलं सत्य शोधायचं आहे.'

म्हणजे ती नक्की काय करणार?

'नोकरी'

'कसली?'

'आधी नर्सिंग शिकणार. नंतर नर्स होणार.'

'नर्स?'

'हो.'

'नर्सच का?'

'हे तिनं दोन दिवसांपूर्वी पाठवलेल्या पत्रात लिहिलंय.'

'आहे का पत्र?'

'दाखवतो ना.'

आबासाहेबांनी पत्र दाखवलं, मजकुरातील त्या दोन ओळी विलक्षण होत्या. जीवनाचं सार त्या दोन वाक्यांत होतं. मला ते सुभाषित वाटलं. नर्सिंगचा पेशा का निवडला हे सांगताना अनुनं लिहिलं होतं, 'आबा, इस्पितळ आणि पेशंट हे विश्व असं आहे, की सुख आणि दु:ख इथं खऱ्या स्वरूपात भेटतात.'

अनुनं मुंबईत के. ई. एम. मध्ये नोकरी मिळवली. हॉस्पिटलच्या समोरच्या गल्लीत, एका तीन मजली इमारतीत तिनं खोली मिळवली. सजवली. अनुनं मुंबईत बिऱ्हाड थाटल्यामुळं, मुंबईत उतरायचं कुणाकडं हा

आमचाही प्रश्न मस्त सुटला होता. आमच्या प्रत्येक खेपेत अनुनं काहीतरी नवा टप्पा गाठल्याचं आम्ही पाहत होतो. ती पोरगी केवळ वयानं वाढत नव्हती. अनुभवानं समृद्ध होत होती. समजुतीनं वाढत होती. तिनं निवडलेल्या व्यवसायात ती हरवली होती. ते तिचं विश्व बनलं होतं.तिनं अख्खं के. ई. एम. जिंकलं होतं. डॉक्टर्स, सर्जन्स, फिजिशिअन्स, डीन, मेट्रन, तिच्या समव्यवसायी भगिनी आणि पेशंट मंडळीसुद्धा.

हे सगळं पाहून मी तिला एकदा म्हणालो होतो,

'अनु, तू डॉक्टरच व्हायला हवं होतंस.'

'का?'

'तुझी बुद्धी, कामावरची निष्ठा, स्टॅमिना हे सगळं पाह्यलं की वाटतं, नर्सिंगच्या व्यवसायात तू वाया जात आहेस. तुझी कॅलिबर डॉक्टर होण्याची आहे.'

अनु पटकन् म्हणाली, 'म्हणूनच मी नर्स झाले.'

'म्हणजे काय?'

'डॉक्टर होणं सोपं आहे असं मला वाटत गेलं. मला जितकी बुद्धी परमेश्वरानं दिली आहे तेवढी बुद्धी, शिक्षण परवडण्याइतका पैसा आणि तुफान अभ्यास करण्याची तयारी, इतक्या भांडवलावर कुणीही डॉक्टर होऊ शकेल. मी तर नक्कीच झाले असते.'

'तेच मला हवंय्. मग का झाली नाहीस? आता करू शकतेस ह्यापेक्षा जास्त चांगली सेवा तू व्याधीनं पिडलेल्या माणसांची करू शकली असतीस.'

'मुळीच नाही. सेवा ह्याच दृष्टिकोनातून मला विचाराल तर म्हणेन, डॉक्टरपेक्षा नर्स महत्त्वाची. तिची जबाबदारी अधिक.'

'उत्तम डॉक्टर होण्यापेक्षा, उत्तम नर्स होणं कठीण आहे. इतकंच माझं म्हणणं. डॉक्टरीपेशात ज्ञानाचा भाग मोठा आहे. माझ्या व्यवसायात मनाचा भाग मोठा आहे. डॉक्टरांचा स्टेथॉस्कोप फक्त छातीपर्यंतच पोहोचतो. नर्सचा हात काळजाच्या आत जातो. रोग जाणता आला, की डॉक्टरचं कार्य संपतं. नर्सला पेशंट समजावा लागतो. मला रोगाची माहिती नकोच आहे. मला माणसाची माहिती हवी आहे. म्हणूनच मला हा पेशा महत्त्वाचा वाटतो. मी आमच्या डीन साहेबांना नेहमी म्हणते, की तुम्ही डॉक्टरमंडळी फक्त रोग्यांचा ताप पाहून मोकळे होता. आम्ही ताप आणि मनस्ताप दोन्हीचं निवारण करायची धडपड करतो.'

अशी ही अफाट अनु रागावली होती. निमित्त काय? तर तिची एक रुपयाची नोट घेतली हे. ती देखील आम्ही मुद्दाम घेतली नाही. मुंबईच्या आमच्या ह्या मुक्कामात आमचे मित्र भिडे आणि भिडेवहिनी आम्हांला भेटायला आल्या, अनुच्या खोलीवर. गप्पागोष्टीत रात्रीचे अकरा कधी वाजले समजलंच नाही. दोघं जायला निघाली. वहिनी सहज म्हणाल्या, 'आपण टॅक्सीनं जाऊ बाई! त्या बसचा आणि गाडीचा अगदी उबग आला. टॅक्सीनं जाऊ.'

'त्यात काय मोठंसं! फक्त सुटे पैसे वर आहेत की नाही पाहा. तेवढ्यासाठी टॅक्सीवाल्यानं अडवायला नको.'

मग शोधाशोध. कारण दोघांकडे दहाची नोट निघाली.

'भिडे, एक मिनिट थांबा. मी देतो सुटे पैसे.' माझ्याजवळचे आणि मुक्ताजवळचे असे सगळे पैसे जमा केले तर नऊच रूपये भरले.

'अहो चालेल एक रुपया कमी.' भिडे वहिनी म्हणाल्या. 'वा वा, असं कसं?– एक मिनिट थांबा. एखादा रुपया कुठंही मिळेल. मी अनुच्या कपाटात पाहते.' मुक्तानं अनुचं कपाट उलटंपालटं केलं; पण पैसे सापडले नाहीत. भिडे जायला निघाले तोच काहीसं आठवून मुक्ता म्हणाली, 'एक मिनिट थांबा. रुपया मिळेल.'

'कुठाय?'

'अनुच्या टेबलावर काय आहे, त्या काचेखाली तिनं एक नोट ठेवली आहे.'

'that's good.'

मी आणि भिड्यांनी टेबलावरची ती अखंड काच वर उचलली. मुक्तानं पटकन् खाली हात घालून नोट काढून घेतली. भिडे पतीपत्नी निघून गेली. अनु कामावरून परतली. तिच्या रिवाजाप्रमाणं तिनं आंघोळ केली. मग ती पानावर बसली. आम्ही दिवसभराच्या हकीकती सांगितल्या आणि मधेच मुक्तानं, काचेखालची नोट भिड्यांना दिल्याचं सांगितलं.

एकाएकी अनुचा नूर बदलला.

अनु, गप्प झाली. आम्हांला चोरट्यासारखं झालं. मी घाईघाईनं म्हणालो, 'सुटे पैसे आणतो उद्या आणि लगेच तुझी नोट...'

'Kindly Stop it.' अनुनं तुकडाच तोडला.

शेवटी मी म्हणालो, 'अनु आम्ही दोघं तुझी माफी

मागतो हवं तर; पण तू काहीतरी बोल.' त्यावर जरा वेळानं ती म्हणाली, 'तुम्ही ती नोट घ्यायला नको होती.'

कितीतरी वेळ हा सगळा इतिहास आठवत मी गॅलरीत उभा होतो. मुक्ता आत होती. अनु काय करत होती हे कळत नव्हतं. तेवढ्यात मुक्ता गॅलरीत आली. मी पाहृयलं तर मुक्ताच्या अंगावर बाहेर जायचे कपडे.

'हे काय?'

'बाहेर जायचंय्.'

'आत्ता? कुठं?'

'भिड्यांकडं.'

'भिड्यांकडं? कशाला?'

'त्यांच्याकडं ती नोट अजून असेल का ते पाहायचं', असं अनु म्हणाली.

'It is sheer madness', मी पटकन् म्हणालो.

'I accept this comment', अनु पुढं येत म्हणाली.

'अनु, तीच नोट नेमकी टॅक्सीवाल्याला गेली असेल. कारण सुट्या पैशाचाच प्रश्न होता.' 'शक्य आहे. नेमकी तीच नोट टॅक्सीवाल्याकडं गेली, हे मला भिड्यांकडून कळू दे. मग मी थांबेन.'

'अनु, माझं ऐकशील?'

'गळ घालू नका. मी ऐकणार नाही. माझा स्वभाव तुम्हांला माहीत आहे. ज्या टप्प्यापर्यंत माणूस प्रयत्न करू शकतो, त्याच्या अलीकडे थांबणारी बाई मी नव्हे. नोटेच्या बाबतीतला माझा प्रयत्न भिड्यांच्या घरापाशी संपतो. तिथपर्यंत जायलाच हवं.' ह्या वेडात आम्हांला भाग घेण्यावाचून गत्यंतर नव्हतं. आम्हीच गुन्हेगार होतो ना! आम्ही टॅक्सी पकडली. टॅक्सीत बसल्यावर मी म्हणालो, 'अनु, त्या नोटेसाठी तू एवढं का करत आहेस?'

'त्यामागं तशाच भावना आहेत.'

'खाजगी नसेल फार, तर सांगतेस?'

'नोट मिळाली तर सांगेन.'

मुक्तानं एक नुसताच हुंकार दिला. अनुनं त्यातला अर्थ जाणला. ती म्हणाली, 'नोट मिळेल असं वाटतं मला.'

'मिळो बापडी.'

लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशन दिसताच मी टॅक्सी थांबवली. पोलीस स्टेशनशेजारच्याच इमारतीत चौथ्या मजल्यावर जायचं होतं. आम्ही भिड्यांच्या दरवाज्यापाशी आलो तर आत दिवा जळत असल्याचं व्हेंटिलेटरमधून दिसलं. कडी वाजवताना संकोच त्यामुळे कमी वाटला.

दार उघडताच 'तुम्ही?' हा जो भिड्यांनी प्रश्न केला तो अपेक्षित होता.

'या.'

आम्ही ताबडतोब बसलोच. चार जिन्यांचा हा परिणाम.

'आम्ही आत्ताच आलो हे तुमच्यापुढे.' भिडेवहिनी म्हणाल्या.

'काय सांगता काय? आमच्या घरून निघून तर चांगला तास-दीड तास झाला तुम्हांला.' मी आश्चर्यानं म्हणालो.

'सांगतो, काय प्रकार झाला तो. तुमच्या घरून निघालो. ही म्हणाली त्याप्रमाणे टॅक्सी केली. पंधरा मिनिटात त्यानं इथपर्यंत आणलं आणि एक प्रचंड घोटाळा झाला.'

'काय झालं?'

'इथल्याच चौकात एक म्हातारा आमच्या टॅक्सीखाली आला.'

'मग?'

'मग काय? खरं तर आम्ही लगेच त्यातून सुटलो असतो; ठरवलं असतं तर; पण आमचा चांगुलपणा आम्हांला जरा नडला.'

'का?'

टॅक्सीवाल्याची एक टक्का देखील चूक नव्हती. तेव्हा टॅक्सीवाल्याला वाचवायचं म्हणून त्याच्या बाजूनं जबानी द्यायला आम्ही पोलीस स्टेशनवर गेलो.

'आणि तो म्हातारा?' मुक्तानं विचारलं.

'त्याला नायरमध्ये ॲडमिट करून आलो ना.'

'कितपत लागलं?' अनुमधली नर्स जागी झाली.

'no hopes' - भिड्यांनी सांगितलं.

'बरं मग?'

मग काय? हॉस्पिटलमधून पोलीस स्टेशन. जबान्या, स्टेटमेंट्स. पोलीस स्टेशन आपलं शेजारीच आहे म्हणून बरंय.

भिडे ह्या असल्या गोष्टी केवळ तुम्हीच करू जाणे.

'नाही, तसं नाही. माझं ऐका. पोलीसबिलीस लचांड मलाही झेपणारं नाही. मला कीव आली ती टॅक्सी

ड्रायव्हरची. बिचारा नुकताच त्या व्यवसायात आलेला.

तुम्ही आमच्या पाठोपाठ आता कसे काय आलात?

आमच्या आगमनाचं कारण कितीही चमत्कारिक असलं तरी ते सांगावं लागणारच होतं. अनुकडे नजर टाकीत मी म्हणालो, 'भिडेसाहेब, मघाशी आपण जी टेबलावरची, काचेच्या खाली ठेवलेली नोट काढली ना, त्या नोटेसाठी आम्ही आलो आहोत. त्या नोटेच्या बाबतीत आमच्या अनुच्या तशाच काही भावना आहेत.'

'अहो आणि तिच नोट नेमकी गेली असेल तर?'

'मग माझा शोध खुंटला असं समजून मी गप्प बसेन.'

'Let us try', असं म्हणत भिड्यांनी त्यांचं पैशाचं पाकीट आणलं. त्यातले कप्पे शोधले. त्यात एक दहाची नोट, एक दोन रुपयाची नोट आणि बाकी सगळी नाणीच होती.

'I am sorry'

'छे, छे, त्यात तुमची काही चूक नाही', असं म्हणत अनु उठलीच.

आम्ही दरवाज्यापाशी आलो. तेवढ्यात भिडे म्हणाले, 'एक मिनिट थांबा.'

'बोला'

'तुमचा शोध खुंटला असंच काही म्हणता येणार नाही.'

'कसं काय?' अनुनं उत्सुकतेनं विचारलं.

'तुमची नोट अगदी सुखरूप, पोलीसच्या पहाऱ्यात आहे असं समजा.'

'म्हणजे?'

'अख्खं लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशन त्याच्यासाठी पहारा करतंय.'

'त्यांना नीट सांगा हो'– 'भिडेवहिनींनी भिड्यांना माफक प्रमाणात दम भरला.' 'सगळं सांगतो', असं म्हणत भिड्यांनी शर्ट चढवला.

'येतेस का तू?' त्यांनी वहिनींना विचारलं.

'कुठं पण?'

'लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनात. आपला टॅक्सीवाला तिथंच असेल ना अजून.'

'अगंबाई, खरंच की. चला.' ब्लॉकला कुलूप लावून आम्ही निघालो.

'या भिडेसाहेब'– इन्स्पेक्टर साळवींनी स्वागत केलं.

'तुम्हांला थोडी तसदी...'

'It's alright. काम बोला.'

'तो मघाचाच टॅक्सीवाला...'

'अरे, तुम्हाला तो बराच आवडलेला दिसतोय.' 'सालस आहे की नाही?'

'yes, you are right!' नवशिका आहे. चांगला एज्युकेटेड आहे.' म्हणूनच त्याला हेल्प करावीशी वाटली. 'he was not at all fault.'

'त्याला भेटायचंय पुन्हा?'

'इथं असला तर. त्याच्या टॅक्सीत आमची पिशवी राहयली त्या गोंधळात.'

टॅक्सीवाल्याला पाचारण करण्यात आलं. पलीकडच्या खोलीतून तो आला. भिड्यांना त्यानं नमस्कार केला. साळवींच्या परवानगीनं आम्ही त्याला घेऊन बाहेर आलो. 'you have obliged me like anything', टॅक्सीवाला भिड्यांना भरून आलेल्या आवाजात म्हणाला.

'ते ठीक आहे हो.'

मग आमच्याकडं पाहत तो म्हणाला, 'साहेब, खरंच सांगतो. टॅक्सीवाल्यांना कुणीही एवढी मदत करत नाही. आज बाराच्या भावात जात होतो. किती बोलू, किती नको असं झालं होतं त्याला.'

'संपलं तुमचं?'– भिड्यांनी विचारलं.

'ते आता आयुष्यभर संपायचं नाही.'

'माझं एक काम करा.'

'म्हणाल ते.'

मघाशी मी तुम्हांला भाड्याचे पैसे दिले, त्यातली एक रुपयाची नोट मला बदलून घ्यायची आहे. ही विचित्र मागणी ऐकून त्याला नवल वाटलं; पण फार काही न दर्शवता तो म्हणाला, 'त्या नोटेवर फोन नंबर वगैरे लिहून ठेवलेला दिसतोय.'

'नोटांवर लिहायची मला सवय नाही.' भिडे म्हणाले.

'या इकडे.'

आम्ही सगळे दिव्याच्या उजेडात आलो. टॅक्सीवाल्यानं खिशात होत्या नव्हत्या तेवढ्या सगळ्या नोटा काढून भिड्यांच्या हातात न मोजता दिल्या. ह्यातून घ्या शोधून. अनु झटकन् पुढे झाली. सगळ्या नोटा पाहयल्या. अनुला हवी ती नोट नव्हती.

'चला, जाऊ या. तुम्हाला सगळ्यांना मी फार त्रास

दिला. पुन: माझ्या खोलीवर तुम्ही कधीही उतरणार नाही.'

'ए वेडे, थांब तर खरी.' मी म्हणालो.

'भिडेसाहेब, काय झालं सांगता का?' टॅक्सीवाल्यानं विचारलं.

भिड्यांनी थोडक्यात सगळं सांगितलं आणि त्याला विचारलं, 'नंतर तुम्ही कुठं गेलाच नाहीत तर तुमच्याकडची नोट जावी कशी?'

'अर्ध्याच तासापूर्वी समोरच्या हॉटेलात पाव उसळ खायला गेलो होतो; साळवी साहेबांना विचारून. आज जेवायला मिळालंच नव्हतं.' आम्ही गप्प होतो. तेवढ्यात टॅक्सीवाला म्हणाला, 'नोट मिळेल साहेब'

'कशी काय?'

'पोलीस लोकांसाठी ते हॉटेल जवळजवळ रात्रभर उघडं असतं. चहापाण्यासाठी. चला, प्रयत्न करू.'

लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनसमोरच ते हॉटेल होतं. हॉटेलचं शटर टॅक्सीवाल्यानंच उघडलं. दार उघडता उघडता त्यानं, 'शंकर, ओ शंकरराव', अशा हाका मारल्या. शंकरराव बाहेर आले.

शंकरराव, जरा सुटे पैसे द्या.

शंकररावांनी काऊंटरखालचा ड्रॉवर उघडला.

'बंडल नोटा देऊ नका हं. समोर साळवीसाहेबांच्याकडे ह्या नोटा जायच्या आहेत.' शंकररावांनी रुपयांचं बांधलेलं बंडल काऊंटवर ठेवलं. तिथला दिवा लावला आणि ते म्हणाले, 'तुम्हांला हव्या त्या नोटा पाहून घ्या. मग तर झालं?' टॅक्सीवाल्यानं शंभराची नोट शंकररावांना दिली. रुपयांच्या नोटांच्या पुडक्याला बांधलेला रबरबँड शंकररावांनी काढून घेतला.

'भिडेसाहेब, या.'

अनुकडे पाहत भिड्यांनी विचारलं, 'नोट कशी ओळखायची?'

'त्याच्यावर लाल अक्षरात, बॉलपेननं 'सुनीता' असं नाव लिहिलंय.'

नोट मिळाली. शंकररावांचे आभार मानीत आम्ही रस्त्यावर आलो. 'अनु, आता धीर धरणं अशक्य आहे. ह्या नोटेचा इतिहास सांगायला हवा.'

आजचा दिवस निराळाच. मुंबईत रात्री दोन अडीच वाजता दुकानाच्या पायरीवर बसून असं काही ऐकण्याचा योग आमच्या आयुष्यात येणार आहे ह्यावर मीही विश्वास ठेवला नसता. आम्ही फुटपाथवर आलो. शंकररावांनी शटर बंद करून घेतलं होतं. हॉटेलच्या मार्बलच्या पायऱ्यांवर रात्री अडीच वाजता, मी, मुक्ता, भिडे पतीपत्नी, तो टॅक्सीवाला आणि अनु असे बसलो. रस्त्यावरच्या दिव्याचा प्रकाश सगळ्यांच्या अंगावर पडला होता. अशा वातावरणात, भरून आलेल्या आवाजात, अनुनं हकीकत सांगायला प्रारंभ केला :

नर्स म्हणून मी पाच वर्ष हॉस्पिटलमध्ये काम करत आहे. महिन्या दीड महिन्यापूर्वीची कथा. लहान मुलांच्या वॉर्डमध्ये माझी ड्युटी होती. तिथं मला खरं तर उभं राहवत नाही; पण ड्युटी आली, की टाळता येत नाही. एके दिवशी सकाळी एक आठनऊ वर्षांची मुलगी ॲडमिट करावी लागली. तिची आशा सगळ्यांनी सोडलेली होती. मुलीबरोबर तिची आई, मावशी आणि बिल्डींगमधल्या दहा-बारा बायकांचा घोळका होता. त्या सगळ्यांना मी बाहेरच्या बाहेर थोपवलं. मग भराभरा आमच्या हालचाली सुरू झाल्या. पायाला, हाताला नळ्या लागल्या. ब्लड ट्रॅन्स्फ्यूजन, सलायन-याशिवाय ऑक्सिजनपण दिला. हे सगळं अर्थात नातेवाईकांच्या समाधानासाठी आणि नशिबाचा एक टक्का असतो त्याच्यासाठी.

पोरगी नक्षत्रासारखी होती. तिच्यासाठी माझीही एकीकडे प्रार्थना चालली होती. ती पोरगी मधूनमधून डोळे उघडायची आणि क्षीण आवाजात सांगायची, ह्या नळ्या काढा. दिवसभर हे चाललं होतं. तिच्या यातना बघवत नव्हत्या. ह्या नळ्या काढा, म्हणून तिचा जप चालला होता. शेवटी मी डॉक्टरांना विचारलं. ते म्हणाले, 'फार तर तीन चार तास काढेल.' मग मी विचारलं, 'असंच जर असेल, तर शेवटचे काही तास तिला सुखानं तरी जगू दे ना. तिच्या नळ्या काढते मी सगळ्या.' डॉक्टर म्हणाले, 'फक्त ऑक्सिजनची ठेवा.' मी एकेक नळी काढून टाकली. तिनं डोळे उघडले. क्षीण पण लाघवी आवाजात ती म्हणाली, 'ताई थँक्यू.' मी तिला म्हणाले, 'बेटा लवकर बरं व्हायचं. ही एवढी नळी मात्र काढायची नाही हं. मी उद्या भेटेन. तुझ्यासाठी गंमत आणीन.' तिनं मान हलवली.

दुसऱ्या दिवशी मी ड्युटीवर गेले ती गोड पोरगी आदल्याच दिवशी गेली होती. त्यानंतर पंधरा दिवसांनी त्या मुलीची आई माझा शोध घेत पुन्हा हॉस्पिटलमध्ये आली. तिनं मला एका बाजूला नेलं. हातात एक पाकीट ठेवलं.

त्यात पंचवीस रुपये होते. 'हे काय?' मी विचारलं.

ती बाई म्हणाली, 'तुम्ही आमच्याशी खऱ्या सिस्टरप्रमाणे वागलात. ही माझी आठवण.'

मी म्हणाले, 'सिस्टरप्रमाणे वागले असं म्हणता, मग मला सांगा, तुमच्या सख्ख्या बहिणीला तुम्ही असे पैसे दिले असते का?' तिची मी खूप समजूत घातली. इथल्या धर्मादाय पेटीत ते पैसे टाका असं सांगितलं. मग ती म्हणाली, 'कमीत कमी ही एक रुपयाची नोट तरी ठेवायला हवी तुम्ही. तुमच्या भाचीनं, माझ्या सुनीतानं दिली आहे ती.' तुम्ही त्या दिवशी नळ्या काढल्यात. तुम्ही गेल्यावर ती मला म्हणाली, 'ही नर्सताई चांगली आहे. तिनं हातापायातल्या सुया काढल्या. मी आता झोपते. माझा उशीखालचा खाऊचा रुपया त्या ताईला दे.' पोरगी एवढं बोलली. तिनं डोळे मिटले आणि मिटले ते मिटलेच. एवढं सांगून माझ्या गळ्यात हात टाकून ती कोसळलीच. तिची समजूत घालणं माझ्या शक्तीबाहेरचं होतं.

हकीकत सांगताना अनुचा आवाज भरून आला. थोडा वेळ थांबून, रुमालानं डोळ्यांच्या कडा टिपत म्हणाली, 'हीच ती नोट.' आम्ही सुन्न बसून होतो. सगळीकडे शांत होतं आणि मग तितक्याच संथ स्वरात टॅक्सीवाला म्हणाला, 'ताई, असं पेशंटमध्ये मन गुंतून चालणार नाही. माणूस भूतकाळात अडकला, की संपलं. मग भविष्यकाळही खराब होतो. नजर नेहमी समोर हवी. एखाद्या ड्रायव्हरसारखी. आता माझंच पाहा ना, माझा पेशा टॅक्सी ड्रायव्हरचा. नव्यानंच सुरू केलाय. केव्हा केव्हा टॅक्सीत अशी व्यक्ती येऊन बसते, की वाटते हा पॅसेंजर टॅक्सीतून कधीही उतरू नये; पण त्याचंही डेस्टिनेशन ठरलेलं असतं. 'यहाँ आगे खडी करो'- असं म्हणताच गाडी मुकाट्यानं उभी करावी लागते. मग मीटरवरचा आकडा पुसायचा, मनावर रेंगाळू पाहणारा तो पॅसेंजरही त्याबरोबर पुसायचा आणि नव्या पॅसेंजरचं स्वागत करायला तयार व्हायचं. ताई तुमचा आणि माझा पेशा हा असा एकच आहे. तुम्हीही हेच करायला हवं. पेशंट दगावला, की फक्त चादर बदलायची, उशी झटकायची, पायाखालचं ब्लँकेट नवं वाटेल अशी घडी घालायची आणि नव्या पेशंटचं स्वागत करायचं. कॉटवर कोण आला नवा, तेही पाहायचं नाही. मिनिस्टर असेल नाहीतर रस्त्यावरचा कोणीतरी. आपण आपला कॉट नंबर सांभाळायचा.' त्याचा शब्द न् शब्द भिडत होता. अनु फक्त रडत नव्हती, इतकंच. तिनं विचारलं, 'सगळ्याच गोष्टी विसरता येतात का?'

'येत नाहीत ना; पण काय करणार? ह्या रुपयाच्या नोटेमागं तुम्ही धावत; एवढ्या अपरात्री आलात. नोट, एक जड वस्तू. शोधल्यावर सापडणारी. म्हणूनच आम्ही सर्वांनी ह्या वेडेपणात भाग घेतला; पण ताई, हातातून निसटलेल्या सगळ्याच गोष्टी अशा मिळत नाहीत. ह्या एका आठवणीपायी वेड्यापिशा होत तुम्ही धावाधाव केलीत. नोट मिळवलीत, तुम्ही भाग्यवान आहात. शोध घेण्याचं तुमचं काम फार सोपं होतं.'

'सोपं?'

'माझ्यापेक्षा नक्कीच सोपं.'

'कसं काय?'

'माझी वस्तू मला कधीच परत मिळणार नाही. एका नोटेसाठी तुमची ही अवस्था झाली. मला सांगा ताई, माझी प्रत्यक्ष मुलगी जेव्हा कायमची सोडून गेली, तेव्हा मी काय केलं असेन? काय करावं? सांगता?'

**(मी माणूस शोधतोय)**

**(१) (अ) कारणे लिहा.**

(१) अनुनं घर सोडलं, कारण···

(२) 'जगाकडं पाहताना मला माझा चष्मा हवा', असं अनु म्हणाली. कारण···

(३) अनुने डॉक्टर व्हावे असे आबांना वाटत होते, कारण···

**(आ) खालील नातेसंबंध लिहा.**

(१) अनु आणि आबा ...........................

(२) भिडे दाम्पत्य आणि टॅक्सी ड्रायव्हर ...........................

(३) अनु आणि सुनीता ...........................

**(२) कृती करा.**

(१) **अनुच्या मते डॉक्टर होण्यासाठी आवश्यक गोष्टी**
→
→
→

(२) **आबांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये**
→
→
→

**(३) अनुने आबांजवळ व्यक्त केलेल्या विचारांतून डॉक्टरचा पेशा आणि नर्सचा पेशा यांतील फरक स्पष्ट करा.**

| डॉक्टरचा पेशा | नर्सचा पेशा |
|---|---|
| | |
| | |
| | |

**(४) थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) घर सोडण्यामागचा अनुचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) अनुला समाज कसा समजून घ्यायचा आहे, ते थोडक्यात स्पष्ट करा.

(इ) कुतूहल, जिज्ञासा निर्माण करणाऱ्या कथेतील एका प्रसंगाचे वर्णन करा.

(ई) कथेला कलाटणी देणारा एक प्रसंग शब्दबद्ध करा.

**(५) तुमच्या शब्दांत माहिती लिहा.**

(अ) भिडे दाम्पत्याची सामाजिक बांधिलकी.

(आ) टॅक्सी ड्रायव्हरचा स्वभावविशेष.

**(६) स्वमत.**

(अ) कथेच्या नायिकेचे स्वभावचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

(आ) एका रुपयाच्या नोटेव्यतिरिक्त कथेतील आणखी कोणकोणते शोध तुम्हांला महत्त्वाचे वाटतात, ते स्पष्ट करा.

(इ) कथेच्या 'शोध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत पटवून द्या.

(ई) कथेतील टॅक्सी ड्रायव्हरने 'जीवनातील वास्तवाचा घेतलेला शोध', तुमच्या शब्दांत लिहा.

**(७) अभिव्यक्ती.**

(अ) 'स्वत:चा स्वतंत्र मेंदू घेऊन जन्माला आलेला जीव दुसऱ्याचं ऐकतो त्याच क्षणी तो स्वत:चं अस्तित्व, निसर्गानं जगाकडं पाहण्याची दिलेली स्वतंत्र नजर हरवून बसतो', या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

(आ) कथेतील 'टॅक्सी ड्रायव्हर' हे पात्र तुम्हांला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण स्पष्ट करा.

**उपक्रम :**

यू-ट्यूबवरील व. पु. काळे यांच्या कथा ऐका.

# २. गढी

■ डॉ. प्रतिमा इंगोले (१९५३) :

सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार, कथाकथनकार, कवयित्री. ललित, विनोदी आणि बालसाहित्य असे विविध स्वरूपांचे लेखन. आईच्या वडिलांकडून बालपणीच वाचनाचे संस्कार. खेड्यातील वास्तव्यामुळे ग्रामीण वातावरणाचा व स्त्रीजीवनाचा सखोल परिचय. खेड्यातील दारिद्र्य, स्त्रीचे सर्व प्रकारे होणारे शोषण तसेच खेड्यातील माणुसकी यांचे लेखनातून विविध प्रकारे चित्रण. 'हजारी बेलपान', 'अकसिदीचे दाने', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचं पोर' इत्यादी कथासंग्रहांमुळे ग्रामीण कथालेखिका म्हणून ख्याती. 'भुलाई' हा कवितासंग्रह, 'बुढाई' ही कादंबरी, काही सामाजिक लेख व बालवाङ्मय पुस्तकरूपात प्रकाशित. अस्सल वैदर्भी बोलीचा प्रभावी वापर हे त्यांच्या लेखनाचे खास वैशिष्ट्य. 'अकसिदीचे दाने' या कथासंग्रहास महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार, त्याशिवाय अनेक पुरस्कार प्राप्त.

स्वातंत्र्यानंतरच्या विकासाच्या वाटेवरील गावगाड्यासमोरचे प्रश्न, ते सोडवण्यातील अडचणी आणि ग्रामसुधारणेसाठी निष्ठापूर्वक झटणारे बापू गुरुजींसारखे समाजसेवक यासंबंधीचे वर्णन 'गढी' या वैदर्भी बोलीतील कथेत कशाप्रकारे आले आहे हे तुम्हांला अभ्यासता येणार आहे. बापू गुरुजी या प्रमुख पात्रासोबत 'गढी', 'वाननदी' आणि 'वडाचे झाड' यांच्या प्रतीकांतून गावातील बरी-वाईट स्थित्यंतरे कशाप्रकारे दर्शवली आहेत हेही अनुभवण्यासारखे आहे. कथेतील ग्रामीण वातावरण, प्रसंग, पात्रे इत्यादींचे वर्णन चित्रदर्शी शैलीत कसे केले आहे ते समजून घेतले तर कथेचे चांगल्याप्रकारे आकलन होऊ शकेल.

सातपुड्याच्या दुपट्यावर ते लहानुलं गाव वसेल व्हतं. गावभवताल सातपुड्याची झालर व्हती. गावासेजून वाननदी झुममूय वायत व्हती. वायता वायता या गावात कायचीच वान नायी, असं ते सांगत व्हती. गावची जमीन कायीशार, लोन्यावानी मऊ. तिच्यातून दरसाल दान्याचा पूर ये. आन् वाननदी उर भरूभरू गावाचं कवतीक पाहे. या नदीच्या कराळी एक वडाचं झाळ फुटू पायत व्हतं. डोक्स्याएवळं झालं व्हतं. त्याचा कव्वा कव्वा हिरवटपना गाववाल्याइले भुलवू पायत व्हता. पन उनाये-पावसाये झेलता झेलता तो गारद झाला व्हता. वाळा पळल्यानं पांढ्ढी पांढ्ढी गढी उघळी पळली व्हती.

आज त्या गावात धामधूम सुरू व्हती. भोंगा वाजत व्हता. जो तो आज आनंदात व्हता. काऊन का त्या गावाले 'साजरं गाव' म्हनून मान भेटला व्हता. आज ज्याच्या त्याच्या तोंडी हेच गोठ व्हती. वाननदी भरूभरू वायत व्हती. तिच्या कराळीवरला वड फुलू पायत व्हता.

बापू गुरजी बयठकीतल्या त्याइच्या पलंगावर बसेल व्हते. आज त्याइले कारयकरमाचं आवतन व्हतं. याच कारयकरमात गाववाल्यांइनं त्याइचा सत्कार कऱ्याचं ठरोल व्हतं. पन बापू गुरजीले त्याचं काइच वाटत नोतं; पन आज रावू रावू त्याइले झाल्या गोठी सतावत व्हत्या. उबा जलम त्याइनं गाववाल्याइची सेवा केली व्हती. त्याइच्यासाठी रगत आटोलं व्हतं. आज मातर वाननदीवानी त्याइचा ऊर भरभरून येत व्हता. एकेकच गोठ त्याइले आठोत व्हती.

बापू गुरजीच्या लानपनी गावात शाया नोती. त्यानं गाववाल्याइले तालुक्याले शिकाले जा लागे. बापू गुरजी तसे गरीबच, घरी तेल हाये तं मीठ नायी; आन् मीठ हाये त चटनी नायी, हेच गत हाये. पाटलाचा गळीवरला वाळा पळाल्यानं ते बापू गुरजीच्या शेजीच गळीखाली राहाले आले व्हते. पाटलाले पोटी सनतान नोतं, त्यानं ते बापू गुरजीचा लाळ करत. त्याइनंच बापू गुरजीच्या बापाले म्हनलं व्हतं, ''परबतराव, पोट्ट हुशार दिसते. त्याले शायीत टाका.''

''पाटील, चटनीवर तेल सापळत नायी गरिबाले. आन् शायीचा खरचं कोन करील?''

''अरे! मी बसेल आहो ना? तुले काय वाटलं... मी कोळलंच म्हनतो!''

आन् बापू गुरजी तालुक्याले गेले व्हते. त्याइच्यावाक्ती तेच फकत इतले शिकेल व्हते. पन शिकसन होताबरूबर त्याइले गावची ओढ लागली व्हती. त्याईच्या वरगातले त्याईचे सारे गळी दूर शयरात नवकरीले लागले व्हते. बापू गुरजीले ते हासत व्हते.

''अरे, काय पळलं हाय या नसत्या गोठीत? म्हने, आपून शिकलो तं गावाले सुदराले पायजे. अरे, तू लाख

सुदरोशीन पन गाववाले तं सुदारले पायजाल?''

''हे पाय, आपलं करतव्य आपून करावं. अरे, पोटासाठी त नासुकला हळ्ळ्याई पिंडाले झोम्बते. मंग आपुनई शिकल्या सवरल्यावर तेच करावं काय?''

बापू गुरजीनं कोनाचंच आईकलं नायी. त्याईनं हरेक परकारे गावात शाया उघळली आन् मासतर म्हनून काम पायनं सुरू केलं. तालुक्याले जानाऱ्या हरेकच पोराचं नाव पटावर दाखल हू लागलं. आन् गावच्या भाग्याचं एकेक सपन गुरजीच्या डोयात फुलू लागलं. वान नदीची त्याईले संगत व्हती. रोज त्याईले नदी हुरूप देत व्हती. या नदीनंच लानपनी तिच्यात पोयता पोयताच त्याइले गावच्या कळवळ्याचं वान देल्लं व्हतं. आता तिच्या कराळीचा वळ मोठा झाला व्हता. त्याले पारंब्या फुटू पायत व्हत्या आन् गावातली गढी उनायापावसायाशी झुंजत व्हती. वावटयीत ठान मांडून उबी रायत व्हती.

आता देश सवतंतर झाला व्हता. जिकळे तिकळे आनंद व्हता. आता आपल्याले आपला इकास करा लागते, असे जो तो सांगत व्हता. बापू गुरजीई देश्याइषयीच्या पेरमानं भारून गेले व्हते.

त्याइच्या वरगातले गळी आता मोठ्ठे-मोठ्ठे सायेब झाले व्हते. कोनी कोनी पुढारी झाले व्हते. असाच त्याईचा एक पुढारी व्हयेल गळी गावात आला व्हता. तो गुरजीले विलेकशनात उबा राहाचा आगरव्ह करत व्हता. पन गुरजी आईकत नोते. ते म्हनत, ''अरे, मानसानं पयले पानी पावावं आन् मंग पोवावं, पाखरानं पयले पख पारखावं आन् मंग उळावं. उगा मोठेपनाची हाव काय कामाची? आन् हे बी तं आपल्या देशाचीच सेवा हाये. आपून त पक्क ठरोल हाये का आंदी लगीन शायीच!''

आन् खरंच जीव वतून ते शायीचा इकास करत व्हते. राती आन् दिवसा कई पा ते आपले शायीतच. त्याइची लकषुमीच तं त्याइची वाट पावू पावू थकून जाये. सेल्यासेवटी शायीतच त्याइले शिदोरी धाळून दे आन् आपून जियाले बसे. अशा रातदिसाच्या मेहनतीन चवथीलोग असनारी शाया आता सातवीलोग झाली व्हती. सारे मासतरई गुरजीबरूबर रातीबेराती शायीत दिसत व्हते. वान नदीले कदीमधी येनारा पूर आता पटावरल्या आकळ्याइले आला व्हता. नदीच्या कराळीवरल्या वडाले पारंब्या फुटल्या व्हत्या. गढी गावामंदी शाननं उबी व्हती.

गुरजीनं शायीत तालीमखाना बी सुरू केला व्हता. त्या जमान्यात, त्याच गावात इतलं लान असुनबी तालीमखाना व्हता. तसीई त्या गावच्या शायीतल्या पोट्याइची सर इलाकातल्या कोनच्याच शायीले येत नोती. भक्कमच ढाली, कप शायीन जीतून आनले व्हते. त्यानं चहुकळे त्याइची शाया गाजत व्हती.

गावातल्या उचापती मानसाइले हे पावोत नोतं. ''मले पा आन् फुलं वहा'' हे त्याइचं धोरन व्हतं. नायी काई सादलं त निदान जयताळेपना कराले काय घोर आहे? 'खुटे गाळ खुटे उपळ'चे त्याइचे धंदे सुरू व्हते. गुरजीनं कायी केलं का, त्याले इरोध कराचाच, मंग ते गोठ कितीकई साजरी असेना. हेच त्याईनं ठरोल व्हतं.

पन हळ्ळ्याच्या सरपानं मानसं मरत नसतात. गुरुजीलेई चांगल्या गुरुजीचा मान भेटला आन् गुरुजीच्या कस्टाचं सरकारनं चीज केलं. त्यावाक्ती सत्कारात भेटेल पयस्याचं त्याइनं गावात वाचनालय सुरू केलं. भवतालच्या खेळ्यापाळ्यातल्यांसाठी गावातच लानसक बोरडींग चालू केलं अन् सरकारच्या पयस्याचं चीज केलं. एक खळकूई त्याइनं सोतासाठी खरचला नायी. उलट बोरडिंगाच्या दरसालच्या खरच्याचं वझं त्याइच्या आंगावर पळलं. पन गायीचे शिंगं गायीले भारी नसतातच.

बोरडिंगाच्या आठोनीबरूबरच गुरजीले आठोला संपत्या. साऱ्या लेकराईवर मायेची वाकय घालता घालता ते लेकरू जसं त्याइचंच झालं व्हतं. असाच हा संपत्या. बिनाबापाचं लेकरू. पन आता त्याले बाप भेटला व्हता. त्या दिसी तो रावू रावू गुरजीले म्हनत व्हता,

''गुरजी, आज तुमी जाऊ नोका ना आकोल्याले? मंग गेले की दोन-चार रोज येतई नायी.''

''अरे, आज शिकसन समितीची बयठक हाये. मले गेलंच पायजे.''

आन् त्याच रोजी हा संपत्या उब्या पटकीनं गेला व्हता. गावात डागतर नोताच मंग दवापानी कुठ्ठूल्लं?

''संपत्या, तुले मी दवापानी नायी दिवू शकलो रे'', असं म्हनत येताबरूबर गुरजी धायधाय लळले व्हते. त्यावाक्तीच त्याईनं या गावात दावखाना झालाच पायजे, याची खुनगाठ बांदली व्हती. आजई संपत्याच्या आठोनीनं त्याइच्या मनात गलबलून आलं व्हतं. डोयाच्या कराळीवर पान्याची धुवारी पसरली व्हती. संपत्यानंच पयलमसुट्ट्या

त्याइले नाराज केलं व्हतं. पन तरीई ते हिंमत बांदून उठले व्हते. वान नदीलेई पूर आलता. पार गढीलोग तो टेकला व्हता. पन तरीई गढी तग धरून व्हती आन् वान नदीच मंग मांग फिरली व्हती.

गावात पोस्ट आन्यासाठी त्याईनं कितीतरी कोशीस केली व्हती. उनायायल्या तपेल फफूटातून पायीच तालुक्याले कितीतरी चकरा मारल्या व्हत्या. त्याइच्याईथी बईलजोळीई नोती आन् कोनाले मांगाची त्याईची दानतई नोती. त्यानं मंग पायी जानं भाग व्हतं. आन् शायीच्यानं उनायाशिवी त रिकामपनई नोतं. पन त्याइच्या चकरा कारनी लागल्या व्हत्या. गावाले पोस्ट भेटलं व्हतं.

पन गावातल्या उचापत्याइले ते कसं सईन व्हईन? त्याइनं साऱ्या गावात सांगनं सुरू केलंत, ''आपून आजलोग मऱ्याच्या बातमीशिवी कोनाले चिठ्ठी पाठोली काय? नायी ना? मंग आताई आपल्या हे पोस्ट कायीच कामाचं नायी.''

आन् लोकाइले ते खरं वाटत व्हतं. कारन का आजलोग त्या गावात लेकराची गुळी आन् मरनाची चिठ्ठीच फक्त येत व्हती. म्हणून गावात पोस्ट यिऊनबी कितीक दिवस कोनीच पतरं नेत नोतं, आन् खपच नायी म्हनून वरून या गावाले पोस्टाची जरूर नायी असं म्हनल्या जात व्हतं.

गुरजीले मातरं ह्या गोठीचं दुखूं होत होतं. त्याइच्या भल्या मोठ्या कपायावर दुखाच्या रेषा उमटत व्हत्या. मायच्यावानी त्याईचा जीव अंदरल्या अंदर लोये तोळत व्हता. त्याइले वाटे... चाल व्हयरे पोरा आन् वयरे ढोरा असीच या लोकइची गत हाये, आपल भलं कायच्यात हाये, हेही या लोकाइले काऊन कयत नसीन? आता मातर कदी कदी त्याईले इरल्यावानीच वाटत राये. आंगनात ऊबं रावून ते गढीच्या इकळे पायत. एवढी भक्कम गढी पन उनायापावसायाईपुळे तिनई आता हात टेकोले व्हते. नायी म्हनलं तरी आता ती काठाकाठानं खचत चाल्ली व्हती आन् गाववाल्याइले तं तेच पायजे व्हतं? कारन गढी खचली का त्याइले पांढ्ढी माती भेटत व्हती. बापू गुरजीलेई आजकाल उदास वाटत व्हतं. त्याइचं चित कायच्यात लागत नोतं. त्याईची पयलेची उमेद जसी कनाकनानं खचत व्हती; पन ते तिले सावरत व्हते. गावाबद्दलची कळकळ त्याइले सतावत व्हती. वान नदीले आता गावाजोळच डोव पळला व्हता. आन् तिच्या कराळीवरल्या वडाच्या पारंब्या आता भुइत धसत व्हत्या. मोकाट ढोराइले आता नदीकराळी सावली झाली व्हती. आन् अदीमधी गावातले रिकामे पोट्टेई खेयाले आले म्हनजे त्या वडाखाली बसत व्हते. त्याईच्या पारंब्याईले लमकत व्हते.

बोरडिंगातल्या पोरायीचे गुरजी भल्लेच लाळाचे व्हते. त्याइच्या शबदाले सर्वेच मान देत व्हते. त्याईच्या मतापरमानं वागासाठी सर्वेच धळपळत व्हते. गुरजीई त्याइले जीव लावत व्हते. त्यानं तं रोज राती गुरजी त्याईले कंदीलाच्या उजिळात घिऊन बसत व्हते. झाकुल्यात आखीन कायजीनं उठोत व्हते. अशातच गुरजीचं पोरगं बिमार पळलं पन गुरजीले त्याच्यापरस बोरडिंगातल्या पोराइचीच जादा कायजी! ते आपले बोरडिंगातच झपत व्हते. एक दिवस आखीन लकषुमी तपली, ''अवो, तुमाले पोराचीई कायी कायजी हाय का नायी? रोज त्याले इस्त्यावानी ताप रायते आन् तसंच असीन तं आमाले घरवाल्याईले मारून टाका आन् मंग बसा शायीतच जाऊन.''

मंग मातर गुरजी पोराले आकोल्याले डागतरच्या इकळे घिऊन गेले. त्यादिसी सारं बोरडिंगच भकासलं व्हतं. बोरडिंगात कोनीच जेवलं नोतं. रातचे पाखरं मुके व्हतात तसे सारे पोरं गिपचीप झाले व्हतं; पन आता उशीर झालता. गुरजीच्या पोराले आकोल्याले नेल्यानं कायीच पालट पळला नायी. आन् पोराच्या मरनानं आखीन एकडाव गुरजी हादरले व्हते. ओघयनाऱ्या डोयाईले सावरू पायत व्हते. बोरडिंगातले पोरं त्यानं आखीनच भेदरले व्हते. एकमेकाईच्या गयात गये घालू घालू ते लळत व्हते. अवकानी पान्यानं गढीलेई झोळलं व्हतं. आन् चवूभवताल ते खचत चालली व्हती. गुरजीचे नोकरीवून दूर हुयाचे दिस आता जोळ येत व्हते.

बोरडिंगातले पोरं सातवी पास हुवून बोरडींग सोळत व्हते. काईकाईले तं गुरजीनंच मासतर म्हनून दुसऱ्या गावाले लावून देलं व्हतं. पोरं पोटापान्याले लागले तरी गुरजीले भुलले नोते. नायी निदान तं ते अखाळीले आपले नारय घिऊन पाया लागाले येत व्हते. गुरजीई त्याइची चवकशी करत व्हते आन् नव्या दमानं ते आपआपल्या कामावर जात व्हते. जाता जाता, ''गुरजी तुमी आमच्या गावाले जरूर या.'' असा आगरव्ह करत व्हते.

गावात आता सळक यिऊ घातली व्हती. पन लोकाइले वाटत व्हते, ''अरे, आपल्याले कायले सळक पायजे? फालतूच गावची तितली जमीन पळीत पडते. पीक आपून कायले बुडू देवावं? आन् अथी कोनाले रोज गावा जा लागते? का तेच्यासाठी इतल्या मोठ्या जमिनीचा सत्यानाश करावं? फार झालं त एखाद्या डाव माळेगावलेच जाच काम पळते. आन् माळेगाव तं तसई एका दुकळीतच येते. मंग कायले आगीस पळावं?''

गावातल्या उचापत्याइच्या, उचापती कारवायानं येनारी सळक रूसली व्हती. लानगाव असूनबी हायस्कूल व्हनार व्हतं. पन गावातल्या लोकाईनच पायजे नायी म्हनल्यावर ते दुसऱ्या गावाले भेटलं व्हतं. गावाले दावखाना भेटूनइ गावालेच तो पायजे नोता.

गुरजीचा चेयरा आता सदाच कावूरल्यावानी दिसत व्हता. त्याइचं मन तिळतिळ दुखत व्हतं. असे कसे हे लोकं? कोनी काहीही सांगते आन् त्यावर हे भरोसा ठेवतत. त्याईले आपलं भलं करनरा कोन हाये, आन् आपल्याले भळकोनारा कोन हाय, हेही कसं कयत नसीन? हे उचापती लोकई कसे उरफाटे? त्याइच्या सादेपनाचाई हे फायदा घेतेत. अस्यानं या लोकाईचं कसं व्हइनं? देशाच्या सवतंतरानई त्याइच्या पदरात काई पळनार नायी? पन मंग आपून उबा जलम काय केलं? आपल्या पदरात काय पळलं? एकुनता एक पोरगा व्हता तोई गेला. पन जाऊ द्या. त्याचं काई नायी पन या लोकाईचं कसं?

आझुनई गावचे तेच हाल व्हते. गावात पावसायात गाटापान्याचं येनं-जानं बंद व्हतं. गावातले लोक अचानक बिमार पळले तं डागतर भेटला नायी म्हनून, दवापान्याबिगर जीव सोळत व्हते. सातवीच्या पुळे गावातले पोर शिकतच नोते. कारन त्याईले तालुक्याले जावा लागत व्हतं. गावातली गढी आता दर पावसायात खचत व्हती. आन् तसीई उनायात लोक इव्यानं खोदूखोदू सारोयाले तिची माती उकरून नेतच व्हते. आझुनई ते आपली झुजतच व्हती आन् वान नदी भरूभरू वायत व्हती. तिच्या कराळीवरल्या वडाच्या पारंब्या मातीत धसत व्हत्या. अन् दुसऱ्या खोळासारख्या दिसत व्हत्या.

गढी मातर उनीपुरी खचली व्हती. आन् वान नदी उनायात बारीक व्हत व्हती. तिच्या कराळीवरल्या वडाचेई उनायात पान झळत व्हते. आन् उदासपन गावात तरंगत व्हतं.

आता तं अजबच घळ्ळ व्हतं. वान नदीच्या पान्यानं आपलं पातरच बदललं व्हतं. गारपिटीत उनाया नसूनई कराळीवरल्या वडाचे पानं गवून पळले व्हते. गावातली गढी तं आता पुरीच खचली व्हती. गावातले पोरं आता तालुक्याले शिकाले जावू लागले व्हते. आझुनई गाटापान्याचं गाव इतर गावापासून तुटत व्हतं. आन् डागतरची तं गावात हमेशाचीच बोंब व्हती. आन् म्हनूनच गावात कायी सोय नायी असं म्हनत नयी पिढी गाव सोळून शेयरात राहाले जात व्हती. गावात आता सोसायट्या आल्या व्हत्या. नयी पिढी आता करती झाली व्हती. झेड. पी. तं गावातला उमेदवार निवळून आला व्हता. त्यानंच गावाचा रिपोट वधर नेला व्हता. गावातलं दूध, गावातली भाजी, गावातले फय आता शेयरात जात व्हते. शयरातून भरभरू पयसा येत व्हता. पन मातर चटनीवरल्या तेलाले तो पुरता नोता. गावातल्या जमिनीतला दान्याचा पुरई आटला व्हता.

आज गावाले साजऱ्या गावाचा मान भेटला व्हता. गावातली गढी खचूखचू तिच्या जागी मोठ्ठं पांढ्ढ मयदान झालं व्हतं. आन् त्याच मयदानात आजचा कारयकरम व्हनार व्हता. नयी पिढी धाव धाव करत व्हती. भोंगा वाजत व्हता. वडाचं झाळई आता वायत चाल्लं व्हतं. आन् दर उनायात वाननदी कोळली पळत व्हती.

कारयकरमाची येळ झाली म्हनून भोंगा सांगत व्हता. पन बापू गुरजीचा जीव कासावीस झाला व्हता. गुरजीनं कुळतं आंगात घातलं. डोक्स्यावर टोपी घातली. आन् गळव्यातलं पानी गिलासात वतून ते घटघट पेले. त्याइले वाटलं, त्यानं तरी आपली कोळली घाटी वली हुईन. पन नायी. जीव कासावीस व्हतच व्हता. घाटी कोळली पळतच व्हती.

हाताची घळी त्याइनं पाठीमागं कुळत्यावर घातली आन् ते तसेच निघाले दूर ऽ ऽ ऽ ऽ ऽ वावरा कळे! त्याइले कारयकरमापासून दूर जायाचं व्हतं पन आता पायच लटलट कापत व्हते. जीवई घायबरल्यावानी करत व्हता आन् घाटीई कोळली पळत व्हती. पाऊल उचलत नोतं. उचललं का भोंड येत व्हती आन् डोयापुळे अंधारी पसरत व्हती.

(अकसिदीचे दाने)

## कृती

**(१) (अ) चौकटी पूर्ण करा.**

(१) गावाचं भरभरून कौतुक पाहणारी–

(२) लहानुलं गावाच्या भोवताल झालर असलेला पर्वत–

(३) बापू गुरुजींना शाळेत पाठवण्याचा आग्रह करणारे–

(४) गुरुजींच्या समाजकार्याविरुद्ध फळी तयार करणारे–

**(आ) खालील व्यक्तींतील नातेसंबंध स्पष्ट करा.**

(१) बापू गुरुजी आणि परबतराव–

(२) बापू गुरुजी आणि संपती–

(३) लक्ष्मी आणि बापू गुरुजी–

(४) बापू गुरुजी आणि पाटील–

**(२) कृती करा.**

(१) **गुरुजींनी गावात सुरू केलेल्या विविध गोष्टी**

(२) **बापू गुरुजींची स्वभाव वैशिष्ट्ये**

**(३) (अ) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) दान्याचा पूर.

(२) मानसानं पयले पानी पावावं आन् मंग पोवावं.

(३) पाखरानं पयले पख पारखावं आन् मंग उळावं.

(४) मले पा आन् फुलं वहा.

**(आ) वैदर्भी बोलीत वापरलेल्या खालील वाक्प्रचारांचे अर्थ लक्षात घ्या. यासाठी तुमच्या बोलीत किंवा मराठीत वापरले जाणारे वाक्प्रचार लिहा.**

(१) मन तिळतिळ दुखने–

(२) ठान मांडून उबी रायने–

**(इ) खालील म्हणींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(१) हळ्याच्या सरपानं मानसं मरत नसतात.

(२) गायीचे शिंगं गायीले भारी नसतात.

(३) चाल व्हयरे पोरा आन् वयरे ढोरा.

**(४) कारणे लिहा.**

(अ) गावातला जो तो आनंदात होता, कारण···

(आ) शिक्षण आटोपल्यावर बापूंना गावाची ओढ लागली, कारण···

(इ) गाववाले गढी खचण्याची वाट पाहत होते, कारण···

### (५) थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) ‘पाखरानं पयले पख पारखावं आन् मंग उळावं’, असे बापू गुरुजी का म्हणत असतील ते स्पष्ट करा.

(आ) बोर्डींगमधला ‘संपती’ नावाचा मुलगा गेल्यानंतर बापू गुरुजींच्या भावना तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) गुरुजींचा मुलगा वारल्यानंतर बोर्डिंगातल्या मुलांच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन करा.

### (६) स्वमत.

(अ) बोर्डिंगात शिकत असलेल्या व शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांचे बापू गुरुजींबद्दल असलेले प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) गावातल्या उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

(इ) ‘वान नदीले कदीमधी येनारा पूर आता पटावरल्या आकळ्याइले आला व्हता.’ यातून तुम्हांला समजणारा अर्थ स्पष्ट करा.

### (७) अभिव्यक्ती.

(अ) ‘गढी’, ‘वान नदी’ आणि ‘वटवृक्ष’ या तीन प्रतीकांतून गावातील स्थित्यंतराचे दर्शन कशाप्रकारे घडवले आहे, ते प्रत्येकी एकेका उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

(आ) पाठाच्या शीर्षकाची समर्पकता पटवून द्या.

(इ) या कथेतील वैदर्भी बोलीचे तुम्हांला जाणवलेले वेगळेपण लिहा.

# उपयोजित मराठी

आपण भाषिक व्यवहारात वावरतो. त्यामुळे भाषा हे आपल्या विचार, भावना, कल्पना यांच्या निर्मितीचे माध्यम आणि अभिव्यक्तीचे साधन आहे. साहित्य, सामाजिक शास्त्रे, विज्ञान-तंत्रज्ञान यांचे ज्ञानभांडार भाषेत साठवले जाते. त्यामुळेच भाषा हे व्यक्तीच्या समृद्धीचे आणि मानवी प्रगतीचे प्रमुख साधन आहे.

श्रवण, भाषण-संभाषण, वाचन आणि लेखन यांमधून आपली भाषा विकसित होते. भाषेच्या माध्यमातून आपण संवाद साधतो, अभिव्यक्त होतो. त्याशिवाय अनेक ठिकाणी भाषेचे उपयोजन होते. आपण आत्मसात केलेल्या भाषिक कौशल्यांचा, शब्दभांडाराचा आणि अभिव्यक्ती कौशल्यांचा उपयोग जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये करता येणे म्हणजे भाषेचे उपयोजन होय. पत्रलेखन, जाहिरात, बातमी लेखन, सूत्रसंचालन, अनुवाद, मुद्रितशोधन, ब्लॉग लेखन, रेडिओजॉकी यांसारखी भाषेच्या उपयोजनाची क्षेत्रे सांगता येतात. समाजाच्या विकासाबरोबर आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर भाषेच्या उपयोजनाची क्षेत्रे अधिकाधिक व्यापक आणि विविधांगी होत आहेत. त्यामधून व्यवसायाच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत.

बारावीच्या वर्गात आपण भाषेच्या उपयोजनाशी संबंधित मुलाखत, माहितीपत्रक, अहवाल आणि वृत्तलेख या चार घटकांची ओळख करून घेणार आहोत.

## मुलाखत –

आपापल्या क्षेत्रामध्ये उत्तुंग कामगिरी केलेल्या, कर्तृत्वाचा ठसा उमटवलेल्या किंवा आदर्शवत जीवन जगणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती आपण वर्तमानपत्रात वाचतो, रेडिओवर ऐकतो अथवा दूरदर्शनवर पाहातो. मुलाखत घेणे हे एक वेगळे कौशल्य आहे आणि त्यामधून चांगल्या व्यावसायिक संधीसुद्धा उपलब्ध होऊ शकतात. मुलाखतीचे स्वरूप कसे असते? मुलाखतीसाठी काय काय पूर्वतयारी करावी लागते? प्रत्यक्ष मुलाखत घेताना कोणकोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे लागते इत्यादी संबंधीचा अभ्यास आपण मुलाखत या घटकात करणार आहोत. त्यामुळे मुलाखतीकडे चिकित्सकपणे पाहण्याचा दृष्टिकोन आपल्यामध्ये विकसित होईल. या मार्गाने वाटचाल करत गेल्यास आपणही उत्तम मुलाखतकार होऊ शकाल.

मुलाखती या दूरदर्शनवर, आकाशवाणीवर, वर्तमानपत्रांत, साप्ताहिकांत अथवा मासिकांत सहजपणे पाहायला, ऐकायला, वाचायला मिळतात. त्यांचा शोध घेऊन त्या पाहाव्यात, ऐकाव्यात अशी अपेक्षा आहे.

## माहितीपत्रक –

बाजारातील विविध वस्तू आणि सेवा यासंबंधीची माहितीपत्रके आपण जवळजवळ दररोज पाहातो, वाचतो आणि गरजेनुसार त्या माहितीचा उपयोग करतो. माहितीपत्रकातील मजकूर स्पष्ट, नेमका, समजण्यास सोपा असून त्याची मांडणी विशिष्ट प्रकारे केलेली असते. त्यामुळे माहितीपत्रकाचे नेटके लेखन हे एक तंत्र आहे. ते अवगत करून घेतले तर मराठी भाषेच्या उपयोजनातून चांगल्या व्यावसायिक संधी आपणास नक्कीच मिळू शकतात. माहितीपत्रकाचे स्वरूप कसे असते? ते कसे तयार केले जाते? यासंबंधीचा तपशील आपणास माहितीपत्रक या घटकातून मिळतो. त्यानुसार तुम्ही नमुन्यादाखल काही माहितीपत्रके तयार करून पाहू शकाल.

**अहवाल –**

शाळा असो वा महाविद्यालय, शासकीय कार्यालय असो वा एखादी खाजगी संस्था त्याठिकाणी विविध स्वरूपाचे समारंभ, कार्यक्रम आयोजित केले जातात. ते कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर त्या कार्यक्रमांचे अहवाल लिहिले जातात. संस्थेच्या आवश्यकतेनुसार आणि कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार अहवाल लिहिणे हे एक प्रकारचे कौशल्य आहे. अहवाल लेखनाचा करून घेतलेला परिचय तुम्हांला भावी जीवनात निश्चितपणे उपयोगी ठरू शकतो. त्यामुळे विविध स्वरूपाचे अहवाल वाचून कसे समजून घ्यावेत आणि संधी मिळाल्यास अहवाल कसे लिहावेत, याचे मार्गदर्शन या घटकात आणि सोबत दिलेल्या नमुन्यातून मिळेल.

**वृत्तलेख –**

इयत्ता दहावीमध्ये आपण बातमीचे स्वरूप पाहिले आहे. 'बातमी' म्हणजेच 'वृत्त' होय. बातमी अगदी नेमक्या शब्दात संक्षेपाने शब्दांकित केली जाते. बातमीमधील माहितीच्या पलीकडे त्या बातमीसंबंधीचा बराचसा तपशील शिल्लक राहतो. त्यासंबंधी वाचकांना कुतूहल वाटत असते. त्या बातमीवर आधारलेल्या ज्या लेखातून त्या कुतूहलाची पूर्तता होते, तो असतो वृत्तलेख. आजकाल वृत्तलेखाला (फिचर) फार महत्त्व प्राप्त झाले आहे. वृत्तलेखासंबंधीच्या घटकांमधून आपणाला यासंबंधीची अधिक माहिती मिळेल.

आता, तालुका पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत वर्तमानपत्रांचे विश्व विस्तारले आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या व्यावसायिक संधी उपलब्ध होत आहेत.

**समारोप –**

वरील चार घटकांमध्ये भाषेच्या उपयोजनाचे स्वरूप हे घटकांच्या प्रकारानुसार कसे बदलते हे अभ्यासता येते. मुलाखतीमधून प्रश्नोत्तराच्या साहाय्याने मुलाखत देणाऱ्याकडून माहिती काढून घ्यायची असली तरी ती अगदी वस्तुनिष्ठ आणि रूक्ष नसते. त्या मुलाखतीमध्ये विनोद, लालित्य आणि खुमासदार भाषाशैलीतून विविध रंग भरता येतात. मात्र अहवाल लेखनात प्रामुख्याने औपचारिक स्वरूपाच्या भाषेचा अवलंब केलेला असतो. माहितीपत्रकात सुद्‌धा औपचारिक आणि वस्तुनिष्ठ माहिती दिलेली असते. मात्र त्याची वेगळी आणि आकर्षक मांडणी वाचकांचे लक्ष वेधून घेते. वृत्तलेख बातमीसारखा केवळ वस्तुनिष्ठ नसतो तर लालित्य, उपरोध, उपहास, विनोद, हलकीफुलकी उदाहरणे यांमधून तो वाचनीय स्वरूपात वाचकांपुढे येतो.

या घटकांच्या अभ्यासातून तुम्हांला तुमच्या आवडीच्या घटकासंबंधीचा अधिक अभ्यास करून त्यासंदर्भातील व्यावसायिक संधी मिळवता येतील.

# १. मुलाखत

## ◈ प्रास्ताविक

वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी माध्यमांमध्ये सातत्याने मुलाखती वाचायला, ऐकायला, पाहायला मिळतात. 'मुलाकात' या अरबी शब्दावरून 'मुलाखत' हा सर्वांना परिचित असलेला शब्द तयार झाला आहे. सभा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही प्रकट मुलाखती होत असतात. अशा मुलाखतींमधून व्यक्तींच्या जीवनाचा आणि कर्तृत्वाचा वेध घेतला जातो. मुलाखत घेणे आणि देणे हे खूपच कौशल्याचे काम असते. अलीकडे तर 'मुलाखत घेणे' या गोष्टीला मोठ्या प्रमाणात व्यावसायिक महत्त्व प्राप्त होत आहे; म्हणूनच मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी, मुलाखत कशी घ्यावी, नोकरीसाठी, एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवण्यासाठी मुलाखत कशी द्यावी, त्यावेळी कोणती काळजी घ्यावी अशा काही मुद्द्यांबाबतची माहिती आपणाला असायला हवी.

## ◈ स्वरूप

मुलाखत म्हणजे संवाद. मात्र हा संवाद पूर्वनियोजित असतो. तो हेतुपूर्वक घडवून आणला जातो. मुलाखत देणारा, मुलाखत घेणारा आणि ती मुलाखत ऐकणारा, पाहणारा, वाचणारा या तिघांच्या सहभागातून मुलाखत पार पडते. जेव्हा क्रमबद्ध प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे जीवन आणि कर्तृत्व श्रोत्यांसमोर उलगडून दाखवते, तेव्हा त्यांच्यात झालेला संवाद म्हणजेच मुलाखत होय. थोडक्यात, दोन व्यक्तींमध्ये नियोजनपूर्वक झालेला वैचारिक, भावनिक संवाद म्हणजे मुलाखत होय. मात्र या सहेतूक वैचारिक संवादासाठी, म्हणजेच मुलाखतीसाठी व्यक्ती, दिवस, वेळ, स्थळ, विषय, कालावधी, उद्दिष्ट इत्यादी गोष्टी अगोदर ठरवल्या जातात.

मुलाखतीचे स्वरूप विविधांगी असते. एकावेळी एक व्यक्ती दुसऱ्या एका व्यक्तीची मुलाखत घेऊ शकते; तसेच एका वेळी एक व्यक्ती अनेक व्यक्तींचीही मुलाखत घेऊ शकते. फोनवरूनही मुलाखत घेतली जाऊ शकते.

मुलाखत लिखित, मौखिक, ध्वनिमुद्रित, प्रकट अशा विविध स्वरूपाची असते. मुलाखती विचारप्रवर्तक असतात, भावनाप्रधानही असतात. श्रोत्यांचे कुतूहल शमवणाऱ्या, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू स्पष्ट करणाऱ्या, अनुभव कथन करणाऱ्या, वाङ्मयीन सौंदर्य उलगडून दाखवणाऱ्या, पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या... अशा कितीतरी वेगवेगळ्या स्वरूपाच्या मुलाखती असतात.

ज्यांच्याजवळ 'सांगण्यासारखे' काही आहे आणि ज्यांच्याकडून 'ऐकण्यासारखे' काही आहे अशा व्यक्तींची मुलाखत घेतली जाऊ शकते. यात लोकप्रतिनिधी, कलावंत, खेळाडू, वैज्ञानिक, डॉक्टर, अध्यापक जसे असू शकतात तसेच व्यावसायिक, उद्योजक, वकील, विशेषज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, कवी, गिर्यारोहक, संपादक, ज्येष्ठ नागरिक, सैनिक, वैमानिक, पुरस्कार विजेते, विचारवंत, शेतमजूर, कामगार, अगदी फेरीवालेही असू शकतात. सामान्यत: कर्तृत्वसंपन्न व्यक्ती, ज्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात विशेष ठसा उमटवला आहे अशा असाधारण व्यक्ती, ज्यांनी जगावेगळी आव्हाने पेलून असामान्य कर्तृत्व गाजवले आहे अशी व्यक्तिमत्त्वे, समाजात ज्यांच्याबद्दल विशेष आदर आणि कुतूहल आहे अशा व्यक्ती... अशा कितीतरीजणांची मुलाखत घेतली जाऊ शकते. अगदी सामान्य माणसांचीही मुलाखत घेतली जाऊ शकते; अट फक्त एवढीच, की त्यांच्याकडे काहीतरी आगळेवेगळे सांगण्यासारखे असले पाहिजे.

## ◈ हेतू

मुलाखत घेण्याचे अनेक हेतू असतात. मुलाखत देणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून घेण्यासाठी; तसेच त्या व्यक्तीच्या कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी मुलाखत घेतली जाऊ शकते. अनेकांचे जीवन म्हणजे एक संघर्षगाथा असते. जनसामान्यांच्या मनात तो संघर्ष जाणून घेण्याची इच्छा असते. त्यासाठीही मुलाखत घेतली जाऊ शकते. व्यक्तीच्या कर्तृत्वाबरोबरच त्या व्यक्तीच्या आत दडलेला 'माणूस' समजून घेण्यासाठी प्रामुख्याने मुलाखत घेतली जाते. विचारवंतांची विविध विषयांवरील मते जाणून घेण्यासाठी, एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीकडून नवे काही माहीत करून घेण्याच्या हेतूने, एखादी घटना सखोलपणे समजून घेण्यासाठी मुलाखतीचे आयोजन केले जाते. मुलाखत देणारी व्यक्ती ज्या परिसरात लहानाची मोठी झाली, तो परिसर जाणून घेण्यासाठी, समाजाचे प्रबोधन करण्यासाठी, जनजागृतीसाठी, कलांचा रसास्वाद घेण्यासाठी मुलाखती घेतल्या जातात. मुलाखत घेण्यामागे असे अनेक हेतू असतात.

## ◈ मुलाखतीची पूर्वतयारी

मुलाखत उत्तम व्हावी यासाठी पूर्वतयारी तर करावीच लागते. पूर्वतयारीचा गृहपाठ भरपूर करणे हा यशस्वी मुलाखतीचा पाया आहे. सर्वांत महत्त्वाची पूर्वतयारी म्हणजे ज्यांची मुलाखत घ्यायची आहे त्यांच्याबद्दलची आवश्यक ती माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे आधीपासूनच उपलब्ध असली पाहिजे. उदा., त्यांचे पूर्ण नाव, असल्यास टोपणनाव, वय, जन्म दिनांक, जन्म स्थळ, पत्ता, शिक्षण, कौटुंबिक माहिती, कर्तृत्व, सध्याचा हुद्दा, मिळालेले मानसन्मान, पुरस्कार, लेखनकार्य, वैचारिक पार्श्वभूमी इत्यादींची माहिती अगोदरच तयार ठेवावी लागते. मुलाखत घेणाऱ्याने मुलाखतीच्या विषयासंबंधीचे सखोल वाचन करून ठेवले पाहिजे. मुलाखतीचे उद्दिष्ट काय आहे हेही नीट जाणून घेतले पाहिजे. त्यानंतर तो विषय आणि ते उद्दिष्ट लक्षात घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीत विचारायचे प्रश्न तयार केले पाहिजेत. मुलाखतीसाठी किती वेळ असणार आहे हे लक्षात घेऊन त्यानुसार प्रश्नसंख्या निश्चित करावी लागते. तसेच त्या प्रश्नांचा योग्य तो क्रमही लावून ठेवावा लागतो.

मुलाखतीचे स्वरूप नेमके कसे आहे, ती प्रकट असणार आहे की लिखित स्वरूपाची, श्रोतृवृंद/वाचक नेमका कोणता असणार आहे, (विद्यार्थी, की विद्यार्थी आणि पालक एकत्र, की फक्त नागरिक, की फक्त महिला इत्यादी.) याचीही माहिती मुलाखतकाराने घेऊन ठेवलेली असावी. मुलाखत प्रत्यक्ष श्रोत्यांसमोर आहे, की रेडिओसाठी आहे, की टी. व्ही. साठी आहे, हेही माहीत असले पाहिजे. मुलाखतीसाठी बैठक व्यवस्था, ध्वनिक्षेपण व्यवस्था, वातावरण निर्मिती, गरजेनुसार संदर्भ ग्रंथ, चित्रे, वाद्ये, वस्तू इत्यादी गोष्टीही अगोदरच पाहून ठेवणे चांगले. आवश्यकता वाटली तर मुलाखत देणाऱ्यांना अगोदर भेटून घ्यावे, चर्चा करावी. त्यामुळे प्रत्यक्ष मुलाखत घेणे सुकर, सुलभ, सोपे होऊन जाते. आकाशवाणीवरील, दूरदर्शनवरील आणि प्रत्यक्ष मुलाखती ऐकल्यास मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी नेमकी दिशा मिळण्यास मदत होईल.

## ◈ मुलाखत कशी घ्यावी?

### • मुलाखतीची सुरुवात.

मुलाखतीचा प्रारंभच मुळी अत्यंत आकर्षक, चटपटीत, थेट श्रोत्यांच्या/वाचकांच्या काळजाला जाऊन भिडणारा झाला पाहिजे. मुलाखतकाराच्या पहिल्या चार-सहा वाक्यांतच श्रोते/वाचक त्या मुलाखतीच्या श्रवणात/वाचनात मनाने पूर्णत: गुंतले गेले पाहिजेत. 'वेल बिगन इज हाफ डन्' असे जे म्हणतात ते याच अर्थाने. मॅचच्या पहिल्याच चेंडूवर एखाद्या फलंदाजाने चेंडू थेट सीमारेषेबाहेर टोलवल्याचा आनंद झाला पाहिजे आणि तेही अगदी नैसर्गिकपणे, सहजपणे, ओघाओघात घडले पाहिजे. त्याला कृत्रिमतेचा जरासाही स्पर्श होता कामा नये. त्यासाठी मुलाखतकाराला मुलाखतदात्याचा स्वभाव, शैली नेमकी माहीत असली पाहिजे. एखादा नवाकोरा चुटका, ताजा

किस्सा सांगून त्याच्या शेवटी तितक्याच नेमक्या, टोकदार प्रश्नाचा बॉल सुरुवातीलाच मुलाखतदात्याच्या कोर्टात भिरकावता येतो. मुलाखतीची पहिली ओव्हर अशा हलक्याफुलक्या, दिलखुलास चेंडूंनी सुरू करावी. त्यामुळे सर्वांच्याच मनावरचा ताण सैल होतो. वातावरण मोकळे, हलके होते. मुलाखतीची ही नांदी जितकी जास्त श्रवणीय होईल तितकी पुढची मैफल अधिकाधिक रंगतदार होत जाईल, मुलाखतकाराचा आत्मविश्वास दुणावत जाईल, मुलाखतदाता खुलेल आणि श्रोते/वाचक त्या मुलाखतीत गुंतून जातील.

- **मुलाखतीचा मध्य.**

चला, सुरुवात तर झाली. आता खरी बॅटिंग सुरू. विचारायच्या प्रश्नांची यादी तर समोर आहेच. त्यांचा क्रमही पक्का आहे. उत्तरे काय मिळतील याची मात्र खात्री नाही. शिवाय एक प्रश्न, मग त्याचे पूर्ण उत्तर, नंतर दुसरा प्रश्न, त्याचे पूर्ण उत्तर, तिसरा, चौथा... या पठडीतून जात राहिले तर मुलाखत रूक्ष, पठडीछाप होण्याची भीती असते. म्हणून मग प्रश्नच असे लवचीक तयार करायचे, की मिळालेल्या उत्तराचा धागा पकडून पुढचा प्रश्न तयार करता आला पाहिजे. कौशल्यच आहे हे, थोडीशी आयत्या वेळची कसरतच; पण सरावाने ती जमते. प्रश्नांची यादी मुलाखतकारासाठी असते, श्रोत्यांसाठी नसते.

ही अशी प्रश्नोत्तरांची रंगीबेरंगी फुले एकामागे एक मुलाखतीच्या धाग्यात गुंफत गेले, की ती एक सलग दिमाखदार संवादमाला होऊन जाते. प्रश्नांतून उत्तरे, उत्तरांतून प्रश्न, प्रश्नांची उत्तरे, उत्तरांचे प्रश्न... बघता बघता मुलाखतदात्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडत जातात. मात्र हे करताना मूळ विषयाचा संदर्भ सुटता कामा नये. मुलाखतीचा हेतू निसटता कामा नये. मुलाखत रंजक असावी, असलीच पाहिजे; पण रंजकतेच्या आहारी जाऊन मुलाखतीचे उद्दिष्टच भरकटता कामा नये.

सूर्यकिरणांच्या स्पर्शाने कळीची एकेक पाकळी उमलत जाऊन तिचे टपोऱ्या फुलात रूपांतर व्हावे तसे प्रश्नकर्त्याच्या एकेका प्रश्नाने मुलाखतदात्याचे व्यक्तिमत्त्व, त्याचे कार्यकर्तृत्व उलगडत जावे. हळूहळू मुलाखत तिच्या सर्वोच्च बिंदूकडे अग्रेसर होत जावी. विषयाचे, व्यक्तिमत्त्वाचे, विचारधारेचे सर्व कंगोरे समोर आले पाहिजेत. त्याचप्रमाणे मुलाखतीच्या या टप्प्यावर मुलाखत घेणाऱ्याने मुलाखत देणाऱ्याला जास्तीत जास्त वेळ द्यावा. त्याला अधिक व्यक्त होऊ द्यावे. प्रश्नांची गुंफण अशा कुशलतेने करावी, की उत्तरदात्याचा उत्साह वाढत गेला पाहिजे.

याच टप्प्यावर एकूण मुलाखतीतील सर्वांत जास्त महत्त्वाचे, विषयाशी थेट संबंधित असे प्रश्न विचारावेत. मुलाखतीच्या माध्यमातून लोकांना जे द्यायचे आहे ते याच टप्प्यात द्यायचे आहे. हीच ती वेळ आहे.

- **मुलाखतीचा समारोप.**

इतका वेळ कसे अगदी छान जमून आले होते; पण आता कुठेतरी थांबायलाच हवे; पण हे थांबणे म्हणजे कळसाध्याय असला पाहिजे. इथेच मुलाखतकाराने आपले संपूर्ण भाषिक कौशल्य पणाला लावायचे असते आणि श्रोत्यांना, 'अरेरे, फारच लवकर संपली मुलाखत!' असे वाटायला लावणारा समारोप करायचा असतो. हा समारोप करताना मुलाखतकाराने या टप्प्यावर स्वत:साठी थोडासा जास्त वेळ घेतला तरी चालेल. प्रश्नांऐवजी परिणामकारक, प्रभावी निवेदन या क्षणी अधिक महत्त्वाचे असते.

मुलाखत योग्य वेळी, योग्य ठिकाणी संपवावी. योग्य वेळ कोणती ? तर अशी वेळ, की त्यावेळी मुलाखत संपेल याचा श्रोत्यांना जराही अंदाज आलेला नसतो. अनपेक्षितपणे ती संपवावी. अजून हवीहवीशी वाटत असतानाच संपावी; पण 'ती अपूर्णच, अर्धवटच राहिली' अशा स्थितीतही संपू नये. भरभरून मिळाल्याचे समाधान तर श्रोत्यांना मिळावेच; पण 'अजून थोडा वेळ हे असेच मिळत राहिले असते तरीही चालले असते', असेही वाटायला लावणारा समारोप हा उत्तम समारोप. 'पुन्हा कधी हा असाच वैखरीचा यज्ञ होणार असेल तर यायचेच', असा निश्चय मनोमन करून श्रोते बाहेर पडले पाहिजेत. बाहेर जाताना मुलाखतीतील काही अविस्मरणीय संवाद मनात आठवत श्रोते बाहेर पडले, की समजावे 'मुलाखत यशस्वी झाली; श्रोत्यांपर्यंत पोहोचली.'

## ◈ नोकरीसाठी, प्रवेशासाठीची मुलाखत

नोकरीसाठी, एखाद्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अलीकडील काळात ज्या पद्धतीने मुलाखती घेतल्या जातात त्यांचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले आहे. उमेदवारांची बौद्धिक क्षमता, त्यांच्या ज्ञानाची पातळी, त्यांचा कल हे तर पूर्वीप्रमाणे आजही मुलाखतींमध्ये जोखले जातेच; पण त्याहीपेक्षा आता अधिक भर दिला जातो तो उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करण्यावर. उमेदवाराच्या वर्तनाशी संबंधित प्रश्न विचारण्यावर आता भर दिला जातो. केवळ नोकरीबाबतच नव्हे तर उमेदवाराचा एकूणच जीवनविषयक दृष्टिकोन तपासण्याचे दिवस आता आले आहेत. आता उमेदवारांकडून वेगळ्या अपेक्षा केल्या जात आहेत. त्यांची बौद्धिक, तांत्रिक हुशारी, निर्णयक्षमता, भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, त्यांचे आत येणे, बसणे, उठणे, पोशाख, यापेक्षा 'तुम्ही सध्याच्या स्पर्धेत टिकून राहाल का, अपेक्षित उद्दिष्टे तुम्ही कितपत गाठू शकाल, गटकार्य आणि गटनेतृत्व करण्याचे कौशल्य तुमच्यात कितपत आहे, अडचणींना तुम्ही कसे आणि किती तोंड देऊ शकता, अडचणी येणारच नाहीत यासाठी तुम्ही काही करू शकता का, आपली चूक तुम्ही मान्य करू शकता का, आपल्या यशाचे श्रेय टीममधल्या इतरांना देण्याची तुमची कितपत तयारी असते, इतरांचे विचार, भावना, सूचना स्वीकारण्याची तुमची कितपत तयारी असते' हे सर्व आजकाल मुलाखतीत अधिक प्राधान्याने पाहिले जाते. उमेदवार बाह्य गोष्टींपेक्षा 'आतून' कसा आणि कितपत विकसित झालाय हे जाणून घेणे सध्याच्या मुलाखतींचे वैशिष्ट्य झाले आहे.

## ◈ मुलाखत घेताना 'हे' नक्की करावे.

- मुलाखत घेणाऱ्याने आपल्या मर्यादांची जाणीव ठेवून प्रश्न विचारावेत.
- प्रश्नांची उत्तरे देण्याचे किंवा न देण्याचे मुलाखत देणाऱ्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवावे.
- मुलाखतीचे सादरीकरण ओघवते, श्रवणीय, उत्स्फूर्त असावे.
- मुलाखतीदरम्यान अनौपचारिक आणि सकारात्मक वातावरण निर्माण करावे.
- 'हो', 'नाही', 'माहीत नाही', 'नंतर सांगेन' अशी उत्तरे येणार नाहीत याची दक्षता घेऊन प्रश्न तयार करावेत.
- संयम, विवेक आणि नैतिकतेचे पालन यांना खुसखुशीतपणाची जोड देऊन मुलाखतीत रंग भरावेत.

## ◈ मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी

- चुकीचे, अप्रस्तुत प्रश्न विचारणे टाळावे.
- मुलाखत देणाऱ्याचा अवमान होईल असे प्रश्न विचारू नयेत.
- ज्याद्वारे ताणतणाव, संघर्ष निर्माण होईल असे प्रश्न नसावेत.
- मूळ विषय सोडून असंबद्ध प्रश्न विचारणे टाळावे.
- अपेक्षित उत्तर सूचित होईल असे सूचक प्रश्न नसावेत.
- क्लिष्ट, अवघड प्रश्न विचारू नयेत.
- प्रश्नांची पुनरावृत्ती करू नये.
- पूर्वतयारी आणि पूर्वाभ्यास न करता अति आत्मविश्वासाच्या आहारी जाऊन मुलाखत घेऊ नये.
- रटाळ, कंटाळवाणे, प्रभावहीन प्रश्न विचारणे टाळावे.
- मुलाखतीदरम्यान हास्यास्पद हावभाव करू नयेत.
- मुलाखत देणाऱ्यापेक्षा मुलाखत घेणाऱ्याने स्वत: जास्त बोलू नये.
- मुलाखत नियोजित वेळेत पूर्ण करावी.

## ◈ समारोप

प्रकट मुलाखती, नियतकालिकांमधील लिखित मुलाखती, आकाशवाणीवरील श्राव्य मुलाखती, दूरचित्रवाणीवरील दृक्-श्राव्य मुलाखती, प्रत्यक्ष घटनास्थळी घेतल्या जाणाऱ्या मुलाखती अशा विविध प्रकारच्या मुलाखतींनी वर्तमान जनजीवन अंतर्बाह्य व्यापून टाकले आहे.

व्यक्तीव्यक्तींमधल्या 'माणसाचा' वेध घेणाऱ्या, वाचकाला अंतर्मुख व्हायला लावणाऱ्या, आशयसंपन्न, विचारगर्भ आणि रंगतदार मुलाखतींमुळे समाजाचे उन्नयन होत असते. मुलाखतींचे हे फलित लक्षात घेतले तर 'मुलाखती'चे माहात्म्य वेगळे सांगावे लागणार नाही.

## कृती

**(१) खालील मुद्द्यांविषयी माहिती लिहा.**

(अ) मुलाखतीची पूर्वतयारी.

(आ) मुलाखतीचा समारोप.

**(२) थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलाखतीचे प्रमुख हेतू तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) व्यक्तीमधील 'माणूस' समजून घेण्यासाठी मुलाखत असते, हे स्पष्ट करा.

(इ) मुलाखत म्हणजे पूर्वनियोजित संवाद हे स्पष्ट करा.

(ई) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.

(उ) उमेदवार 'आतून' जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते, हे सोदाहरण स्पष्ट करा.

(ऊ) मुलाखत ही व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाची ओळख असते, हे स्पष्ट करा.

**(३) मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी ते खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

(अ) मुलाखतदात्याची वैयक्तिक माहिती

(आ) मुलाखतदात्याचे कार्य

(इ) मुलाखतीच्या अनुषंगाने वाचन

(ई) प्रश्नांची निर्मिती

**(४) खालील व्यक्तींची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.**

(अ) भाजीवाला

(आ) पोस्टमन

(इ) परिचारिका

❀❀❀

– नमस्कार आशाताई.

– नमस्कार.

– मी रोहित. खरंतर तुमच्याशी बोलायला आलोय मी; पण तुमचं अभिनंदनही करणार आहे मी. अभिनंदन आशाताई.

– ते कशासाठी?

– नुकताच तुमचा सत्कार झालाय असं ऐकलंय मी. हो ना?

– हो झालाय, पण त्याचं काय एवढं?

– व्वा! असं कसं? उगाच नाही कुणी कुणाचा सत्कार करत! मला सांगा, का झाला तुमचा हा सत्कार?

– अहो, गेली पंधरा वर्षे मी हे सफाईचं काम करते. एकदाही सुट्टी घेतली नाही मी. नुकतीच मोठी मिरवणूक गेली या गावातून. त्यावेळी रस्त्यावर झालेला कचरा आम्ही दहाजणींनी अवघ्या तीनच तासात उचलला. म्हणून आमचा सगळ्यांचाच सत्कार झाला.

– आशाताई, हे साफसफाईचं काम का निवडलंत तुम्ही?

– माझ्या आईनं गरिबीमुळं आयुष्यभर हेच काम केलं. मलाही तेच काम करावं लागतंय. ते करत करतच मी दहावीपर्यंत शिकले.

– पण मग तुम्हांला या कामाची घाण वाटत नाही? त्रास वाटत नाही?

– कशी वाटेल? 'आवडीनं केलेलं कोणतंही काम चांगलंच असतं', असं माझे वडील म्हणायचे.

– पण तरीही अडचणी खूपच येत असतील ना, ही असली कामं करताना?

– हो तर! येतातच की!

– कोणत्या अडचणी, सांगाल?

– सगळ्यात मोठी अडचण म्हणजे लोकांना कितीही सांगितलं तरी लोक ओला कचरा आणि सुका कचरा अजिबात वेगळावेगळा ठेवत नाहीत. फार त्रास होतो त्याचा. शिवाय काचा, ट्यूबलाईट्स, थर्माकोल, प्लास्टिक खुशाल कचऱ्यात फेकून देतात. अनेकदा आमच्या हाताला कापतं, जखमा होतात.

– आणखी काही कडवट अनुभव?

– काय सांगू तुम्हांला! अहो, जी जागा साफ करायला आम्ही तासन्‌तास राबतो, ती जागा हे लोक अवघ्या पंधरा मिनिटात पुन्हा घाणेरडी करून टाकतात. दिवसदिवसभर घाणीतच काम करावं लागतं आम्हांला. सण म्हणू नका, आजारपण म्हणू नका, काम तर करावंच लागतं ना! ऊन, वारा, पाऊस, थंडी काहीही असो, काम चालूच असतं आमचं.

– तर मग तुम्हांला छत्री, रेनकोट, हातमोजे अशी काही साधनं नक्कीच मिळत असतील ना?

– नाही हो! काही नाही मिळत.

– आशाताई, घरी कोणकोण आहेत तुमच्या?

– नवरा, मुलगा, मुलगी, सासू, सासरे! आम्ही सगळे एकत्रच राहतो.

- त्यांना काय वाटतं तुमच्या कामाबद्दल?
- त्यांना अभिमानच वाटतो माझा. आमच्या घराण्यात दहावी पास झालेली मीच पहिली मुलगी. त्यांना त्याचाही अभिमान! फक्त त्यांनाच नाही, माझ्या सगळ्या नातेवाईकांनाही!
- तुमचा दिवस कसा सुरू होतो?
- भल्या पहाटे उठायचं, सगळ्यांचा स्वयंपाक करायचा, स्वत:चं सगळं आवरून वेळेत कामावर जायचं. सकाळी  दहा साडेदहापर्यंत काम करायचं. मग तिथंच कुठंतरी एखाद्या टपरीवर चहानाश्ता घ्यायचा. पुन्हा काम. दुपारी जेवण. नंतर पुन्हा साफसफाई. संध्याकाळी घरी पोचायला पाच-साडेपाच होतात. घरी जाऊन पुन्हा घरची कामं सुरू.
- आशाताई, समाजासाठी तुम्ही हे एवढं सगळं करता, तो समाज तुमच्याकडे कसा बघतो?
- तसा काही फारसा चांगला अनुभव नाही माझा. पण कधीकधी हे असे सत्कार झाले की खूप बरं वाटतं मनाला.
- आशाताई, एवढं घाणीचं काम करूनही तुम्ही स्वत: मात्र सदैव प्रसन्न, हसतमुख, स्वच्छ असता. हे कसे काय?
- ही आपले गुरु संत गाडगेबाबांची कृपा आणि माझ्या आईचा आशीर्वाद.
- आता शेवटचाच प्रश्न. विचारू? तुमचंही काम खोळंबलंय ना!
- हो, विचारा की.
- या तुमच्या कामाच्या संदर्भात तुमच्या लक्षात राहिलेला एखादा अनुभव सांगाल?
- हो, मागच्याच वर्षीचा प्रसंग. दिवाळीची पहिली पहाट. नुकतीच मी स्टेशनरोडवर माझ्या कामाला सुरुवात केली होती. तेवढ्यात एक बाई माझ्यासमोर आली. ती म्हणाली, ''मावशी, तुमच्यासाठी दिवाळीची भेट आणली आहे. घ्याल?''
- मग?
- तिने एक पिशवी माझ्या हातावर ठेवली. पिशवीत बघते तर काय, नवं कोरं स्टीलचं ताट, लाडू, करंज्या, चिवडा, चकली यांची पाकीटं, मेणबत्ती-काडेपेटीचा पुडा, उटणं, वासाचा साबण, तेल, छोटा आकाशकंदिल!
- व्वा! खूपच बरं वाटलं असेल नां तुम्हाला?
- हो. दिवाळीच्या त्या पहाटे माझी भर रस्त्यावर दिवाळी साजरी झाली! अहो, रोजच तुम्ही लोक पहाटे जेव्हा घरात प्रार्थना करत असता तेव्हा आम्ही मात्र त्याचवेळी घाण उपसत असतो; पण तीच आमची पूजा असते.
- आशाताई, खूप खूप धन्यवाद. जाता जाता लोकांसाठी काही सांगाल?
- स्वच्छता हेच परमेश्वराचं दुसरं नाव आहे!
- छान! शेवटी पुन्हा एकदा तुमचं अभिनंदन आणि धन्यवाद. येतो मी.
- नमस्कार.

# २. माहितीपत्रक

## ◈ प्रास्ताविक

आजच्या स्पर्धेच्या युगात जागतिकीकरणामुळे आणि व्यापारीकरणामुळे ग्राहक अधिक चौकस आणि चिकित्सक झाले आहेत. कोणताही व्यवहार करताना आता लोकांना संबंधित व्यवहाराबद्दलची सखोल माहिती हवी असते, बारीकसारीक तपशील हवा असतो. हा तपशील घरबसल्या, लिखित स्वरूपात मिळाला तर लोकांना ते हवेच असते. लोकांची ही मानसिकता आता व्यावसायिकांनी, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक व्यवहार करणाऱ्यांनी; तसेच उत्पादक आणि विक्रेत्यांनी ओळखली आहे. या मानसिकतेचे समाधान करण्यासाठी जे काही निरनिराळे मार्ग उत्पादक, व्यावसायिक हाताळतात, त्यातलाच एक प्रभावी मार्ग आहे 'माहितीपत्रक'.

## ◈ माहितीपत्रकाचे स्वरूप

माहितीपत्रक म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. माहितीपत्रक हे एक प्रकारे उत्पादने, सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे साधन आहे. नवनव्या योजनांकडे, उत्पादनांकडे, संस्थांकडे लोकांनी डोकावून पाहावे यासाठीची ती एक खिडकी आहे. जनमत आकर्षित करण्यासाठी ते एक लिखित स्वरूपाचे जाहीर आवाहन असते. माहितीपत्रकामुळे माहिती देणारा आणि माहिती घेणारा यांच्यात एक नाते निर्माण होण्यास मदत होते. नवीन ग्राहक मिळवण्याची, नवीन बाजारपेठ काबीज करण्याची ती पहिली पायरी आहे. माहितीपत्रकामुळे ग्राहकाला हवी असलेली माहिती ग्राहकाकडे सतत उपलब्ध राहू शकते. माहितीपत्रक कमी वेळात, कमी खर्चात ग्राहकांपर्यंत घरबसल्या पोहोचवता येते. माहितीपत्रक हे अप्रत्यक्षपणे जाहिरातीचे कार्य करते. माहितीपत्रक वाचताक्षणीच लोकांच्या मनात कुतूहल, उत्कंठा, औत्सुक्य जागे झाले, की समजावे माहितीपत्रकाचा हेतू साध्य झाला आहे.

## ◈ माहितीपत्रकाची गरज

माहितीपत्रकाची गरज सर्वत्र असते. अगदी फळफळावळ आणि भाजीपाला विक्रेत्यांपासून ते थेट लक्षावधी रुपयांच्या आलिशान कार विक्रेत्यांपर्यंत सर्वांना माहितीपत्रकाची आवश्यकता भासतेच. दिवाळी फराळ, रेडिमेड कपडे, साड्या, खेळणी, किराणा माल, दिवाळी अंक, पुस्तके, स्टेशनरी, हॉटेल्स, डायनिंग हॉल, मंगल कार्यालये, फर्निचर, विद्युत उपकरणे, यंत्रसामग्री, घरगुती वापराची उपकरणे, वाहने, कारखाने, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, औषधे, दूधदुभते, खाद्यपदार्थ इत्यादींची माहितीपत्रके पाहावयास मिळतात.

नाट्यगृहे, सिनेमागृहे, सहकारी संस्था, आर्थिक आणि शैक्षणिक संस्था, सामाजिक आणि साहित्यिक संस्था, सांस्कृतिक आणि क्रीडासंस्था, कंपन्या, हॉस्पिटल्स, पर्यटन संस्था, एलआयसी, पोस्ट, बँका, पतपेढ्या, बचतगट इत्यादी ठिकाणी माहितीपत्रकाची गरज असते.

कला, संगीत, छोटे मोठे अभ्यासक्रम, शेती अवजारे, बांधकाम साहित्य, प्रवासी कंपन्या, रोपवाटिका यांसारखीच इतरही अनेकानेक क्षेत्रे आहेत. जिथे जिथे लोकमत आकर्षित करण्याची गरज असते तिथे तिथे माहितीपत्रक आवश्यक ठरते. आपले वेगळेपण, आपले वैशिष्ट्य, आपल्याकडून ग्राहकाला होणारा फायदा, या गोष्टी जिथे अधोरेखित करायच्या असतील तिथे माहितीपत्रकाची गरज हमखास असते.

## ◈ माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये

**(१) 'माहिती'ला प्राधान्य–** नावच 'माहिती'पत्रक असल्याने माहितीपत्रकात 'माहिती'ला सर्वांत जास्त प्राधान्य दिले जाते. ज्या हेतूने माहितीपत्रक तयार केले जाते, त्या हेतूशी सुसंगत, अचूक माहिती दिली गेली पाहिजे. माहिती आटोपशीर, संक्षिप्त असावी. संस्थेशी संबंधित अत्यावश्यक आणि कायदेशीर माहिती (उदा.,संस्था नोंदणी क्रमांक, संस्था नोंदणी दिनांक, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल, वेबसाइट, संस्थेचे बोधचिन्ह, घोषवाक्य, पत्ता, पदाधिकाऱ्यांची नावे, कामकाजाची वेळ इत्यादी.) माहितीपत्रकात दिली गेलीच पाहिजे. मुख्य म्हणजे माहितीपत्रकातील माहिती वस्तुनिष्ठ, सत्य, वास्तवच असली पाहिजे. तिच्यात अतिशयोक्त, चुकीची माहिती असता कामा नये. माहितीपत्रकातील माहिती वाचनीयही असली पाहिजे. तथापि त्यात माहितीचा अतिरेक नसावा.

**(२) उपयुक्तता–** आपले माहितीपत्रक उपयुक्त, परिणामकारक कसे होईल याचीही दक्षता घेतली पाहिजे. वाचून झाल्यानंतर ते चुरगाळून फेकून न देता जपून ठेवण्याची, वापरण्याची इच्छा झाली पाहिजे. असे उपयोगमूल्य माहितीपत्रकाला केव्हा प्राप्त होईल; तर जेव्हा माहितीपत्रकात वाचकाच्या (ग्राहकाच्या) जिव्हाळ्याची माहिती दिली जाते तेव्हा. 'माझ्या दैनंदिन जीवनातील समस्या, अडचणी, प्रश्न यांच्या सोडवणुकीसाठी हे माहितीपत्रक मला उपयोगी पडेल' असे ग्राहकाला वाटायला लावणारे माहितीपत्रक उपयुक्तच असते. माहितीपत्रकातील 'तुमच्या पालेभाज्यांवर अतिरिक्त कीटकनाशके मारली आहेत का?', 'दुधातली भेसळ ही अशी ओळखा' अशा वाक्यांकडे वाचकांचे लक्ष गेले, की शहरी व्यक्तींनाही कृषिप्रदर्शनाविषयीचे माहितीपत्रक उपयोगी वाटू लागते.

**(३) वेगळेपण–** इतरांच्या माहितीपत्रकांपेक्षा आपले माहितीपत्रक वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण कसे असेल याचीही काळजी घेतली पाहिजे. हे वेगळेपण माहितीपत्रकाच्या मजकुरात आणि रचनेत आणले पाहिजे. इतरांपेक्षा वेगळी, नवी, रोचक, उपयोगी माहिती देणे आणि वेगळा लेआऊट, वेगळा आकार, वेगळी रचना आणि वेगळा दृष्टिकोन ठेवणे याद्वारे माहितीपत्रकात वेगळेपण आणता येते.

**(४) आकर्षक मांडणी (लेआऊट)–** माहितीपत्रकातील माहितीची मांडणी आकर्षक असली पाहिजे. मांडणी सरधोपट असू नये. माहितीपत्रक दिसताक्षणी ते 'वाचावेच' असे वाटले पाहिजे. त्याचा कागद दर्जेदार असावा, छपाई रंगीत असावी, पहिले पृष्ठ तर खूपच चित्ताकर्षक असावे. त्याचा आकार योग्य असावा. त्याचे शीर्षक, बोधवाक्य ठसठशीतपणे दिसणारे असावे. माहितीपत्रकाची मांडणी वेधक करण्यासाठी गरजेनुसार त्या क्षेत्रातले कुशल कलाकार, चित्रकार, संगणक तज्ज्ञ मदतीला घ्यावेत.

**(५) भाषाशैली–** 'माहितीपत्रक' केवळ पाहिले जात नाही, तर ते 'वाचले'ही जाते. म्हणूनच ते वाचावेसे वाटावे यासाठी त्याची भाषा आकर्षक आणि वेधक असली पाहिजे. उदा., 'आमच्या कृषिपर्यटन केंद्रात' राहायला आलात तर तुम्ही खूप सुखी व्हाल; इथे तुम्ही इतके रंगून जाल, की तुम्हांला दु:ख करत बसायला वेळच मिळणार नाही' एवढी सगळी माहिती 'आता तणावाला वेळ नाही' एवढ्या चारच शब्दांत सांगणे म्हणजेच मनाला भिडणारी शब्दयोजना करणे होय! थोडक्यात, भाषाशैली पाल्हाळीक नको तर मनाची पकड घेणारी हवी.

## ◈ माहितीपत्रकासाठी आवश्यक मुद्द्यांचा नमुना

समजा, एका कनिष्ठ महाविद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षापासून विज्ञानशाखा नव्याने सुरू करायची आहे. ही बाब जास्तीत जास्त प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांपर्यंत आणि पालकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवायची आहे. कारण तसे झाले तरच विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी त्या कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधतील. तर मग कशी पोहोचवता येईल ही बाब त्यांच्यापर्यंत...

अर्थातच माहितीपत्रकाच्या माध्यमातून.

**कोणकोणते मुद्दे असले पाहिजेत या माहितीपत्रकात...**

(१) ते कनिष्ठ महाविद्यालय ज्या शैक्षणिक संस्थेमार्फत चालवले जाते त्या संस्थेचे बोधचिन्ह/बोधवाक्य, संस्थेच्या महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची नावे.

(२) त्या संस्थेचे नाव/पत्ता/स्थापना वर्ष/दूरध्वनी क्र./मोबाईल क्र./ई-मेल/वेबसाईट.

(३) त्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव/पत्ता/स्थापना वर्ष/दूरध्वनी क्र./मोबाईल क्र./ ई-मेल/वेबसाईट.

(४) संस्था व कनिष्ठ महाविद्यालयास असलेली शासकीय मान्यता/मंजुरी विषयक संक्षिप्त माहिती.

(५) कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधित प्राथमिक माहिती (उदा., शासकीय/खाजगी/अनुदानित/विना अनुदानित इत्यादी.)

(६) कनिष्ठ महाविद्यालयाची थोडक्यात पार्श्वभूमी.

(७) आवश्यक ती सांख्यिकीय माहिती.

(८) कनिष्ठ महाविद्यालयातील सुविधा. (उदा., स्वच्छतागृहे, प्रयोगशाळा, क्रीडांगण, सभागृह, ग्रंथालय, अभ्यासिका, वसतिगृह, वाहनतळ, उपाहारगृह इत्यादी.)

(९) कनिष्ठ महाविद्यालयाची इतर वैशिष्ट्ये.

(१०) कनिष्ठ महाविद्यालयात होणारे उपक्रम. (उदा., कमवा व शिका, एन.एस.एस., सहली इत्यादी.)

(११) पूरक फोटो.

(१२) संस्थेच्या इतर शाखांमधील परीक्षांचे निकाल.

(१३) कनिष्ठ महाविद्यालयाच्या भविष्यकालीन योजना.

(१४) विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती इत्यादी.

(१५) कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची माहिती/नकाशा.

(१६) प्रवेशप्रक्रियेबद्दलची माहिती, प्रवेश क्षमता, प्रवेशाच्या अटी, आवश्यक ती कागदपत्रे, प्रवेशाबाबतची पात्रता, प्रवेशाची अंतिम तारीख, प्रवेश अर्जाचा नमुना, फी, सुरुवातीला भरायची रक्कम, संबंधित कोर्सचा कालावधी, प्रवेशाच्या कामकाजाची वेळ, सुट्ट्या केव्हा असतील, संबंधित अधिकाऱ्याचे नाव, त्यांचा फोन क्र., प्रवेश निश्चित केव्हा होणार त्याची तारीख (यादी जाहीर करणे.) कनिष्ठ महाविद्यालय सुरू होण्याची तारीख याबद्दलची माहिती.

## ⟐ समारोप

आजच्या काळात आकर्षक आणि नेमकी माहिती पुरवणारे माहितीपत्रक तयार करणे ही व्यावसायिकांची गरज आहे आणि ते वेळेवर उपलब्ध होणे ही ग्राहकांची गरज आहे. त्यामुळे माहितीपत्रक तयार करणे या गोष्टीला व्यावसायिक मूल्य प्राप्त होत आहे.

## कृती

**(१) माहितीपत्रक म्हणजे काय ते सोदाहरण सांगा.**

**(२) माहितीपत्रकाची वैशिष्ट्ये खालील मुद्द्यांना धरून स्पष्ट करा.**

(अ) आकर्षक मांडणी (आ) भाषाशैली

**(३) थोडक्यात माहिती लिहा.**

(अ) माहितीपत्रकाची गरज असणारी क्षेत्रे.

(आ) माहितीपत्रक म्हणजे अप्रत्यक्षपणे जाहिरातच.

**(४) माहितीपत्रकाची उपयुक्तता तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**(५) महाराष्ट्रीयन पद्धतीचे सुग्रास भोजन उपलब्ध करून देणाऱ्या भोजनगृहाचे माहितीपत्रक तयार करण्यासाठी कोणकोणते मुद्दे आवश्यक राहतील ते लिहा.**

**(६) एका वस्त्रदालनाचे आकर्षक माहितीपत्रक तयार करा.**

तुमच्या आवडीची! तुमच्या पसंतीची!! तुमच्या मनातली!!!

# हुरडा पार्टी

## योगेश फार्म्स

तगरे वस्ती, बार्शी

मोबाईल :– ८८××××××५१, दूरध्वनी :– (०२१८४) २५××७१

वेबसाईट :– http://www.farms.com

ई–मेल :– ygfarmsbar199@gmail.com



* हिवाळा येतो आणि हुरडा पार्टीच्या आठवणी ताज्या होतात. आमची हुरडा पार्टी म्हणजे हिवाळ्यातील सर्वोत्तम 'सेलिब्रेशन'च!
* दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आम्ही आमच्या 'योगेश फार्म्स'वर हुरडा पार्टीचे बुकींग सुरू केले आहे. तुम्ही कधी येत आहात?
* लवकर या. तुमच्या स्वागतासाठी 'योगेश फार्म्स' उत्सुक आहे.

संपूर्ण दहा एकराच्या निसर्गरम्य परिसरातील '**योगेश फार्म्स**'वर तुम्ही अनुभवाल जलतरणासाठी तलाव, गर्द हिरवाई, फुलांचे ताटवे, पक्ष्यांचे थवे!

## आमच्या हुरडा पार्टीची वैशिष्ट्ये

* गरमागरम, गोड, ताजा हुरडा! अगदी तुमच्या समोर भाजून मिळेल.
* यथेच्छ हुरडा. भरपूर आस्वाद घ्या.
* हुरड्यासोबत :- मडक्यातले दही, ताजे मसाला ताक, लसणीची झणझणीत चटणी, खोबरे, गूळ.

याशिवाय तुमच्या आवडीनुसार काकडी, टोमॅटो, गाजर, कांदा, मुळा, कोथिंबीर, भरली वांगी इत्यादी.

**महाराष्ट्रीय पद्धतीचे चवदार 'भोजन' ही आमची खासियत.**

## हुरड्यासोबत याची सुद्धा मौज लुटा.

- बैलगाडीतून, घोड्यावरून फेरफटका
- जलतरण
- नौकानयन
- ग्रामीण खेळ (सूरपारंब्या, विटीदांडू, पतंगबाजी, चकारी)
- सायकलफेरी

वेळ : सकाळी १० ते सायं.७.००

प्रवेश फी : प्रौढांसाठी (रू.५००/-)

लहान मुलांसाठी (रू.२००/-)

१० पेक्षा जास्त जणांच्या गटाला विशेष सवलत.

शाळा, कॉलेज आणि बचतगटांनाही खास सवलत.

## परत जाताना आपल्याबरोबर काय काय घेऊन जाल?

- शेतातल्या ताज्या भाज्या.
- रसरशीत फळे.

आणि

भरपूर आनंद, ऊर्जा, उत्साह, पुढच्या वर्षी परत येण्याची तीव्र इच्छा!

# ३. अहवाल

## ◈ प्रास्ताविक

शाळा-महाविद्यालयांमध्ये वक्तृत्वस्पर्धा, क्रीडास्पर्धा, स्नेहसंमेलने असे अनेक कार्यक्रम संपन्न होत असतात. तसेच शासकीय, सामाजिक, आर्थिक संस्थांचेही कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमानंतर त्यांचे अहवाल लिहिले जातात. असे अहवाल भविष्यकाळात विविध प्रकारे उपयुक्त ठरतात. अहवालामुळे वाचकाला समारंभाचा, कार्यक्रमाचा तपशील माहीत होतो. म्हणूनच अहवाल म्हणजे काय, अहवालाची आवश्यकता का असते, अहवालाचा आराखडा कसा असतो, अहवाल लिहिताना कोणती काळजी घ्यावी इत्यादी संबंधीची माहिती आपणाला असायला हवी. त्यामुळे अहवालाचे वाचन आणि लेखन करणे सुलभ होते.

## ◈ स्वरूप

एखाद्या कार्यालयात, संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे 'अहवाल लेखन' होय. ही नोंद करताना त्यात कार्यक्रमाचा हेतू, तारीख, वेळ, सहभागी व्यक्ती, प्रतिसाद, समारोप अशा विविध मुद्द्यांचा समावेश केलेला असतो. कार्यक्रम, समारंभ प्रत्यक्षात सुरू झाल्यापासून ते थेट तो समारंभ, कार्यक्रम संपेपर्यंत क्रमाक्रमाने कसा पूर्ण होत गेला याची आवश्यक तेवढ्या तपशीलांसह लेखी नोंद अहवालात केली जाते.

एखाद्या विषयातील समस्येच्या संबंधाने माहितीच्या संकलनाचे, सर्वेक्षणाचे, विशिष्ट विषयासंबंधी नेमलेल्या आयोगाचे अहवाल असतात. तसेच प्रगती अहवाल (प्रोग्रेस रिपोर्ट), तपासणी अहवाल (इन्व्हेस्टिगेशन रिपोर्ट), चौकशी अहवाल, आढावा अहवाल, मासिक अहवाल आणि वार्षिक अहवाल अशा स्वरूपाचे अनेकविध अहवाल असतात.

## ◈ आवश्यकता

कार्यक्रमांच्या, समारंभांच्या नोंदी ठेवल्या नाहीत तर भविष्यकाळात संस्थेचा विकास, परंपरा इत्यादींची माहिती मिळवण्यात अडचणी येतात. तसे होऊ नये यासाठी अहवाल लिहिणे आवश्यक ठरते. भविष्यकालीन नियोजनासाठीही अहवाल आवश्यक असतात. विविध संस्था, लघुउद्योग ते मोठमोठे उद्योगधंदे आणि ग्रामपंचायत ते महानगरपालिका अशा सर्व ठिकाणी होणाऱ्या घडामोडींना अधिकृतता प्राप्त व्हावी यासाठी अहवालाची गरज असते. एखाद्या समस्येच्या संदर्भात योग्य निर्णय घ्यायचा असेल, सार्वजनिक क्षेत्रात एखादा महत्त्वाकांक्षी उद्योग किंवा उपक्रम सुरू करायचा असेल तर अगोदर त्या संदर्भात योग्य ती माहिती घेऊन अहवाल तयार करणे आवश्यक असते.

## ◈ अहवालाचा आराखडा

अहवाल नेमका कशाचा लिहायचा आहे यावर त्या अहवालाचा आराखडा अवलंबून असतो. एखाद्या संस्थेचे कार्यक्षेत्र, विषय इत्यादींनुसार अहवालाच्या आराखड्याचे मुद्दे बदलतात. महाविद्यालयातील एखाद्या वक्तृत्व स्पर्धेचा अहवाल आणि क्रीडास्पर्धेचा अहवाल यांच्या आराखड्यातील मुद्दे वेगवेगळे असू शकतात. कारण स्पर्धांचे स्वरूप वेगळे वेगळे असते.

विषयाच्या स्वरूपानुसार अहवालांचे लेखन, त्यांची रचना, त्यांचे घटक, मुद्दे, क्रम, म्हणजे एकूणच आराखडा काही प्रमाणात वेगळा असतो.

## ◈ अहवालाची प्रमुख चार अंगे

(१) प्रास्ताविक (अहवालाचा प्रारंभ)

(२) अहवालाचा मध्य (विस्तार)

(३) अहवालाचा शेवट (समारोप)

(४) अहवालाची भाषा

एक नमुना म्हणून आपण एका सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अहवाल लेखनाचा आराखडा नेमका कसा असू शकेल, ते मुद्द्यांच्या स्वरूपात पाहूया.

**अहवालाचा विषय :** 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' समारोप समारंभाचा अहवाल. या पंधरवड्यात आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचा एकत्रित अहवाल लिहावा.

(१) **प्रास्ताविक–** इथे खालील बाबींचा (मुद्दे, विषय) समावेश असणे अपेक्षित आहे. समारंभाचा विषय, समारंभाचे स्थळ, दिनांक, वार, वेळ, स्वरूप, अध्यक्षांचे नाव-पद, प्रमुख पाहुण्यांचे नाव-पद. समारंभाच्या आयोजकांचे नाव-पद, अन्य उपस्थितांचा उल्लेख. या सर्वांचे शाब्दिक स्वागत. दीपप्रज्वलन/प्रतिमापूजन/ईशस्तवन/स्वागतगीत यांचाही उल्लेख प्रास्ताविकात केला जातो.

(२) **मध्य–** मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा हेतू, पंधरवड्याचे नियोजन, कोणाकोणाचा सहभाग होता, नेमके कोणकोणते उपक्रम झाले, त्या उपक्रमांचे फलित काय मिळाले, या संदर्भात पुढील योजना, नियोजन काय असणार आहे, यांबाबत क्रमबद्ध, मुद्देसूद विवेचन करणे अपेक्षित असते. संबंधित कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनोगतही इथे लिहिणे अपेक्षित असते. प्रमुख पाहुण्यांचे विचार, अध्यक्षांचे भाषण, निवडक दोन-तीन उपक्रमांच्या सादरीकरणावरील भाष्य, पारितोषक वितरण समारंभ यांचा उल्लेख अपेक्षित असतो.

(३) **समारोप–** मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा हेतू कितपत साध्य झाला हे लोकांच्या प्रतिसादावरून आजमावून त्याचा उल्लेख अहवालात करावा.

याचप्रमाणे कोणत्याही कार्यक्रमातील उल्लेखनीय बाबी, त्रुटी आणि यशस्वीता यासंबंधीचा निष्कर्षाच्या स्वरूपातील अभिप्राय समारोपात नोंदवून अहवाल पूर्ण करणे अपेक्षित असते.

(४) **अहवालाची भाषा–** मराठी भाषेचे स्थान, महत्त्व, सद्यस्थिती याबाबतीत या पंधरवड्यात आयोजित केलेले उपक्रम आणि कार्यक्रम यांना अनुसरून योग्य त्या औपचारिक भाषेत अहवाल लिहावा.

संस्थेचे कार्यक्षेत्र, विषय, कार्यक्रमाचे स्वरूप इत्यादींनुसार अहवालात विशिष्ट संज्ञा, पारिभाषिक शब्दयोजना करावी लागते. त्यानुसार त्या-त्या क्षेत्रातील अहवालाची ठरावीक भाषा विकसित झालेली असते. अशा ठरावीक भाषेचा वापर अहवाल लेखन करताना केला जातो.

## ◈ अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये

(१) **वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता–** अहवालाच्या स्वरूपानुसार त्यामध्ये तारीख, वार, वेळ, ठिकाण, सहभाग घेणाऱ्यांची नावे, पदे, घटना, हेतू, संख्यात्मक माहिती, निष्कर्ष इत्यादी अनेक महत्त्वाच्या वस्तुनिष्ठ बाबींच्या नोंदी आवर्जून आणि अचूकतेने केलेल्या असतात. त्या नोंदी पूर्णत: सुस्पष्ट असतात.

(२) **विश्वसनीयता–** अहवालातील विश्वासार्ह माहिती आणि तथ्यांच्या नोंदीमुळे अहवालाला विश्वसनीयता प्राप्त होते. या विश्वसनीयतेमुळेच अनेकदा गुंतागुंतीच्या समस्यांमध्ये असे अहवाल पुरावा म्हणूनही वापरले जातात. हे त्या अहवालांचे खास वैशिष्ट्य असू शकते.

(३) **सोपेपणा–** शक्यतोवर सर्वसामान्य व्यक्तीलाही अहवालाचा आशय समजावा अशी अपेक्षा असते. हे गृहीत धरून जेव्हा अहवाल लिहिला जातो तेव्हा साहजिकच त्याची भाषा ही सोपी असते. गरज नसेल

तर त्यात बोजड शब्द, फारसे तांत्रिक शब्द वापरले जात नाहीत. विनाकारण आलंकारिक वर्णनशैली, नाट्यपूर्णता, अतिशयोक्ती इत्यादी गोष्टी अहवालात टाळल्या जातात; परंतु अहवालात त्या त्या क्षेत्राशी संबंधित संज्ञा, प्रक्रिया याविषयीचे पारिभाषिक शब्द वापरले जातात.

(४) **शब्दमर्यादा–** अहवालाच्या विषयावर/स्वरूपावर अहवालाची शब्दमर्यादा अवलंबून असते. सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडाविषयक इत्यादी प्रकारचे स्थानिक पातळीवरील अहवाल आटोपशीर असतात. सहकारी संस्थांचे, वार्षिक सर्वसाधारण सभांचे अहवाल तुलनेने विस्तृत असतात. त्यांचे स्वरूप निश्चित असते.

एखाद्या समस्येच्या/उपक्रमाच्या संदर्भात संशोधनात्मक अहवाल, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगव्यवसाय, सार्वजनिक सेवा (शहरातील बस वाहतूक) यांच्यासंदर्भातील अहवाल खूपच विस्ताराने लिहिले जातात. त्यात भरपूर माहिती, आकडेवारी, निरीक्षणे, तपशील, निष्कर्ष नोंदवलेले असतात. एखाद्या समारंभाचा अहवाल तीन–चार पृष्ठांचा असतो, तर एखाद्या आयोगाचा अहवाल सुमारे १००० किंवा अधिक पृष्ठांचा असू शकतो.

(५) **नि:पक्षपातीपणा–** अहवालाचा विषय कोणताही असो, प्रकार कुठलाही असो सर्वच प्रकारच्या अहवालांचे एक सामाईक वैशिष्ट्य म्हणजे त्या अहवालाचा नि:पक्षपातीपणा. अहवाल लेखकाला संबंधित विषयाला बाध आणणारी स्वत:ची एकांगी मते, एककल्ली विचार अहवालात आणता येत नाहीत. स्वत:च्या मर्जीनुसार अहवाल लेखन करता येत नाही. वास्तवदर्शी लेखन हा अहवालाचा आत्मा आहे. त्या त्या समारंभामध्ये, सभेमध्ये, संशोधनामध्ये अहवाल लेखकाने काय काय अनुभवले, पाहिले, ऐकले याविषयीचे खरेखुरे लेखन अहवालात आलेले असते.

## ◈ अहवाल लेखन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी

अहवाल लेखन हा जरी एखादा लालित्यपूर्ण साहित्यप्रकार नसला तरी अहवाल लेखन ही एक कला आहे. शिक्षणाच्या संदर्भात सुप्रसिद्ध कोठारी कमिशनच्या अहवालातील पहिलेच वाक्य 'द डेस्टिनी ऑफ इंडिया इज बीईंग शेप्ड् इन हर क्लासरूम्स!' (भारताच्या भवितव्याची जडणघडण शाळांमधील वर्गखोल्यांमध्ये होत आहे!) असे आहे. अशा प्रकारची लालित्यपूर्ण, मार्गदर्शक व प्रेरक वाक्ये, विचार यांमुळे अहवाल लेखनाला लालित्याचा स्पर्श होतो. गरजेनुसार त्यांचा उपयोग करता येतो.

अहवाल लेखन करताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) अहवाल लिहिणाऱ्या व्यक्तीला संबंधित विषयाची चांगली जाण हवी.

(२) जे घडले, जसे घडले त्यावर आधारित अहवाल लेखन करता आले पाहिजे.

(३) अहवाल लेखनासाठी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक असते. विशेषत: सांस्कृतिक कार्यक्रमांचे अहवाल लेखन करताना बोलके आणि सजीव चित्र उभे करता आले पाहिजे, तर संशोधनात्मक स्वरूपाच्या अहवालात योग्य पारिभाषिक शब्दावली आणि वस्तुनिष्ठता महत्त्वाची असते.

(४) सारांशरूपाने संक्षिप्त लेखन करता आले पाहिजे.

(५) सहज, सोपी, स्वाभाविक लेखनशैली असावी. अति आलंकारिक, नाट्यपूर्ण, अतिशयोक्तीपूर्ण वर्णन नसावे.

(६) व्यक्तींची नावे, व्यक्तींची पदे चुकीची दिली जाऊ नयेत. तसेच घटनाक्रमही चुकवू नये. अहवाल लिहिताना आवश्यक त्या तांत्रिक गोष्टींचा (मथळा, तारीख, वेळ, स्थळ, प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, नावे, पदे इत्यादी) विसर पडता कामा नये.

(७) अहवालाच्या विषयाचे स्वरूप, वेगळेपण, वैशिष्ट्य बारकाव्याने टिपता आले पाहिजे. यासाठी अहवाल लेखकाकडे सूक्ष्म आकलन आणि निरीक्षणशक्ती असली पाहिजे.

(८) अहवाल लेखनात विषयाला विसंगत असलेले स्वमत, स्व-विचार लिहू नयेत.

(९) अहवाल हा संबंधित कार्यक्रम आणि विषयाच्या स्वरूपानुसार लिहिलेला असावा. तो अपुरा, अर्धवट, विस्कळीत असू नये.

(१०) अहवाल लिहून झाल्यानंतर त्याखाली संबंधित अध्यक्ष आणि सचिव यांची मान्यतेस्तव स्वाक्षरी केलेली असावी.

### ◈ समारोप

अहवाल हे त्या-त्या संस्थेतील कार्यक्रमांचे महत्त्वाचे दस्तऐवज असतात. म्हणून त्यांचे लेखन योग्य ती दक्षता घेऊनच करावे लागते. संस्था, कार्यालयाच्या कार्याचा दीर्घकालीन आढावा घेण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो. त्यामुळे ते जतन करून ठेवावे लागतात.

## कृती

**(१) अहवालाचे स्वरूप स्पष्ट करा.**

**(२) अहवालाची आवश्यकता लिहा.**

**(३) वास्तवदर्शी लेखन हा अहवालाचा आत्मा आहे, हे विधान स्पष्ट करा.**

**(४) अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये खालील मुद्द्यांना अनुसरून स्पष्ट करा.**

(१) वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता (२) शब्दमर्यादा (३) नि:पक्षपातीपणा

**(५) अहवाल लेखन करताना लक्षात घ्यावयाच्या दोन बाबी सोदाहरण स्पष्ट करा.**

**(६) खालील विषयांवर अहवालाचे लेखन करा.**

(अ) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील स्नेहसंमेलन.

(आ) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील वृक्षारोपण कार्यक्रम.

❀❀❀

### अहवाल लेखनाचा नमुना

**भारत शिक्षण संस्थेचे, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय आणि कला, वाणिज्य, विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, भुसावळ, जिल्हा जळगाव**

**वार्षिक पारितोषक वितरण समारंभ सन २०१९-२०**

**अहवाल**

गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर २०१९ रोजी दुपारी चार वाजता विद्यालयाच्या भव्य प्रांगणात सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक पारितोषक वितरण समारंभ मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला.

समारंभाचे अध्यक्षस्थान जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी उद्योगपती मा. श्री. बाबासाहेब शिंगाडे यांनी भूषवले होते. मुंबई येथील नामवंत लेखिका श्रीमती हेमाताई रणपिसे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. समारंभास भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, खजिनदार व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे सर्व अध्यापक, निमंत्रित नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाच्या सुरुवातीला प्रा. लक्ष्मण जाधव यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी समारंभात संपन्न होणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली. त्यानंतर प्रा. माधवी कुलकर्णी यांनी समारंभास उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले. स्वागतगीताच्या माध्यमातून इयत्ता बारावी कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे संगीतमय स्वागत केले. स्वागतगीतानंतर इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे सेवक समीर सावंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

उपस्थित पाहुण्यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या हृद्य सत्कारानंतर विद्यालयाचे प्राचार्य विद्यानंद सोनटक्के यांनी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात उच्च माध्यमिक विद्यालयात झालेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडाविषयीच्या घडामोडींचा वृत्तान्त सादर केला. यावेळी त्यांनी उच्च माध्यमिक विद्यालयातील अध्यापक आणि विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा सादर केला.

यानंतर मैदानी क्रीडास्पर्धा, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी खेळाडू, सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी खेळाडू, सर्वोत्तम संघ तसेच सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धांची पारितोषके वितरीत करण्यात आली. या वर्षाची सर्वोत्तम सांघिक कौशल्याची ढाल बारावीच्या कबड्डीच्या संघाने पटकावली, तर सर्वोत्तम खेळाडूच्या सुवर्ण चषकावर अकरावीच्या भारती शहा या विद्यार्थिनीचे नाव कोरले गेले. क्रीडा स्पर्धांच्या पाठोपाठ वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा इत्यादी विविध स्पर्धांची पारितोषके वितरीत करण्यात आली. सलग अर्धा तास चाललेल्या पारितोषक वितरण समारंभात सुवर्ण, रौप्य, कांस्य अशी एकूण वीस सांघिक, चाळीस वैयक्तिक तसेच इतर विभागांची पंधरा अशी एकूण पंच्याहत्तर पारितोषके देण्यात आली. ढोल, ताशा आणि लेझीमच्या तालावर पारितोषक प्राप्त विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्या माननीय हेमाताई रणपिसे आणि अध्यक्ष बाबासाहेब शिंगाडे यांच्या हस्ते पारितोषके स्वीकारली.

पारितोषक वितरणानंतर माननीय हेमाताईंनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, ''काळ झपाट्याने बदलतो आहे. सर्व क्षेत्रांत स्पर्धा तीव्र झाली आहे. अशा वेळी परीक्षेतल्या गुणांबरोबरच आता तुमचे व्यक्तिमत्त्व, वर्तन, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, संवेदनशीलता या गोष्टींनाही खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. उत्तुंग यश मिळवण्यासाठी तुमच्याजवळ प्रबळ आत्मविश्वासाचे पाठबळ असले पाहिजे.''

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. बाबासाहेब शिंगाडे यांनी त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील संघर्षयात्रा विद्यार्थ्यांपुढे उलगडून दाखवली. त्यानंतर ते म्हणाले, ''तुम्ही सातत्याने प्रयत्न करत राहा. कितीही प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले तरी संघर्ष करा. कृतिवंत व्हा. धडपडे व्हा. 'केल्याने होत आहे रे' हा मंत्र सतत आचरणात आणा, मग तुम्ही विजयश्री नक्कीच खेचून आणाल. देशाचे उत्तम नागरिक व्हा. स्वतःबरोबर आपले मातापिता, गुरुजन आणि देशाचे नाव उज्ज्वल करा.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पारितोषकप्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन विद्यार्थी प्रतिनिधी माधवी परांजपे आणि महेश देशमुख यांनी केले. आभारप्रदर्शन संस्कृत विभागाचे प्रा. देशमाने यांनी केले.

अडीच तास रंगलेल्या या कार्यक्रमाची सांगता सायंकाळी साडेसहा वाजता झाली.

**दि. ............** **सचिव** **अध्यक्ष**

❖❖❖

# ४. वृत्तलेख
## (फिचर रायटिंग)

### ◈ प्रास्ताविक

आपले जीवन बातम्यांनी व्यापले आहे. आपण आकाशवाणीवरील बातम्या ऐकतो, दूरचित्रवाणीवरील बातम्या पाहतो आणि ऐकतो. वर्तमानपत्रातील बातम्या वाचतो. बातमी वाचली तरी वाचकांच्या मनातील जिज्ञासा संपत नाही. बातमीत वस्तुनिष्ठ माहिती असते. बातमी ज्या प्रसंगावर आधारित असते, त्या पलीकडील वाचकांची जिज्ञासा शमवण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रास करावा लागतो. वर्तमानपत्राचा उद्‌देश माहिती देणे, लोकजागृती करणे, लोकशिक्षण करणे, मनोरंजन करणे हा आहे. बातमीत जे घडले, ते जसे आहे तसेच द्यावे लागते. बातमीत 'मी' असत नाही, तर घडलेली घटना 'जशी आहे' 'तशी देणे' ही बातमीची गरज असते; परंतु बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती आणि तिचे सूक्ष्म धागेदोरे व वेगवेगळे तपशील हे वाचकांना वृत्तलेखात वाचावयास मिळतात.

### ◈ अर्थ आणि स्वरूप

अनेकदा बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देणे गरजेचे असते. मात्र बातमीत तो देता येत नाही. त्यासाठी वृत्तलेखाचा अवलंब केला जातो. त्याला इंग्रजीत 'फिचर' असे म्हणतात. ऑक्सफर्डच्या शब्दकोशात त्याचा अर्थ 'It is a non news article in a news paper' असा देण्यात आला आहे. त्याचा भावार्थ 'बातमीपलीकडचे खास असे काही, आकर्षक असे काही' असा होतो. वर्तमानपत्राचा जन्म पाश्चात्य देशात झाल्याने तेथील काही संकल्पना भारतीय वृत्तपत्रातदेखील रूजल्या. त्यापैकी एक म्हणजे फिचर, म्हणजेच वृत्तलेख. आता वृत्तलेख ही वर्तमानपत्रांची आणि वाचकांची गरज बनली आहे.

बातमी ज्या घटनेविषयी आहे, त्यासंबंधीचा तपशील, गोष्टी वाचकांपर्यंत पोहोचवण्याची गरज असते. ती गरज पूर्ण करण्यासाठी वृत्तलेख लिहिला जातो. फिचर म्हणजे 'नॉन न्यूज' असे म्हटले जात असले तरी वृत्तलेखाचा संबंध नेहमीच बातमीशी असतो. वृत्तलेख हा नेहमीच ताजा असावा लागतो. त्याला काही निमित्त असावे लागते. वृत्तलेख हा घडलेल्या, घडू पाहणाऱ्या घटनेशी संबंधित असतो. वृत्तलेखाला 'धावपळीतले साहित्य' असेही म्हणतात. वृत्तलेख तातडीचा असला तरी त्यामधील अचूकतेला महत्त्व असते. हे लेखन वास्तवावर आधारित असल्याने त्यात कल्पकतेला फारसा वाव नसतो. खरेतर बातमीचा आस्वाद घेण्यासाठी वृत्तलेख मदत करतात. वृत्तलेखात वाचकांच्या भावनांची दखल घेतली जाते. त्याचप्रमाणे यांतून वाचकांचे समाधानही महत्त्वाचे ठरते.

वृत्तलेख स्वतंत्र असतो. त्यातील मजकूर हा वैशिष्ट्यपूर्ण असतो. तसेच तो आकर्षकही असतो. वृत्तलेखाची भाषादेखील वाचकाला खिळवून ठेवणारी असते. वृत्तलेखाची भाषा सोपी, वाचकांना समजणारी, त्यांना आपलीशी वाटणारी, वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी, कमी शब्दांत अधिक आशय सांगणारी असते. सातत्यपूर्ण लेखनसरावानंतर ती कमवता येते. वृत्तलेख वाचकाला आनंद देणारा, माहिती देणारा, ज्ञान देणारा, मनोरंजन करणारा असतो. वाचकाला त्यात रस असतो, हे लेखन त्याची उत्सुकता वाढवणारे असते. वृत्तलेखाचा विषय, आशय, शैली, वाचकांच्या विचाराला चालना देणारी असते. वाचकांच्या विचाराला धक्का देण्याची ताकद वृत्तलेखात असते. मांडणी अत्यंत मुद्‌देसूद असते. आपल्या लेखातील मुद्‌द्यांच्या समर्थनार्थ माहितीशी संबंधित आलेख, नकाशा, छायाचित्र, व्यंगचित्र, आकडेवारीचा तक्ता वापरला जाऊ शकतो. त्यामुळे योग्य परिणाम साधला जातो. वृत्तलेख लिहिताना लिहिणारा स्वतःचा अनुभव आणि त्या विषयांच्या संदर्भाने असलेली तज्ज्ञता वापरत असतो.

## ◈ वृत्तलेखांचे प्रकार

विषय आणि लेखन प्रकारानुसार वृत्तलेखाचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**(अ) बातमीवर आधारित वृत्तलेख–** एखाद्या घटनेच्या, बातमीच्या संदर्भाने हा लेख लिहिलेला असतो. ज्या घटनेवर लेख लिहायचा आहे, त्या घटनेचा विस्ताराने विचार करावा लागतो. मात्र जी बातमी वर्तमानपत्रात छापून आलेली असते, तिच्यातील सर्व माहिती वृत्तलेखात नसते. तर त्या बातमीतील महत्त्वाच्या मुद्‍द्यांवर अशा वृत्तलेखात प्रकाश टाकला जातो. वृत्तलेखात त्या बातमीतील मुद्‍द्यांचे विश्लेषण केले जाते. लिहिणाऱ्याकडे त्या विषयाच्या संदर्भाने असलेली ताजी, स्वतंत्र माहिती असते. अनेकदा वृत्तलेख लिहिताना तज्ज्ञांशी बोलून, घटनेचा तळ गाठून लेखन करावे लागते. त्यामुळे वाचकांना नवे काही मिळाल्याचा आनंद असतो. वृत्तलेखासाठी विषयाच्या मर्यादा नसतात. तो राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, शहरी, ग्रामीण, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, राजकीय अशा विविध विषयांवर लिहिला जाऊ शकतो.

उदा., पर्यावरण, दिल्लीतील वाढते प्रदूषण– कारणे आणि त्याचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम, दळणवळणावरील गुंतवणूक, ग्रामीण भागातील पशुधनाची घटलेली संख्या व त्याचा समाजजीवनावर होणारा परिणाम.

**(आ) व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख –** अशा प्रकारच्या लेखात जसे असामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तीवर लिहिले जाते तसेच एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण कार्य असलेल्या सामान्य माणसाबद्‍दलदेखील लिहिले जाऊ शकते. एखाद्या क्षेत्रात मिळवलेले देदिप्यमान यश, केलेला संघर्ष व प्रयत्नांची पराकाष्ठा, एखाद्या समस्येवर मात करताना केलेला उपक्रम, कृती, केलेला विक्रम या संदर्भात वृत्तलेख लिहिले जातात. औचित्य साधून या प्रकारचे लेख लिहिले जातात. अनेकदा व्यक्तीला मिळालेला पुरस्कार, गौरव, वाढदिवस, अमृत महोत्सव, जयंती, पुण्यतिथी, जन्मशताब्दी यांसारख्या प्रसंगी व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख लिहिला जातो. या प्रकारातील वृत्तलेख लिहिताना त्या व्यक्तीसंबंधी झालेले पूर्वीचे लेखन, चरित्र, आत्मचरित्र, त्यांच्यासोबत काम केलेल्या व्यक्ती, सहकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन देखील या प्रकारचे वृत्तलेख उत्तम स्वरूपात तयार करता येतात. वाचकांच्या पुढे केवळ जीवनपट मांडणे अपेक्षित नसते. आकडेवारी, सनावळ्या, परिचय एवढ्यापुरते ते लेखन मर्यादित नसते. त्यामध्ये त्या व्यक्तीची जीवनशैली, वेगळेपण, दृष्टिकोन, खास शैली, सवयी, वैशिष्ट्ये असा व्यक्तिगत स्पर्श असतो. भावनिक स्पर्श हे अशा प्रकारच्या लेखाचे वैशिष्ट्य असते.

उदा., पोपटराव पवार, बीजमाता राहीबाई पोपेरे, डॉ. श्रीराम लागू इत्यादी.

**(इ) मुलाखतीवर आधारित वृत्तलेख–** विविध क्षेत्रात वेगवेगळे लोक स्वतःचे कर्तृत्व सिद्‍ध करत असतात. प्रसारमाध्यमांसाठी त्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. त्या मुलाखतीचा भाग लेख स्वरूपात वृत्तपत्रात प्रकाशित केला जातो. या लेखातून व्यक्तीच्या कर्तृत्वाची बाजू, संशोधन, मतप्रणाली, त्यांचा दृष्टिकोन, त्यांनी निवडलेले क्षेत्र, एखादा अविस्मरणीय प्रवास, स्वतःच्या क्षेत्रात मिळवलेले अभूतपूर्व यश, अनुभव या संदर्भाने त्यात मांडणी केली जाते. सर्वसाधारण लोकांना जे माहीत आहे त्यापेक्षा वेगळे काही मांडण्याचा प्रयत्न या प्रकारच्या लेखात केला जातो. मुलाखत देणाऱ्या व्यक्तीची स्वतःची म्हणून जी काही भूमिका असते ती या प्रकारच्या वृत्तलेखातून मांडली जाते. त्यातून त्या माणसाच्या कर्तृत्वाची उंची व संबंधित क्षेत्रातील योगदान अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जातो.

उदा., गिर्यारोहक, संशोधक, नामवंत लेखक, कवी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती यांच्या मुलाखतींवर आधारित लेख इत्यादी.

(ई) **ऐतिहासिक स्थळांविषयी वृत्तलेख–** गावे, स्थळे, वास्तू यांना ऐतिहासिक संदर्भ असतात. काही ठिकाणी संशोधन करताना उत्खनन होत असते. संशोधनाच्या माध्यमातून जुनी कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट आदी संदर्भात नवनवीन माहिती समोर येत असते. अनेकदा संशोधक जुन्या माहितीच्या संदर्भात संशोधनात्मक अभ्यासातून एखाद्या वास्तू किंवा स्थळावर प्रकाशझोत टाकत असतात. त्या नव्या माहितीच्या संदर्भात प्राचीन माहितीचा उपयोग करून लेख लिहिता येतो. ग्रामीण परंपरेतील लोकसाहित्याच्या संदर्भांचा अभ्यास करून मांडणी करता येते. लिहिणारी व्यक्ती त्या स्थळाला भेट देते. त्याने जे पाहिले, अनुभवले त्या बाबतीत तो वृत्तलेख लिहिला जातो. एखाद्या इतिहास तज्ज्ञाशी झालेली चर्चा, त्यांचे व्याख्यान आणि त्यातून मिळालेल्या नव्या माहितीचा उपयोग करून ऐतिहासिक वृत्तलेख लिहिला जातो. अशा स्वरूपाच्या वृत्तलेखाची गरज म्हणून नकाशा, चित्रे, छायाचित्रे यांचा देखील वापर करता येतो.

उदा., अहमदनगर शहर, भुईकोट किल्ला, शनिवार वाडा, हेमाडपंथीय मंदिरांचे शिल्पकाम इत्यादी.

(उ) **नवल, गूढ, विस्मय इत्यादींवर आधारित वृत्तलेख–** एखादी विस्मयकारक घटना, कृती, निसर्गातील नवलाई यासंबंधीच्या अनुभवांवर आधारित हा लेख असतो. एखाद्या परिसरातील निसर्गाचे दृश्य हा जसा वृत्तलेखाचा विषय ठरतो त्याप्रमाणे एखादे गूढ, निसर्गातील एखादा चमत्कार हा देखील वृत्तलेखाचा विषय ठरतो. मात्र यासंबंधी लेखन करतांना आपण ज्यावर लिहीत आहोत त्या संबंधीची शहानिशा करणे, त्या संदर्भातील माहिती पारखून घेणे, चिकित्सा करणे आवश्यक ठरते. यामधील माहितीची विश्वासार्हता महत्त्वाची असते.

उदा., सांगलीत नदीच्या महापूराच्या पाण्याची पातळी ५८ फूट, हिमालयातील निसर्ग, रांजणखळगे, मोठा अपघात होऊनही एखाद्या बालकाचा प्राण वाचणे, डोक्यावरून पाणी वाहून जगवली वीस हजार झाडे.. इत्यादी स्वरूपाच्या घटना वृत्तलेखाचे विषय होतात.

वृत्तलेखांच्या वरील प्रकारांशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम, लोकरूचीचे विषय, खाद्यसंस्कृती इत्यादी विषयांवरही वृत्तलेख लिहिले जातात.

## ◈ वृत्तलेखासाठी विषय कसे सुचतात?

वर्तमानपत्रात काम करणाऱ्या व्यक्तीला भेटणाऱ्या व्यक्ती, प्रवास, अनुभव, निरीक्षण, विविध वर्तमानपत्रांतील बातम्या, पुस्तके, नियतकालिके, संकेतस्थळे, दूरचित्रवाणी या सारखी विविध साधने ही आपल्याला वृत्तलेख लिहिण्यासाठीचे विषय मिळवून देत असतात.

वृत्तलेखासाठीच्या विषयांचे स्रोत पुढील गोष्टींतून मिळू शकतात.

**(१) बातमी–** वर्तमानपत्रात प्रकाशित होणारी बातमी, नियतकालिकात लिहिले गेलेले विशेष वृत्त/वृत्तमाला वाचल्यानंतर; तसेच दूरचित्रवाणीवर दाखविलेली घटना पाहिल्यानंतर त्या अनुषंगाने मनात वृत्तलेखासंबंधी विचारांचे बीज तयार होत असते. त्या बातमीच्या मागे असलेल्या गोष्टी, संदर्भ, मुलाखत घेऊन त्या बातमीच्या संबंधाने उत्तम वृत्तलेखाची निर्मिती करता येते. बातमीकडे विविध अंगांनी पाहिले आणि त्या घटनेचा परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला वृत्तलेखासाठी अनेक विषय सहज मिळू शकतात.

उदा., "विजेशिवाय वाहनांच्या ट्यूबचे पंक्चर काढणे" अशी बातमी प्रकाशित झाल्यावर पंक्चर नेमके कसे काढले जाते? असे का करावे वाटले? त्यामागील प्रेरणा कोणती? त्यामुळे काय परिणाम साधला जाणार आहे? लोकांची सोय, विजेची बचत, त्यातून मिळालेला रोजगार अशा अंगाने हा वृत्तलेख लिहिला जाऊ शकतो.

**(२) व्यक्तिगत अनुभव–** पत्रकारितेच्या क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तीला अनेक घटना/प्रसंगांना सामोरे जावे लागते.बातमी मिळवताना अनेक अनुभव मिळत जातात. त्यातील काही अनुभव बातमीला मदत करतात. तर काही केवळ अनुभवाची शिदोरी वाढविण्यास मदत करतात; पण ते अनुभव वाया जात नाहीत. गतकाळातील असे अनुभव भविष्यातील एखाद्या वृत्तलेखासाठी मदत करणारे ठरतात.

'बसस्थानकावरील फेरीवाल्यांच्या संघटनेची स्थापना' अशी बातमी जेव्हा येते, तेव्हा त्यावर वृत्तलेख लिहितांना फेरीवाल्यांची संख्या, त्यांच्या व्यवसायातील कष्ट, वेळ, त्यांच्या कुटुंबांचे उदरभरण, रोजगाराचे उत्पन्न अशा मुद्द्यांवर वृत्तलेख लिहिला जाऊ शकतो. यात केवळ तपशीलाची नोंद अपेक्षित नसते तर त्यामधून त्यांच्या जीवनानुभवाचे दर्शन घडणे आवश्यक असते.

**(३) भेटीगाठी/संभाषण–** पत्रकारिता करणाऱ्या व्यक्तीला उत्तम लिहिता येण्यासाठी त्याचे भाषाज्ञान उत्तम हवे. तसेच व्यवसायाची गरज म्हणून उत्तम संवाद कौशल्य हवे असते. त्याला अनेक क्षेत्रात जाऊन बातमी मिळवावी लागते. त्यामुळे अनेकदा वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर संवाद साधावा लागतो, तर कधी शेतकरी, शेतमजूर, कलाकार, खेळाडू, विविध कंपन्यांचे व्यवस्थापक, लोकप्रतिनिधी यांच्याशी बोलताना अनेक मुद्द्यांना स्पर्श करावा लागतो. कधी कधी काही माणसे बोलत नाहीत तेव्हा त्यांना बोलते करण्याचे कौशल्य पत्रकारांकडे असावे लागते. त्यांच्याशी बोलताना अनेक विषय सहजतेने मिळून जातात.

या संभाषणातून एखाद्या व्यक्तीचे अनेक पैलू सहजतेने समोर येतात.विदर्भातील जमीन विकून भाताच्या जातीचे संशोधन करणारे दादाजी खोब्रागडे यांची शोधकथा वृत्तलेखासाठी विषय देऊन जाते. एखादा अधिकारी अशी घटना सहजपणे चर्चेत सांगून जातो. अशा व्यक्तींना, कुटुंबातील सदस्य, सहकारी यांना प्रत्यक्ष भेटून आणखी काही पैलू समोर येतात.

**(४) निरीक्षण–** पत्रकाराने चौकस असायला हवे. पत्रकाराला बातमीचे धागेदोरे मिळवावे लागतात. वृत्तलेखासाठी सूक्ष्म दृष्टी असावी लागते. आपल्या अवतीभोवती अनेक घटना घडत असतात. त्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करता येणे, त्यातील बातमी शोधता येणे व वृत्तलेखाचे विषय निवडता येणे महत्त्वाचे असते. वृत्तलेखासाठी निरीक्षणातून आणि अनुभवातून विवेचन, संदर्भ, कारणमीमांसा, परिणाम यांसारख्या गोष्टी समोर आणल्या जातात.

अंत्यविधीच्या ठिकाणी 'प्रेत जाळण्याचे काम करणारी महिला' ही बातमी आहे; पण त्या बातमीची अधिक माहिती घेतली तर आपल्याला वृत्तलेखाचा विषय मिळू शकतो. 'शेतीसाठी बैलांऐवजी माणसांचा वापर', 'खानावळ चालवून मुलाला केले जिल्हाधिकारी', 'बांधकामाचे साहित्य वरती नेण्यासाठी टाकाऊ मोटारसायकलाचा वापर' अशा कितीतरी गोष्टी आपल्या अवतीभोवती आपण पाहात असतो. त्यामधून वृत्तलेखाचे विषय मिळतात. मात्र त्यासाठी निरीक्षणात सातत्य ठेवावे लागते.

### ◈ वृत्तलेख लिहितांना विचारात घ्यायच्या बाबी

वर्तमानपत्रे सतत वाचकांची गरज शोधत असतात. वाचकांची बौद्धिक भूक कशी भागवली जाईल याचा विचार वर्तमानपत्राच्या व्यवस्थापनाला करावा लागतो. कारण वाचकांच्या संख्येवर वर्तमानपत्राची विक्री आणि जाहिराती मिळणे अवलंबून असते. या दोन्ही गोष्टी अर्थव्यवहाराशी निगडित असतात. त्या दृष्टीने वृत्तलेखासाठी देखील वाचकांची गरज आणि विषयाची निवड यांचा विचार करावा लागतो.

**(अ) वाचकांची अभिरूची–** आपले वाचक, त्यांची गरज, अभिरूची लक्षात घेऊन वर्तमानपत्रात लेखन करावे लागते. एखादे वृत्तपत्र ग्रामीण भागात प्रकाशित होते. त्याचा वाचक कोणत्या वर्गातील आहे, त्याची गरज काय आहे हे लक्षात घेऊन विषय, भाषा, आशय, त्यांची अभिरूची इत्यादींचा विचार

करून लेखन केले तरच वर्तमानपत्र वाचकांच्या हृदयावर अधिराज्य करू शकते. त्यामुळे वृत्तलेख लिहिताना वाचकांच्या अभिरूचीचा विचार करावा लागतो.

(आ) **तात्कालिकता–** वृत्तलेखाचे नियोजन करताना तात्कालिकतेचा विचार करावा लागतो. वृत्तलेख हा विशिष्ट निमित्ताने लिहिला जातो. त्यामागे तात्कालिक कारण असेल तर वाचक तो वृत्तलेख वाचतात. त्यासाठी त्याचे ताजेपण, समयोचितता साधली जाणे महत्त्वाचे असते.

(इ) **वेगळेपण–** वाचकांची उत्सुकता, जिज्ञासा समजून घेऊन वृत्तलेखाचे वेगळेपण जपणे महत्त्वाचे असते. वृत्तलेखाच्या आराखड्याचा विचार करताना त्यामधील वेगळेपण लक्षात घेण्याची गरज असते.

(ई) **वाचकांचे लक्ष वेधणे–** वृत्तलेखात विषयाच्या आरंभापासून ते त्याच्या शेवटापर्यंत वाचकांची उत्सुकता टिकली पाहिजे. त्यासाठी वृत्तलेख लिहिताना त्याचा एक आराखडा तयार करावा लागतो. त्यात साधारणपणे वृत्तलेखाचा विषय, त्याची मध्यवर्ती कल्पना, शीर्षक, पोटशीर्षक, विवेचन, त्यातील चित्रे, तक्ता, आलेख, नकाशा, छायाचित्रे या सर्वांचा विचार करावा लागतो. सदर चित्रे कोठे उपलब्ध होणार आहेत, कोणाकडून काढून घ्यायची आहेत हा विचार देखील करावा लागतो. वृत्तलेखाचा मजकूर जितका उत्तम हवा असतो तितकीच त्याची चित्रे देखील समर्पक व चांगली असावी लागतात. कारण एक चित्र हजार शब्दांचे काम करते असे म्हणतात. त्या अर्थाने वृत्तलेखाची उंची वाढवण्याचे काम समर्पक चित्रे करत असतात. या संबंधीचे नियोजन केले आणि त्यासाठीचे कच्चे टिपण, संदर्भ तयार करून ठेवले, तर वृत्तलेख लिहिणे सुलभ होते.

(उ) **वृत्तलेखाची शैली–** वृत्तलेखाचा प्रारंभीचा भाग बातमीसारखा असतो. वृत्तलेखाच्या पहिल्या भागात बातमीचा उलगडा झाला पाहिजे. 'कशावरती' आणि 'का' या संदर्भातील वाचकांच्या जिज्ञासेची पूर्ती प्रारंभीच्या भागात व्हावी लागते. त्यानंतर मधल्या भागात विवेचनाला संधी असते. अखेरच्या भागात समारोप करताना या वृत्तलेखातून काय अपेक्षित आहे, काय बदल घडावा असे वाटते, याचा विचार करावा लागतो. त्यामुळे वृत्तलेख लिहिताना भाषा सरळ, साधी व मनाला थेट भिडणारी असावी लागते. विवेचन करताना शब्दबंबाळपणा टाळावा लागतो. भाषा जड, समजण्यास कठीण असू नये. प्रदीर्घ वाक्ये नसावीत. छोटी छोटी वाक्ये असतील तर वाचकांना विषय समजून घेणे सोपे जाते. शेवटी आपण ज्या विषयासंबंधीचा वृत्तलेख लिहीत आहोत त्या विषयासंबंधीची वाचकांची जिज्ञासा शमली जात आहे ना, हे लक्षात घ्यायला हवे.

## ◈ समारोप

आधुनिक तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्राचे स्वरूप वेगाने बदलत आहे. त्याचबरोबर सध्याच्या अत्यंत वेगवान बनलेल्या 'ब्रेकिंग न्यूज 'च्या जमान्यात माध्यमांमुळे लोकांना घटना तात्काळ कळण्याचा वेग प्रचंड वाढला आहे. त्यामुळे अभ्यासू आणि लेखन क्षमता असणाऱ्या व्यक्ती वर्तमानपत्राला वृत्तलेख लिहिण्यासाठी हव्या असतात. अशा स्वरूपाची लेखन क्षमता असणाऱ्या व्यक्तींना वर्तमानपत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध असतात. वृत्तलेखांसाठी विशिष्ट रक्कमेचे मानधनदेखील दिले जाते. त्यामुळे बातमीच्या पलीकडचे आणि वाचकांची भूक शमवणारे लेखन करण्याची क्षमता मिळवली तर वर्तमानपत्रांच्या क्षेत्रात काम करण्याची संधी निश्चित मिळू शकते.

## कृती

(१) वृत्तलेख म्हणजे काय ते स्पष्ट करा.

(२) बातमी आणि वृत्तलेख यातील फरक स्पष्ट करा.

(३) वृत्तलेखाचे प्रकार लिहून, कोणत्याही एका प्रकाराविषयी सविस्तर माहिती लिहा.

(४) 'वृत्तलेख लिहिताना विचारात घ्यावयाच्या बाबी लिहा.

(५) थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) वृत्तलेखाची गरज
(आ) वृत्तलेखाचे स्रोत
(इ) वृत्तलेखाची भाषा
(ई) वृत्तलेखाची वैशिष्ट्ये

(६) वर्तमानपत्रातील एखादा वृत्तलेख मिळवा आणि त्यात आढळलेली वैशिष्ट्ये लिहा.

(७) बातमीवर आधारित वृत्तलेख लिहिताना करावयाची तयारी तुमच्या शब्दांत लिहा.

---

### बातमी

## नटसम्राट काळाच्या पडद्याआड

मुंबई, प्रतिनिधी
दि. १८

मराठी रंगभूमीचे अनभिषिक्त 'नटसम्राट', नाटककाराचे शब्द रसिक प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणारे विचारवंत अभिनेते आणि अभिनयाला आपल्या जीवनात शेवटपर्यंत परमोच्च स्थान देणारे व्यक्तिमत्त्व डॉ. श्रीराम लागू (वय ९२ वर्षे) यांचे पुणे येथील एका खासगी रुग्णालयात काल मंगळवार दिनांक १७ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी ज्येष्ठ अभिनेत्री दीपा आणि मुलगा आनंद असा परिवार आहे. 'वेड्याचं घर उन्हात', 'जगन्नाथाचा रथ', 'गिधाडे', 'काचेचा चंद्र', 'आधे अधुरे' या नाटकांमधील त्यांच्या भूमिका खूप गाजल्या. 'सूर्य पाहिलेला माणूस' हे त्यांचे रंगभूमीवरील अखेरचे नाटक ठरले. 'पिंजरा', 'सिंहासन', 'सामना', 'मुक्ता' या चित्रपटांतील त्यांच्या अभिनयाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली होती. मराठीप्रमाणेच डॉ. लागू यांनी हिंदी चित्रपटांमध्येही भूमिका साकारल्या होत्या. 'लमाण' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

---

## ❋ 'अभिनय सूर्य' मावळला ❋

मराठी नाट्यसृष्टीतील अनभिषिक्त नटसम्राट, मराठी नाट्यसृष्टीला दृष्टी देणारा कलाकार, माणसाला 'माणूस' म्हणून जगण्याची ताकद देणारा कलावंत, स्वतःच्या विचारांवर निस्सीम प्रेम करणारा आणि जगताना विवेकशीलतेची कास धरणारा कलावंत म्हणून डॉ. श्रीराम लागू यांचे कलाक्षेत्रातील योगदान लक्षणीय आहे. दिनांक १७ डिसेंबर २०१९ रोजी पुणे येथे वयाच्या ब्याण्णवाव्या वर्षी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने जणू अभिनयाचा सूर्य मावळला आहे.

रंगभूमीवरील कलाकार हा समाजाचा घटक असतो. कलाकाराला स्वतःचा विचार असतो आणि सामाजिक प्रक्रियेत त्याचीही एक भूमिका असते. समाज समृद्ध करण्यासाठी कलाकारांनी विचारांची धुरा वाहायला हवी. यादृष्टीने मनात सतत विचार आणि विवेक ठेवून आपल्या भूमिकेला न्याय देणारे डॉ. लागू हे उच्च दर्जाचे कलावंत होते. सामाजिक जाणिवा सतत जागृत ठेवून हा नटसम्राट दैनंदिन जीवनात सुद्धा स्वत:ला पटलेली वैचारिक भूमिका घेऊन कायम एका उंचीवर वावरत राहिला. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुलाने त्याच क्षेत्रात नाव कमवावे या त्यांच्या आई-बाबांच्या अपेक्षा होत्या. त्यांच्या पूर्ततेसाठी त्यांनी काही काळ वैद्यकीय क्षेत्रातही आपला वावर कायम ठेवला; पण त्या पलीकडे स्वतःचा आनंद आणि जबाबदारी याचे भान ठेवून एका विशिष्ट काळानंतर आपल्या आवडत्या कलाक्षेत्रात स्वतःला झोकून दिले. वसंत कानेटकर यांच्या 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकातील भूमिकेने त्यांचा नाट्यसृष्टीतील प्रवास सुरू झाला. त्या नाटकातील भूमिकेने त्यांना स्वतःची पाऊलवाट दिसू लागली. त्यानंतर रंगमंचावरील प्रवासात त्यांनी पुन्हा मागे वळून पाहिले नाही.

मराठी चित्रपटसृष्टीतील 'पिंजरा' या सिनेमातील डॉ. लागू यांची भूमिका मराठी रसिकांच्या मनावर कायमच अधिराज्य गाजवणारी ठरली. कसलेल्या अभिनयाच्या माध्यमातून समाजमनावर परिणाम करता येतो हे त्यांच्या नाटक, सिनेमांतील भूमिकेतून अनेकदा सिद्ध झाले आहे. 'नटसम्राट' नाटकाच्या माध्यमातून आप्पा बेलवलकरांची भूमिका रंगमंचावर उभी करताना त्यांनी रसिकांच्या डोळ्यांत अश्रू उभे केले होते. अनेकांना त्यांच्या अभिनयाने विचारप्रवृत्त केले. भूमिकेत शिरून ती भूमिका रसिकांच्या मनावर कोरली जाईल इतके निस्सीम प्रेम त्यांनी नाटक, सिनेमातील भूमिकांवरती केले होते. जेव्हा कलेवर आपले प्रेम असते, तेव्हा जिवंत अनुभव देता येतो, हे डॉ. लागू यांच्या आयुष्याकडे पाहिल्यावर लक्षात येते. आपल्या आयुष्यात त्यांनी सुमारे दोनशेहून अधिक मराठी, हिंदी व गुजराती चित्रपटात भूमिका केल्या. सुमारे पन्नासच्या आसपास नाटके रंगमंचावर सादर करून त्यांनी मराठी, हिंदी भाषक रसिकांच्या मनावर अभिनयाचे गारूड केले. त्यांना नाट्यसृष्टीतील व सिनेमासृष्टीतील योगदानाबद्दल अनेक नामवंत पुरस्कारांनी गौरवले गेले.

कलाकार हा विचारवंत असू शकतो या धारणेवर डॉ. लागूंच्या विचारसरणीने शिक्कामोर्तब झाले. अनेक वर्षांच्या तपश्चर्येनंतर त्यांनी आपली मते बनवली होती. ती मते विज्ञानवादी व विवेकशील होती आणि त्यात समाजाच्या उन्नतीची दृष्टी होती.

सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रपंच चालवण्याची जबाबदारी समाजाने उचलायला हवी, असे त्यांना वाटत होते. समाजासाठी झोकून देऊन काम करणारे सामाजिक कार्यकर्ते समाजाच्या विकासाची महत्त्वाची चाके आहेत. त्यामुळे समाजाने त्यांच्या प्रपंचाची काळजी वाहायला हवी असे त्यांचे मत होते. आपल्या विचारांची सोबत करणाऱ्या काही समविचारी सहकाऱ्यांना बरोबर घेऊन डॉ. लागू यांनी सामाजिक निधी निर्माण केला. या कामांमध्ये त्यांनी सक्रीय योगदान दिले होते.

'लग्नाची बेडी' या नाटकाच्या माध्यमातून 'सामाजिक कृतज्ञता निधी' निर्माण केला. बोलून थांबणारा नव्हे तर विचारांबरोबर कृतीला प्राधान्य देणारा कलावंत म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. म्हणून त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास कृतिशील राहिला आहे. डॉ. लागू संवेदनशील कलावंत होते. समाजाबद्दल त्यांच्या मनात प्रेम होते. त्यांच्या प्रत्येक प्रयत्नाला कृतज्ञतेची जोड होती.

आकाशाच्या उंचीचा हा कलावंत सतत जमिनीवर पाय ठेवून समाजात वावरत राहिला. यशाची उंची त्यांना कधीच माणसांपासून तोडू शकली नाही. आरोग्याची काळजी घेण्यासाठी सकाळी बागेत फिरायला जाणे व्हायचे. बागेत फिरता फिरता बाकावरती बसणे व्हायचे. अवतीभोवतीच्या माणसांच्या मनावर या माणसाच्या उंचीचे गारूड होते. त्यामुळे लागूंसोबत छायाचित्र काढण्याची अनेकांना इच्छा व्हायची. डॉ. लागू यांनी देखील त्यांना छायाचित्र घेण्याचा आनंद मिळवून दिला. इतक्या उंचीच्या कलावंताने सामान्य माणसासोबत देखील आपले नाते कायम जपून ठेवले होते.

डॉ. लागू यांचे विचार आणि त्यांचे जगणे यात अंतर पडले नाही. विचारांवरती प्रेम करत काळाच्या पडद्याआड गेलेले डॉ. लागू त्यांच्या नाट्य, सिनेसृष्टीतील योगदानामुळे कायम लक्षात राहतील. त्याचप्रमाणे समाजाला जागे करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची दखल इतिहासाला नक्कीच घ्यावी लागेल.

# व्याकरण व लेखन

## • व्याकरण

### वाक्यप्रकार व वाक्यरूपांतर

**• वाक्यप्रकार**

आपण बोलताना, लिहिताना अनेक प्रकारची वाक्ये वापरतो. एकच आशय अनेक प्रकारच्या वाक्यांतून सांगता येतो. उदा., 'काल खूप पाऊस पडला', हे वाक्य अनेक प्रकारे सांगता येते.

(१) काल फार पाऊस पडला. (विधानार्थी)

(२) काल काही कमी पाऊस पडला नाही. (विधानार्थी)

(३) काल काय कमी पाऊस पडला का? (प्रश्नार्थी)

(४) काल कमी तर पाऊस पडला नाही ना? (प्रश्नार्थी)

(५) किती अफाट पाऊस पडला काल! (उद्गारार्थी)

**वाक्याचे प्रकार**

(अ) आशयावरून आणि भावार्थावरून (आ) क्रियापदाच्या रूपावरून

**(अ) वाक्याच्या आशयावरून आणि भावार्थावरून वाक्याचे (१) विधानार्थी (२) प्रश्नार्थी (३) उद्गारार्थी असे प्रकार आढळतात. ही वाक्ये होकारार्थी किंवा नकारार्थी असू शकतात.**

(१) **विधानार्थी वाक्य–** ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते त्याला 'विधानार्थी वाक्य' असे म्हणतात.
उदा., (१) सचिन तेंडुलकर उत्तम फलंदाज आहे. (विधानार्थी)
(२) विटीदांडूचा खेळ अलीकडे फारसा खेळला जात नाही. (विधानार्थी)

(२) **प्रश्नार्थी वाक्य–** ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो त्याला 'प्रश्नार्थी वाक्य' म्हणतात.
उदा., (१) तू बाहेर केव्हा जाणार आहेस? (प्रश्नार्थी)
(२) तो स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण का झाला नाही? (प्रश्नार्थी)

(३) **उद्गारार्थी वाक्य–** ज्या वाक्यात मनातील विशिष्ट भाव उत्कटपणे व्यक्त केलेला असतो, त्या वाक्याला 'उद्गारार्थी वाक्य' असे म्हणतात.
उदा., किती छान आहे हे फूल! (उद्गारार्थी)

**(आ) क्रियापदाच्या रूपावरूनही वाक्याचे प्रकार पडतात.**

(१) **स्वार्थी वाक्य–** ज्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून नुसताच काळाचा बोध होत असेल तर त्याला 'स्वार्थी' वाक्य म्हणतात.
उदा., (१) मुले शाळेत गेली.
(२) खेळाडू मैदानावर सराव करतात.

(२) **आज्ञार्थी वाक्य–** ज्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, आशीर्वाद, प्रार्थना, विनंती, उपदेश आणि सूचना या गोष्टींचा बोध होत असेल तर त्या वाक्याला 'आज्ञार्थी' वाक्य म्हणतात.

उदा., (१) ती खिडकी लावून घे. (आज्ञा)

(२) तुम्ही नक्की यशस्वी व्हाल. (आशीर्वाद)

(३) देवा, मला सद्‌बुद्‌धी दे. (प्रार्थना)

(४) कृपया, मला तुझे पुस्तक दे. (विनंती)

(५) विद्‌यार्थ्यांनो, खूप मेहनत करा. (उपदेश)

(६) इथे पादत्राणे ठेवू नयेत. (सूचना)

(३) **विध्यर्थी वाक्य–** ज्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून विधी म्हणजे कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होत असेल तर त्याला 'विध्यर्थी' वाक्य म्हणतात.

(१) परिसर स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. (कर्तव्य)

(२) आज बहुतेक पाऊस पडेल. (शक्यता)

(३) अंगी धैर्य असणाराच कठीण काम करू शकतो. (योग्यता)

(४) विद्‌यार्थ्यांनी वर्गात शांतता राखावी. (इच्छा)

(४) **संकेतार्थी वाक्य–** ज्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमुक केले असते तर अमुक झाले असते अशी अट किंवा संकेत, असा अर्थ निघत असेल तर त्यास 'संकेतार्थी' वाक्य असे म्हणतात.

उदा., (१) पाऊस पडला असता तर हवेत गारवा आला असता.

(२) मला जर सुट्‌टी मिळाली तर मी गावी येईन.

## कृती

**(१) खालील वाक्ये वाक्याच्या आशयानुसार कोणत्या प्रकारात मोडतात ते लिहा.**

(१) गोठ्यातील गाय हंबरते.

(२) श्रीमंत माणसाने श्रीमंतीचा गर्व करू नये.

(३) किती सुंदर देखावा आहे हा!

(४) यावर्षी पाऊस खूप पडला.

(५) तुझा आवडता विषय कोणता?

**(२) खालील वाक्ये क्रियापदाच्या रूपानुसार कोणत्या प्रकारात मोडतात ते लिहा.**

(१) प्रार्थनेसाठी रांगेत उभे राहा.

(२) सरिताने अधिक मेहनत केली असती तर तिला उज्ज्वल यश मिळाले असते.

(३) विद्‌यार्थी कवायत करत आहेत.

(४) विद्‌यार्थ्यांनो सभागृहात गोंगाट करू नका.

(५) क्रिकेटच्या सामन्यात आज भारत नक्की जिंकेल.

## • वाक्यरूपांतर

वाक्यरूपांतराला ‘वाक्यपरिवर्तन’ असेही म्हणतात. आपण बोलत असताना एकाच स्वरूपाची वाक्ये बोललो तर ती ऐकणाऱ्याला कंटाळवाणी वाटतात. शिवाय त्यातून योग्य भाव पोहोचेलच असे वाटत नाही. तद्वतच लेखकाने एकाच साच्याची वाक्ये लिखाणात वापरली तर वाचणाऱ्याला कंटाळा येतो. आपल्या बोलण्यातून, लिहिण्यातून भाषेचा डौल, भाषेचे सौंदर्य व्यक्त व्हावे असे वाटत असेल, तर छोट्या छोट्या वैविध्यपूर्ण वाक्यांतून आपली भाषा डौलदार व परिणामकारक होईल असा प्रयत्न करावा. वाक्यरूपांतराची क्षमता आत्मसात करण्यासाठी वाक्यरूपांतर करायला शिकणे साहाय्यभूत ठरते.

वाक्यरूपांतर म्हणजे वाक्यरचनेत करावा लागणारा बदल होय. हा बदल करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी; ती म्हणजे, **वाक्याचे रूपांतर करताना वाक्याच्या रचनेत बदल होत असला, तरी वाक्याच्या अर्थात बदल होता कामा नये. वाक्यार्थाला बाध न आणता वाक्याच्या रचनेत केलेला बदल म्हणजे ‘वाक्यरूपांतर’ होय.**

उदा., लोकांचे दारिद्र्य पाहून मला दु:ख होते. (विधानार्थी–होकारार्थी)

लोकांचे दारिद्र्य पाहून मला आनंद होत नाही. (विधानार्थी–नकारार्थी)

प्रस्तुत वाक्यात मूळ वाक्याचा अर्थ बदलू न देता वाक्याचे रूपांतर केलेले आहे.

या इयत्तेत आपल्याला विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे वाक्यरूपांतर शिकायचे आहे.

### (अ) प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(१) जगात सर्व सुखी असा कोण आहे? (प्रश्नार्थी)
जगात सर्व सुखी असा कोणी नाही. (विधानार्थी)

(२) अपमान केल्यास कुणाला राग येत नाही? (प्रश्नार्थी)
अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतो. (विधानार्थी)

वरील उदाहरणांत जे प्रश्न विचारले आहेत ते उत्तराच्या अपेक्षेने विचारलेले प्रश्न नाहीत. अशा प्रकारच्या प्रश्नांमध्ये त्यांचे उत्तर दडलेले असते. अशा प्रश्नार्थक वाक्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करताना लक्षात ठेवावे, की

(१) प्रश्न होकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य नकारार्थी करावे.

(२) प्रश्न नकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य होकारार्थी करावे.

### (आ) उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(१) बापरे! केवढी उंच आहे ही इमारत! (उद्गारार्थी)
ही इमारत खूपच उंच आहे. (विधानार्थी)

(२) काल रात्री ढगांचा खूप गडगडाट झाला. (विधानार्थी)
किती गडगडाट झाला ढगांचा काल रात्री! (उद्गारार्थी)

उद्गारार्थी वाक्ये अधिक परिणामकारक वाटतात कारण एखाद्या गोष्टीतील आधिक्य, परिमाण, मोठी संख्या, विपुलता परिणामकारकतेने व्यक्त केलेली असते. विधानार्थी वाक्यात कोणत्या गोष्टीची विपुलता स्पष्ट करायची आहे ते स्पष्ट करावे. त्यासाठी खूप, प्रचंड, भरपूर यांसारखे शब्द वापरले जातात.

### (इ) आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

उदा., (१) तू नियमित व्यायाम कर. (आज्ञार्थी)
तू नियमित व्यायाम करावास. (विधानार्थी)

(२) ज्ञान संपादनासाठी भरपूर वाचन करावे. (विधानार्थी)

ज्ञान संपादनासाठी भरपूर वाचन करा. (आज्ञार्थी)

आज्ञार्थी वाक्यात आज्ञा अभिप्रेत असते. विधानार्थी वाक्यात सरळ विधान अभिप्रेत असते. या वाक्यांचे परस्पर रूपांतर करताना भावार्थ लक्षात घ्यावा.

**(ई) होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर**

(१) त्याच्यासाठी हजार रुपये ही देखील मोठी रक्कम आहे. (होकारार्थी)

त्याच्यासाठी हजार रुपये ही काही लहान रक्कम नाही. (नकारार्थी)

(२) ही काही वाईट कल्पना नाही. (नकारार्थी)

ही कल्पना चांगली आहे. (होकारार्थी)

वरील उदाहरणांमध्ये 'मोठी' विरुद्ध 'लहान' आणि 'वाईट' विरुद्ध 'चांगली' असे विरुद्धार्थी शब्द वापरल्यामुळे वाक्याचा मूळ अर्थ बदलत नाही.

## कृती

**(१) खालील तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्यप्रकार | करावयाचा बदल |
|---|---|---|
| (१) दिलेल्या सूचनांचे पालन करा. | .......................... | विधानार्थी करा. |
| (२) बापरे! किती वेगाने वाहने चालवतात ही तरुण मुले! | .......................... | विधानार्थी-नकारार्थी करा. |
| (३) स्वयंशिस्त ही खरी शिस्त नाही का? | .......................... | विधानार्थी-होकारार्थी करा. |
| (४) मोबाईलचा अतिवापर योग्य नाही. | .......................... | आज्ञार्थी करा. |
| (५) खऱ्या समाजसेवकाला लोकनिंदेची भीती नसते. | .......................... | प्रश्नार्थक करा. |
| (६) विद्यार्थ्यांनी संदर्भग्रंथांचे वाचन करावे. | .......................... | आज्ञार्थी करा. |

**(२) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यरूपांतर करा.**

(१) सकाळी फिरणे आरोग्यास हितकारक आहे. (नकारार्थी करा.)

(२) तुम्ही काम अचूक करा. (विधानार्थी करा.)

(३) किती सुंदर आहे ही पाषाणमूर्ती! (विधानार्थी करा.)

(४) पांढरा रंग सर्वांना आवडतो. (प्रश्नार्थी करा.)

(५) चैनीच्या वस्तू महाग असतात. (नकारार्थी करा.)

(६) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. (उद्गारार्थी करा.)

(७) अबब! काय हा चमत्कार! (विधानार्थी करा.)

(८) तुम्ही कोणाशीच वाईट बोलू नका. (होकारार्थी करा.)

(९) निरोगी राहावे असे कोणाला वाटत नाही? (विधानार्थी करा.)

(१०) दवाखान्यात मोठ्या आवाजात बोलू नये. (होकारार्थी करा.)

## समास

- **खालील वाक्ये वाचून त्यातील अधोरेखित शब्दांची वैशिष्ट्ये लक्षात घ्या.**
  (१) सैनिक सीमेवर पहारा करताना प्रतिक्षण सतर्क असतात.
  (२) त्याने आपले तन मन धन राष्ट्रार्पण केले.
  (३) सद्सद्विवेकबुद्धी असणारी व्यक्ती योग्यायोग्यतेचा विचार करतेच.
  (४) लंबोदराला मोदक प्रिय आहेत.

- कृती– **(१) अधोरेखित शब्दांमध्ये दडलेले दोन शब्द ओळखून चौकटी पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रतिक्षण – | | |
| (आ) राष्ट्रार्पण– | | |
| (इ) योग्यायोग्य– | | |
| (ई) लंबोदर– | | |

वरील उदाहरणांवरून असे लक्षात येते, की वरील प्रत्येक शब्दात दोन वेगळे शब्द आहेत. बोलताना आपण त्या दोन शब्दांशी संबंधित विभक्ती प्रत्यय, तसेच इतर शब्द गाळून वरीलप्रमाणे एक शब्द तयार करतो. उदा., 'प्रतिक्षण' हा शब्द प्रत्येक क्षणाला या दोन शब्दांसाठी वापरतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाला **'समास'** असे म्हणतात. अशा प्रकारच्या एकत्रीकरणाने जो शब्द तयार होतो त्याला **'सामासिक शब्द'** म्हणतात. सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करून दाखवतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला **'सामासिक शब्दाचा विग्रह'** असे म्हणतात.

उदा.,

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| (१) ज्ञानामृत | ज्ञानरूपी अमृत/ज्ञान हेच अमृत |
| (२) घरोघर | प्रत्येक घरी |
| (३) अहोरात्र | अह (दिवस) आणि रात्र |
| (४) जितेंद्रिय | जिंकली आहेत इंद्रिये ज्याने असा तो |

समासात कमीत कमी दोन शब्द असावे लागतात. त्या प्रत्येक शब्दाला **'पद'** असे म्हणतात. त्या दोन पदांपैकी कोणत्या पदाला प्राधान्य आहे, यावरून समासाचे चार प्रकार पडतात.

| पद प्राधान्य | समासाचे नाव | उदाहरणे |
|---|---|---|
| (१) पहिले पद प्रधान | अव्ययीभाव समास | प्रतिदिन, दिवसेंदिवस |
| (२) दुसरे पद प्रधान | तत्पुरुष समास | सूर्योदय, अनपेक्षित |
| (३) दोन्ही पदे प्रधान | द्‌वंद्‌व समास | खरेखोटे, भाजीपाला |
| (४) दोन्ही पदांतून तिसऱ्याच पदाचा बोध होतो. | बहुव्रीही समास | अथांग, सनाथ |

या इयत्तेत आपण समासाच्या चार मुख्य प्रकारांचा आणि त्यांतील दोन समासांच्या उपप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

**समासाचे प्रकार**

(१) अव्ययीभाव समास

(२) तत्पुरुष समास
उपप्रकार
(अ) विभक्ती तत्पुरुष समास
(आ) कर्मधारय समास
(इ) द्विगू समास

(३) द्वंद्व समास
उपप्रकार
(अ) इतरेतर द्वंद्व
(आ) वैकल्पिक द्वंद्व
(इ) समाहार द्वंद्व

(४) बहुव्रीही समास

## (१) अव्ययीभाव समास–

**कृती– खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखून अधोरेखित करा.**

(१) वैभव वर्गातील कोणत्याही तासाला गैरहजर राहत नाही.

(२) नागरिकांनी गरजू विद्यार्थ्यांना यथाशक्ती मदत केली.

(३) रस्त्याने चालताना जाहिरातींचे फलक सध्या पावलोपावली दिसतात.

**तुम्ही अधोरेखित केलेल्या सामासिक शब्दांची वैशिष्ट्ये म्हणजे–**

**अधोरेखित केलेल्या शब्दांत–**

(१) सामासिक शब्दातील दोन पदांपैकी पहिले पद प्रधान (महत्त्वाचे) असून ते बहुधा अव्यय आहे.
उदा., गैर, यथा (आ, यथा, प्रति वगैरे उपसर्गांना संस्कृतमध्ये अव्यय म्हणतात.)

(२) संपूर्ण सामासिक शब्द वाक्यात क्रियाविशेषणाचे काम करतो.

(३) 'पावलोपावली' या शब्दात अव्यय दिसत नसले, तरी त्याचा विग्रह अव्ययासह केला जातो. म्हणून या शब्दाचा समावेश 'अव्ययीभाव' समासात होतो.
उदा., पावलोपावली–प्रत्येक पावलावर

यावरून असे लक्षात येते, की **जेव्हा समासातील पहिले पद बहुधा अव्यय असून ते महत्त्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर वाक्यात क्रियाविशेषणासारखा केलेला असतो, तेव्हा 'अव्ययीभाव समास' होतो.**

- **कृती– खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| (१) | ..................... | जन्मापासून |
| (२) | प्रतिदिन | ..................... |
| (३) | ..................... | कंठापर्यंत |
| (४) | व्यक्तिगणिक | ..................... |
| (५) | ..................... | प्रत्येक दारी |

## (२) तत्पुरुष समास–

- **कृती– खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखून अधोरेखित करा.**

(१) मेट्रो रेल्वेचा लोकार्पण सोहळा थाटामाटात पार पडला.

(२) सुप्रभाती तलावात नीलकमल उमललेले दिसले.

(३) शिक्षण प्रक्रियेत पालक, शिक्षक आणि विद्यार्थी हा आदर्श त्रिकोण असतो.

**तुम्ही अधोरेखित केलेल्या लोकार्पण, सुप्रभाती, नीलकमल व त्रिकोण या सामासिक शब्दांची वैशिष्ट्ये म्हणजे–**

(१) या सामासिक शब्दात दुसरे पद महत्त्वाचे आहे.

(२) सामासिक शब्दाचा विग्रह करताना अर्थाच्या दृष्टीने गाळलेले शब्द किंवा विभक्ती प्रत्यय योजावे लागतात.

- **कृती– खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | समासाचा विग्रह | सामासिक शब्द |
|---|---|---|
| (१) | राजाची आज्ञा | .................... |
| (२) | आठ अंगांचा समूह | .................... |
| (३) | उत्तम असा पुरुष | .................... |

यावरून असे लक्षात येते, की **ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो. त्यास 'तत्पुरुष समास' असे म्हणतात.**

तत्पुरुष समासाच्या तीन उपप्रकारांचा या इयत्तेत अभ्यास करूया.

### (अ) विभक्ती तत्पुरुष समास

- **कृती– पुढील उदाहरणांचा अभ्यास करून तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह | विभक्ती प्रत्यय किंवा विभक्तिदर्शक अव्यय |
|---|---|---|---|
| (१) | लोकप्रिय | लोकांना प्रिय | .................... |
| (२) | कष्टसाध्य | कष्टाने साध्य | .................... |
| (३) | चोरभय | चोरापासून भय | .................... |
| (४) | घरमालक | घराचा मालक | .................... |
| (५) | नाट्यगृह | नाट्यासाठी गृह | .................... |
| (६) | वनभोजन | वनातील भोजन | .................... |

- **लक्षात ठेवा–** सामासिक शब्दांचा विग्रह करताना नामांना विभक्ती प्रत्ययांऐवजी काही काही वेळा काही शब्दयोगी अव्यये वापरली जातात. ती अव्यये त्या त्या विभक्तीचे कार्य करतात. उदा., **चतुर्थी**– करिता, प्रीत्यर्थ, साठी, **पंचमी**–पासून, पेक्षा.

**विभक्ती तत्पुरुष समासाची वैशिष्ट्ये–**

(१) सामासिक शब्दातील पहिले पद नाम किंवा विशेषण असते.

(२) सामासिक शब्दाचा विग्रह करताना पहिल्या पदाला प्रथमा व संबोधन सोडून अन्य विभक्तीचे प्रत्यय किंवा त्याच अर्थाची शब्दयोगी अव्यये वापरली जातात. **ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्ती प्रत्ययाचा किंवा त्या विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडली जातात त्यास 'विभक्ती तत्पुरुष समास' म्हणतात.**

### (आ) कर्मधारय समास–

- **कृती– पुढील वाक्ये अभ्यासून तक्ता पूर्ण करा.**

(१) गुप्तहेर वेशांतर करून खऱ्या माहितीचा शोध घेतात.
(२) अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ पडला.
(३) काही माणसे केलेल्या कामाचे मानधन घेणे टाळतात.
(४) निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| (१) | .................... | अन्य असा वेश |
| (२) | दुष्काळ | .................... |
| (३) | .................... | मान हेच धन |
| (४) | .................... | निळा सावळा असा |

**कर्मधारय समासाची वैशिष्ट्ये म्हणजे–**

(१) दोन्ही पदे एकाच विभक्तीत (प्रथमा) असतात. उदा., मुखचंद्रमा
(२) कधी पूर्व पद (पहिले पद) विशेषण असते. उदा., कृष्णविवर
(३) कधी उत्तर पद (दुसरे पद) विशेषण असते. उदा., घननीळ
(४) कधी दोन्ही पदे विशेषणे असतात. उदा., श्यामसुंदर
(५) कधी पहिले पद उपमान तर कधी दुसरे पद उपमान असते. उदा., कमलनयन, नरसिंह
(६) कधी दोन्ही पदे एकरूप असतात. उदा., विद्याधन

**ज्या समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजे सामान्यत: प्रथमा विभक्तीत असतात त्या समासाला 'कर्मधारय समास' असे म्हणतात.**

### (इ) द्विगू समास–

- **कृती– खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखून दिलेला तक्ता पूर्ण करा.**

(१) सूर्याच्या सोनेरी किरणांनी दशदिशा उजळून निघाल्यात.
(२) नवरात्रात ठिकठिकाणी गरबा नृत्याचे कार्यक्रम चालतात.
(३) सुरेखाला वन्यजीव सप्ताहानिमित्त झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| (१) | .................... | दहा दिशांचा समूह |
| (२) | नवरात्र | .................... |
| (३) | .................... | सात अहांचा (दिवसांचा) समूह |

**द्‌विगू समासाची वैशिष्ट्ये म्हणजे–**

(१) द्‌विगू समासात पूर्वपद संख्याविशेषण असते.

(२) हा समास नेहमी एकवचनात असतो, कारण त्यातील सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा बोध होतो.

**ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा बोध होतो, तेव्हा त्यास 'द्‌विगू समास' असे म्हणतात.**

• **कृती– तत्पुरुष समासाचे प्रकार ओळखून खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | .................... | सहा मासांचा (महिन्यांचा) समूह | .................... |
| (२) | ग्रंथालय | .................... | .................... |
| (३) | .................... | .................... | कर्मधारय |
| (४) | त्रिदल | .................... | .................... |
| (५) | .................... | बालकांसाठीचे मंदिर | .................... |
| (६) | नरश्रेष्ठ | .................... | .................... |
| (७) | .................... | .................... | विभक्ती तत्पुरुष |

## (३) द्‌वंद्‌व समास–

**खालील उदाहरणांतील सामासिक शब्द ओळखून अधोरेखित करा.**

(१) पतिपत्नी ही संसाररथाची दोन महत्त्वाची चाके आहेत.

(२) योग्य पुरावा उपलब्ध झाला, की खरेखोटे कळतेच.

(३) स्नेहमेळाव्यात मित्रमैत्रिणींच्या गप्पागोष्टी रंगात आल्या.

• **कृती– खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| (१) | .................... | पती आणि पत्नी |
| (२) | .................... | .................... |
| (३) | गप्पागोष्टी | .................... |

यावरून असे लक्षात येते, की **ज्या समासाची दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान म्हणजे समान दर्जाची असतात त्याला 'द्‌वंद्‌व समास' असे म्हणतात.**

सामासिक शब्दाचा विग्रह करण्याच्या पद्‌धतीवरून या समासाचे तीन प्रकार पडतात.

## द्वंद्व समास

### (अ) इतरेतर द्वंद्व समास
**वैशिष्ट्ये**

(१) अर्थासाठी दोन्ही पदांची अपेक्षा असते.

(२) या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' यांपैकी एक **समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय** वापरावे लागते.

उदा., विटीदांडू-विटी आणि दांडू

### (आ) वैकल्पिक द्वंद्व समास
**वैशिष्ट्ये**

(१) दोन्ही प्रधान पदांपैकी एकाचीच अपेक्षा असते.

(२) समासाचा विग्रह करताना 'किंवा', 'अथवा', 'वा' यांपैकी एक **विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय** वापरावे लागते.

उदा., खरेखोटे- खरे किंवा खोटे

### (इ) समाहार द्वंद्व समास
**वैशिष्ट्ये**

(१) समासातील पदांचा विग्रह करताना त्यातील मूळ पदांच्या बरोबर त्याच जातीच्या इतर पदार्थांचा, वस्तूंचा समावेश केलेला असतो.

(२) समासात आलेल्या आणि त्याच जातीच्या इतर वस्तूंच्या समुदायाला महत्त्व असते, म्हणून हा समास एकवचनी असतो.

उदा., अंथरूणपांघरूण- अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर वस्तू

- **कृती- खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | समासाचा विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | .................... | माय आणि लेकरे | .................... |
| (२) | इष्टानिष्ट | .................... | .................... |
| (३) | .................... | .................... | समाहार द्वंद्व |
| (४) | .................... | लहान किंवा मोठे | .................... |
| (५) | घरदार | .................... | .................... |
| (६) | .................... | .................... | इतरेतर द्वंद्व |
| (७) | भलेबुरे | .................... | .................... |
| (८) | कुलूपकिल्ली | .................... | .................... |

### (४) बहुव्रीही समास-

**खालील उदाहरणे अभ्यासा व त्यातील सामासिक शब्द अधोरेखित करा.**

(१) कृष्णा हा माझा सहाध्यायी आहे.

(२) काल रात्री आमच्या परिसरात नीरव शांतता होती.

(३) रावणाला दशमुख असेही संबोधले जाते.

**बहुव्रीही समासाची वैशिष्ट्ये म्हणजे–**

(१) दोन्हीही पदे महत्त्वाची नसून या दोन्ही पदांशिवाय तिसऱ्याच एका पदाचा बोध होतो.

(२) हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असतो.

(३) या सामासिक शब्दाचा विग्रह करताना गाळलेली पदे योजावी लागतात.

उदा., (१) निष्कलंक– नाही कलंक ज्याला अशी ती. (व्यक्ती)

(२) नीलकंठ– निळा आहे कंठ ज्याचा असा तो. (शंकर)

**ज्या सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्त्वाची नसून या दोन पदांशिवाय तिसऱ्याच एका पदाचा बोध होतो व दिलेला सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असते तेव्हा 'बहुव्रीही समास' होतो.**

- **कृती– खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|---|
| (१) | ............................... | निघून गेले आहेत प्राण ज्याचे असा तो |
| (२) | नीरस | ............................... |
| (३) | ............................... | प्रमाणासह आहे जे ते |
| (४) | गोपाल | ............................... |
| (५) | ............................... | माशासारखे आहेत डोळे जिचे अशी ती |
| (६) | षडानन | ............................... |

## प्रयोग

- **उदाहरण वाचा. कृती करा.**

विद्यार्थी पाठ्यपुस्तक आवडीने वाचतो.

(१) वाक्यातील क्रियापदातील धातू. [ ]

(२) पाठ्यपुस्तक आवडीने वाचणारा तो कोण? [ ]

(३) वाचले जाणारे ते काय? [ ]

(४) वरील वाक्यातील क्रिया कोणती? [ ]

**लक्षात ठेवा–** वाक्यात कर्त्याला किंवा कर्माला प्राधान्य दिल्यामुळे क्रियापदाचे रूप त्यांच्याप्रमाणे बदलत असते. वाक्यातील कर्ता ⟷ क्रियापद, कर्म ⟷ क्रियापद या संबंधाला '**प्रयोग**' असे म्हणतात.

**प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत.**

**(१) कर्तरी प्रयोग**
कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुष यांनुसार क्रियापदाच्या रूपात बदल होतो.

**(२) कर्मणी प्रयोग**
कर्माच्या लिंग, वचन यांनुसार क्रियापदाच्या रूपात बदल होतो.

**(३) भावे प्रयोग**
कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचन यांनुसार क्रियापदाच्या रूपात बदल होत नाही.

### (१) कर्तरी प्रयोग–

**खालील उदाहरणे वाचून कृती करा.**

(१) (अ) समीर चित्र रंगवतो.
(आ) स्वाती चित्र रंगवते.
} दुसऱ्या वाक्यात क्रियापद बदलण्याचे कारण ............................

(२) (अ) मुलगी सूचनाफलक वाचते.
(आ) मुली सूचनाफलक वाचतात.
} दुसऱ्या वाक्यात क्रियापद बदलण्याचे कारण ............................

(३) (अ) आम्ही शाळेत जातो.
(आ) त्या शाळेत जातात.
} दुसऱ्या वाक्यात क्रियापद बदलण्याचे कारण ............................

**कर्तरी प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास ते प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुष यांनुसार बदलते.

**जेव्हा वाक्यातील क्रियापद हे कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याप्रमाणे बदलते तेव्हा तो 'कर्तरी' प्रयोग असतो.**

## (२) कर्मणी प्रयोग–

**खालील उदाहरणे वाचून कृती करा.**

(१) (अ) केशवने सदरा खरेदी केला.
(आ) केशवने विजार खरेदी केली.
} दुसऱ्या वाक्यात क्रियापद बदलण्याचे कारण ..............................

(२) (अ) कमलने बक्षीस मिळवले.
(आ) कमलने बक्षीसे मिळवली.
} दुसऱ्या वाक्यात क्रियापद बदलण्याचे कारण ..............................

**कर्मणी प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता सामान्यत: तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते.
- क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलते.

**जेव्हा वाक्यातील क्रियापद हे कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलते तेव्हा तो 'कर्मणी' प्रयोग असतो.**

## (३) भावे प्रयोग–

**खालील वाक्यांत 'रोखणे' क्रियापदाचे योग्य रूप लिहा.**

(१) सैनिकाने शत्रूला सीमेवर ..................... .
(२) सैनिकांनी शत्रूला सीमेवर ..................... .
(३) सैनिकांनी शत्रूंना सीमेवर ..................... .

**खालील वाक्यांत 'बांधणे' या क्रियापदाचे योग्य रूप लिहा.**

(१) श्रीधरपंतांनी बैलांना .....................
(२) सुमित्राबाईंनी गाईला .....................
(३) त्याने गोऱ्ह्याला .....................
(४) आम्ही शेळ्यांना .....................

वरील वाक्यांचे निरीक्षण केल्यानंतर असे लक्षात येते, की

(१) कर्त्याचे लिंग, वचन, पुरुष बदलूनही क्रियापदाच्या रूपात बदल होत नाही.
(२) कर्माच्या लिंग, वचनात बदल करूनही क्रियापदाच्या रूपात बदल होत नाही.
(३) वरील वाक्यांतील सर्व क्रियापदे तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी व एकवचनी आहेत.

**भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये**

- कर्ता सामान्यत: तृतीया विभक्तीत असतो.
- कर्म असल्यास द्वितीया विभक्तीत असते.
- क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असते व कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनानुसार ते बदलत नाही.

**जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी व एकवचनी असून स्वतंत्र असते, तेव्हा तो 'भावे' प्रयोग असतो.**

## कृती

**(१) खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा.**

(१) मुख्याध्यापकांनी इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बोलावले.
(२) कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.
(३) मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.
(४) तबेल्यातून व्रात्य घोडा अचानक पसार झाला.
(५) मावळ्यांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले.
(६) राजाला नवीन कंठहार शोभतो.
(७) शेतकऱ्याने फुलांची रोपे लावली.
(८) आकाशात ढग जमल्यामुळे आज लवकर सांजावले.
(९) युवादिनी वक्त्याने प्रेरणादायी भाषण दिले.
(१०) आपली पाठ्यपुस्तके संस्कारांच्या खाणी असतात.

**(२) सूचनेनुसार सोडवा**

**(अ) कर्तरी प्रयोग असलेल्या वाक्यासमोर ✓ अशी खूण करा.**

(१) गुराख्याने गुरांना विहिरीपासून दूर नेले.
(२) सकाळी तो सरावासाठी मैदानावर गेला.
(३) विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतगीत गायले.

**(आ) कर्मणी प्रयोग असलेल्या वाक्यासमोर ✓ अशी खूण करा.**

(१) सुजाण नागरिक परिसर स्वच्छ ठेवतात.
(२) शिक्षकाने विद्यार्थ्यास शिकवले.
(३) भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली.

**(इ) भावे प्रयोग असलेल्या वाक्यासमोर ✓ अशी खूण करा.**

(१) आज लवकर सांजावले.
(२) त्याने कपाटात पुस्तक ठेवले.
(३) आम्ही अनेक किल्ले पाहिले.

# अलंकार

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो तेव्हा दैनंदिन जीवनातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचनाचा आनंद मिळवून देण्यात यांतील भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यातील एक घटक म्हणजे 'अलंकार' होय.

अलंकाराचे 'शब्दालंकार' आणि 'अर्थालंकार' हे दोन प्रकार आहेत. त्यांपैकी यमक, अनुप्रास, श्लेष हे शब्दालंकार आणि उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, व्यतिरेक, दृष्टान्त, चेतनगुणोक्ती हे अर्थालंकार आपण अभ्यासले आहेत. या इयत्तेत आपण अनन्वय, अपन्हुती, अतिशयोक्ती व अर्थान्तरन्यास हे अर्थालंकार अभ्यासणार आहोत.

## (१) अनन्वय –

**खालील उदाहरणांचे निरीक्षण करा व कृती सोडवा.**

(१) आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी

(२) ह्या आंब्यासारखा गोड आंबा हाच.

(अ) वरील दोन्ही उदाहरणांतील उपमेये– ☐ , ☐

(आ) वरील दोन्ही उदाहरणांतील उपमाने– ☐ , ☐

निरीक्षण केल्यानंतर वरील उदाहरणांत उपमेय व उपमान एकच आहेत, असे लक्षात येते.

**अनन्वय अलंकाराची वैशिष्ट्ये**

(१) उपमेय एखाद्या गुणाच्या बाबतीत अद्‌वितीय असते.

(२) उपमेयाला योग्य असे उपमान मिळू शकत नाही म्हणून उपमेयाला उपमेयाचीच उपमा द्यावी लागते.

इतर अनेक अलंकारांमध्ये एखाद्या वस्तूची तुलना दुसऱ्या समान वस्तूशी करून आपण वर्णन करतो; पण कधी कधी उपमेय हे एखाद्या गुणाच्या बाबतीत इतके अद्‌वितीय असते, की त्याला योग्य असे उपमानच मिळत नाही. अशावेळी उपमेय हे उपमेयासारखेच आहे असे सांगितले जाते. या ठिकाणी 'अनन्वय' अलंकार होतो.

**उपमेयाला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल म्हणजेच जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते तेव्हा 'अनन्वय' अलंकार होतो.**

(अन्वय म्हणजे संबंध. अनन्वय म्हणजे तुल्य अन्वय (संबंध) मिळत नाही असा– अतुलनीय)

उदा., अर्जुनाचे वर्णन करताना कवी मोरोपंत म्हणतात–

झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा ।

'अर्जुनासारखा पराक्रमी अर्जुनच', हे स्पष्ट करण्यासाठी प्रस्तुत ओळी आलेल्या आहेत. 'अर्जुन' हेच उपमेय व उपमान आहे.

## (२) अपन्हुती–

**खालील उदाहरणांचे निरीक्षण करा व कृती सोडवा.**

उदा., न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजांतील ।<br>
न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ ।।

वरील उदाहरणातील–

पहिल्या ओळीतील उपमेय व उपमान

↓ ↓

[ ] [ ]

दुसऱ्या ओळीतील उपमेय व उपमान

↓ ↓

[ ] [ ]

**अपन्हुती अलंकाराची वैशिष्ट्ये**

(१) उपमेयाला लपवले जाते.

(२) उपमेय असूनही ते उपमेय नाही तर उपमानच आहे असे सांगितले जाते. म्हणजेच–

(३) उपमेयाचा निषेध केला जातो.

(४) निषेध दर्शवण्यासाठी न, नव्हे, नोहे, नसे, कसले असे शब्द येतात.

अपन्हुती म्हणजे लपवणे किंवा झाकणे. वरील उदाहरणातील पहिल्या ओळीत 'नयन' हे उपमेय आहे. 'कमळातल्या पाकळ्या' हे उपमान आहे. इथे डोळे हे डोळे नसून त्या कमळाच्या पाकळ्या आहेत, असे सांगताना उपमेयाला लपवून, दूर सारून म्हणजेच उपमेयाचा निषेध करून त्याच्या जागी उपमानाची स्थापना केली आहे. उदाहरणातील दुसऱ्या ओळीत 'वदन' या उपमेयाचा निषेध करून तो 'शरदऋतूतील चंद्र' आहे असे म्हणून उपमानाची स्थापना केली, म्हणून 'अपन्हुती' अलंकार झालेला आहे.

**उपमेयाचा निषेध करून उपमेय हे उपमानच आहे, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा 'अपन्हुती' अलंकार होतो.**

### (३) अतिशयोक्ती–

**खालील उदाहरणाचे निरीक्षण करा व त्यातील आशयाच्या दृष्टीने असलेली असंभाव्यता अभ्यासा.**

उदा., जो अंबरी उफळतां खुर लागलाहे ।
तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे ।।

प्रस्तुत उदाहरणात नलराजाचा घोडा आकाशात इतका उंच उसळला, की त्याचा खूर चंद्राला लागला म्हणून चंद्रावर डाग पडला असे वर्णन केले आहे.

**अतिशयोक्ती अलंकाराची वैशिष्ट्ये**

(१) एखाद्या गोष्टीचे, प्रसंगाचे वर्णन केलेले असते.

(२) ते वर्णन अधिक फुगवून केलेले असते.

(३) त्यामुळे त्या वर्णनाची असंभाव्यता, कल्पनारंजकता अधिक स्पष्ट होते.

अलंकारांमध्ये प्रत्येक गोष्टीचे वर्णन चमत्कृतिपूर्ण करायचे असल्यामुळे त्यात थोडी अतिशयोक्ती येतेच. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, व्यतिरेक या अलंकारात थोडी अतिशयोक्ती असतेच; पण केवळ अतिशयोक्तीच जिथे प्रामुख्याने केलेली असते तिथे 'अतिशयोक्ती' हा स्वतंत्र अलंकार मानला जातो. प्रस्तुत उदाहरणात चंद्राला घोड्याच्या खुराचा डाग लागणे असंभवनीय असले तरी तसे घडल्याचे वर्णन केल्यामुळे इथे 'अतिशयोक्ती' अलंकार झालेला आहे.

**कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्यावेळी 'अतिशयोक्ती' हा अलंकार होतो.**

उदा., दमडिचं तेल आणलं, सासूबाईंचं न्हाणं झालं
मामंजींची दाढी झाली, भावोजीची शेंडी झाली
उरलं तेल झाकून ठेवलं, लांडोरीचा पाय लागला
वेशीपर्यंत ओघळ गेला, त्यात उंट पोहून गेला.

दमडीच्या तेलात कोणकोणत्या गोष्टी उरकल्या हे सांगताना त्या वस्तुस्थितीपेक्षा कितीतरी गोष्टी फुगवून सांगितल्या आहेत.

### (४) अर्थान्तरन्यास–

**खालील उदाहरणाचे निरीक्षण करा व अभ्यासा.**

उदा., **तदितर खग भेणे वेगळाले पळाले ।**
**उपवन–जल–केली जे कराया मिळाले ।।**
**स्वजन, गवसला जो, त्याजपाशी नसे तो ।**
**कठिण समय येता कोण कामास येतो?**

नलराजाने हंसाला पकडल्यानंतर बागेत जलक्रीडेसाठी जमलेले इतर सर्व पक्षी घाबरून पळाले. त्याच्याजवळ कोणीच राहिले नाही. एवढी हकीकत सांगून झाल्यावर कवीने त्यावरून एक सामान्य सिद्धान्त सांगितला, की ‘कठीण प्रसंगी कोणीच आपल्या उपयोगी पडत नाही.’

**अर्थान्तरन्यास अलंकाराची वैशिष्ट्ये**

(१) विशेष उदाहरणांवरून एखादा सर्वसामान्य सिद्धान्त सांगितला जातो.

(२) सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे दिली जातात.

(३) अर्थान्तर– म्हणजे दुसरा असा अर्थ. न्यास म्हणजे शेजारी ठेवणे.

या अलंकारात **एका अर्थाचा समर्थक असा दुसरा अर्थ त्याच्या शेजारी ठेवणे म्हणजेच एक विशिष्ट अर्थ दुसऱ्या व्यापक अर्थाकडे नेऊन ठेवणे, म्हणजे ‘अर्थान्तरन्यास’ होय.**

उदा., होई जरी संतत दुष्टसंग,
न पावती सज्जन सत्त्वभंग;
असोनिया सर्प सदाशरीरीं;
झाला नसे चंदन तो विषारी.

सज्जन सतत जरी दुष्टांच्या संगतीत आले तरी सज्जनांची सात्त्विकता नष्ट होत नाही, हा विशेष सिद्धान्त सांगितल्यानंतर कवी निसर्गातले एक सामान्य उदाहरण देतात. साप चंदनाच्या झाडावर सतत राहतात तरीपण चंदनाचे झाड मात्र विषारी बनत नाही.

## कृती

**(१) खालील ओळींतील अलंकार ओळखून त्याचे नाव लिहा.**

(१) वीर मराठे आले गर्जत!
पर्वत सगळे झाले कंपित!

(२) सागरासारखा गंभीर सागरच!

(३) या दानाशी या दानाहुन
अन्य नसे उपमान

(४) न हा अधर, तोंडले नव्हत दांत हे कीं हिरे ।

(५) अनंत मरणें अधी मरावीं,
स्वातंत्र्याची आस धरावी,
मारिल मरणचि मरणा भावी,
मग चिरंजीवपण ये बघ तें.

(६) मुंगी उडाली आकाशी
तिने गिळिले सूर्यासी!

(७) फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज नुरे, डौलांत तरू डुले;
तेज जळे, बघ ज्योत पाजळे;
का मरणिं अमरता ही न खरी?

**(२) खालील तक्ता पूर्ण करा.**

| अलंकाराची वैशिष्ट्ये | अलंकाराचे नाव |
|---|---|
| (अ) उपमेयाचा निषेध केला जातो.<br>(आ) उपमेय असूनही ते उपमेय नाही तर उपमानच आहे असे सांगितले जाते. | (१) .......................... |
| (अ) .......................................<br>(आ) .......................................<br>....................................... | (२) अनन्वय |
| (अ) विशेष उदाहरणांवरून एखादा सर्वसामान्य सिद्धान्त सांगितला जातो.<br>(आ) सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे दिली जातात. | (३) .......................... |
| (अ) .......................................<br>(आ) .......................................<br>....................................... | (४) अतिशयोक्ती |

**(३) खालील कृती करा.**

(१) कर्णासारखा दानशूर कर्णच.

वरील वाक्यातील– उपमेय .............

उपमान .............

(२) न हे नभोमंडल वारिराशी आकाश
न तारका फेनचि हा तळाशी

पहिल्या ओळीतील– उपमेय .............

उपमान .............

दुसऱ्या ओळीतील– उपमेय .............

उपमान .............

**(४) खालील तक्ता पूर्ण करा.**

| **क्र.** | **उदाहरण** | **सामान्य सिद्धान्त** | **विशेष गोष्टी** |
|---|---|---|---|
| (१) | जन पळभर म्हणतिल, 'हाय हाय!'<br>मी जातां राहिल कार्य काय?<br>सूर्य तळपतिल, चंद्र झळकतिल;<br>तारे अपुला क्रम आचरतिल,<br>असेच वारे पुढे वाहतिल,<br>होईल कांही का अंतराय? | -- | -- |
| (२) | सखेसोयरे डोळे पुसतिल,<br>पुन्हा आपल्या कामिं लागतिल<br>उठतिल, बसतिल, हसुनि खिदळतील<br>मी जातां त्यांचें काय जाय? | -- | -- |

# लेखन

## • निबंधलेखन

### ◈ प्रास्ताविक

शालेय जीवनात तुम्ही निबंधलेखन केलेले आहे. विविध संस्थांमार्फत आयोजित निबंधलेखनाच्या स्पर्धांत तुम्ही सहभागी झालेला आहात आणि होणारही आहात. त्यादृष्टीने तुम्हांला निबंधलेखनाचे स्वरूप, त्यासाठीची पूर्वतयारी आणि प्रत्यक्ष उत्तम निबंधलेखन कसे करावे यासंबंधीची माहिती असणे आवश्यक असते. या सर्वांचा उपयोग स्पर्धा परीक्षांमध्ये निबंध लिहिण्यासाठी तुम्हाला निश्चितच होईल.

### ◈ निबंधाचे स्वरूप

नीट बांधलेला, नीट गुंफलेला, नीट जुळवलेला असतो तो निबंध. 'विषयाला धरून मनातील विचार आणि भावना यांची सूत्रबद्‌ध गुंफण करणे' निबंधलेखनात अभिप्रेत असते. निबंधलेखनात आत्माविष्काराला भरपूर वाव असतो. एखाद्या विषयाच्या संदर्भात आपल्याला जे जे म्हणून माहीत आहे, जितके जितके म्हणून माहीत आहे ते ते सगळेच्या सगळे एकत्र करून केलेले लेखन म्हणजे निबंध नव्हे, तर निबंध म्हणजे सुसंगत आणि योग्य विचारांची, कल्पनांची अर्थपूर्ण गुंफण होय. निबंध म्हणजे एखाद्या विषयासंबंधीचे स्वत:चे विचार सुसूत्र, सुसंबद्‌ध आणि सुबकतेने मांडून तो विषय ठरावीक मर्यादेत लिहून पूर्ण करणे होय.

संस्कृतमध्ये अवघ्या तीनच शब्दांत 'निबंध' या साहित्यप्रकाराचे नेमके वर्णन केले आहे. 'निबध्यते अस्मिन इति' अर्थात 'जिच्यामध्ये विषय गोवला जातो अशी वाङ्मयीन रचना म्हणजे 'निबंध' होय.'

निबंधात उत्तम विचारांचे, भावनांचे, अनुभवांचे, घटनांचे, व्यक्तिविशेषांचे विवरणात्मक आणि माहितीपूर्ण विवेचन केलेले असते. ती एक मनोवेधक गुंफण असते. विविध विचारांचा ओघवत्या भाषेतील सुबोध आणि कलात्मक आविष्कार म्हणजे निबंध. निबंधात एखाद्या विषयावरील साधक-बाधक माहितीची, विचारांची सूत्रबद्‌ध आणि सुसंगत मांडणी केलेली असते. निबंध लेखन ही एक कला आहे आणि प्रयत्नांनी ती साध्य होते.

### ◈ निबंधाचे प्रकार

स्थूलमानाने निबंधांचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतात.

(१) **वर्णनात्मक निबंध** (स्थल, ऋतू, निसर्ग, प्रवास, घटना इत्यादींचे वर्णन)
(२) **व्यक्तिचित्रणात्मक निबंध** (व्यक्तिवर्णनात्मक, व्यक्तिप्रधान, चरित्रात्मक)
(३) **आत्मवृत्तात्मक निबंध** (आत्मकथन, मनोगतप्रधान निबंध)
(४) **कल्पनाप्रधान निबंध** (कल्पना फुलवत केलेले लेखन, कल्पनारम्य निबंध)
(५) **वैचारिक निबंध** (विचारप्रधान, चिंतनपर, समस्याप्रधान, चर्चात्मक निबंध)

आता आपण निबंध प्रकारांची थोडक्यात माहिती घेऊया.

(१) **वर्णनात्मक निबंध –** आपण पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, वास्तूचे किंवा प्रसंगाचे हुबेहूब शब्दांत रेखाटलेले चित्र वाचकांसमोर उभे करणे म्हणजे वर्णनात्मक निबंध होय. आपण जे पाहिले, अनुभवले त्याचे शैलीदार वर्णन अशा प्रकारच्या निबंधात अपेक्षित असते. एखादे दृश्य, सहल, घटना, सण, ऋतू, प्रवास, स्थळ यांचे खरे तर शब्दचित्रच रेखाटायचे असते. लेखन करताना त्यात लालित्य आणि कलात्मकता असावी लागते. निबंधलेखकाकडे कॅमेऱ्यासारखी तीक्ष्ण नजर असेल तर तो तपशीलाने निरीक्षण करू शकतो. सूक्ष्म निरीक्षण हे वर्णनात्मक निबंधाचे शक्तिस्थान असते. वर्णनाला भाषिक अलंकारांचे पाठबळ तर असतेच शिवाय भाषा ओघवतीही असते. त्यामध्ये भावनांचे, कल्पनांचे,

विचारांचे गहिरे रंग भरणेही तितकेच महत्त्वाचे असते. अधूनमधून भाषिक सौंदर्यकणांची उधळण हवीच. थोडक्यात, वर्णनात्मक निबंधात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

**नमुना विषय–** आमची अविस्मरणीय सहल, वसंत ऋतू, मी पाहिलेला क्रिकेट सामना.

(२) **व्यक्तिचित्रणात्मक निबंध –** 'व्यक्तीचे शब्दचित्रण करणारा निबंध' म्हणजे व्यक्तिचित्रणात्मक निबंध होय. आता ही 'व्यक्ती' कोण असते? तर कुणीही असू शकते. अगदी आई, वडील, काका, फेरीवाला, पेपरवाला, पोस्टमन, भाजी-विक्रेती, शेतमजूर, शिक्षक, डॉक्टर, लोकप्रतिनिधी, पोलीस अधिकारी, कलावंत... अशी कुणीही. अट फक्त एकच, नेमक्या शब्दांच्या माध्यमातून त्या व्यक्तीचे हुबेहूब, चित्तवेधक, कलात्मक शब्दचित्र उभे करता आले पाहिजे. व्यक्तिचित्रणात्मक निबंध वाचताना ती व्यक्ती वाचकाच्या डोळ्यांपुढे उभी राहिली पाहिजे. अशा निबंधात त्या व्यक्तीचे संपूर्ण जीवन-चरित्र तपशीलवारपणे लिहिणे अपेक्षित नसते; तथापि त्या व्यक्तीची शरीरयष्टी, सवयी, लकबी, रंगरूप, पेहेराव, स्वभाव, व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये यांचे वर्णन करणे आवश्यक असते. व्यक्तिचित्रण म्हणजे केवळ त्या व्यक्तीच्या माहितीचा तपशील नव्हे, तर ते त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे, कर्तृत्वाचे सुसंगत आणि लालित्यपूर्ण शब्दचित्र असते. ते वाचून वाचकाला साहित्यिक आनंद आणि प्रेरणा मिळते. 'व्यक्तिचित्रण' मार्मिक शब्दांनी बहरलेले आणि विचारांनी फुललेले असले पाहिजे.

**नमुना विषय–** माझे आवडते शिक्षक, माझी आई

(३) **आत्मवृत्तात्मक निबंध –** अशा प्रकारच्या निबंधात जो कोणी आपली कथा लिहीत असतो तो आपल्या भावभावनांचे, सुखदु:खांचे, विचारांचे, अनुभवांचे कथन करत असतो. कडू-गोड आठवणींचा तो एक रम्य पट असतो. प्रगतिपुस्तकाचे, उत्तरपत्रिकेचे जसे आत्मकथन असू शकते तसेच एखाद्या पुतळ्याचेही असते. बोलणे, व्यक्त होणे महत्त्वाचे असते. कोण बोलत आहे हे जसे महत्त्वाचे; तसेच ते बोलणे 'आतून' येणेही महत्त्वाचे. त्या 'व्यक्त होण्यात' उमाळा असला पाहिजे. 'काहीतरी' वेगळे सांगण्याची उर्मी असली पाहिजे. त्या आत्मकथनाला भावनांचा स्पर्श लाभला पाहिजे. आत्मकथनात्मक निबंधात 'मी' महत्त्वाचा असतो, तो तर हवाच. तरच ते आत्मकथन; पण आत्मकथनात 'मी'पणा नसावा. 'नदीची आत्मकथा' लिहिताना एखादी नदी प्रत्यक्षात समोर अवतीर्ण होऊन तुमच्याशी बोलणार नसते; तिथे ती बोलते आहे अशी कल्पनाच करावी लागते.

'मी रस्ता आहे' असं समजून रस्त्याची कैफियत, त्याचे मनोगत, गाऱ्हाणे, अनुभव शब्दबद्ध करणे हे तसे अवघड नाही. मात्र त्यासाठी विषयाशी प्रयत्नपूर्वक एकरूप व्हावे लागते. कल्पना, विचार आणि भावना या तिन्हींची सांगड घालून प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत, स्वत:विषयी लेखन करणे म्हणजे आत्मवृत्तात्मक निबंध होय. या प्रकारच्या निबंधांना मनोगत, कैफियत, कहाणी, आत्मकथन अशीही नावे योजतात. अशा प्रकारच्या निबंधात ज्याचे 'आत्मकथन' करायचे, त्याच्या अंतरंगात मनाने शिरून आपण त्याची सुख-दु:खे, अनुभव यांच्याशी एकरूप होऊन कथन करायचे असते. या कथनात कल्पनाविलासाला भरपूर वाव असतो. दिलेल्या विषयाच्या अनुषंगाने घडलेल्या प्रसंगांचे संगतवार कथन करण्यापेक्षा काही निवडक प्रसंग चटकदार पद्धतीने लिहिणे परिणामकारक ठरते. आत्मचरित्रात्मक निबंध लिहिताना त्या-त्या व्यक्तीच्या अंतरंगात शिरावे लागते, म्हणजेच 'परकाया प्रवेश' करावा लागतो. तेव्हा आता 'आइस्क्रीमचं मनोगत' कसे लिहाल? जरा विचार करा बरं!

(४) **कल्पनाप्रधान निबंध –** या प्रकारच्या निबंधात कल्पनाविलासाला महत्त्व दिले जाते. सहजसुंदर, वैविध्यपूर्ण आणि नवनवीन कल्पनांच्या उत्तुंग भराऱ्यांनी हा निबंधप्रकार नटलेला असतो; परंतु त्याला न्याय देण्यासाठी कल्पना शब्दांत गुंफण्याची चांगली तयारी असावी लागते. 'मी पक्षी झालो तर...' हा विषय वाचताक्षणी 'तोच लिहायचा' असा मोह विद्यार्थ्यांना होतो; पण पाच-दहा वाक्यांनंतर आगळ्यावेगळ्या कल्पना सुचणे थांबले तर मात्र अडचण होते. ती होऊ नये यासाठी विविध स्वरूपाच्या कल्पना करण्याचा सराव, सवय असावी लागते. कल्पनेच्या दुनियेत रमण्याचा रियाज करावा लागतो. तसा तो फारसा अवघड नसतो. प्रयत्नातून तो साध्य होऊ शकतो.

एका कल्पनेतून दुसरी, दुसरीतून तिसरी, चौथी... अशी एकापेक्षा एक सुंदर सुंदर कल्पनांची साखळी जोडता आली पाहिजे. अनोख्या कल्पनांनी नटलेला निबंध वाचकाला नक्कीच गुंतवून ठेवतो.

**नमुना विषय–** मी अभिनेता/अभिनेत्री झालो/झाले तर...

(५) **वैचारिक निबंध –** वैचारिक निबंध म्हणजे विचारांवर आधारलेला निबंध होय. एखाद्या विचाराला, समस्येला प्राधान्य देऊन त्यासंबंधीची साधक-बाधक चर्चा करणारा निबंध म्हणजे वैचारिक निबंध होय. उदा., 'काय श्रेष्ठ? मन का मनगट?' असा विषय दिला असेल तर 'मन' आणि 'मनगट' या दोन्ही बाजूंचे गुणदोष, त्यांच्या संदर्भातील अनुकूल-प्रतिकूल मते, त्यांचे खंडन-मंडन, साधक-बाधक चर्चा, एखाद्या विषयासंबंधीचे चिंतन या सर्व गोष्टी वैचारिक निबंधलेखनात असणे अपेक्षित आहे. त्यामुळे निबंध एकांगी होत नाही. तसेच तो पूर्वग्रहदूषितही होणार नाही. अशा प्रकारच्या निबंधाच्या समारोपात निबंधलेखकाने कोणत्याही एका निश्चित निष्कर्षाप्रत पोहोचणे अपेक्षित असते. निबंधाच्या विषयाचा परिपूर्ण विचार कमीत कमी शब्दांत मांडण्याचे कौशल्य अशा प्रकारच्या निबंधात आवश्यक असते. अशा प्रकारच्या निबंधात केवळ गंभीर विषयच हाताळावेत असे नाही. हलकेफुलके विषयही पुरेशा गांभीर्याने हाताळता येतात. त्यासाठी लेखकाला विचारांची पद्धतशीर, तर्कशुद्ध मांडणी करता आली पाहिजे. आपले विचार पटवून देण्यासाठी या निबंधामध्ये दृष्टान्त, दाखले, उदाहरणे देता येतात.

**नमुना विषय–** मोबाईल शाप की वरदान, पर्यावरणापुढील आव्हाने, देशाच्या प्रगतीमधील महिलांचे योगदान.

## ◈ निबंधलेखनाची पूर्वतयारी

**प्रास्ताविक–** निबंधलेखनाची पूर्वतयारी जाणीवपूर्वक करावी लागते. त्यासाठी श्रवण, संभाषण, वाचन, लेखन, निरीक्षण, मनन-चिंतन, शब्दसंपत्ती विकास आणि लेखनसराव यांवर भर दिला पाहिजे.

(१) **श्रवण–** आतापर्यंत तुम्ही 'श्रवण' हे भाषिक कौशल्य बऱ्यापैकी आत्मसात केले आहेच. श्रवणातून शब्दसंपत्ती आणि विचारप्रक्रियेचा विकास होतो. त्यामुळे आता हेच कौशल्य आणखी वाढवायचे आहे. त्यासाठी सकस भाषणे, चर्चा ऐका. रेडिओ आणि दूरदर्शनवरील श्राव्य कार्यक्रम ऐका. वक्तृत्वस्पर्धांमधील भाषणे ऐका. आंतरजालावर उपलब्ध असलेली उत्तमोत्तम व्याख्याने ऐका. सुंदर, अर्थपूर्ण गाणी ऐका. तुम्ही बहुश्रुत व्हा. अशा श्रवणातून निबंधलेखनास उपयोगी पडेल अशी बरीचशी माहिती तुम्हांला मिळेल.

(२) **संभाषण–** संभाषणातून भाषेच्या उपयोजनाची संधी मिळते. विचाराला चालना मिळते. जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा वक्तृत्वस्पर्धांमध्ये, परिसंवादांमध्ये, चर्चांमध्ये सहभागी व्हा. आवडत्या विषयांवर बोला. शिक्षकांशी चर्चा करा. संधी मिळेल तिथे व्यक्त व्हा. त्यामुळे भाषेत सहजता, प्रवाहीपणा येण्यास मदत होईल. तो निबंध लेखनासाठी उपयुक्त ठरेल.

(३) **वाचन–** भरपूर वाचन करा. दैनिक वृत्तपत्रे, अन्य नियतकालिके, आवडीची पुस्तके वाचत राहा. आंतरजालावरही वाचनीय मजकूर उपलब्ध असतो, तो वाचा. पाठ्यपुस्तकातील गद्य-पद्य पाठांशी मिळतेजुळते लेखन, पूरक वाचन करत राहा. रसिक वाचक व्हा. वाचनाने भाषा विकसित होईल. शब्दसंपत्ती वाढेल. विचारांची मांडणी कळेल. विचाराला चालना मिळेल. सर्जनाची प्रेरणा मिळेल. निबंधलेखनासाठी निवडलेल्या विषयासंबंधाने वाचन करा.

(४) **लेखन–** तुमच्या श्रवण, संभाषण, वाचन यांमध्ये जे जे तुम्हांला आवडले, सुचले, पटले ते ते लिहून ठेवा. तुमच्या वाचनात, ऐकण्यात जी जी उपयुक्त माहिती येईल ती ती माहिती वहीत तत्परतेने लिहून ठेवा. ही माहिती फावल्या वेळात वाचत राहा. या माहितीचा वापर कोणत्या निबंधात, कसा, किती करता येईल याचा विचार करून ठेवा. आता हे सर्व करण्यासाठी मुद्दाम वेगळा वेळ काढण्याची गरज नाही. येता-जाता, विश्रांतीच्या वेळी, फावल्या, रिकाम्या वेळी तुम्ही हे सर्व करू शकता. हे सर्व सहजपणे, आवडीने करण्याची सवय लावून घ्या. यालाच व्यासंगाची सुरुवात म्हणतात. तो वाढवत न्या. विविध विषयांची सखोल माहिती लिखित स्वरूपात सतत जवळ ठेवणे हे तुमच्या निबंधलेखनाचे बीजभांडवल आहे. लेखनाच्या सरावामुळे विचारांमध्ये नेमकेपणा येऊन शब्दांकनाचा सराव होतो.

(५) **निरीक्षण–** आपल्याभोवती घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करा. एखादे प्रदर्शन, मंडई, रेल्वेस्टेशन, ग्रंथालय, उपाहारगृह, बाजार, मेळावे, सभा, संमेलने अशा ठिकाणी कोणकोणत्या घडामोडी घडत असतात, तिथली माणसे, त्यांचे संवाद, त्यांचा पेहराव, हालचाली इत्यादी सहजपणे बघत राहा. निसर्गाचे, पशुपक्ष्यांचे, क्रिकेट मॅचचे, रहदारीचे निरीक्षण करा. हे सर्व येता-जाता होऊ शकते. या निरीक्षणांमधून तुम्हांला साध्या साध्या गोष्टींमध्येही मोठा आशय गवसेल; जो निबंधलेखनाला उपयोगी पडू शकतो. विशेषत: वर्णनात्मक निबंधात हे निरीक्षण तुम्हांला खूपच उपयोगी पडेल.

(६) **शब्दसंपत्ती विकास–** शब्दांचे माहात्म्य संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी पुढील ओवीत असे सांगितले आहे.

**जैसें बिंब तरी बचकें एवढें । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।**
**शब्दांची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ।।**

– 'श्रीज्ञानेश्वरी', अध्याय ४ था, ओवी क्र.२१५

'जसे सूर्यबिंब दिसायला तळहाताएवढेच दिसते; पण त्रिभुवने उणी पडावीत इतका त्याचा प्रकाश असतो! अगदी त्याचप्रमाणे शब्दांचे व्यापकपणही तुमच्या अनुभवास येईल.'

उत्तम निबंधलेखनासाठी शब्दनिवडीचे महत्त्व सर्वांत जास्त असते, म्हणून तुम्ही शब्दांची संपत्ती मिळवा, वाढवा. शब्दश्रीमंत व्हा. या शब्दश्रीमंतीचा अचूक, नेमका, योग्य आणि परिणामकारक वापर केव्हा आणि कसा करायचा याचे कौशल्य आत्मसात करा. समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, एका शब्दाबद्दल अनेक शब्द, अनेक शब्दांबद्दल एक शब्द, तत्सम शब्द, सुंदर वचने, वाक्प्रचार, म्हणी, काव्यपंक्ती, संस्मरणीय अवतरणे, आलंकारिक वाक्ये, छोटेसे चुटके इत्यादींचा संग्रह तुमच्याकडे असला पाहिजे.

(७) **सराव–** उत्तम निबंध लिहिता यावा यासाठी 'लेखन सराव' हवाच. एकाच निबंधाची सुरुवात वेगवेगळ्या पद्धतींनी कशी करता येईल, एकाच निबंधाचा समारोप वेगवेगळ्या प्रकारांनी कसा करता येईल, एकाच निबंधाचा मध्य वेगवेगळ्या मुद्द्यांनी कसा विस्तारित करता येईल याचा सराव करा. 'करून तर पाहा!' रोज आठ ते दहा वाक्ये लिहिल्याशिवाय झोपू नका. प्रसंगी पाठ्यपुस्तकातला एखादा उतारा लिहा; पण लिहा. लिहिण्याचा सराव ही उत्तम निबंधलेखनाची सर्वांत उत्तम पूर्वतयारी आहे. स्वत:च्या शब्दांत, स्वत:चे अनुभव लिहिणे हा उत्तम सराव आहे.

थोडक्यात, उत्तम निबंधलेखनाची पूर्वतयारी करणे म्हणजे सर्वांगाने व्यासंगी होणे होय. लेखन विषय क्रमाक्रमाने कसा फुलवता येईल, तो सुसूत्रपणे कसा मांडता येईल, त्यासाठी स्वत:चे शब्द, स्वत:ची भाषा, स्वत:ची शैली कशी विकसित करता येईल याचा विचार केला पाहिजे, चिंतन-मनन केले पाहिजे. आपले लेखन सहज, सुलभ, प्रवाही, अर्थवाही शब्दांत कसे होईल, वाचकांना ते वाचावेसे कसे वाटेल हा विचार मनात सतत घोळू द्यावा.

### ◈ उत्तम निबंधलेखन कसे करावे?

निबंधलेखन करताना खालील बाबी महत्त्वाच्या असतात.

- आकर्षक सुरुवात, एकात एक गुंफलेले सयुक्तिक मुद्दे, परिणामकारक शेवट.
- म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते इत्यादींचा सुयोग्य वापर.
- अवतरणांचा गरजेनुसार आणि प्रमाणशीर वापर.
- अर्थपूर्ण शब्दरचना.
- विरामचिन्हांचा आवश्यक तेथे वापर.
- परिच्छेद रचना.
- लेखननियमांनुसार सुवाच्य लेखन.
- प्रासादिक भाषाशैली.
- पाल्हाळ आणि पुनरुक्ती होणार नाही, याबाबत घेतली जाणारी दक्षता.
- स्वत:च्या शब्दांत अभिव्यक्ती असावी. अन्य ठिकाणाहून मजकूर उतरवून काढलेला नसावा.

### ◈ समारोप

याठिकाणी उत्कृष्ट निबंध कसा लिहावा यासंबंधीचे विवेचन केले आहे. मात्र सुरुवातीलाच असा निबंध लिहिता येईल असे नाही. अथवा यामधील सर्व अपेक्षा इयत्ता बारावीमधील निबंधलेखनासाठी जशाच्या तशा लागू होतील असेही नाही; परंतु भविष्यात महाविद्यालयीन स्तरावर, स्पर्धा परीक्षांसाठी अथवा एखाद्या स्पर्धेत सहभागी होताना हे विवेचन मार्गदर्शक ठरेल.

## कृती

- खालील विषयांवर निबंधलेखन करा.

**वर्णनात्मक निबंध –**
* पहाटेचे सौंदर्य.
* आमची अविस्मरणीय सहल.

**व्यक्तिचित्रणात्मक निबंध –**
* माझा आवडता कलावंत.
* माझे आवडते शिक्षक.

**आत्मवृत्तात्मक निबंध –**
* मी सह्याद्री बोलतोय.
* वृत्तपत्राचे मनोगत.

**कल्पनाप्रधान निबंध –**
* सूर्य मावळला नाही तर...
* पेट्रोल संपले तर...

**वैचारिक निबंध –**
* तंत्रज्ञानाची किमया.
* वाचते होऊया.

❀❀❀

# परिशिष्टे

## पारिभाषिक शब्द

विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, कृषी, शिक्षण, प्रशासन, विधी, वाणिज्य, कला आणि संस्कृती इत्यादी क्षेत्रांशी संबंधित संकल्पनांच्या प्रकटीकरणासाठी पारिभाषिक शब्दांचा वापर केला जातो. त्यांच्या वापरामुळे त्या-त्या क्षेत्रांमधील ज्ञानव्यवहार अधिक नेमका आणि सुस्पष्ट होतो. त्यादृष्टीने पारिभाषिक शब्दांना अनन्यसाधारण महत्त्व असते. याठिकाणी तुमच्या माहितीसाठी काही महत्त्वाचे पारिभाषिक शब्द दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| Abbreviation | संक्षेप, संक्षिप्त रूप | Civil law | दिवाणी कायदा |
| Abstract | गोषवारा, सार | Classical | अभिजात |
| Acceptance | स्वीकृती | Compensation | भरपाई |
| Agreement | करार | Consent | संमती |
| Achievement | संपादणूक, कामगिरी | Copyright | प्रताधिकार |
| Administrator | प्रशासक | Council | समिती, परिषद |
| Affidavit | प्रतिज्ञापत्र | Custom duty | सीमाशुल्क |
| Agitation | आंदोलन | Dearness Allowance | महागाई भत्ता |
| Approval | मंजुरी, अनुमोदन | Decoding | नि:संकेतन |
| Archaeology | पुरातत्वशास्त्र | Demography | लोकसंख्याशास्त्र |
| Audit | लेखापरीक्षा | Deputation | प्रतिनियुक्ती |
| Banquet | मेजवानी | Delegation | प्रतिनिधी मंडळ |
| Ballot Box | मतपेटी | Diagnosis | रोगनिदान |
| Bond | लिखितबंधपत्र | Dictatorship | हुकूमशाही |
| Beneficiary | लाभार्थी | Dietitian | आहारतज्ज्ञ |
| Boycott | बहिष्कार | Dispute | वाद, तंटा |
| Calligraphy | अक्षररेखनकला | Ecologist | पर्यावरणतज्ज्ञ |
| Caption | मथळा | Etiquette | शिष्टाचार |
| Cardiologist | हृदयरोगतज्ज्ञ | Emergency | आणीबाणी |
| Census | जनगणना | Excise Duty | उत्पादनशुल्क |
| Chartered Accountant | सनदी लेखापाल | Express Way | द्रुतगती मार्ग |
| Chief Justice | मुख्य न्यायाधीश | Felicitation | गौरव, सत्कार |
| Child welfare | बालकल्याण | Financial Year | वित्तीय वर्ष |
| Civil defence | नागरी संरक्षण | Forecast | पूर्वानुमान |

| | | | |
|---|---|---|---|
| Forestation | वनीकरण | Nutrition | पोषण |
| Gift deed | दान पत्र | Ordinance | अध्यादेश, वटहुकूम |
| Government Resolution | शासननिर्णय | Pedagogy | अध्यापनशास्त्र |
| Gradation | श्रेणी, प्रतवारी | Penalty | दंड, शास्ती |
| Habitat | वसतिस्थान | Personal Assistant | स्वीय सहायक |
| Honorary | मानद | Preamble | उद्देशिका |
| Horticulture | उद्यानविद्या, फलोत्पादन | Prevention | प्रतिबंध |
| | | Quality Control | गुणवत्ता नियंत्रण |
| Hypothesis | परिकल्पना, गृहीतकृत्य | Quorum | गणपूर्ती |
| | | Recommendation | शिफारस |
| Instructor | निदेशक | Remote Sensing | दूरसंवेदन, दूरस्थ |
| Intake capacity | प्रवेशक्षमता | Salient Feature | ठळक मुद्दे, वैशिष्ट्ये |
| Intelligence | बुद्धिमत्ता | Scrutiny | परिनिरीक्षण, छाननी |
| Interpreter | दुभाषक | Souvenir | स्मरणिका |
| Intervention | हस्तक्षेप | Stipend | विद्यावेतन, शिष्यवृत्ती |
| Judgement | न्यायनिर्णय | | |
| Juvenile court | बाल न्यायालय | Registrar | निबंधक |
| Letter of Guarantee | हमीपत्र | Surveyor | सर्वेक्षक |
| Layout | मांडणी, आराखडा | Suspension | निलंबन |
| Liability | दायित्व | Symposium | परिसंवाद |
| Linguistics | भाषाशास्त्र | Treasurer | कोषाध्यक्ष |
| Magistrate | दंडाधिकारी | Unlawful | बेकायदेशीर |
| Mandate | हुकूम/जनादेश | Vaccination | लसीकरण |
| Manual | नियमपुस्तिका | Value Added Tax | मूल्यवर्धित कर |
| Manuscript | हस्तलिखित | Veterinary | पशुवैद्यक |
| Mechanics | यंत्रशास्त्र | Veto | नकाराधिकार |
| Migration | स्थलांतर | Viva voce | मौखिक परीक्षा |
| Meteorology | हवामानशास्त्र | Volunteer | स्वयंसेवक |
| Millennium | सहस्रक | Wage policy | वेतन धोरण |
| Mortgage | गहाण | Yield | उत्पन्न |
| Mass Communication | जनसंप्रेषण | Zero hour | शून्य काल |
| Motto | ब्रीदवाक्य | Zoology | प्राणिशास्त्र |

## साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिकांची नावे व साहित्यकृती

| वर्ष | लेखक/लेखिका | पुस्तकाचे नाव | साहित्यप्रकार |
|---|---|---|---|
| १९५५ | लक्ष्मणशास्त्री जोशी | वैदिक संस्कृतीचा विकास | सांस्कृतिक इतिहास |
| १९५६ | बाळ सीताराम मर्ढेकर | सौंदर्य आणि साहित्य | सौंदर्यशास्त्र |
| १९५८ | चिंतामण गणेश कोल्हटकर | बहुरूपी | आत्मचरित्र |
| १९५९ | गणेश त्र्यंबक देशपांडे | भारतीय साहित्यशास्त्र | समीक्षा |
| १९६० | विष्णू सखाराम खांडेकर | ययाति | कादंबरी |
| १९६१ | दत्तात्रेय नरसिंह गोखले | डॉ. केतकर | चरित्र |
| १९६२ | पुरुषोत्तम यशवंत देशपांडे | अनामिकाची चिंतनिका | तत्वज्ञान |
| १९६३ | श्रीपाद नारायण पेंडसे | रथचक्र | कादंबरी |
| १९६४ | रणजित देसाई | स्वामी | कादंबरी |
| १९६५ | पु. ल. देशपांडे | व्यक्ती आणि वल्ली | व्यक्तिचित्रण |
| १९६६ | त्र्यंबक शंकर शेजवलकर | श्री शिव छत्रपती | ऐतिहासिक संशोधन |
| १९६७ | नारायण गोविंद कालेलकर | भाषा : इतिहास आणि भूगोल | भाषाशास्त्र |
| १९६८ | इरावती कर्वे | युगान्त | ललित लेखसंग्रह |
| १९६९ | श्रीनिवास नारायण बनहट्टी | नाट्याचार्य देवल | चरित्र |
| १९७० | नरहर रघुनाथ फाटक | आदर्श भारत सेवक | चरित्र |
| १९७१ | दुर्गा भागवत | पैस | निबंधसंग्रह |
| १९७२ | गोदावरी परुळेकर | जेव्हा माणूस जागा होतो | आत्मकथन |
| १९७३ | जी. ए. कुलकर्णी | काजळमाया | कथासंग्रह |
| १९७४ | वि. वा. शिरवाडकर | नटसम्राट | नाटक |
| १९७५ | रा. भा. पाटणकर | सौंदर्यमीमांसा | सौंदर्यशास्त्र |
| १९७६ | गो. नी. दांडेकर | स्मरणगाथा | आत्मकथन |
| १९७७ | आत्माराम रावजी देशपांडे उर्फ अनिल | दशपदी | कवितासंग्रह |

| | | | |
|---|---|---|---|
| १९७८ | चिंतामणी त्र्यंबक खानोलकर | नक्षत्रांचे देणे | कवितासंग्रह |
| १९७९ | शरश्चंद्र मुक्तिबोध | सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य | समीक्षा |
| १९८० | मंगेश पाडगावकर | सलाम | काव्यसंग्रह |
| १९८१ | लक्ष्मण माने | उपरा | आत्मकथन |
| १९८२ | प्रभाकर पाध्ये | सौंदर्यानुभव | समीक्षा |
| १९८३ | व्यंकटेश माडगूळकर | सत्तांतर | कादंबरी |
| १९८४ | इंदिरा संत | गर्भरेशीम | कवितासंग्रह |
| १९८५ | विश्राम बेडेकर | एक झाड दोन पक्षी | आत्मचरित्र |
| १९८६ | ना. घ. देशपांडे | खूणगाठी | कवितासंग्रह |
| १९८७ | रामचंद्र चिंतामण ढेरे | श्री विठ्ठल : एक महासमन्वय | संशोधन |
| १९८८ | लक्ष्मण गायकवाड | उचल्या | आत्मकथन |
| १९८९ | प्रभाकर उध्वरेषे | हरवलेले दिवस | आत्मचरित्र |
| १९९० | आनंद यादव | झोंबी | कादंबरी |
| १९९१ | भालचंद्र नेमाडे | टीकास्वयंवर | समीक्षा |
| १९९२ | विश्वास पाटील | झाडाझडती | कादंबरी |
| १९९३ | विजया राजाध्यक्ष | मर्ढेकरांची कविता | समीक्षा |
| १९९४ | दिलीप चित्रे | एकूण कविता-१ | कवितासंग्रह |
| १९९५ | नामदेव कांबळे | राघववेळ | कादंबरी |
| १९९६ | गंगाधर गाडगीळ | एका मुंगीचे महाभारत | आत्मचरित्र |
| १९९७ | मधुकर वासुदेव धोंड | ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी | समीक्षा |
| १९९८ | सदानंद मोरे | तुकाराम दर्शन | समीक्षा |
| १९९९ | रंगनाथ पठारे | ताम्रपट | कादंबरी |
| २००० | नामदेव धोंडो महानोर | पानझड | कवितासंग्रह |
| २००१ | राजन गवस | तणकट | कादंबरी |
| २००२ | महेश एलकुंचवार | युगान्त | नाटक |

| | | | |
|---|---|---|---|
| २००३ | त्र्यं. वि. सरदेशमुख | डांगोरा एका नगरीचा | कादंबरी |
| २००४ | सदानंद देशमुख | बारोमास | कादंबरी |
| २००५ | अरुण कोलटकर | भिजकी वही | कवितासंग्रह |
| २००६ | आशा बगे | भूमी | कादंबरी |
| २००७ | गो. मा. पवार | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य | चरित्र |
| २००८ | श्याम मनोहर | उत्सुकतेने मी झोपलो | कादंबरी |
| २००९ | वसंत आबाजी डहाके | चित्रलिपी | कवितासंग्रह |
| २०१० | अशोक केळकर | रुजुवात | समीक्षा |
| २०११ | माणिक गोडघाटे ''ग्रेस'' | वाऱ्याने हलते रान | निबंधसंग्रह |
| २०१२ | जयंत पवार | फिनिक्सच्या राखेतून उठला मोर | लघुकथा संग्रह |
| २०१३ | सतीश काळसेकर | वाचणाऱ्याची रोजनिशी | निबंधसंग्रह |
| २०१४ | जयंत विष्णु नारळीकर | चार नगरातले माझे विश्व | आत्मचरित्र |
| २०१५ | अरुण खोपकर | चलत्-चित्रव्यूह | संस्मरण |
| २०१६ | आसाराम लोमटे | आलोक | लघुकथा |
| २०१७ | श्रीकांत देशमुख | बोलावे ते आम्ही | कवितासंग्रह |
| २०१८ | म. सु. पाटील | सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध | समीक्षा |
| २०१९ | अनुराधा पाटील | कदाचित अजूनही | कवितासंग्रह |

# शब्दार्थ व वाक्प्रचार

पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता यांमध्ये आलेले अपरिचित शब्द, वाक्प्रचार यांचे अर्थ खाली दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी वहीत शब्दकोशाप्रमाणे (अकारविल्हे) करावी.

### ◆ वेगवशता

**अगतिक होणे**– निरूपाय होणे.

**अवखळ**– अनिर्बंध.

**यथासांग**– योग्यप्रकारे.

**जाचदायक**– त्रासदायक.

**त्वरा**– घाई.

**अनिवार**– अमर्याद, अतिशय.

**व्यग्रता**– अस्वस्थता.

### ◆ रोज मातीत (कविता)

**हिरवं गोंदणे**– गोंदणाच्या नक्षीसारखी लावलेली हिरवी रोपे.

**बेणं दाबणे**– ऊसाचे तुकडे (कांड्या) शेतातील सरीमध्ये पायाने दाबून लावणे.

### ◆ आयुष्य... आनंदाचा उत्सव

**हुलकावण्या देणे**– चकवणे.

**रुखरुख**– काळजी, टोचणी.

**ईर्ष्या**– मत्सर, हेवा.

**असूया**– द्‌वेष.

**वैषम्य**– दु:ख, खेद.

**पारखे होणे**– दुरावणे.

**निरागस**– निष्पाप.

**विसर्ग देणे**– सोडून देणे.

### ◆ रे थांब जरा आषाढघना (कविता)

**दिठि** – दृष्टी, नजर.

**प्रवाळ** – पोवळे.

**इंद्रनीळ**– निळ्या रंगाचे एक रत्न.

**पदविन्यासखुणा**– पाऊलखुणा.

**आसर**– पावसाळ्यातील उघडीप.

**वासरमणि**– सूर्य.

**हळदुव्या**– हळदीच्या रंगाचे.

**जिवस**– पौष्टिक.

**अरळ**– अलवार.

**पिसोळी**– फुलपाखरू.

**विधुवदना**– चंद्रबिंबाला.

### ◆ वीरांना सलामी

**उत्पात होणे**– अनर्थ होणे.

**भाट**– स्तुति–गीत गाणारे, स्तुतिपाठक.

**कवन**– काव्य.

**कॉनव्हॉय**– एकत्रितपणे प्रवास करणारा गाड्यांचा ताफा.

**अदब**– विनय, नम्रता, आदर.

**मायेची पाखर घालणे**– प्रेम करणे.

**तैनात असणे**– सज्ज असणे.

**दुरापास्त**– कठीण, अवघड.

**हौसला**– मनोबल.

**बुलंद**– मजबूत, भक्कम.

**मळभ दूर होणे**– गैरसमज दूर होणे.

**मुखवटा चढवणे**– मुळात नसलेले रूप धारण करणे.

**कार्यव्यग्र असणे**– कामात गर्क असणे.

**जमीन अस्मानचा फरक असणे**– खूपच फरक असणे.

**मर्दुमकी गाजवणे**– खूप मोठा पराक्रम करणे.

### ◆ रंग माझा वेगळा (कविता)

**गुंता**– गुंतागुंत.

**गळा कापणे**– विश्वासघात करणे.

**तात्पर्य**– सार.

### ◆ विंचू चावला, विंचू चावला (भारूड)

**इंगळी**– विंचवाची एक जात, मोठा विंचू.

**दारुण**– दु:सह, सोसण्यास कठीण, भयंकर.

**उतारा**– वेदनेची तीव्रता कमी होण्यासाठी केलेले उपचार, मनुष्याच्या अंगी असणाऱ्या दुर्गुणांची तीव्रता कमी करण्यासाठी केली जाणारी सत्वगुणांची उपाययोजना.

**तमोगुण**– तामसी वृत्ती.

**फुणफुण**– जखमेची चुरचुर, आग.

### ◆ रेशीमबंध

**मन समेवर येणे**– मन शांत व एकरूप होणे.

**असोशी**– सोस, हव्यास.

**आदिम**– पहिला, मूळचा.

**ऋजु**– सहज, सरळ.

**नजाकत**– सुबकपणा.

**वास्तपुस्त करणे**– चौकशी करणे.

**इंगित**– अंतस्थ हेतू, अंतस्थ गुपित.

### ◆ समुद्र कोंडून पडलाय (कविता)

**संत्रस्त**– अतिशय त्रासलेला.

**झिंज्या**– डोक्यावरचे वाढलेले, विस्कटलेले केस.

### ◆ दंतकथा

**मेख**– खोच, गूढ गोष्ट.

**चारीमुंड्या चीत होणे**– पराभूत होणे.

**पाक पशार होणे**– पळून जाणे.

**नक्षा उतरणे**– अभिमान गळून पडणे.

**शंख करणे**– ओरडणे.

**मामुली**– सामान्य, किरकोळ.

**असार**– निरर्थक, सारहीन.

**फितुर होणे**– दगाबाजी करणे.

**खलदंत**– त्रास देणारा दात.

**नतद्रष्ट**– खाष्ट, दुष्ट.

**खल करणे**– निरर्थक चर्चा करणे.

### ◆ आरशातली स्त्री (कविता)

**घनगर्द**– दाट, निबिड.

### ◆ रंगरेषा व्यंगरेषा

**स्रोत**– उगमस्थान.

**स्वारस्य नसणे**– स्वाभाविक, नैसर्गिक इच्छा नसणे.

**गाफिलपणे**– बेसावधपणे.

**इझेल**– चित्रकलेसाठी वापरायचे लाकडी स्टँड.

### ◆ गढी

**सेजून**– जवळून.

**कराळी**– काठावर.

**कारयकरमाचं**– कार्यक्रमाचं.

**आवतन**– आमंत्रण.

**हळ्या**– कावळा.

**आकळ्याइले**– आकड्यांना.

**उचापती**– त्रास देणारे.

**एक खळकूई**– एक पैसाही.

**कुठूठूल्ल**– कुठलं.

**लोग**– पर्यंत.

**उनायायल्या**– उन्हाळ्यातल्या.

**तपेल फफूटा**– तापलेली बारीक माती.

**मऱ्याच्या**– मृत्यूच्या.

**गुळी**– जन्माची बातमी.

**झाकुल्यात**– अंधारात (पहाटेला).

**पालट पळला नायी**– फरक पडला नाही.

**पळीत**– पडीक.

**कावूरल्यावानी**– चिंताक्रांत.

**सवतंतरानई**– स्वातंत्र्यानंही.

**भारमसूद**– भारदस्त.

**कोकोऽ करणे**– आरडाओरडा करणे.

**भोंड**– भोवळ, ग्लानी, चक्कर.

**नासुकला हळ्या**– क्षुल्लक कावळा.


**इरल्यावानी**– विरल्यासारखे.

**मले पा आन् फुलं वहा**– माझीच री ओढा/ माझंच कौतुक करा.

**त्याइचा जीव अंदरल्या अंदर लोये**– त्याचा जीव आतल्या आत व्याकूळ होतो.

**चाल व्हयरे पोरा आन् वयरे ढोरा**– किंमत न देता कोणालाही कामाला लावणे.

**एका दुकळीत**– एका ढेंगेत.





**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११००४.**

मराठी युवकभारती, इयत्ता बारावी (मराठी भाषा) ₹ १०४.००